23-07-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
SGJ/ ST/ D/ 11:00

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

(माननीय सभापती आसनस्थ होत असताना सभागृहातील काही सन्माननीय सदस्य 'जय महाराष्ट्र' तर काही सन्माननीय सदस्य 'जय विदर्भ' बोलतात.)

**सभापती** :सभ्य आणि सन्माननीय सदस्यांना याबाबतीत मी कालच सूचना दिली होती ती पाळणे आवश्यक आहे. ज्यांनी असे उच्चारले असेल त्यांनी यानंतर तसे उच्चारण टाळावे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## पृ.शी./मु.शी. : तोंडी उत्तरे

### राज्यातील १५ जिल्ह्यांमध्ये दुर्गम आदिवासी भागातील अन्न-धान्याच्या खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१) * ४२८८३ श्री. विजय गिरकर, श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दरवर्षी पावसाळ्यात जून ते सप्टेंबर या महिन्यांमध्ये राज्यामधील १५ जिल्ह्यामधील दुर्गम आदिवासी भागात कोणतेच काम उपलब्ध होत नसल्यामुळे आदिवासींची उपासमार होऊ नये म्हणून काही रोख रक्कम व उर्वरित अन्न-धान्याच्या स्वरुपात आदिवासी विभागातून खावटी कर्जरुपाने दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१२-१३ या वर्षासाठी एक लाख ८० हजार आदिवासींसाठी ६० कोटी रुपयांचा तांदूळ व गहू खरेदी करण्यात आला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, बाजारात गहू १५ रुपये किलो तर तांदूळ १६ रुपये ५० पैसे किलो दराने उपलब्ध असतानाही आदिवासी विभागाने १८ रुपये ५० पैसे दराने गहू आणि २३ रुपये दराने तांदुळाची खरेदी केली, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, तांदूळ व गहू व्यतिरिक्त मिरची पावडर, डाळी, मीठ आदीची खरेदी बाजारभावापेक्षा वीस टक्के जास्त दराने करण्यात आली, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, यावर्षी खरेदी करण्यात आलेल्या ६० कोटींच्या खरेदीत प्रचंड गैरव्यवहार झाला असल्याचे निष्पन्न झाल्यामुळे याप्रकरणी संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेंद्र गावित, श्री.मधुकरराव पिचड यांच्या करिता** : (१) होय. तथापि, सन २०१३-१४ करिता खावटी कर्जाची रक्कम १००% रोखीने चेकद्वारे देण्यात येणार आहे.
(२) सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरिता खावटी कर्ज वाटप योजनेसाठी १,९९,९५८ इतके लाभार्थी निश्चित करण्यात आले होते. खावटी कर्ज वाटपासाठी १.३४ लक्ष क्विंटल गहू मूल्य रक्कम रु.२१.१२ कोटी व ०.३२ लक्ष क्विंटल तांदूळ मूल्य रक्कम रु.६.३३ कोटी अशी एकूण रु.२७.४५ कोटी रक्कम खर्च करण्यात आली आहे.
(३) व (४) नाही

खावटी कर्ज वाटप योजनेतील अन्नधान्य हे आयुक्त आदिवासी विकास, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या खरेदी समिती क्र.१ ने निश्चित केलेल्या दरानुसार खरेदी करण्यात येते. अन्नधान्याचे दर निश्चित करतांना सदर समितीने कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा सांख्यिकी अधिकारी, दैनिक वृत्तपत्रातील दर व स्थानिक घाऊक व्यापाऱ्यांचे बाजारभाव यांच्याकडील प्राप्त दरांशी तुलना करुन गुणात्मकदृष्ट्या चांगल्या प्रतीचा माल खरेदी केला आहे. महामंडळाने प्रति क्विंटल गहू (लोकवन) रु.१५७५ व तांदूळ (परिमल) रु.१९५० या दराने खरेदी केले आहेत. तसेच अन्नधान्याव्यतिरिक्त मिरची पूड, हळद पुड, डाळी व मीठ या वस्तू गुणात्मकदृष्ट्या व चांगल्या प्रतीच्या, ब्रँडेड खरेदी करण्यात आलेल्या आहेत.
(५) व (६) चौकशी करण्यांत येईल.

..३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र गावित ...

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने ३ व ४ क्रमांकाच्या उत्तरामध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करु इच्छितो.

महामंडळाने प्रति क्विंटल गहू लोकवन रुपये १५७५ व तांदूळ परिमल रु.१९५० या दराने खरेदी केला आहे या ऐवजी "महामंडळाने प्रति क्विंटल गहू लोकवन रुपये १८७५ व तांदुळ परिमल २२५० रुपये असे खरेदी केले आहे" असे वाचावे.

श्री. विजय गिरकर : सभापती महोदय, आदिवासी क्षेत्रामध्ये सर्वअर्थाने जो भ्रष्टाचार बोकाळलेला आहे किंवा जे आदिवासी सावकारी पाशात अडकले आहेत त्यांना त्यातून बाहेर काढण्यासाठी शासन कोणती पावले उचणार आहे?

श्री. मधुकरराव पिचड : सभापती महोदय, आदिवासींना वस्तू रुपाने धान्याची खावटी वाटली जाणार नाही याबाबत शासनाने जाणीवपूर्वक निर्णय घेतला असून आदिवासींना या पुढे बँकेमध्ये झीरो अकाऊंटने खाते उघडून खावटी कर्जाचे पैसे चेकच्या स्वरुपात देण्याच्या संदर्भात शासनाने कार्यवाही सुरु केलेली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, खावटी कर्जाची योजना अतिशय चांगली होती. परंतु खावटी कर्जामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाल्यामुळे आता आदिवासींना चेकच्या स्वरुपात पैसे उपलब्ध होणार आहेत अशी माहिती आताच माननीय मंत्री महोदयांनी दिलेली आहे. कुपोषित बालकांच्या पालकांना आपण खावटी कर्ज देता काय, किंवा यापुढे दिले जाणार आहे काय ? मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मी जेव्हा आदिवासी क्षेत्रातील कुपोषणाच्या संदर्भात फिरत असतो तेव्हा आपले मुल ग्रेड ४ मध्ये म्हणजे सॅम मध्ये राहिले तरच मला खावटी कर्ज मिळेल अशी मानसिकता आदिवासी पालकांमध्ये झालेली आहे. कुपोषित बालकाचे पालक जाणीवपूर्वक बालविकास केंद्रात घेऊन जात नाही असे माझ्या निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे राज्य शासन खावटी कर्जाच्या संदर्भात आपला दृष्टिकोन मोठा करणार आहे काय ?

श्री. मधुकरराव पिचड : सन्माननीय सभापती महोदय, ग्रेड ३ व ग्रेड ४ मधील बालकांच्या पालकांची आर्थिक परिस्थिती अडचणीची असल्यामुळेच आपण त्यांना खावटी कर्ज देत असतो. परंतु सन्माननीय सदस्य या विषयाच्या संदर्भात जे काही सांगत आहे तशा प्रकारची मानसिकता त्यांच्यामध्ये तयार होऊ नये यासाठी ज्या काही उपाययोजना करण्याची गरज असेल त्या नक्की



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :** ४२८८३......

श्री. मधुकरराव पिचड.....

केल्या जातील. आता अन्न सुरक्षा बिल येणार आहे त्या योजनेमध्ये जवळपास ९० ते ९५ टक्के आदिवासी कव्हर होणार असून त्यांना १.५० ते २.०० रुपये या दराने धान्य मिळणार असल्यामुळे त्यामध्ये आदिवासीचा फायदाच होणार आहे. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे ती तपासून कुपोषित बालके राहू नये यासंदर्भातील मनोवृत्ती बदलण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, खावटी कर्जाचा दर वर्षी कोटा मंजूर केला जातो व तेवढयाच लोकांना खावटी कर्जाचे वाटप होते व बाकीच्या लोकांना खावटी कर्ज दिले जात नाही. त्यामुळे यावर्षी खावटी कर्जासाठी आलेल्या सर्व अर्जदारांना खावटी कर्ज देणार आहात काय ? सर्व आदिवासींना कुपोषणापासून दूर ठेवण्यासाठी खावटी कर्जाची योजना सर्वत्र राबविणार आहात काय ?

श्री. मधुकरराव पिचड : सभापती महोदय, या योजनेमध्ये ७० टक्के कर्ज आणि ३० टक्के सबसिडी दिली जाते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42883...

श्री.मधुकरराव पिचड....

जे थकबाकीदार असतात त्यांना आपण कर्ज देऊ शकत नाही. शासनाने यापूर्वी 1989 मध्ये निर्णय घेतला आणि त्यावेळी रूपये 2 कोटी 47 लाख कर्ज फेडले. दिनांक 20 जुलै 2004 रोजी निर्णय घेतला आणि त्यावेळी 41 कोटी 73 लाख रूपये कर्जाला माफी देण्यात आली. जून 2009 रोजी शासनाने निर्णय घेतला आणि त्यावेळी रूपये 184 कोटी 37 लाख कर्ज माफ केले. अशा प्रकारे कर्ज माफी करून देखील आजही थकबाकीदार आहेत. थकबाकीदार राहू नयेत म्हणून योजनेत थोडा बदल करावा लागेल. कर्ज जास्त असल्यामुळे सबसिडीची योजना कशी करता येईल यासंबंधी शासन निश्चितच विचार करीत असून एक सुलभ योजना देण्याचा विचार करण्यात येत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन 2012-13 मध्ये 1 लाख 99 हजार 998 लाभार्थींची यादी निश्चित करण्यात आली होती. सन 2013-14 मध्ये किती लाभार्थींची यादी निश्चित केली आहे, त्यासाठी निकष काय आहेत ? यात 60 कोटी रूपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. त्याची चौकशी शासन केव्हा करणार आहे व सदर चौकशी किती कालावधीमध्ये पूर्ण होणार आहे ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, खावटी दिल्यानंतर गेल्या 20-25 वर्षामध्ये किती आदिवासींची उन्नती झाली आहे याचा अभ्यास शासनाने केला आहे काय ?

श्री.मधुकरराव पिचड : सभापती महोदय, या वर्षी या योजनेतून 77 हजार आदिवासींना लाभ देण्यात येईल. मी सांगितल्याप्रमाणे थकबाकीदाराचे प्रमाण वाढलेले आहे. या योजनेत भ्रष्टाचार झाला आहे काय, असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. दर ठरविण्यासाठी समिती आहे. या समितीने आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडील रूपये 2200 चा दर लक्षात घेतला होता. महिला व बालकल्याण विभाग यांच्याकडून दर घेतले होते. त्यांचे दर रूपये 2100 होते. कृषी उत्पन्न बाजार समिती, नाशिक यांचे दर रूपये 1800 होते. सांख्यिकी विभाग यांचे दर रूपये 1800 होते, नाशिक किरकोळ व्यापारी संघ यांचे दर रूपये 1800 होते. हे सर्व दर लक्षात घेऊन त्यांनी ॲव्हरेज रेट काढलेला आहे. तरी देखील सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या प्रकरणाची चौकशी केली जाईल. हे योग्य झाले आहे किंवा नाही, हे पाहिले जाईल. यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकरराव पिचड....

आपण अगोदरच सुधारणा केली आहे. आता आपण खरेदीच करीत नाही. आता आपण रोखीनेच रक्कम वाटण्याची व्यवस्था केलेली आहे. तेव्हा यात अनियमितता झाली आहे किंवा नाही हे तपासून पाहण्यात येईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, अतिशय महत्त्वाच्या विषयावर प्रश्नोत्तरे होत आहेत. मी तीन प्रश्न माननीय मंत्रिमहोदयांना विचारणार आहे. आपण गेल्या वेळी खावटी कर्ज दिले होते. त्याचे आपण रेट सांगितले आहे. हे सांगताना आयुक्त, आदिवासी विभाग, नाशिक, महिला व बालकल्याण यांच्या रेटचा संदर्भ दिला आहे. माझा त्यालाच आक्षेप आहे. माझे तर म्हणणे आहे की, आयुक्त पातळी पासूनच भ्रष्टाचार होत आहे. आज पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी माहितीच्या अधिकारा खाली मिळालेली सगळी माहिती मंत्री महोदयांना देणार आहे. श्री.जॉनी जोसेफ या विभागाचे सचिव असताना त्यांनी न्यायालयामध्ये प्रतिज्ञापत्र सादर केले होते. त्यात त्यांनी नमूद केले होते की, आदिवासींसाठी करण्यात येणारी खरेदी अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या दरानेच करणार आहोत. अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र सचिवांनी त्यावेळी न्यायालयाला सादर केले आहे. त्या प्रतिज्ञापत्राचा भंग या खरेदीच्या अन्वये झाला आहे काय ? पावसाळ्यामध्ये आदिवासींच्या हाताला काम नसल्यामुळे पावसाळ्यात खावटी वाटली जाते. तसा निर्णय देखील शासनाने घेतला आहे. यामध्ये शासनाचा हेतू शुद्ध आहे. मागच्या वर्षी ही खावटी पावसाळ्या नंतर देण्यात आली आहे. म्हणजे पावसाळ्यात आदिवासी उपाशी राहिलेत. ही खावटी आपण कंत्राटदारासाठी काढत आहात की, आदिवासींसाठी वाटत आहात असा प्रश्न निर्माण होत आहे. आदिवासींवर जे अन्याय करीत आहेत त्याची पूर्णपणे चौकशी करून माननीय मंत्री महोदय संबंधितांवर कारवाई करणार आहेत काय ?

श्री.मधुकरराव पिचड : सभापती महोदय, आदिवासींना पावसाळ्यात खावटी वाटावी ही योजना सन 1978 पासून सुरू केली आहे. या योजनेतील पूर्वीचे जे दर होते ते आता बदलले आहेत. ही योजना व्यवस्थित चालावी, आदिवासींना अन्न मिळावे म्हणून खरेदीची व्यवस्था केली. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी प्रश्न विचारल्यानंतरच मी उत्तर दिले होते की, यात काही अनियमितता झाली असेल तर, चुका झाल्या असतील तर त्या तपासून घेतल्या जातील आणि त्याची चौकशी केली जाईल.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42883....

श्री.मधुकरराव पिचड.....

ही योजना भविष्यात चांगल्या रितीने चालण्यासाठी सरकारने काही निर्णय घेतलेले आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जे आरोप केले त्याची देखील तपासणी करण्यात येईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, जे प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले त्याचा भंग झालेला आहे त्याबाबत कोणती कार्यवाही करणार आहात ?

श्री.मधुकरराव पिचड : सभापती महोदय, त्या बाबत देखील तपासणी करण्यात येईल.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयानी तपासणी करण्यात येईल असे सांगितलेले आहे. दिनांक 31 मे 2012 पर्यंत खावटी कर्ज मिळावयास पाहिजे होते. आदिवासींना पावसाळ्यापूर्वी खावटी कर्ज मिळणे आवश्यक होते. आदिवासींना खावटी कर्ज मिळण्यास आठ महिने विलंब झालेला आहे. आपण 90 टक्केपेक्षा जास्त रक्कम ठेकेदाराला दिलेली आहे. जर उशिराने खावटी मिळाली असेल त्यासाठी अर्ध्या टक्का दंड लावण्याची तरतूद आहे. तेव्हा ठेकेदाराकडून अर्धा टक्का दंड वसूल करणार काय ? तसेच ही चौकशी किती दिवसांत पूर्ण करण्यात येईल ?

श्री.मधुकरराव पिचड : सभापती महोदय, चौकशी करण्यासंदर्भातील कागदपत्रे उपलब्ध झाल्यानंतर त्याबाबत कायदेशीर तपासणी करुन संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल. मला निश्चित अवधी सांगता येणार नाही. परंतु या संदर्भातील चौकशी लवकरात लवकर करण्यात येईल.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजा रोहनखेड पर्वतापूर (ता.जि.अमरावती) येथील पेढी बॅरेज उपसा सिंचन बुडीत क्षेत्रातील गावांच्या पुनर्वसनाबाबत**

**(2) * 42660 डॉ.रणजित पाटील, श्री.नागो पुंडलिक गाणार, श्री.प्रवीण पोटे-पाटील** : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पेढी बॅरेज उपसा सिंचन बुडीत क्षेत्रातील गावांच्या पुनर्वसनाबाबत (मौजा रोहणखेड पर्वतापूर, दोनद ता.जि.अमरावती) दिनांक 20 डिसेंबर, 2012 रोजी मा.मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर गावांचे पुनर्वसन राहटगावाजवळ मसला उजाडगाव (अमरावती) येथील ई-क्लास शासकीय जमिनीवर करण्याबाबत निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, मसला उजाडगाव येथे नागरिकांनी (मौजा रोहणखेड पर्वतापूर, दोनद ता.जि.अमरावती) पुनर्वसन करण्याबाबतची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(5) असल्यास, कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश धस, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (1) होय.

(2) नवीन पुनर्वसित गावठाणाची निवड करताना भुमिहीन होणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात येऊ नयेत असे बैठकीत ठरविण्यात आले.

(3), (4), (5) व (6) नाही. मात्र रोहणखेडाचे पुनर्वसन रेवसा व सुलतानपूर येथे तर पर्वतापूरचे पुनर्वसन पुसदा येथे करण्याबाबत प्रकल्पग्रस्तांची मागणी आहे. या बाबत प्रकल्प यंत्रणा व प्रकल्पग्रस्तांची बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, अमरावतील जिल्ह्यातील तीन-चार प्रकल्पांच्या संदर्भातील 54 गावांचा प्रश्न आहे. मौजे रोहणखेड आणि मौजे पर्वतापूर या दोन गावांच्या पुनर्वसनाबाबतचा हा प्रश्न आहे. या गावांच्या पुनर्वसना संदर्भात दोन बैठका झालेल्या आहेत. मागील नागपूर अधिवेशनात दिनांक 20 डिसेंबर, 2012 रोजी एक बैठक झाली. त्या बैठकांमध्ये अनेक गोष्टी चर्चिल्या गेल्या. त्या बैठकीमध्ये असे ठरले की काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये तेथे जाऊन स्थळ निश्चिती करण्यात येईल. रोहणखेड गावाचे पुनर्वसन रेवसा सुलतानपूर या

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42660..

डॉ.रणजित पाटील....

ठिकाणी करण्यासाठी परवानगी देण्यात येईल. प्रकल्प यंत्रणा आणि प्रकल्पग्रस्तांची बैठक दोन वेळा होऊनही अद्याप निर्णय झालेला नाही. प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की, "प्रकल्प यंत्रणा व प्रकल्पग्रस्तांची बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल." मागील दहा-बारा वर्षापासून तेथील ग्रामस्थ पुनर्वसनाची वाट पाहत आहेत. वर्ष-दीड वर्षापूर्वी बैठक होऊनही काही निर्णय झालेला नाही. माझा स्पेसिफीक प्रश्न आहे की, त्या गावांचे किती दिवसांत पुनर्वसन होईल ?

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी दिनांक 20 डिसेंबर, 2012 रोजी बैठक घेतली होती. या प्रकल्पामध्ये दोन गावे बाधित होत आहेत, परंतु महसूल विभागाने तीन गावे दाखविलेली आहेत. फिजिकली दोन आहेत. रेवसा सुलतानपूर आणि पुसदा या दोन ठिकाणी पुनर्वसन करावे अशी प्रकल्पग्रस्तांची मागणी आहे. जमिनीची मोजणी करण्यासाठी विभागाचे अधिकारी तेथे गेले होते. ही जमीन अमरावती शहराच्या लगत असल्यामुळे तेथील स्थानिक शेतकऱ्यानी त्यास विरोध केला. परंतु पाटबंधारे विभाग आणि पुनर्वसन विभागाची बैठक झालेली आहे. रेवसा सुलतानपूर येथे 30 हेक्टरवर तर पुसदा येथे 12 हेक्टरवर पुनर्वसन करावे असे प्रकल्पग्रस्तांनी सुचविलेले आहे. पुढील पंधरा दिवसांच्या आत तेथील जमिनीची मोजणी करुन ती ताब्यात घेण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की, "भूमीहीन होणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात येऊ नयेत." माझा प्रश्न आहे की, या प्रकल्पग्रस्तांसाठी जमिनी घेत असताना त्यामध्ये भूमिहीन शेतकरी आहेत काय ? आता आपण जमीन सपांदित करणार, त्यानंतर नियोजन करुन त्यांना पट्टे देणार, या सर्व बाबी किती दिवसांत पूर्ण करणार आहात ?

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, रेवसा सुलतानपूर येथील 30 हेक्टर जमीन घेण्यात येत आहे. त्यामध्ये तीन शेतकरी भूमीहीन होत आहेत.

यानंतर श्री.बोर्डे..

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ ST/ D/ पूर्वी श्री.अजित.... 11:15

ता.प्र.क्र.42660....

श्री.सुरेश धस....

भूमिहीन शेतकऱ्यांना अमरावतीमध्ये इतरत्र ई-क्लास किंवा गायरान जमीन देण्यात येईल. या ठिकाणी केवळ तीन भूमिहीन लोक असल्यामुळे त्यांचा प्रश्न सोडविण्यात येईल. या प्रकल्पाचे काम गेल्या तीन वर्षांपासून बंद आहे. हा प्रकल्प पूर्ण होणे गरजेचे आहे. या प्रकल्पामुळे 365 हेक्टर क्षेत्र बुडीत होत असून, 2232 हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. जमीन ताब्यात घेतल्यानंतर पुनर्वसनाच्या ठिकाणी मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देऊन पुनर्वसनाचे काम पूर्ण् करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

श्री.प्रवीण पोटे-पाटील : महोदय, रेवसा व सुलतानपूर येथे जमिनीचे दर एकरी 50 लाख ते 1 कोटी रुपयांपर्यंत आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, इतक्या किंमतीची जमीन शासन संपादन करणार आहे काय, जमीन संपादनाची प्रक्रिया सुरु केली आहे काय, ज्या कास्तकारांच्या जमिनीचे दर 50 लाख ते 1 कोटी रुपयांपर्यंत आहेत त्यांना आपण बाजारभावाने जमिनीचा मोबदला देणार काय ?

श्री.सुरेश धस : महोदय, सुरुवातीला खाजगी वाटाघाटीने जमीन घेण्याबाबत विचार करण्यात येईल. माझ्या मते त्या ठिकाणी एवढ्या मोठ्या प्रमाणावर जमिनीचे दर नाहीत. खाजगी वाटाघाटीने जमीन संपादन करताना शासनाच्या धोरणानुसार रेडी रेकनरच्या अडीच पट इतका दर देता येतो. त्यानुसार त्या ठिकाणी जमिनीचा मोबदला देता येईल. या ठिकाणी कास्तकारांचा प्रश्न नाही. त्या ठिकाणी काही बिल्डर सुध्दा घुसल्याचा अहवाल आहे. कास्तकारांपेक्षा बिल्डरांचा या मध्ये जास्त इंटरेस्ट आहे. या बाबतची मी माहिती घेतली आहे. या ठिकाणी शेतकरी आणि प्रगल्पग्रस्तांचा प्रश्न असल्यामुळे शासन निर्णयानुसार तेथील भूसंपादन करण्यात येईल.

श्री.प्रवीण पोटे-पाटील : महोदय, त्या ठिकाणी बिल्डरांचा इंटरेस्ट असल्याचे माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले. मी त्यांना विचारु इच्छितो की, त्या भागात बिल्डरांच्या किती जमिनी आहेत या बाबत आपण जिल्हाधिकाऱ्यांकडे विचारणा केली आहे काय ? अमरावतीमध्ये पेरीफेरलमध्ये कास्तकारांच्या 90 टक्के जमिनी आजही बाकी आहेत. तो भाग महानगरपालिकेमध्ये येत नाही. त्यामुळे त्या ठिकाणी बिल्डर प्रवेश करु इच्छित नाहीत. त्यामुळे मी माननीय राज्यमंत्र्यांना स्पेसिफिक विचारतो की, कास्तकारांचा फायदा होत असेल तर आपण यामध्ये लक्ष

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42660....

श्री.प्रवीण पोटे-पाटील....

घालून त्यांना अधिकाधिक मोबदला मिळण्यासाठी प्रयत्न करणार काय, असे होत नसेल तर त्या लोकांचे दुसरीकडे पुनर्वसन करणार काय ?

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, मी अमरावतीच्या जिल्हाधिकाऱ्यांशी काल आणि आज अशी दोन वेळा चर्चा केली आहे. यामध्ये तीन कास्तकार भूमिहीन होत आहेत. त्यामुळे त्यांना अमरावती जिल्ह्यामध्ये इतरत्र जमीन देऊन हा प्रश्न सोडविण्यात येईल.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## रत्नागिरी जिल्ह्यातील रस्ते नादुरुस्त असल्याबाबत

**(३) * ४३१४० श्री.रामदास कदम, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील विशेषत: खेड, दापोली, मंडणगड मधील रस्ते नादुरुस्त झाले असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे एस.टी.सेवाही बंद झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्याकडून ३.५ कोटी रुपयांचा प्रस्ताव आलेला असताना फक्त सव्वा कोटींचा प्रस्ताव मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात आली आहे काय, वा केंव्हा करण्यात येणार आहे,

(४) याबाबत शासन तातडीने निर्णय घेणार आहे काय ?

**श्री.जयंत पाटील**: (१) अशंत: खरे आहे.

(२) हे खरे नाही. रत्नागिरी जिल्हा परिषदेकरिता सन २०१२-१३ या वर्षासाठी रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रम गट-ब व गट-क अंतर्गत एकूण रु.६११.७८ लक्ष रक्कम वितरित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील डोंगरी भागातील हा प्रश्न आहे. या पूर्वी मी माननीय मंत्र्यांना जी कामे सुचविली होती त्या कामांना त्यांनी मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांचे प्रथम मी आभार मानतो.

महोदय, एस.टी.महामंडळाने रत्नागिरी जिल्ह्यातील 16 ग्रामपंचायतींना पत्र पाठवून कळविले आहे की, रस्त्यांची दुरुस्ती केली नाही तर नाईलाजास्तव त्या भागातील बस सेवा बंद करावी लागेल. महोदय, या भागातील 16 रस्ते अतिशय खराब झालेले आहेत. त्यामुळे या 16 रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी देणे आवश्यक आहे. शासनाने वेळीच निधी दिला नाही तर त्या भागातील बस सेवा बंद होईल आणि त्या गावांतील लोकांना 10-10 कि.मी. अंतरावरुन आपल्या डोक्यावरुन अन्नधान्य वा रेशन घेऊन यावे लागेल. या निमित्ताने मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, एस.टी.महामंडळाने ज्या ग्रामपंचायतींना नोटीस दिल्या आहेत त्या 16 गावांतील रस्त्यांना विशेष दुरुस्ती निधीतून तातडीने निधी उपलब्ध करुन देण्यात येईल काय ?

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 43140 ..... श्री. रामदास कदम .....

या अगोदर आपण निधी दिला त्याबद्दल मी आपले आभार मानले. आता या रस्त्यांसाठी निधी देऊन पुन्हा मला आपले आभार मानण्याची संधी आपण देणार का ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, काल पुरवणी मागण्यांच्या चर्चेच्या वेळी आमच्या माननीय राज्यमंत्र्यांनी आपल्या सर्वच मागण्यांकडे सहानुभूतीने बघू असे सांगितले आहे. त्यामुळे जे रस्ते एस.टी. जाण्यासाठी अडचणीचे आहेत ते जास्तीत जास्त दुरुस्त करण्याचा प्रयत्न करु.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, ज्याप्रमाणे आपण रत्नागिरी जिल्ह्याला विशेष निधी दिला त्याप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्याला देणार का ? कारण यावेळी निधी दिलेला नाही.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, विशेष निधी कोणालाही दिलेला नाही. पण त्या जिल्ह्यात ज्यावेळी निधी जातो त्यावेळी जर सन्माननीय सदस्यांनी काही सूचना केल्या असतील तर त्याचा अवलंब करण्याचा आपण प्रयत्न करतो. आपण जर आपल्या जिल्ह्यात काही सूचना केल्या तर त्याचा अवलंब करण्याचा आपण प्रयत्न करु.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्ह्यात किती किलोमीटर लांबीचे रस्ते जिल्हा परिषदेच्या ताब्यात आहेत ? हे रस्ते दुरुस्त करताना मी अनेक वेळा सभागृहामध्ये या सभागृहामध्ये शासनाकडे मागणी केलेली आहे. कोकणामध्ये जास्त प्रमाणात पाऊस पडतो. कोकण भागामध्ये रस्ते दुरुस्तीसाठी खास निधी, आपल्या नॉर्म्सपेक्षा जास्त निधी देण्याची मागणी मी अनेक वेळा केली आणि ती मागणी आपण मान्य केली आहे. त्याची कार्यवाही होणार का ? कोकणामध्ये प्रामुख्याने गणपतीचा सण मोठ्या प्रमाणात साजरा होतो. त्यावेळी हे सर्व रस्ते नादुरुस्त असतात. त्या दृष्टीकोनातून या काळामध्ये दुरुस्तीसाठी खास निधी देण्याची व्यवस्था शासन करणार का ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्ह्यात 8085 किलोमीटर लांबीचे रस्ते आपल्याकडे आहेत. त्यातील जास्तीत जास्त रस्त्यांची व्यवस्था चांगली करण्याचा शासन प्रयत्न करील. पण पाऊस आहे म्हणून विशेष निधी उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था आपल्याकडे नाही. परंतु आपण सर्व महाराष्ट्रात हे पैसे वाटताना त्या जिल्ह्यातील लांबी लक्षात घेऊन त्या प्रपोर्शनेटमध्ये सर्वांना दुरुस्तीसाठी निधी देतो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

**मौजे माजिवडे (ता.जि.ठाणे) येथील जागा परवानगी न घेता वापरल्याबाबत**

**(४) * ४१७०७ श्री.विनोद तावडे, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, श्री.चंद्रकांत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३६७३६ ला दिनांक २५ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे माजिवडे (ता.जि.ठाणे) येथील सर्व्हे नंबर १९४/१ ही जागा ग्वाल्हेर संस्थानात विलीनीकरण झाल्यानंतर ही जागा भारत सरकारची झाली, हे खरे आहे काय,

(२) उपरोक्त सर्व्हे नंबर १९४/१ ही भारत सरकारची जागा खाजगी कंपनीने परवानगी न घेता वापरल्याबाबत राज्याच्या मुख्य सचिवांनी मध्य प्रदेश सरकारकडे विचारणा केली असून त्या सरकारकडून अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ही जागा मे.नॅशनल स्टोन क्वॉरी या कंपनीला भारत सरकारची परवानगी न घेता प्रॉव्हीडंट इनव्हेस्टमेंट कंपनी ह्या मध्य प्रदेश सरकारच्या उपक्रम असलेल्या कंपनीने दिली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणात झालेल्या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले,

(५) तद्नुषंगाने दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. सुरेश धस, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (१) हे अशंत: खरे आहे.

(२), (३), (४), (५) व (६)

मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद यांचेकडून या संदर्भात पत्र प्राप्त झाले असून त्यानुषंगाने मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या स्तरावर मध्य प्रदेश सरकारकडे विचारणा करण्यात आली असून त्या सरकारकडून अद्याप माहिती अप्राप्त आहे. याबाबत शासनस्तरावरुन मध्य प्रदेश सरकारकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, स्वातंत्र्यापूर्वी ग्वाल्हेर संस्थानची असलेली ही जमीन नंतर भारत सरकारच्या नावावर आली आणि नंतर मध्यप्रदेशच्या प्रॉव्हीडंट इन्व्हेस्टमेंट कंपनीला दिली. या कंपनीने ती जमीन परस्पर के.आर.सिंग, पुरणसिंग, अब्दुल कादर खान यांना नॅशनल स्टोन क्वारी चालविण्यास दिली. त्यासाठी मध्यप्रदेश सरकारची परवानगी आवश्यक आहे. या संदर्भात या सभागृहामध्ये काही वर्षापूर्वी चर्चा सुध्दा झाली होती. त्यावेळी तीन महिन्यात विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी करुन असे आश्वासन सभागृहात दिले होते. ती चौकशी पूर्ण झाली का ? नसेल तर चौकशी पूर्ण का झाली नाही ? मध्यप्रदेश सरकारची एनओसी मागवावयास पाहिजे होती. ती एनओसी मागविली नाही. एनओसी मागविण्याचे काम वर्षानुवर्षे चालू आहे. ती एनओसी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

ता. प्र. क्र. 41707 ..... श्री. विनोद तावडे .....

अद्याप आलेली नाही. ती एनओसी कधी येणार ? सर्वात वाईट गोष्ट म्हणजे त्या ठिकाणी एका निळकंठ डेव्हलपरने ही जमीन डेव्हलप केली. युएलसी ॲक्ट प्रमाणे 2 हजार चौ. मीटर एवढी जमीन मिळावयास पाहिजे. त्यांनी त्यामध्ये अनेक भागीदार दाखविले आणि प्रत्येकाच्या नावावर 2-2 हजार चौ. मीटर जमीन करुन त्यांनी जमीन डेव्हलप केली. युएलसी ॲक्टप्रमाणे त्याला 2 हजार चौ.मी. जमीन मिळावयास पाहिजे होती. त्यापेक्षा त्यांनी अधिक बांधकाम केले. विभागीय आयुक्तांनी चौकशी केली असती आणि अहवाल दिला असता तर ते थांबले असते. त्यांनी फ्लॅट बांधले आणि विकले. अशा मनमानी पध्दतीने या शासनाला एका अर्थाने बाजूला सारुन त्यांनी काम केलेले आहे आणि त्यांनी ॲडिशनल जमिनीचा लाभ घेतलेला आहे. आता इमारती बांधून झालेल्या आहेत. त्या ठिकाणी लोक राहावयास आले. त्या बिल्डरने युएलसीपेक्षा ॲडिशनल जमीन घेतली आणि त्याचा फायदा घेतला आहे त्याचा पैसा आपण शासनाकडे जमा करुन घेणार का ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41707....

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, या प्रकरणातील सगळ्यात महत्वाचा जो भाग आहे तो म्हणजे मध्य प्रदेश सरकारच्या वित्त विभागाकडून दिनांक 12.6.2002 रोजी एक पत्र आलेले आहे. त्या पत्राच्या संदर्भात मुख्य सचिवांनी मध्य प्रदेश सरकारला पत्र पाठविलेले आहे. परंतु त्या पत्राचे उत्तर आलेले नाही. त्यामुळे पुढील एक महिन्यामध्ये उप सचिव किंवा सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांना तेथे पाठवून या पत्राची सत्यता पडताळून पाहण्यात येईल. मध्य प्रदेश सरकारने हे पत्र डायरेक्ट महानगरपालिकेच्या आयुक्तांना पाठविलेले आहे. वास्तविक मध्य प्रदेशच्या सरकारकडून आयुक्तांना पत्र न पाठविता राज्याच्या मुख्य सचिवांना किंवा विभागाला पत्र पाठविणे आवश्यक होते. विभागीय आयुक्तांच्या चौकशीसंबंधीचा अहवाल तातडीने मागवून घेण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, विभागीय चौकशी झालेली नाही. ही बाब माननीय राज्यमंत्र्याना माहीत नाही.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या जमिनीला 1925 पासूनचा इतिहास आहे. मूळ जमीन होती ती त्यांनी प्रॉव्हिडण्ट इन्व्हेस्टमेण्ट कंपनीला दिली. त्या कंपनीकडे ही जमीन असताना भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते संस्थाने खालसा झाली. त्यामुळे त्या जमिनीवर भारत सरकार असे नाव आले. त्यानंतरही प्रॉव्हिडण्ड इन्व्हेस्टमेण्ट कंपनीचे नाव राहिले होते. त्यांनी प्रधान यांना प्राधिकृत केले होते. प्रधान यांनी मे.नॅशनल स्टोन क्वॉरीला पार्टनर करुन घेतले. त्यांनी अभिनव रियल इस्टेट कंपनीला ती जमीन डेव्हलप करण्यासाठी दिली. असा या जमिनीचा इतिहास आहे. हे करीत असताना मध्य प्रदेश सरकारकडून ठाणे महानगरपालिकेला विकास करण्याच्या बाबतीत ना हरकत आहे असे कळविण्यात आले. त्यामुळे तेथे डेव्हलपमेण्ट सुरु झाली ही वस्तुस्थिती आहे. मध्य प्रदेश सरकारचे आलेले पत्र खरे आहे की खोटे आहे येथून मूळ प्रश्न सुरु होतो. यापूर्वी सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनीही कायम पाठपुरावा केलेला दिसतो. मुख्य सचिवांनी मध्य प्रदेश सरकारच्या मुख्य सचिवांना पत्र पाठविले होते. परंतु त्याचे उत्तर आलेले नाही. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांना मध्य प्रदेश राज्याच्या राजधानीमध्ये पाठवून त्या पत्राची सत्यता पडताळून घेण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

श्री.बाळासाहेब थोरात....                                    ता.प्र.क्र.41707...

सभापती महोदय, सातत्याने विधानसभेत व विधानपरिषदेत प्रश्न उपस्थित केल्यानंतर विभागीय आयुक्तांनी 3 महिन्यामध्ये चौकशी पूर्ण करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. परंतु त्याबाबत काहीच कामकाज झाल्याचे दिसत नाही ही वस्तुस्थिती आहे. 3 महिन्याच्या कालावधीत कोकण विभागीय आयुक्तांना यासाठी प्राधिकृत करण्यात येईल. यासंबंधीचे सर्व मुद्दे चौकशीसाठी घेण्यात येतील. आता युएलसीचा नवीन मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे. हा मुद्दा त्यात समाविष्ट करुन चौकशी ते 3 महिन्यात पूर्ण करतील. या प्रश्नाचा पाठपुरावा सुध्दा केला जाईल.

श्री.विनोद तावडे : ही चौकशी होईपर्यंत तेथे चालू असलेले काम शासन थाबविणार आहे काय, अन्यथा तो विकासक तेथे बांधकाम करुन मोकळा होईल आणि तेथून निघून जाईल. त्यामुळे शासनाच्या हाती काहीच लागणार नाही. चौकशीमध्ये त्यांनी अतिरिक्त फायदा घेतल्याचे सिध्द झाल्यास त्याची वसुली कशा प्रकारे करण्यात येईल ?

श्री.बाळासाहेब थोरात : यापूर्वीही विधानसभेमध्ये तेथील बांधकाम थांबविण्यासंबंधी आश्वासन देण्यात आलेले आहे. तत्कालीन महसूल मंत्र्यांनी एक बैठक घेऊन बांधकामाला असलेली स्थगिती उठविली होती.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ 11:30

ता.प्र.क्र.41707.... श्री. बाळासाहेब थोरात ...

सर्व कागदपत्रे तपासावी लागतील. दिलेला स्टे उठविण्यात आला होता. त्यामुळे लगेच तसे करणे योग्य होणार नाही.

ॲड. आशिष शेलार : अतिशय गंभीर विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधण्यात आलेले आहे. हे "आदर्श" एवढे मोठे प्रकरण दिसते. या सर्व प्रकरणाकडे सरकार कशा पध्दतीने बघत आहे ? ही पहिल्यांदा सरकारची जमीन होती, नंतर ती केन्द्र सरकारची जमीन झाली, त्यानंतर मध्यप्रदेश सरकारचा संबंध आला, त्यानंतर भाडेपट्टीचा संबंध आला, त्यानंतर युएलसीचा संबंध आला, त्यानंतर प्रायव्हेट बिल्डरने त्या जागेवर पैसे कमावले. तीन महिन्यापूर्वी या प्रकरणी विभागीय चौकशी करण्यात येईल असे सांगितले होते, ती झाली नाही. शासनाने 2002 मध्ये ठाणे महानगरपालिकेला पत्र दिले होते. त्याचे व्हेरिफिकेशन झाले नाही. आता नवीन चौकशीची बाब समोर आलेली आहे. दोन महत्वाचे मुद्दे समोर आलेले आहेत. एक म्हणजे जे डॉक्युमेण्ट ट्रान्स्फर झालेले आहेत ते डॉक्युमेण्ट चेक केले पाहिजेत. दुसरे म्हणजे, युएलसी डॉक्युमेण्ट आणि प्रधान नावाच्या व्यक्तीने दिलेले पत्र हे डॉक्युमेण्ट तपासण्याची आवश्यकता आहे. तसेच ठाणे महानगरपालिकेने कोणत्या डॉक्युमेण्टचे व्हेरिफिकेशन करुन परवानगी दिली ? या गोष्टी क्रिमिनल ॲक्टमध्ये मोडतात. त्यामुळे सरकार या प्रकरणी सीआयडी चौकशी करील काय ? बिल्डरला एमआरटीपी ॲक्टखाली नोटीस देण्यात येइल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : जमिनीच्या व्यवहाराच्या संदर्भातील चौकशी ही महसूल विभागातील एका प्रमुख अधिका-याने करणे जास्त योग्य आहे असे माझे मत आहे. त्यामुळे या सर्व मुद्यांची चौकशी कोकण आयुक्तांनी तीन महिन्यामध्ये करावी असे मी निदेश देईन आणि चौकशी अहवाल घेईन.

श्री. गोपीकिसन बाजोरीया : जागा राज्य शासनाची असो वा अन्य राज्याची असो वा केन्द्र शासनाची असो. जागा खाजगी माणसाला दिली असेल तर राज्य शासनाने त्याबाबतीत रेव्हेन्यू घ्यायला पाहिजे. राज्य शासनाने मे. नॅशनल स्टोन क्वॉरीकडून महसूल वसूल केलेला आहे काय ? हा महसूल वसूल करीत असताना ही जागा त्यांना कोणत्या नियमानुसार देण्यात आली याची चौकशी करण्यात आलेली आहे काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41707....

श्री. बाळासाहेब थोरात : 7/12मध्ये फेरफार दिसत आहेत. फेरफारासाठी अनुषंगिक कागदपत्रे उपलब्ध असलेली दिसत नाहीत. खूप जुन्या गोष्टी आहेत. मात्र रेव्हेन्यू भरलेला दिसतो.

श्री. विनोद तावडे : मघाशी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, बांधकाम थांबविण्याचे आदेश दिले होते. स्टे दिला होता तो उठविण्यात आला त्यामुळे पुन्हा स्टे देता येणार नाही. हा स्टे कोणी दिला, तो का उठविला, स्टे उठविण्याची कारणे काय होती ? आता या प्रकरणी स्टे देण्यास राज्य शासनाला कोणती अडचण आहे? प्रॉव्हीडण्ट इन्व्हेस्टमेण्ट कंपनीच्या ठाण्यामध्ये किती जमिनी आहेत आणि किती जण त्यामध्ये हात मारत आहेत, याची चौकशी केली जाईल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : तत्कालीन राज्यमंत्र्यांनी विधानपरिषदेमध्ये स्टे दिला होता. दिनांक 1.8.2009ला तत्कालीन महसूल मंत्र्यानी बैठक घेतली. बैठकीचे प्रोसिडिंग पाहिल्यानंतर दिलेल्या स्टेचे स्वरुप बेकायदेशीर स्वरुपाचे दिसते. त्यामुळे तो स्टे उठविण्यात यावा असे स्पष्ट आदेश दिले होते. बैठकीमध्ये सर्व संबंधित अधिकारी, कंपनीचे अधिकारी उपस्थित होते. तसे आदेश देण्यात आल्यामुळे स्टे उठविण्याच्या संदर्भात खाली पत्र देण्यात आले. त्या बैठकीमध्ये कोणी काय मुद्दे मांडले याचे प्रोसिडिंग्ज उपलब्ध नाही. परंतु ती कृती बेकायदेशीर स्वरुपाची दिसते म्हणून तो स्टे उठविण्यात यावा अशा सूचना मंत्री महोदयांनी दिल्याचे दिसते. त्यामुळे पुन्हा स्टे देण्याऐवजी या प्रकरणी आपण पुन्हा चौकशी करीत आहोत. कोकण आयुक्तांना त्यासाठी प्राधिकृत करीत आहोत. यामध्ये फार काळ जाणार नाही. परंतु वस्तुस्थिती समोर येईल. यामध्ये ज्याचा दोष असेल त्याच्यावर कारवाई केली जाईल.

...नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41707...

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आत्ताच माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, सदरहू स्टे बेकायदेशीर होता. माननीय राज्यमंत्री महोदय बेकायदेशीर स्टे कसा काय देऊ शकता ? हा प्रश्न या सभागृहात वारंवार उपस्थित होत आहे, त्यामुळे माननीय मंत्री महोदयांकडून या प्रश्नाच्या अनुषंगाने वारंवार चौकशीची आश्वासने दिली जात आहेत. परंतु हा प्रश्न अजून सुटत नाही. हा प्रश्न न सुटण्याचे कारण काय, या प्रश्नाच्या पाठीमागे कोण आहे? अशा पध्दतीने स्टे उठवून तेथे पुन्हा बांधकाम सुरु झाले आहे. या ठिकाणी माननीय महसूल मंत्री सांगता आहेत की, तेथील बांधकाम थांबविण्याचे कारण नाही. या बाबतीत तीन महिन्यात चौकशी पूर्ण करण्यात येईल आणि त्या अनुषंगाने पुढील कारवाई करण्यात येईल. या ठिकाणी बांधकाम करणाऱ्या कंत्राटदाराला पाठीशी घातले जात आहे अशी आमच्या मनात शंका आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, डिसेंबर महिन्याच्या अधिवेशनामध्ये प्रश्नाधीन जमिनीमध्ये सुरु असलेले बांधकाम तत्काळ थांबविणे या अनुषंगाने माननीय महसूल राज्यमंत्र्यांनी स्टे दिला होता. या सभागृहात त्यांनी सांगितले की, या ठिकाणच्या बाधकामास स्थगिती देतो. यानंतर माननीय राज्यमंत्री महोदयांनी बैठक घेतली. त्या बैठकीस सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते. त्या बैठकीत या विषयाच्या अनुषंगाने एकत्रितपणे सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यावेळी माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले की, अशा प्रकारचा स्टे ठेवणे हे बेकायदेशीर दिसते आहे. त्यामुळे तो उठविण्यात यावा. आता या गोष्टीस पुन्हा स्टे देण्याऐवजी त्यासंबंधी पूर्ण चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्यात येईल. या प्रकरणी कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले आहे की, त्या ठिकाणी बांधकामे झालेली आहेत, तेथे रहिवासी रहावयास गेले आहेत. या बाबतीत आता स्टे देण्यापेक्षा या प्रकरणाची संपूर्णपणे चौकशी करुन संबंधित कोणी दोषी आढळून आले तर त्यांच्या विरुध्द कारवाई केली जाईल असे मी स्पष्ट आश्वासन देऊ इच्छितो.

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदय, यापूर्वी राज्यमंत्र्यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन या बाबतीत स्टे दिला. या ठिकाणी जो स्टे दिला गेला होता, तो चुकीचा असावा असे प्रतिपादन उत्तराच्या अनुषंगाने आपण केलेले आहे. या प्रकरणाची संपूर्ण चौकशी होण्याच्या अगोदर

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41707...

सभापती....

जर हा स्टे पुन्हा दिला तर ती देखील चूक होऊ शकते असेही आपले मत आहे. यापूर्वी स्टे देण्यासंबंधी जी चूक झालेली आहे, ती चूक दुरुस्त करण्याच्या दृष्टीने आपणाकडून योग्य पाऊल टाकले जाईल काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, डिसेंबर 2008 च्या अधिवेशनात स्टे दिला होता. ऑगस्ट, 2009 मध्ये तत्कालिन महसूल मंत्र्यांनी बैठक बोलाविली. या बैठकीस सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते, त्यांच्याबरोबर चर्चा करण्यात आली...

श्री.रामदास कदम : त्यावेळी महसूल मंत्री कोण होते ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ऑगस्ट, 2009 मध्ये तत्कालीन महसूल मंत्र्यांनी बैठक बोलाविली, त्या बैठकीमध्ये सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते. या विषयाच्या बाबतीत सविस्तर चर्चा करण्यात आली, त्यानंतर हा स्टे उठविण्यात आला आहे. तत्कालीन महसूल मंत्र्यांकडून चर्चेअंती तो स्टे उठविण्यात आल्यानंतर पुन्हा स्टे देणे मला योग्य वाटत नाही माझे मत असे आहे. या बाबतीत तीन महिन्यात चौकशी करण्यात येऊन संबंधित दोषी विरुध्द कारवाई करण्यात येईल. या बाबतीत कोणालाही पाठीशी घालण्याचे काहीही कारण नाही. मी पुन्हा सांगू इच्छितो की, या संदर्भात पूर्णपणे चौकशी केली जाईल. त्याचे इश्यू काढले जातील. या बाबतीत कोणी दोषी आढळून आले तर त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपणही अतिशय योग्य मुद्दा माननीय मंत्री महोदयांसमोर आणला. आम्ही या बाबतीत स्टे का मागतो आहोत याचे कारण असे आहे की, विभागीय आयुक्तांची चौकशी पूर्ण न होता स्टे उठविण्यात आला, याचा अर्थ यात काही गौडबंगाल आहे असे आमचे मत झालेले आहे. तेथे जो पर्यंत स्टे देत नाहीत, तोपर्यंत तेथे बांधकाम सुरुच राहील. तेथे रहिवाशी रहावयास येतील. तुम्ही या बाबतीत विभागीय चौकशी करणार आहात, त्या चौकशीत कळले की, तेथे रहिवाशी रहावयास गेले आहेत. तर त्या रहिवाश्यांना आपण घराबाहेर काढणार काय ? तुम्हाला या प्रकारणाची खरोखर सत्यता बाहेर आणावयाची असेल तर विभागीय आयुक्तांची चौकशी पूर्ण होईपर्यंत त्या ठिकाणचे बांधकाम थांबविले जाईल काय ? सदरहू

3...



ABG/ ST/ D/ प्रथम श्री.शिगम 11:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41707...

श्री.विनोद तावडे....

चौकशीचे काम पूर्ण होईपर्यंत स्टे दिला तर चौकशीला काही अर्थ राहील. स्टे न देता सदरहू चौकशी सुरु राहिली तर त्या चौकशीस काहीही अर्थ नाही. म्हणून माझा पुन्हा प्रश्न आहे की, विभागीय आयुक्तांची चौकशी पूर्ण होईपर्यंत त्या ठिकाणचे बांधकाम थांबविले जाईल काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : त्या ठिकाणी बांधकाम होऊन रहिवासी तेथे रहावयास गेले आहेत ही गोष्ट माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी देखील मान्य केली आहे. सदर चौकशी तीन महिन्यात पूर्ण करण्यात येणार आहे. तीन महिन्याचा कालखंड काही मोठा नाही. या प्रकरणाची संपूर्णपणे चौकशी करण्यात येणार आहे. या चौकशीत कोणी दोषी आढळून आले तर संबंधितांविरुध्द कारवाई करण्यात येईल.

------------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**आदिवासी विकास महामंडळाअंतर्गत योजना राबविण्यासाठी आदिवासी भागात गोदामांचे जाळे उभारण्याबाबत करावयाची कार्यवाही**

**(५) * ४१८२५ श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळाला आधारभूत किंमत खरेदी योजना आणि एकाधिकार गौण वनोपज खरेदी योजना राबविण्यासाठी आदिवासी भागात गोदामांचे जाळे उभारण्याचे प्रस्ताव अद्यापही प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे भाड्यापोटी १ कोटी रुपयांच्यावर रक्कम खर्च करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची गोदामे तातडीने उभारण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र गावीत, श्री.मधुकरराव पिचड यांच्याकरिता** : (१) व (२) हे खरे नाही. मात्र आदिवासी उपयोजना क्षेत्रातील दुर्गम भागात खरेदी केंद्रांवर गोदामे उपलब्ध नसल्याने आदिवासी विकास महामंडळ सहकारी संस्थांची गोदामे भाडेतत्वावर घेते.

(३) नाबार्ड ग्रामीण पायाभूत विकास निधी टप्पा अंतर्गत आदिवासी क्षेत्रामध्ये आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरेदी केलेले धान्य व भरड धान्य साठविण्यासाठी ९९ गोदामे बांधण्याच्या प्रस्तावावर अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून कार्यवाही केली जात आहे.

आदिवासी विकास महामंडळास गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी, नवेगाव, राजापूर पॅच (बोरी) व नंदुरबार जिल्ह्यातील कुडावद येथे ३००० मेट्रिक टन क्षमतेची ४ गोदामे बांधण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिलेला असून गोदामे बांधकामाचे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी, कोरची, नवेगाव बांध व गोंदिया जिल्ह्यातील देवरी येथे ३००० मेट्रिक टन क्षमतेची ४ गोदामे बांधण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिला असून गोदामे बांधण्याची प्रक्रिया सुरु आहे. याव्यतिरिक्त अवसायनातील जुन्या आदिवासी सहकारी संस्थांची गोदामे व जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही महामंडळाने हाती घेतली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मंत्री महोदयांना उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे काय?

श्री.राजेंद्र गावीत : उत्तरामध्ये कोणतीही सुधारणा करावयाची नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आदिवासी विकास महामंडळाला आधारभूत किंमत खरेदी योजना आणि एकाधिकार गौण वनोपज खरेदी योजना राबविण्यासाठी आदिवासी भागात गोदामांचे जाळे उभारण्याचे प्रस्ताव अद्यापही प्रलंबित आहेत हे खरे आहे काय? असल्यास, यामुळे भाड्यापोटी १ कोटी रुपयांच्यावर रक्कम खर्च करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय?

..२...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.... ता.प्र.क्र.४१८२५.....

या दोन्ही प्रश्नांना 'हे खरे नाही' असे उत्तर देण्यात आले आहे. मात्र आदिवासी उपयोजना क्षेत्रातील दुर्गम भागात खरेदी केंद्रावर गोदामे उपलब्ध नसल्याने आदिवासी विकास महामंडळ सहकारी संस्थांची गोदामे भाडे तत्वावर घेते असेही उत्तरात नमूद केले आहे. १९७६ पासून एकाधिकार खरेदी योजना राबविली जात आहे. अद्याप आदिवासी विकास महामंडळाचे कार्यालय नाही किंवा मालकीचे गोदाम नाही. लाखो रुपयांचा माल पावसाळ्यात भिजून सडत असल्याने राष्ट्रीय खाद्यान्नाचे प्रचंड प्रमाणात नुकसान होते. ७० लाख रुपये गोदामाच्या भाड्यासाठी आणि ३५ लाख रुपये कार्यालयाच्या भाड्यासाठी खर्च केले जात असल्यामुळे मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे आहे. ९९ गोदामे बांधण्याची कार्यवाही केली जात आहे. राष्ट्रीय खाद्यान्नाचे नुकसान टाळण्यासाठी ही कार्यवाही किती दिवसात पूर्ण होईल? किती काळात कार्यालय आणि गोदाम बांधून आदिवासी विकास महामंडळाला संरक्षण दिले जाईल?

श्री.मधुकरराव पिचड : सभापती महोदय, एकाधिकार खरेदी योजना सध्या बंद आहे. परंतु आधारभूत किंमतीखाली या विभागात खरेदी केली जाते. आदिवासी विकास महामंडळाची 7 गोदामे सध्या वापरात आहेत. जूनी आदिवासी सहकारी संस्थांची भाड्याने घेतलेली 70 गोदामे असून खाजगी व सहकारी संस्थांची भाड्याने घेतलेली 206 गोदामे आहेत. शासकीय निधीतून 10 गोदामे बांधण्यात यावयाची आहेत, त्यापैकी 2 गोदामे चंद्रपूरमध्ये व इतर 8 गोदामे गडचिरोली आणि ठाणे जिल्हयात बांधण्यात येणार आहेत.

अन्न व नागरी पुरवठा विभागाने 99 गोदामे बांधण्याचा कार्यक्रम आखला आहे. ही गोदामे बांधण्यासाठी आदिवासी उपयोजनेतून 70 कोटी रुपये इतका निधी अन्न व नागरी पुरवठा विभागाला उपलब्ध करुन दिला आहे. त्याचबरोबर चंद्रपूर येथील 2 गोदामे बांधून पूर्ण झाली असून उर्वरित गोदामे बांधण्याची प्रक्रिया सुरु असून बांधकामासाठी 12 कोटी रुपयांचा निधी शासनाने उपलब्ध करुन दिला आहे आणि गोदामे बांधण्याचा कार्यक्रम सुरु आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सहकारी संस्थांच्या भाड्याने घेतलेल्या गोदामांची स्थिती चांगली नाही. गोदामामध्ये मोठया प्रमाणात गळती होत असून भिंतींना भेगा पडलेल्या आहेत. त्यामुळे तेथे ठेवण्यात येणारा माल सुरक्षित नाही हे खरे आहे काय?

....3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकरराव पिचड : सभापती महोदय, ही गोष्ट सत्य आहे. गोदामांची क्षमता अपुरी आहे, त्यामुळे अनेक ठिकाणी धान्य बाहेर साठवावे लागले, त्यामुळे ते खराब झाले ही वस्तुस्थिती आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, अनेक वृत्तपत्रातून धान्य पावसाच्या पाण्यात भिजल्यामुळे कुजल्याच्या बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत. गोदामांची साठवणूक क्षमता कमी आहे हे मंत्री महोदयांनी मान्य केले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. परंतु भाड्यापोटी 1 कोटी रुपये खर्च करावे लागतात हे खरे आहे काय? या प्रश्नाचे उत्तर देत असताना संदिग्धता बाळगण्यात आली आहे. खरोखर 1 कोटी रुपये गोदामांकरिता भाडे म्हणून दिले जाते का, असल्यास गोदामांची संख्या किती आहे?

श्री.मधुकरराव पिचड : 206 गोदामांचे भाडे क्लेम 2009 ते 2011-12 या काळाकरिता 350 लक्ष इतके मंजूर केले असून ते अदा केलेले आहे.

श्री.मुजफ्फर हुसेन : एकाधिकार खरेदी योजना बंद असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले. ही एकाधिकार खरेदी योजना केव्हा सुरु होणार आहे?

नंतर जे.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :41825** ......

श्री. मधुकरराव पिचड : सभापती महोदय, ही योजना सन 2008 मध्ये बंद पडली होती. परंतु ही योजना आदिवासी लोकांच्या विकासासाठी असल्यामुळे ही योजना पुन्हा सुरु करण्यात यावी अशी मागणी झाल्यामुळे ही योजना सुरु करण्यात आली. या योजनेचा सुधारित स्वरुपाचा आराखडा करण्याचे काम सुरु असून या योजनेच्या संदर्भात मी कालच माननीय मुख्य मंत्री महोदयांबरोबर चर्चा केली होती. महाराष्ट्रातील जे अतिसंवेदनशील भाग आहेत त्यामध्ये ठाणे जिल्हयातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड. रायगड जिल्हयामध्ये कर्जत. नंदूरबार जिल्हयामध्ये अक्कलकुवा,तळोदा, धडगाव, अक्राणी. अमरावती जिल्हयातील चिखलदरा. नांदेड जिल्हयामध्ये किनवट, चंद्रपूर जिल्हयामध्ये गोलपींप्री, तसेच संपूर्ण गडचिरोली जिल्हा या क्षेत्रात एकाधिकार खरेदी योजना सुरु करण्यात येईल व इतर ठिकाणी ऐच्छिक स्वरुपात ही योजना सुरु करण्यात येईल.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील अनुसूचित जातीच्या सहकारी औद्योगिक संस्थांना देण्यात आलेल्या निधीत झालेला गैरव्यवहार**

**(६) * ४२४८३ श्री.संदिप बाजोरिया, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रमेश शेंडगे, श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३०६३१ ला दिनांक १९ जुलै, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातीच्या सहकारी औद्योगिक संस्थांना गेल्या सात वर्षात शासकीय भागभांडवल योजनेत सुमारे ३७५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यामुळे शासनाने ही मदत देणे थांबविले असून समाजकल्याण आयुक्त, पुणे यांचेकडून शासनाने अहवाल मागविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप अहवाल प्राप्त झाल नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवाजीराव मोघे** : (१) अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य या योजनेतंर्गत सन २००९-२०१० मध्ये मंजूरी दिलेल्या संस्थाविरुध्द तक्रार प्राप्त झाल्याने या योजनेंतर्गत मंजूरी दिलेल्या सर्व ३७२ संस्थांचा अहवाल आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचेकडून मागविण्यात आला आहे. तथापि, मंजूरी दिलेल्या संस्थांना उर्वरित अर्थसहाय्य मंजुरी करणे आवश्यक असल्याने सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वर्षात नवीन संस्थांना मंजुरी न देता, पहिल्या हफ्त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या संस्थांना दुसरा हफ्ता मंजूर करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही. सदर अहवाल सादर करण्याबाबत आयुक्तालयाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

श्री. संदिप बाजोरिया : सभापती महोदय, अनुसूचित जातीच्या सहकारी औद्योगिक संस्थामध्ये गेल्या ७ वर्षात सुमारे ३७५ कोटी रुपयाच्या शासकीय भाग भांडवलाचा मोठया प्रमाणात गैरव्यवहार झालेला आहे. सहकारी औद्योगिक संस्थेमध्ये स्वत:चे ५ टक्के भागभांडवल, दीर्घ मुदतीचे कर्ज ३५ टक्के आणि वित्तीय संस्थांकडून दीर्घ मुदतीचे कर्ज ३५ टक्के. ही योजना सन २००४ पासून कार्यान्वीत आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ३७५ सहकारी औद्योगिक संस्थांना कोटयावधी रुपयांचे भाग भांडवल शासनाने दिलेले आहे. या संस्थांना प्रत्येक एक कोटी रुपयाची मदत शासनाने दिलेली आहे असे गृहीत धरले तरी हा आकडा ३७५ कोटी रुपयांच्या घरात जातो. या संस्थांना सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वर्षात या संस्थांना दुसरा हप्ता मंजूर करण्याची कारणे काय आहेत ? या संस्थांना दुसरा हप्ता मंजूर करतांना अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची चौकशी न करता दुसरा हप्ता मंजूर केलेला आहे व त्यामध्ये जिल्हाधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांची आपण चौकशी करणार आहात काय ? ..३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : ४२४८३** ......

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन २०१२-२०१३ पर्यंत ३७२ संस्थांना शासनाने कर्ज दिलेले आहे. पहिल्या हप्त्यामध्ये केवळ ३५ प्रोजेक्ट पूर्ण झालेले आहेत. ३५ प्रोजेक्ट पूर्णत्वास आलेले आहेत. बाकीचे प्रोजेक्ट लवकर पूर्ण व्हावे यासाठी मागील दोन वर्षापासून नवीन संस्थेला भाग भांडवल देणे बंद केलेले आहे. काही संस्था पहिला हप्ता घेऊन गेले परंतु ते नंतर आलेच नाहीत. त्यामुळे पहिल्यांना जे भागभांडवल दिलेले आहे त्या संस्थाचे प्रोजेक्ट उभे रहावे असा त्यामागचा उद्देश आहे. जर तुम्ही प्रोजेक्ट पूर्ण केला नाही तर तुम्हाला दिलेले भागभांडवल वसूल केले जाईल अशा प्रकारच्या सूचना केल्या आहेत. यामध्ये एकंदर २०० संस्थांची चौकशी करण्यात आलेली आहे व यामध्ये एकंदर १०५ प्रोजेक्टला पैसे दिलेले आहेत व काहींना पुढे देणार आहोत.

श्री. सुभाष चव्हाण : सभपती महोदय, अनुसूचित जातीमध्ये औद्योगिक क्रांती व्हावी म्हणून १:९ या प्रमाणे ही योजना सुरु करण्यात आलेली आहे. ही योजना केव्हापासून सुरु झाली, आजतागायत या योजनेसाठी किती भागभांडवल वितरीत केले आहे? या योजनेमध्ये भाग भांडलाचे वाटप समाजनिहाय झाले असेल तर त्याची सूची पटलावर ठेवली जाणार आहे काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या योनजेतून समाजनिहाय भागभांडवलाचे वाटप होत नाही तर अनुसूचित जातीच्या ५९ जाती प्रमाणे भागभांडवलाचे वाटप होत असते. आतापर्यंत ३७९.२९ कोटी भाग भांडवल व ३७७.५९ लक्ष रुपये कर्ज देण्यात आलेले आहे.

ॲड. जयदेव गायकवाड : सभापती महोदय, या योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी आलेल्या आहेत असा आरोप करण्यात आलेला असल्यामुळे शासनाने मदत थांबवली आहे असा प्रश्न विचारण्यात आलेला आहे परंतु त्या प्रश्नाचे निरसन झालेले नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42483...

श्री.जयदेव गायकवाड...

तक्रारी झाल्यामुळे अहवाल मागविला अशा प्रकारचे उत्तर देण्यात आले आहे. यात निश्चितपणे गैरव्यवहार झाला आहे काय, असल्यास, तो किती रकमेचा झाला आहे ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, तक्रारदाराने अशी तक्रार केली होती की, ह्या संस्था बोगस आहेत. पण त्या सगळ्या नोंदणीकृत संस्था आहेत असे चौकशीमध्ये आढळून आले आहे. तक्रारदाराने अशीही तक्रार केली होती की, एकच सदस्य अनेक संस्थांचे सदस्य आहेत. एवढेच नव्हे तर कास्ट व्हॅलिडिटी झाली नाही. फोटो आणि नाव वेगवेगळे आहे. पण तसे चौकशीमध्ये काही आढळून आले नाही. श्री.राणे नावाचे सद्‌गृहस्थ कोर्टामध्ये गेले होते. उच्च न्यायालयाने दिनांक 19 मार्च 2013 रोजी या सगळ्या केसचा अभ्यास केला आणि त्यांनी एवढेच सांगितले की, सर्वांची कास्ट व्हॅलिडिटी करून घ्यावी.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, याबद्दल मागच्या अधिवेशनात देखील चर्चा झाली होती. ही 2004 सालापासून योजना सुरू आहे. माझ्या माहिती प्रमाणे 225 संस्थांच्या अडीच हजार कोटी रूपयांना शासनाने मान्यता दिलेली आहे. यात शेकडो कोटी रूपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. या संस्था दुसऱ्या हप्त्यासाठी न येण्याचे कारण असे आहे की, त्यांनी पहिल्या हप्त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र दिलेले नाही. आपण या संस्थांना जेवढे पैसे दिले आहेत ते परत येणार नाहीत आणि संस्थाही उभ्या राहणार नाहीत ही वस्तुस्थिती आहे. यात अधिकारी आणि संस्था या दोघांचेही संगनमत आहे. यासंबंधातील तक्रारी मोठ्या प्रमाणावर आल्या होत्या म्हणून पुण्याच्या बार्टी या संस्थेने चौकशी केली. त्यांनी आपला अहवाल शासनाला दिलेला आहे. तो गेल्या अनेक वर्षापासून पडून आहे. शासन या संबंधी ढिम्म असून हलायला तयार नाही. तेव्हा बार्टीचा अहवाल स्वीकारून त्यानुसार कारवाई करण्यात येणार आहे काय ? तसेच ज्या संस्थेने बोगसपणे पैसे उचलले आहेत त्या सगळ्या संस्थांकडून शासन पैसे वसूल करणार आहे काय व यात जे आधिकारी दोषी आहेत त्यांच्या विरूद्ध फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे काय ?

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42483...

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, हा प्रश्न अगदी बरोबर आहे. त्यामुळेच आम्ही मागच्या दोन वर्षांपासून नवीन संस्थांना परवानगी दिलेली नाही. 372 संस्थांच्या अडचणी काय आहेत हे पाहिले पाहिजे. या संस्था पहिला हप्ता घेऊन गेल्या असून दुसरा हप्ता घेण्यासाठी येत नाहीत. याचा अर्थ त्यांना प्रोजेक्ट करावयाचा नाही. त्यामुळे शासनाचे पैसे वसूल करण्यासंबंधीच्या सूचना आम्ही दिलेल्या आहेत. आपल्या कायद्यामध्ये जी काही तरतूद आहे त्या प्रमाणे हे पैसे वसूल करण्यात येतील. यात बार्टीने देखील चौकशी केली आहे. यात गैरव्यवहार झालेला नसून ते प्रोजेक्ट पूर्ण करीत नाही असा त्यामध्ये विषय आहे.

(दोन्ही बाजूकडील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदय, समाजिक न्याय विभागाचे जवळ जवळ एक हजार कोटी रूपये यात गुंतलेले आहेत. या मध्ये 370 संस्थांचा समावेश आहे. या संस्थांनी आपल्याकडून पहिला हप्ता घेतला आहे. पण ते काम सुरू न करता त्यांनी शासनाच्या निधीचा गैरवापर केला असेल तर त्यांच्याकडून फक्त वसुलीच नव्हे तर कायदेशीररित्या प्रॉसिक्युशन कसे होईल या दृष्टीने आपण पहावे.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, पहिला हप्ता घेतल्यानंतर दुसऱ्या हप्त्याला जिल्हाधिकारी एनओसी देतात. त्यानंतर मग आम्ही शेवटचा हप्ता देतो. यात जर कोणी गैरव्यवहार केला असेल तर त्या संस्थेला प्रॉसिक्यूट करण्यात येईल.

........................

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील जातपडताळणीचे हजारो अर्ज जातपडताळणी समितीकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(7) * 41610 श्री.मोहन जोशी, श्री.सुभाष चव्हाण, श्री.संजय दत्त, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.एम.एम.शेख, डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक 37275 ला दिनांक 18 मार्च, 2013 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील जात प्रमाणपत्र पडताळणीच्या पंधरापैकी बारा समित्यांचे अध्यक्ष व नऊ सदस्य सचिवांचे पद गेल्या 1 वर्षापासून रिक्त असल्याने जात पडताळणी अर्ज प्रलंबित असल्याचे माहे मे, 2013 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उपरोक्त रिक्त पदांवरील नियुक्त्या त्वरित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) असल्यास, जात पडताळणी प्रमाणपत्रास विलंब लागू नये यासाठी कोणत्या उपाययोजना राबविण्यात येणार आहेत,

(4) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवाजीराव मोघे** : (1) व (2) राज्यातील 15 जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांपैकी 10 पदावर अध्यक्ष कार्यरत असून सदस्य सचिवांची 13 पदे भरण्यात आलेली आहेत. उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(3) जात पडताळणी प्रमाणपत्राची प्रकरणे निकाली काढण्याकरिता माहे सप्टेंबर, 2012 ते मे, 2013 या कालावधीत विशेष मोहिम राबविण्यात आली असून भविष्यातही अशा मोहिमा राबविण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. प्रमाणपत्र पडताळणीस विलंब लागू नये म्हणून ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून संबंधित अधिकाऱ्यांच्या वेळोवेळी कार्यशाळा व बैठका आयोजित करण्यात येत आहेत. तसेच, भविष्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन अर्जदारांना एस.एम.एस. व्दारे माहिती देणे व कार्यालयात सी.सी.टी.व्ही. यंत्रणा व रेकॉर्डिंगसाठी स्वतंत्र संगणक यंत्रणा बसविण्याची बाब तपासण्यात येत आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, राज्यामध्ये गेल्या अनेक वर्षापासून जात पडताळणीचा प्रश्न गाजत आहे. मागासवर्गीय, ओबीसी, व्हीजेएनटी, एस.टी.च्या लोकांच्या व विद्यार्थ्यांच्या मनामध्ये यासंबंधी फार मोठी नाराजी आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ पूर्वी श्री.भारवि... 11:55

ता.प्र.क्र.41610...

श्री.मोहन जोशी...

मधल्या काळात शासनाने विशेष मोहिमा घेऊन प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्याचा प्रयत्न केला. तरी सुध्दा 1 लाखाहून अधिक लोकांना जातपडताळणीचे दाखले मिळालेले नाहीत. जातप्रमाणपत्र लवकर मिळण्यासाठी शासनाने समित्या नेमल्या. परंतु त्या समित्यांवर अध्यक्ष व सचिवांच्या नियुक्त्या झाल्या नाहीत. जातप्रमाणपत्र लवकर मिळण्याच्या संदर्भात केंद्र सरकारने काही निर्देश दिलेले आहेत काय ? जिल्हा पातळीवर समित्याकरुन 1 लाख प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याच्या दृष्टीने शासनाने काही उपाय योजना आखल्या आहेत काय ? जातप्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज केल्यानंतर त्यास तीन महिन्यात जात प्रमाणपत्र मिळेल असे माननीय मंत्री महोदयांनी नागपूर अधिवेशनात सांगितले होते. तेव्हा प्रलंबित असलेली प्रकरणे तीन महिन्यात निकाली काढण्यात येतील काय ? निवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांनी जात प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांचे निवृत्तवेतन थांबविण्यात येणार आहे. तेव्हा त्या संदर्भात शासन काही निर्णय घेणार आहे काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, जात प्रमाणपत्राची पडताळणी लवकर होण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्नशील आहे. सन 2011-2012मध्ये एकूण अडीच लाखांहून अधिक प्रकरणे निकाली काढली आहेत. सन 2012-2013 मध्ये जादा स्टाफ देऊन जवळपास चार लाखाहून अधिक प्रकरणे निकाली काढली आहेत. आता 1 लाख 6 हजार 352 प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यापैकी 62 हजार 974 प्रकरणे ही विद्यार्थ्यांची आहेत आणि ती दोन वर्षात द्यायची असतात. ही सर्व प्रलंबित प्रकरणे लवकरात लवकर काढण्याचा निर्णय होणार आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, एक लाख प्रकरणे प्रलंबित आहेत. अर्ज केल्यानंतर तीन महिन्याच्या आत जातपडताळणी प्रमाणपत्र देण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात सांगितले होते. परंतु जातपडताळणी प्रमाणपत्र वेळेवर न मिळाल्यामुळे अनेकांच्या मुदती बार झाल्या आहेत, अनेकांच्या नोकऱ्या संकटात आल्या आहेत, विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये प्रवेश मिळू शकले नाहीत. तेव्हा प्रलंबित एक लाख अर्जापैकी मुदतबाह्य झालेले अर्ज किती आहेत ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41610...

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, अकरावीच्या विद्यार्थ्यांना जातप्रमाणपत्र देण्यासाठी दोन वर्षाचा कालावधी असतो. परंतु अन्य प्रकरणे तीन महिन्यांच्या कालावधीत निकाली काढण्यात येतात. ज्यांनी बोगस प्रमाणपत्र सादर केलेले आहे ते कागदपत्रांची पूर्तता वेळेवर करीत नाहीत. पोलीस व्हेरिफिकेशनमध्ये वेळ जातो. तेव्हा आम्ही समितीला सूचना दिलेल्या आहेत की, ज्यांच्याकडे कागदपत्रांची मागणी केल्यानंतर त्यांनी ती वेळेवर न दिल्यास जास्त वाट न पाहता त्यांचे प्रमाणपत्र रद्द करावे जेणेकरुन प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये हा चिंतेचा विषय झालेला आहे. 31 जुलै महिन्यापर्यंत जात प्रमाणपत्र दिले नाही तर विद्यार्थ्यांना जातीच्या आधारावर मिळालेले प्रवेश रद्द होणार आहेत. पुढील सात-आठ दिवसांमध्ये 1 लाख विद्यार्थ्यांना आपण जात प्रमाणपत्र देऊ शकणार नाही तर निदान ती मुदत तरी वाढविणार आहात काय ? माझा दुसरा प्रश्न आहे की, शासकीय सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे पेन्शन थांबविण्यात आलेले आहे त्या संदर्भात शासन कोणती भूमिका घेणार आहे ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मोहन जोशी आणि चंद्रकांत पाटील यांनी सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. सदर प्रश्न सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित आहे. ज्यांनी आरक्षित जागांवर नोकरी मिळाली आहे त्यांनी जातपडताळणी प्रमाणपत्र सादर करावे असे सामान्य प्रशासन विभाग मागील सात वर्षापासून सांगत आहे.. परंतु त्यांनी तशी प्रमाणपत्रे सादर केलेली नाहीत. तेव्हा सामान्य प्रशासन विभागाने एक परिपत्रक काढलेले आहे की, ज्यांनी आरक्षित जागांवर नोकरी मिळवली आहे त्यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र दिले नसेल त्यांनी 31 जुलै पूर्वी तसा अर्ज करुन पुढील सहा महिन्यात जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करायचे आहे. परंतु ही मुदत वाढण्याची शक्यता आहे.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, जे सरकारी कर्मचारी अनेक वर्षापूर्वी सेवानिवृत्त झालेले आहेत आणि त्यांना पेन्शन सुरु आहे त्यांच्या बाबतीत शासनाचे काय धोरण आहे ? जात प्रमाणपत्र पडताळणीची प्रकरणे लवकर निकाली काढण्यासाठी जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांमध्ये वाढ करण्यात येईल काय ?

यानंतर श्री.बोर्डे...

अग्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41610....

श्री.शिवाजीराव मोघे : महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी 20 दिवसांपूर्वी एक बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये सध्या कार्यरत असलेल्या 15 जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांची संख्या 24 करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या संदर्भात लवकरात लवकर अंमलबजावणी करण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न पेन्शनच्या बाबतीत विचारलेला आहे. पेन्शन हा विषय माझ्या विभागाच्या अखत्यारीत नसून, सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारीत आहे.

**सभापती** : मला वाटते या प्रश्नावर सन्माननीय सदस्यांनी कितीही प्रश्न विचारले आणि माननीय मंत्र्यांनी कितीही उत्तरे दिली तरी अपेक्षित उत्तर येईल की नाही हे सांगता येत नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन या विषयी माझ्या दालनामध्ये सन्माननीय सदस्य व माननीय मंत्र्यांना बोलावून हा प्रश्न कसा सुटेल या दृष्टीने प्रयत्न करण्यात येईल.

या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित आहेत. विद्यार्थ्यांना 31 जुलै पर्यंत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यास सांगण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने ही मुदत वाढवून देता येईल काय, ते आपण पहावे.

श्री.शिवाजीराव मोघे : महोदय, इंजिनियरींग कॉलेजच्या विद्यार्थ्यांना प्रतिज्ञापत्राच्या आधारावर प्रवेश देणार आहोत. परंतु मेडीकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांना त्या तारखेच्या आत प्रवेश देणार आहोत. जे विद्यार्थी कागदपत्रे सादर करणार नाही त्यांचे प्रवेश स्टेट-वे रद्द करण्यात येतील.

श्री.विजय गिरकर : सभापती महोदय, विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दि. 31 जुलै, 2013 पर्यंतची मुदत दिलेली आहे. मी विचारु इच्छितो की, ही मुदत वाढवून देण्यात येईल काय ?

**सभापती** : मी अगोदरच ही बाब माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन उद्याच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत या विषयावर चर्चा करण्यात येईल. याच्या बाकीच्या बाजू काय आहेत हे पाहू. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी व्यवहार्य मार्ग काढण्यात येईल असाच राज्य सरकारच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. -------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: अतरांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे

अतिरिक्त सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतरांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्या आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

..3..

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**</u>

**सभापती** : सन्माननीय सदस्य, श्री.विनोद तावडे, श्री.रामदास कदम, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री.पांडुरंग फुंडकर, डॉ.दीपक सावंत, ॲड.आशिष शेलार यांनी "पुणे-सातारा महामार्गावर कात्रजच्या नव्या बोगद्याजवळील शिंदे वाडी येथे दिनांक 7 जून, 2013 रोजी वा त्या सुमारास पाण्याच्या मोठ्या प्रवाहात एक महिला व मुलगी वाहून गेल्याची घडलेली घटना, सदरची घटना त्या भागातील बुजवलेले ओढे, टेकड्यावर केलेली बेकायदेशीर बांधकामे आणि रस्त्यांची अर्धवट बांधकामे यामुळे घडल्याचा तेथील नागरिकांनी केलेला आरोप" या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे. हा विषय नियम 289 चा कसा होतो एवढेच सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी एक मिनिटात सांगावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी रस्त्यांची कामे सुरु आहेत. विशेषत: नॅशनल हायवे ऑथॉरिटीने वेगवेगळ्या ठेकेदारांवर त्या रस्त्याच्या दुरुस्ती व देखभालीची जबाबदारी टाकली आहे. पुणे-सातारा रोडवर टेकडी येथून नवीन बोगदा केला गेला. हा बोगदा प्रवाशांना सोयीचा होईल असे अपेक्षित होते. प्रत्यक्षात त्या टेकडीवर 100 एकरांपेक्षा जास्त एकरांवर अतिक्रमण झाले आहे. किसन राठोड नावाच्या व्यावसायिकाने त्या ठिकाणी बेकायदेशीर बांधकामे केली आहेत. मोठ्या प्रमाणावरील पाण्याचा निचरा होण्यासाठी मोऱ्या साफ केल्या जात नाहीत. पुणे-सातारा रोडवरुन आपण नेहमीच प्रवास करीत असतो. विशाखा वाडेकर आणि तिच्या मुलीऐवजी कदाचित आपणही या घटनेमध्ये सापडलो असतो. त्या ठिकाणी अनपेक्षित पाण्याचा लोंढा आला आणि ही घटना घडली.

महोदय, ही एकमेव घटना घडली असे नाही.

नंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ...

पुण्याच्या आसपास अनेक ठिकाणी टेकड्यांवर अनधिकृत बांधकाम आणि टेकड्या पूर्णपणे भूईसपाट करण्याचा उद्योग बेकायदेशीरपणे चाललेला आहे. टेकड्यांचे संरक्षण करण्याच्या संदर्भात जे कायदे आहेत त्याच्या अंमलबजावणीची ॲथॉरिटी अजून शासनाने नेमलेली नाही. या संबंधित घटनेबरोबरच गृह विभागामधील काही पोलीस अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी जमिनी घेतलेल्या आहेत. त्यांचा दबाव येत होता. आज जिल्हाधिकाऱ्यांनी जी चौकशी जाहीर केली आहे ती चौकशी एका तहसीलदारामार्फत केलेली आहे परंतु प्रत्यक्षात अनेक आयपीएस अधिकारी आणि मंत्रालयातील आयएएस अधिकाऱ्यांचे प्लॉट्स या टेकडीच्या आसपास असल्यामुळे ही टेकडी आपल्या पुढच्या अधिवेशनापर्यंत पूर्ण नष्ट केली जाईल ही वस्तुस्थिती आहे. या शिंदेवाडी येथील दुर्घटनेच्या अनुषंगाने नागरिकांची सुरक्षितता, हायवे ॲथॉरिटी, सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल विभाग यांच्याशी संबंधित या विषयाच्या संदर्भात ही नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. आता सुध्दा प्रचंड पाऊस पडत आहे. हायवेवर ठिकठिकाणी आपण बघतो की, पाणी तुंबल्यामुळे मंद गतीने लोकांचा प्रवास चालू आहे. हा विषय तातडीचा असल्यामुळे आपण या विषयावरील चर्चेला न्याय द्यावा आणि लोकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे अशी मी विनंती करते.

**सभापती** : सर्वसाधारणपणे प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या विषयावंर नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचना दाखल होतात. आज सुध्दा नियम 289 अन्वये ही प्रस्तावाची सूचना दाखल झालेली आहे. मी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की, या विषयावर चर्चा करण्याकरिता मी आपल्याला लक्षवेधी सूचनेकरिता परवानगी देतो. त्यामध्ये आपल्याला हा विषय या ठिकाणी मांडता येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी आपली आभारी आहे. त्याला आपण अर्धा-तास तरी वेळ द्यावा. कारण यामध्ये खूप मुद्दे आहेत.

**सभापती** : खरे तर लक्षवेधी सूचनेवरील चर्चेकरिता 10 मिनिटांचा वेळ असतो परंतु आपण ती चर्चा 25 मिनिटे घेतो आणि अर्धा-तास चर्चेकरिता अर्धा-तास वेळ असतो पण ती चर्चा पंधरा मिनिटांमध्ये संपवितो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, यामध्ये गृह विभाग सुध्दा अपेक्षित आहे. आम्हाला पाच मिनिटात उत्तर मिळाले तरी चालेल परंतु समाधानकारक उत्तरे देणारे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे. आमची विनंती राहील की ते घडले पाहिजे.

**सभापती** : ठीक आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. जयंत पाटील ( ग्रामविकास मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010-2011 चा महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील चाळिसावा लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011-2012 चे ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या 33 जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुणे विद्यापीठाचा सन 2011-2012 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांचे सन 2010-2011 व 2011-2012 या वर्षाचे वार्षिक लेखे (अंकेक्षण अहवालासह ) सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे (अंकेक्षण अहवालासह) सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मुंबईमधील बी.डी.डी.चाळ क्रमांक 52 मध्ये एक विश्वस्त निधीतर्फे अंध विद्यार्थ्यांचे वसतिगृह चालविले जाते. नरसी शिवाजी वसतिगृह असे या वसतिगृहाचे नाव आहे. 1981 सालापासून ही इमारत ढासळण्याच्या स्थितीत आहे. तेथील पलंग, गाद्या व चादरी जुनाट झ ालेल्या आहेत, तेथे विजेचा पुरवठा केला जात नाही. अशा खूप समस्या आहेत. तेथे राहणारे सर्व विद्यार्थी अंध आहेत. त्या ठिकाणी जेवणाचीही नीट व्यवस्था नाही. त्या ठिकाणच्या विश्वस्त मंडळाचे या बाबीकडे लक्ष नाही. सामाजिक न्याय विभागाची ही जबाबदारी आहे. परंतु त्या विभागानेही आपली जबाबदारी पार पाडलेली नाही. एकदा अपंगत्वावर मात करीत असताना या अंध विद्यार्थ्यांना अतिशय हलाखीच्या परिस्थितीतून आपला जीव मुठीत धरुन राहावे लागत आहे. ही अतिशय दुर्दैवी घटना आहे. माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांना याबाबतीत तातडीने उपाययोजना करुन शक्य असेल तर या वसतिगृहातील सर्व अंध विद्यार्थ्यांना दुसऱ्या जागेमध्ये जाण्याची परवानगी द्यावी आणि त्यांच्या राहण्याची नीट व्यवस्था करावी. अन्यथा ते विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होतील आणि अपंगत्वावर त्यांना मात करीत असताना पुढील आयुष्य जगणे अतिशय खडतर होईल. शासनाने या औचित्याच्या मुद्याची दखल घ्यावी अशी मी विनंती करीत आहे.

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आज 'सकाळ' या वर्तमानपत्रात या वसतिगृहाचे फोटो छापून आलेले आहेत. ते अंध विद्यार्थी तेथे कशा परिस्थितीत राहत आहेत त्याचेही फोटो आलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी मांडलेल्या मुद्याबाबत मी लक्षवेधी सूचना दिलेली आहे. त्या अंध विद्यार्थ्यांना आजच्या आज दुसरीकडे स्थलांतरित करण्यात यावे अशी माझी मागणी आहे. याबाबत आपण मंत्री महोदयांना आपण निर्देश द्यावेत अशी मी आपल्याला विनंती करीत आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, देश पातळीवर काम करणाऱ्या एका अंध संस्थेचा मी प्रमुख आहे. हे काम करीत असताना वेगवेगळ्या राज्यातील अंध वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्या सोयी सवलती दिल्या जातात त्या मी पाहिलेल्या आहेत. खाजगी संस्थांना किंवा विश्वस्त संस्थांना सामाजिक न्याय खात्याकडून वसतिगृहासाठी परवानगी मिळते. अपंग कल्याण आयुक्त यांच्याकडे हा विषय आहे. विभागीय अधिकाऱ्यांची या वसतिगृहांची वारंवार तपासणी करुन तेथील व्यवस्था नीट आहे किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी असते. परंतु ह्या संस्था आणि अधिकाऱ्यांनी संगनमत करुन ह्या संस्था शासनाकडून चुकीच्या पध्दतीने अनुदान घेतातच आणि अंध विद्यार्थ्यांचे जीवन अधिक भयावह करतात. ही माणुसकीला लाजविणारी गोष्ट आहे. त्यामुळे शासनाने यामध्ये तातडीने हस्तक्षेप करुन ज्या अधिकाऱ्यांनी या संस्थेविरुध्द कारवाई केली नाही त्यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल काय ? त्या ठिकाणी राहात असलेल्या अंध विद्यार्थ्यांचे दुसरीकडे स्थलांतर करण्यासाठी उपाययोजना केली जाईल काय, याबाबत मंत्री महोदयांनी सभागृहाला माहिती द्यावी अशी मी विनंती करतो.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत दोन दिवसामध्ये कार्यवाही करण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

3....

NTK/ D/ KTG/

**नियम 93 अन्वयेच्या सूचना**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते यांनी "एमएमआरडीए ने तळोजे येथे एकात्मिक भराव भूमी योजना चालविण्याचा ठेका भ्रष्ट व काळ्या यादीतील रामकी कंपनीला देणाऱ्या संबंधितांविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव शहराच्या बाहेरुन असलेल्या वळणमार्गाला लागून 4 हेक्टर जागेवर ट्रक पार्किंगची तरतूद असतानाही अशा जागेचा फलक किंवा जागा पाहण्यात न येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय उप सभापती**...

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "मुंबई उपनगरातील बोरीवली येथे लक्ष्मी शॉपिंग सेंटर ही इमारत असून तेथील रहिवाशांना स्थलांतरित करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, विनोद तावडे व नागो पुंडलिक गाणार यांनी "शिक्षण सेवकांच्या मानधनातील वाढ दिनांक 1 जानेवारी 2012 ऐवजी दिनांक 1 जून 2012 पासून लागू केल्याने आदिवासी विभागातील शिक्षण सेवकांवर झालेला अन्याय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी "महेश्वरी उद्यान, माटुंगा परिसरातील श्री सत्यदेवी सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) या संस्थेच्या वतीने धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या मसुद्याला हरकत घेतली असून या संस्थेच्या वसाहतीचे क्षेत्र धारावी पुनर्विकास प्रकल्प क्षेत्रातून वगळण्याची केलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार, श्री. विनोद तावडे,श्रीमती शोभा फडणवीस व श्री. चंद्रकांत पाटील यांनी "मुंबई वांद्रे येथील स्टीवन कॉडर्स याचा रेल्वे अपघातात मृत्यू न होता खून करण्यात आल्याचा त्याच्या कुटुंबीयाकडून संशय व्यक्त करण्यात आल्याने सदर प्रकरण स्वतंत्र विशेष तपास यंत्रणेकडे देण्याची केलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. भाई गिरकर, विनोद तावडे व ॲड. आशिष शेलार यांनी "ठाणे जिल्ह्यात तसेच आदिवासी तालुकयांमध्ये वाढत असलेले बालमृत्यू तसेच कुपोषणाच्या प्रमाणात होत असलेली वाढ " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय उप सभापती**...

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया व डॉ. रणजित पाटील यांनी "अकोला महानगरपालिकेतील अधिका-यांची रिक्त असलेली पदे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 12:15

**पृ.शी./ मु.शी** : मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्याच्या मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची करावयाची अंमलबजावणी याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे व नागो पुंडलिक गाणार,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.शिवाजीराव मोघे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : हा मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळयाचा विषय आहे. राज्यातील विनाअनुदानित शाळामधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी प्रतिपूर्तीच्या संदर्भातील हा विषय आहे. शासनाने फी प्रतिपूर्ती करण्यास नकार दिल्यानंतर अनेक लोकांनी मुंबई उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका दाखल केली. मुंबई उच्च न्यायालयाने या बाबतीत स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. पहिली ते चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना किंती फी द्यावी, पाचवी ते सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना किती फी द्यावी आणि 8 वी ते 10 पर्यंतच्या विद्यार्थ्यांना किती फी द्यावी यासंबंधी न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. परंतु या आदेशांची अंमलबजावणी शासनाने केलेली नाही. उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी न केल्यामुळे आता अवमान याचिका न्यायालयामध्ये दाखल झालेली आहे. उच्च न्यायालयाने आदेश दिल्याचे शासनाने निवेदनामध्ये मान्य केलेले आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शुल्क भरण्याच्या उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी न करता शासनाने सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केलेली आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचा हा विषय आहे. संताप व्यक्त करावा अशा प्रकारचे उत्तर शासनाकडून दिले गेले आहे. सभापती महोदय, माझी शासनाला विनंती आहे की, मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी भरण्याच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याऐवजी मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशाची शासन अंमलबजावणी करील काय आणि फी प्रतिपूर्तीचा निधी शिक्षण संस्थांना देईल काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : आपल्या राज्यामध्ये पोस्टमॅट्रीक स्कॉलरशीप देण्याची पध्दती होती. आता प्रीमॅट्रीक स्कॉलरशीप मिळावी यासाठी जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. निवेदनामध्ये नमूद केल्याप्रमाणे पहिली ते चौथीसाठी दरमहा 100 रुपये, पाचवी ते सातवीसाठी दरमहा 150 रुपये आणि आठवी ते दहावीसाठी दरमहा 200 रुपये दिले जातात. माननीय उच्च न्यायालयाने पहिली ते चौथीसाठी 10,463 रुपये प्रति विद्यार्थी, पाचवी ते आठवीसाठी 25,581 रुपये प्रतिविद्यार्थी, आणि नववी ते दहावी अहवालातील विकल्पाप्रमाणे शुल्काची प्रतिपूर्ती द्यावी असे आदेश दिलेले आहेत. जे बीपीएलधारक आहे त्यांच्या बाबतीत आपण मान्य केले आहे. परंतु याबाबतीत आर्थिक अडचण असल्यामुळे शासन सर्वोच्च न्यायालयामध्ये गेलेले आहे.

---

...5..



**पृ.शी./ मु.शी** : कोल्हापूर व सांगली मधील विद्यार्थ्यांना बळजबरीने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गडचिरोली येथे पाठविण्याचे आदेश रद्द करण्याची
आवश्यकता याबाबत श्री. नागो पुंडलिक गाणार, वि. प. स.
यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. पद्माकर वळवी ( क्रीडा व युवक कल्याणमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

...6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री. नागो पुंडलिक गाणार : गडचिरोली येथील क्रीडा प्रबोधिनीमध्ये खेळाडूंची संख्या कमी असल्यामुळे भंडारा जिल्ह्यातील 9, सातारा जिल्हयातील 6,कोल्हापूर जिल्ह्यातील 1, परभणी

जिल्ह्यातील 3 अशा वर्ग पाचवी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले आहेत. हे प्रवेश बदलून अन्य ठिकाणी देण्यात यावेत अशी विद्यार्थ्यांच्या पालकांनी विनंती केलेली आहे. या विनंतीचा शासन किती दिवसात विचार करील ?

श्री. पद्माकर वळवी : याबाबतीत 15 दिवसात निर्णय घेतला जाईल.

---

...नंतर श्री. गिते...

अप्रसुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बुलढाणा जिल्हयातील शेगाव,खामगाव,नांदुरा हया गावांची हद्दवाढ करण्यासंदर्भात निर्णय घेणे

**मु. शी.** : बुलढाणा जिल्हयातील शेगाव,खामगाव,नांदुरा हया गावांची हद्दवाढ करण्यासंदर्भात निर्णय घेणे यासंबंधी श्री.गोपीकिसन बाजोरिया,डॉ.रणजित पाटील,ॲड.अनिल परब, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.गोपीकिसन बाजोरिया (अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शेगाव,खामगाव,नांदुरा या तालुक्यांचा बुलढाणा जिल्हयात समावेश होणे, उपरोक्त गावातील नगरपालिका क्षेत्राचा झपाटयाने होत असलेला विकास, ब्रिटीश काळापासून उपरोक्त गावांची हद्दवाढ करण्यासंदर्भात सातत्याने शासनाकडे होत असलेली मागणी, तसेच येथील नागरिक नगरपालिकेचा कर न भरताच तेथील सोयीसवलतींचा लाभ घेत असणे,यामुळे, शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडणे,परिणामी शासनाचे लाखो रुपयांचे होणारे नुकसान, याप्रकरणी शासनाने तातडीने लक्ष घालून उपरोक्त जिल्हयातील शेगाव,खामगाव,नांदुरा हया गावांची हद्दवाढ करण्यासंदर्भात निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही,प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.उदय सामंत ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

श्री.गोपीकिसन बाजोरिया : ही शेगाव, खामगाव,नांदुरा ह्या गावाची हद्दवाढ करण्यासंबंधीची लक्षवेधी सूचना आहे. माझ्या मतदार संघातील अकोला,वाशिम आणि बुलढाणा या जिल्हयात जवळपास 20 नगरपालिका आहेत. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे म्हटले आहे की, शेगाव नगरपालिकेची स्थापना 1887 मध्ये झाली आहे. खामगाव नगरपालिकेची स्थापना 1867 झाली आहे आणि 1948 मध्ये हद्दवाढ करण्यात आली आहे. ती हद्दवाढ ब्रिटीश कालावधीत प्रस्तावित केली गेली असेल. नंतरच्या कालावधीत राज्य शासनाने या तिन्ही नगरपालिकांची हद्दवाढ केलेली नाही. नांदुरा नगरपालिकेची हद्दवाढ 1930 मध्ये करण्यात आली आहे. जवळपास 80 वर्षात एकाही नगरपालिकेची हद्दवाढ करण्यात आलेली नाही. या तिन्ही नगरपालिका क्षेत्रामध्ये 20 टक्के लोकसंख्या वाढलेली आहे. नांदुरा शहरात 42 हजार लोकसंख्या मूळ हद्दीत आहे आणि 15 हजार एवढी लोकसंख्या साईडच्या पॅरीफेरील झोनमध्ये वाढलेली आहे. खामगाव नगरपालिका क्षेत्रात मोठया प्रमाणात लोकसंख्या वाढली आहे आणि शेगांव नगरपालिका कार्यक्षेत्रातही 20 टक्के लोकसंख्या वाढलेली आहे.

ब्रिटीश काळामध्ये असलेला कोणताही महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनींग ॲक्ट पॅरीफेरील झोनसाठी लागू होत नाही. तसेच कोणताही डेव्हलपमेंट कंट्रोल रुल लागू होत नाही. अशी परिस्थिती असताना पॅरीफेरील झोनमध्ये येण्या-जाण्यासाठी रस्ता, सांडपाण्याची व्यवस्था केली जात आहे. या ठिकाणी सोयीसुविधा देण्यासाठी वारंवार नगरपालिकांनी ठराव घ्यावयाचा आणि ते ठराव शासनाकडे पाठवावयाचे. पॅरीफेरील झोनमध्ये दिलेल्या सोयीसुविधांमुळे शहराचा सत्यानास होत चालला आहे. तेथील लोकांकडून नगरपालिकेस करही येत नाही. तरी देखील तेथील रहिवाश्यांना नगरपालिकेला सर्व सुविधा पुरवाव्या लागत आहेत. या तिन्ही नगरपालिकांची हद्दवाढ केली नसल्यामुळे या तिन्ही नगरपालिकांना राज्य शासनास हेरीटेज शहर म्हणून घोषित करावयाचे आहे काय ? या शहरातील नगरपालिकांना 100 वर्षाचा कालावधी झाला असल्यामुळे त्यांच्यासाठी मोठे कार्यक्रम आखून त्या नगरपालिकांना हेरीटेजमध्ये टाकू असा शासनाचा प्रयत्न आहे काय ? या तिन्ही नगरपालिकांची हद्दवाढ करणार काय, जो पर्यंत या शहरांची हद्दवाढ होत नाही तो पर्यंत या शहरांचा विकास करण्यासाठी मास्टर प्लॅन तयार करण्यात येईल काय, या तिन्ही नगरपालिकांमध्ये राज्य शासनाने एकही टी.पी.ओ.अथवा ए.टी.पी. दिलेला नाही, ते टी.पी.ओ.अथवा ए.टी.पी. नियुक्त केले जातील काय ?

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिशन बाजोरिया.... लक्षवेधी सूचना क्रमांक-1.....

या तीनही नगरपालिकांमध्ये एकही नगररचना अधिकारी राज्य शासनाने नेमलेला नाही. अन-क्वालिफाईड व्यक्तींकडून बांधकामांना परवानगी दिली जात आहे. 1.5, 2.0, 3.0 किंवा वेळप्रसंगी 4.0 एफएसआय दिला जातो. म्हणून शासन या तीनही नगरपालिकांमध्ये नगर नियोजन अधिकारी किंवा सहाय्यक नगररचना अधिकारी नियुक्त करणार आहे काय?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारले की, हेरिटेज जाहीर करणार आहे का? या प्रश्नाचे उत्तर 'नाही' असे आहे. नगरपालिकांचे कामकाज 1965 च्या कायद्यानुसार चालते. या तीनही नगरपालिकांची सविस्तर माहिती द्यावयाची झाली तर शेगाव नगरपालिकेची स्थिती अशी आहे की, तेथे हद्दवाढीच्या संदर्भात काही कोर्ट मॅटर झाली आहेत. रोकडीया नगर ही नवीन ग्रामपंचायत 2012 मध्ये स्थापन झाली. ती ग्रामपंचायत हद्दवाढीमध्ये येते. परंतु तेथील ग्रामस्थांचा शेगाव नगरपालिकेमध्ये यायला विरोध आहे. त्या बाबतीत समन्वय साधणे आवश्यक आहे. ब वर्ग असलेली शेगाव नगरपालिका आणि रोकडीया नगर ग्रामपंचायत यांच्यातील हद्दवाढीचा प्रश्न समन्वयाने सुटू शकतो.

सभापती महोदय, खामगाव नगरपालिकेने ठराव संमत केला, परंतु तो प्रस्ताव अद्याप शासनाकडे आलेला नाही. नांदूरा नगरपालिकेच्या बाबतीत शासनाकडे काही दिवसापूर्वी प्रस्ताव पाठविला गेला आहे. त्या प्रस्तावाची सविस्तर छाननी करुन लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, प्रत्येक नगरपालिकेमध्ये एटीपी किंवा टीपीओ नियुक्त करणार आहात काय? अन-क्वालिफाईड लोकांकडून तेथील डेव्हलपमेंट सुरु आहे.

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, ज्या पध्दतीने सन्माननीय सदस्यांनी विषय मांडला आहे त्या संदर्भात कार्यवाही केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शेगाव नगरपालिकेची स्थापना 1887 साली झाली. त्या काळापासून हद्दवाढीचा एकही प्रस्ताव मंजूर झालेला नाही. खामगाव नगरपालिकेमध्ये 1924 व 1948 मध्ये हद्दवाढ झालेली होती. त्यानंतर 70 वर्षाचा काळ उलटून गेला आहे. या तीनही नगरपालिकांकडून हद्दवाढीचे प्रस्ताव शासनाकडे न पाठविण्याची कारणे अशी आहेत की,.........

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर......

नगरपालिकेकडून कोणत्याही वस्त्यांना कोणत्याही प्रकारच्या सोयी सुविधा पुरविल्या जात नाहीत. त्या भागात राहणाऱ्या नागरिकांना रस्ते उपलब्ध नाहीत, सांडपाण्याची व्यवस्था नाही, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. मात्र ले-आऊट टाकून जमिनी विकल्या गेल्या, त्या जमिनीवर घरे बांधली गेली. परंतु आवश्यक त्या सोयी सुविधा नगरपालिका पुरवित नसल्यामुळे हद्दवाढीचा प्रस्ताव त्वरित मान्य करणे आवश्यक आहे. प्रस्ताव मान्य झाल्यास त्यांना सोयी सवलती मिळू शकतील आणि सर्व अडचणी दूर होतील. त्यामुळे नगरपालिकांना कर रुपाने उत्पन्न मिळू शकेल. शासन शेगाव, खामगाव व नांदूरा या तीनही नगरपालिकांकडून हद्दवाढीचे प्रस्ताव मागवून घेणार आहे का?

श्री.उदय सामंत : शेगाव नगरपालिकेबाबत मी यापूर्वीच सांगितले आहे. रोकडीया नगर नावाची नवीन ग्रामपंचायत स्थापन झाली असून ती ग्रामपंचायत आणि शेगाव ब वर्ग नगरपालिका यांच्यात हद्दवाढीबाबत वाद आहे. हा वाद मिटला तर प्रस्ताव मागवून निर्णय घेता येईल. खामगाव नगरपालिकेबाबत आजच तशा सूचना देऊन प्रस्ताव मागवून घेऊ. कोणत्याही तक्रारी नसतील तर प्रस्तावाची छाननी करुन लवकर हद्दवाढीबाबत निर्णय घेण्यात येईल.

श्री.प्रवीण पोटे : सभापती महोदय, हद्दवाढीचा प्रश्न संपूर्ण महाराष्ट्रात ऐरणीवर आलेला आहे. आज कोणत्याही महापालिकेमध्ये किंवा नगरपालिकेमध्ये एडीटीपी नेमलेला नाही. ज्या ज्यावेळी विचारणा केली जाते तेव्हा सांगितले जाते की, शासन जागा मंजूर करते. त्याबाबत प्रस्ताव पाठविला आहे. असे किती तरी प्रस्ताव शासनाकडे धूळ खात पडले आहेत. या संदर्भात तातडीने निर्णय कसा घेता येईल याचा विचार झाला पाहिजे. डीपी प्लॅनसाठी अधिकारी नेमले जातात. ते प्लॅन तयार करताना स्थानिक लोकांना ब्लॅकमेल करतात. तुमची जमीन अमुक कारणासाठी रिझर्व्ह दाखवू, तमुक कारणासाठी रिझर्व्ह दाखवू असे सांगतात. या संदर्भात शासन काय कारवाई करणार आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर एस.1...

श्री. उदय सामंत :सभापती महोदय, नगर परिषदेमध्ये जर हद्दवाढ करावयाची असेल तर नगरपरिषदेचे व ग्रामपंचायतीचे त्यासाठी ठराव करावे लागतात. यासंदर्भात संपूर्ण महाराष्ट्राचा रिव्हयू घेतला जाईल व त्यामध्ये किती "अ" वर्ग व किती "क" वर्ग नगरपालिकांची हद्दवाढ करावयाची आहे याचा रिव्हयू घेतला जाईल तसेच ग्रामपंचायती व नगरपरिषदेच्या हद्दवाढीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारे तक्रारी नसतील तर लवकरात लवकर त्यासंदर्भात योग्य ती कारवाई केली जाईल. सन्माननीय सदस्यांनी हद्दवाढीच्या संदर्भात जी सूचना केलेली आहे त्याबाबत त्यांच्याकडून अधिकची माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही केली जाईल.

-----------------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात झालेल्या वादळी पावसामुळे प्रचंड नुकसान झालेल्या कुटुंबांचे पुनर्वसन करुन आपदग्रस्तांना तातडीने मदत करणे

**मु. शी.** : राज्यात झालेल्या वादळी पावसामुळे प्रचंड नुकसान झालेल्या कुटुंबांचे पुनर्वसन करुन आपदग्रस्तांना तातडीने मदत करणे यासंबंधी सर्वश्री हेमंत टकले, किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, डॉ. अपूर्व हिरे, सर्वश्री मितेश भांगडिया, नागो पुंडलिक गाणार, विनोद तावडे, अनिल तटकरे, राजेंद्र जैन, संदीप बाजोरिया, प्रकाश बिनसाळे, विजय सावंत,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात मे व जून महिन्यात झालेल्या वादळी पावसामुळे झालेले प्रचंड नुकसान, विदर्भातील गोंदिया, वर्धा, नागपूर, अमरावती, अकोला, वाशिम, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, तसेच जिल्हा सातारा येथील पाटण तालुक्यातील ढेबेवाडी, तळमावले व कुंभारगाव परिसर येथे अनेक घरांची झालेली पडझड, घरात पाणी शिरुन घरांचे झालेले नुकसान, रायगड तीन व्यक्ती व सिंधुदुर्ग जिल्ह्यात दोन व्यक्तींचा झालेला मृत्यू, नाशिक, जळगाव, व अन्य कळवण, सटाणा, सुरगाणा, हरसुल, इत्यादी विविध तालुक्यांमध्ये केळी, भात, नागली, डाळिंब, कांदा, टॉमेटो, शेवगा, गहू, द्राक्ष इत्यादी पिकांचे झालेले अतोनात नुकसान, हरसूल तालुक्यात देवडोंगरी मध्ये वीज कोसळून शाळकरी मुलाचा झालेला मृत्यू, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया जिल्ह्यात सोयाबीन, धान, कापूस या पिकांचे झालेले नुकसान, अनेक स्थानिक पूरग्रस्त भागाचे सर्वेक्षण न होणे, शासनाकडून शेतकऱ्यांना व आपदग्रस्तांना कोणतीही मदत अद्याप ही प्राप्त न होणे, परिणामी शेतकरी व तेथील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, या आपत्तीमुळे बेघर झालेल्या कुटुबांचे पुनर्वसन करणे व आपदग्रस्तांना तातडीने मदत मिळण्याची होत असेलेली मागणी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

डॉ.पतंगराव कदम ( मदत व पुनर्वसन मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

..4..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, गेल्या वर्षी राज्याला भीषण दुष्काळाला व पाणी टंचाईला तोंड द्यावे लागले होते. परंतु या वर्षी जवळ जवळ संपूर्ण महाराष्ट्रावर निसर्गाने कृपा केलेली आहे. निसर्गाच्या कोपामुळे राज्यातील बहुतांशी भूभागाला अतिवृष्टीच्या संकटाचा सामना करावा लागतो. अतिवृष्टीच्या संकटाचा सामना करीत असतांना विदर्भामध्ये विशेषत: गोंदिया, नागपूर, अमरावती, अकोला, वाशिम, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, यवतमाळ या जिल्यातील परिस्थिती भीषणावह झालेली आहे. त्याच बरोबर कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व सातारा तसेच नाशिक, जळगाव इत्यादी जिल्हयामध्ये पिकांचे नुकसान होणे, वीज पडून अनेक नागरिकांचा मृत्यू होणे, पिकांची नुकसानी होणे, पूरग्रस्त भागाचे वेळेवर सर्वेक्षण न होणे अशा संकटाच्या परिस्थितीत राज्यातील जनता या संकटाचा सामना करीत आहे. राज्यातील नागरिकांना संकटातून दूर करण्यासाठी राज्य शासनाने तातडीने उपाययोजना केल्या पाहिजेत. उत्तरामध्ये शासनाने राज्यातील संकटग्रस्त नागरिकांच्या संदर्भात कशा प्रकारे काम सुरु केलेले आहे याची माहिती दिलेली आहे. परंतु या भागात फिरल्यानंतर जनतेला फारसे काही मिळाले आहे असे जाणवत नाही. यासंदर्भात खूप काम करण्याची आवश्यकता आहे. मला वाटते की, या कठीण परिस्थितीत राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने सूचना देण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भातील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आपल्या विभागामार्फत मंत्रालयात 24 तास यंत्रणा सुरु करण्याची आवश्यकता आहे. काही ठिकाणी गावांचा संपर्क तुटला तर तेथील जनजीवनावर,शालेय विद्यार्थ्यांवर, आरोग्य व्यवस्थेवर परिणाम होतो व त्यानंतरचा कित्येक काळ शेतीचे झालेले नुकसान, घरांचे झालेले नुकसान, जनावरांचे झालेले नुकसान भरुन येत नाही. त्यामुळे शासनाने सर्व प्रश्नाकडे गांभीर्याने पहाण्याची आवश्यकता आहे. आपल्या विभागीय आयुक्तांच्या मार्फत मदत व पुनवर्सन कार्याची आखणी करणे, अंमलबजावणीत काही त्रुटी राहत असतील तर त्यामध्ये वेळच्या वेळी सुधारणा करणे, जनतेला दिलासा देणे हे अतिशय महत्वाचे असते. या खात्याला सक्षम मंत्री लाभले असून माननीय मंत्री महोदयांना या सर्व प्रश्नांची जाण आहे. या सगळया यंत्रणेतील त्रुटी दूर करुन ती अधिक कार्यरत कशी होईल, अधिक गतिशील कशी होईल व योग्य दिलासा सामान्य माणसाला कसा मिळेल यासाठी शासनाने फार प्रयत्न करण्याची गरज असून हे प्रयत्न शासनाने लवकरात लवकर दृश्य परिणामात यावयास पाहिजे अशी विनंती मी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना करीत आहे.

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांनी अतिशय महत्वाची लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. विदर्भ,कोकण व उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्हयांमध्ये अतिवृष्टी झालेली आहे.

यानंतर श्री. भारवि....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम...

सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले साहेब म्हणाल्याप्रमाणे मी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना ताबडतोब आदेश दिले आहेत की, मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना ताबडतोब दीड लाख रूपये नुकसान भरपाई देण्यात यावी. जनावरे मृत पावली असतील तर तातडीने कारवाई करून संबंधित शेतकऱ्यांना मोबदला देण्यात यावा. शेती संबंधात जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा कृषी अधीक्षक यांनी एकत्रितपणे नुकसानीचे पंचनामे करावेत आणि आठ दिवसांच्या आत आपला अहवाल शासनाला पाठवून देण्यात यावा. दुर्दैवाने अजूनही अतिवृष्टी सुरू आहे. त्यामुळे मला सर्व अधिकाऱ्यांनी विनंती केली आहे की, आम्हाला 15 दिवसांची मुदत द्यावी. आमची कंट्रोल रूम 24 तास सुरू आहे. अतिवृष्टी झालेली आहे. पूर्वी आपण तात्पुरती मदत म्हणून एक हजार रूपये देत होतो. चौदाशे रूपयाप्रमाणे आपण सगळे पैसे दिलेले आहेत. आलेल्या आपत्तीला शासनाच्या वतीने सतर्कपणाने तोंड देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत ठोस अशी उपाययोजना केलेली आहे. शेतीचे नुकसान झालेले आहे. तीन अधिकाऱ्यांचा अहवाल आल्यानंतर मोबदला देण्यासंबंधीचा विचार केला जाईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, शेती पिकाच्या नुकसानी संबंधातील अहवाल दिलेला आहे. मृग नक्षत्रापासून संततधार पाऊस आहे. गेल्या 18 तारखेला चार तासामध्ये 285 मि.मी.पाऊस पडला आहे. आज अर्धे चंद्रपूर पाण्यामध्ये आहे. अजून एकही दाणा लोकांचा टाकला गेलेला नाही. कापसाची, सोयाबीनची पेरणी झालेली नाही. पेरणी झाली नसल्यामुळे आपण 50 टक्क्यांच्या वर नुकसान कसे काय दाखवत आहात ? चंद्रपूरमध्ये अजूनही पाऊस आहे. या जिल्ह्यातच नव्हे तर पूर्व विदर्भामध्ये ही परिस्थिती आहे. नागपूर, भंडारा, गडचिरोलीमध्ये अशीच परिस्थिती असल्यामुळे यावेळी पिके येतील अशी आम्हाला आशा नाही. लोकांना वाचविणे कठीण झाले आहे. त्यामुळे पूर्व विदर्भात आपण ओला दुष्काळ जाहीर करणार आहात काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस म्हणाल्या तशी परिस्थिती आहे. जिल्ह्यातील तीन अधिकाऱ्यांना स्पॉटवर जावे लागेल. त्यांनी आम्हाला आजच सकाळी 8 दिवसांच्या ऐवजी 15 दिवसांची मुदत द्यावी असे सांगितले आहे. त्या दृष्टीने त्यांचा अहवाल येईल. शासन आपल्या भावनेशी सहमत आहे. त्यासंबंधी ठोस अशी उपाययोजना केली जाईल.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी वस्तुस्थिती सांगितली आहे. पूर्व विदर्भाप्रमाणेच पश्चिम विदर्भामध्ये देखील ओला दुष्काळ आहे. पश्चिम विदर्भामध्ये गेल्या वर्षी देखील ओला दुष्काळ होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय मंत्र्यांचे दौरे झाले होते. त्यानुसार सर्व्हे झाला. आम्हाला मदत करण्याचे आश्वासन देण्यात आले. मागच्या वर्षी पडलेल्या ओल्या दुष्काळाचा एकही रूपया अद्याप पर्यंत प्राप्त झालेला नाही. त्याची अद्याप चौकशी सुरू आहे. कालच माननीय मंत्री महोदयांनी यवतमाळ जिल्ह्या संबंधातील बैठक बोलाविली होती. त्या बैठकीला फक्त त्यांच्याच पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना बोलाविण्यात आले होते. आम्हा लोकप्रतिनिधींना बोलाविण्यात आले नव्हते. आताच माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना ताबडतोब दीड लाख रूपये देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आता पर्यंत यवतमाळ जिल्ह्यात बोरीअरब व दारव्हा येथे दोन व्यक्ती मृत पावल्या आहेत. त्यांच्या नातेवाईकांना अद्याप पर्यंत एकही रूपया न देण्याचे कारण काय आहे ? मागच्या वर्षी सारखेच आम्हाला आश्वासन देणार आहात की, पश्चिम महाराष्ट्राला मदत केली त्याप्रमाणे विदर्भाला मदत करणार आहात यासंबंधीचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, यवतमाळ जिल्ह्यासंबंधी जी बैठक बोलाविण्यात आली होती त्या बैठकीला फक्त सत्ताधारी पक्षातील आमदारांनाच बोलाविण्यात आले होते असे जे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे ते खरे नाही. आपणाला जर निरोप मिळाला नसेल तर त्यात रुसून बसण्याचे कारण नाही. आपण आपल्या प्रश्नासाठी पुढे आले पाहिजे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KTG/ D/ पूर्वी श्री.भारवि... 12:40

डॉ.पतंगराव कदम...

सन्माननीय सदस्य श्री.संदीप बाजोरिया यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना काही मदत मिळालेली नाही. मी स्वत: यवतमाळ येथे मिटींग घेतली होती त्यावेळी ते गैरहजर होते. माननीय मुख्यमंत्र्यांच्या खास निधीतून यवतमाळ येथे भिंतीसाठी 14 कोटी रुपये दिलेले आहेत. मी काल सकाळी 10.00 वाजता अमरावती आणि नागपूर विभागाचे आयुक्त तसेच जिल्हाधिकारी यांच्या सोबत बैठक घेतली होती. त्यांच्याकडून सर्व परिस्थितीचा आढावा मी घेतलेला आहे. जर शेतकऱ्यांना काही मदत मिळाली नसेल तर ती त्यांना का देण्यात आली नाही याचे स्पष्टीकरण जिल्हाधिकाऱ्यांकडून घेण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी झाली त्या सर्व जिल्ह्यांचा उल्लेख या लक्षवेधी सूचनेमध्ये आहे. पूर्व विदर्भामध्ये मृग नक्षत्रपासून पाऊस सुरु झाला तो आजपर्यंत थांबलेला नाही. त्या ठिकाणी पावसाची संततधार इतकी आहे की, एक तासाकरिता देखील तो विश्रांती घेत नाही. मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्यामुळे शेतकरी पेरणी करु शकत नाही आणि शेतामध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्यामुळे भविष्यात तो पेरणी करु शकेल आणि त्यातून काही उगवेल अशी परिस्थिती देखील नाही. अहवाल येण्यास अजून पंधरा दिवस लागतील. तेव्हा ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी झालेली आहे त्या ठिकाणी सरकार ओला दुष्काळ जाहीर करणार काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, वस्तुस्थितीची आणि परिस्थितीची जाणीव आपल्याप्रमाणे सरकारला देखील आहे. माननीय मुख्यमंत्री शुक्रवार आणि शनिवारी त्या भागांचा दौरा करणार आहेत. दौरा झाल्यानंतर त्या ठिकाणी मिटींग होईल आणि तेथील अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांची परिस्थिती लक्षात घेऊन त्याप्रमाणे निर्णय घेण्यात येईल.

श्री.राजेंद्र जैन : सभापती महोदय, विदर्भामध्ये जून-जुलै महिन्यात झालेल्या वादळी पावसामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात अनुक्रमे 63 टक्के आणि 69 टक्के जास्त पाऊस झालेला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे भंडारा जिल्ह्यातील 2800 च्या लोक बेधर झाले आहेत तर गोंदिया जिल्ह्यातील 1000 च्या वर लोक बेघर झाले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र जैन....

आहेत. निवेदनात नमूद केले आहे की, गोंदिया जिल्ह्यात 1780 आणि भंडारा जिल्ह्यात 1131 हेक्टर शेतीचे 50 टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झालेले आहे. माननीय मंत्री महोदयांनी कबूल केलेले आहे की, आजपर्यंत पाऊस सुरु आहे. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी विदर्भातील परिस्थितीबाबत सांगितलेले आहे. तेव्हा माझी मागणी आहे की, अहवालाची चिंता न करता माननीय मंत्री महोदय विदर्भामध्ये ओला दुष्काळ जाहीर करणार काय, तसेच सर्व शेतकऱ्यांना सरसकट मदत करणार काय ?

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ज्या वेळी वास्तव डोळ्यासमोर दिसत असताना, आपली प्रशासकीय यंत्रणा या बाबत कळवित असताना एवढेच नव्हे तर लोकप्रतिनिधी सांगत असताना सुध्दा ओला दुष्काळ का जाहीर केला जात नाही, आपण कशाला माननीय मुख्यमंत्र्यांची वाट पाहत आहात ? माननीय मंत्री महोदय, मी पुन्हा एकदा मागणी करतो की, आपण ओला दुष्काळ जाहीर करावा.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकत्रित बोलतात.)

**उप सभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 5 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.45 वाजता 5 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

----------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

( माननीय उप सभापती आसनस्थ होताच दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदय या संदर्भात निवेदन करीत आहेत. त्यांचे निवेदन सन्माननीय सदस्यांनी ऐकून घ्यावे.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, या अतिवृष्टीच्या गंभीर परिस्थितीमध्ये माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री व मी ... ( अडथळा ) तुम्हाला प्रश्न सोडवावयाचा नाही. तुम्हाला फक्त पेपरला बातमी पाहिजे. सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री सोमवारी निवेदन करणार आहेत.

( दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना कशाला राखून ठेवावयाची ? प्रथम सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, दौरा करुन सोमवारी माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये फायनल निवेदन करणार आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, तोपर्यंत ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ज्यावेळी या सर्व गोष्टी आता घडत असताना तुम्हाला तुमचे तेथील अधिकारी खरी माहिती देत नसतील तर या ठिकाणी लोकप्रतिनिधी माहिती देत आहेत. विरोधी पक्षाचेच सदस्य नव्हे तर सत्ताधारी पक्षाचे सदस्य सुध्दा माहिती देत आहेत. नेहमी 65 मि.मि. पाऊस पडतो पण त्या ठिकाणी 235 मि.मि.च्या वर पर्जन्यवृष्टी झालेली आहे. असे असे सर्व वास्तव असताना मंत्री महोदय म्हणतात की, तुम्हाला मीडियामध्ये हेडलाईन पाहिजे. हा शेतकऱ्यांचा अपमान आहे. माननीय मंत्र्यांना असे बोलणे शोभते का ? ते वक्तव्य कामकाजातून

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. विनोद तावडे .....

काढले पाहिजे. आम्ही प्रामाणिकपणे त्या भागातील हालअपेष्टा होणाऱ्या जनतेच्या बाजूने बोलत आहोत. आपण प्रेस्टीज आणि क्रेडीट कोणाला मिळणार, बाबांना मिळणार की दादांना मिळणार यासाठी हा विषय लांबवित आहात का ? आपण ताबडतोब ओला दुष्काळ घोषित केला पाहिजे अशी आमची मागणी आहे. डॉ. पतंगरावजी कदम, आपण तर मुख्यमंत्र्यांपेक्षा वरताण आहात. आपण उभे राहून सांगावे. आपण कशाला घाबरता ? आपण घोषित करावे.

**उप सभापती** : दुष्काळाच्या प्रश्नावर सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापली मते मांडलेली आहेत. राज्य शासनाच्या वतीने त्या भागामध्ये सन्माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री आणि बाकीचे संबंधित मंत्री दोन चार दिवसाच्या आत दौरा करणार आहेत हे माननीय मंत्री महोदयांनी स्पष्टपणे सांगितले आहे. मला सभागृहाचे कामकाज चालवावयाचे आहे. सर्वांच्या भावना अत्यंत महत्वाच्या आहेत आणि त्याची दखल घेऊनच माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांचा शनिवार-रविवारी तेथे दौरा होणार आहे. ते प्रत्यक्ष जाऊन सन्माननीय सदस्य या ठिकाणी माहिती सांगत आहेत त्याची व्याप्ती पाहतील त्यातून नक्की सोल्यूशन काढले जाईल. सभागृहाचे कामकाज चालणेही महत्वाचे आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**.....

सन्माननीय सदस्यांच्या मागणीचे निरसन करावयाचे असेल तर माननीय मुख्यमंत्र्यांचा दौरा होणे आवश्यक आहे. त्यांचा दौरा 15 दिवसांनी नाही तर 2-4 दिवसांनी होणार आहे. त्यामुळे मी या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा येथेच थांबवून पुढील लक्षवेधी सूचना पुकारत आहे.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. त्याचवेळी माननीय मदत व पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम हे सभागृहाच्या बाहेर जात असतात. )

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. महत्वाचा विषय सभागृहात सुरु आहे. त्याच विषयाबाबत आपण मला हरकतीचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी दिलेली असल्यामुळे मी बोलण्यासाठी उभा असताना या विषयाशी संबंधित असलेले माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम हे सभागृहाच्या बाहेर जाण्यासाठी निघाले आहेत. हा पळपुटेपणा त्यांना शोभत नाही. (अडथळा) हा विषय अतिशय गंभीर व तातडीचा असल्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी दौरा करण्यासाठी शनिवार किंवा रविवारपर्यंत थांबण्याची गरज नाही. काल याच विषयामुळे विधानसभेचे कामकाज लवकर संपले होते. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांना दौऱ्यावर जाता आले असते. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांचा काल वाढदिवस होता. त्यामुळे त्यांचे कार्यक्रम अगोदर ठरले होते. आम्ही ते समजू शकतो. (अडथळा) सरकारला या विषयाचे गांभीर्य वाटत नाही काय ?

विदर्भातील पूरस्थिती भयानक आहे. माननीय मंत्री श्री.संजय देवतळे हे त्या भागातील आहेत. ते देखील एका ठिकाणी अडकून पडले होते. तेथील अनेक गावांचा संपर्क तुटलेला आहे. सामान्य माणसांचे हाल होत आहेत, लोकांचे नुकसान होत आहे. असे असताना माननीय मुख्यमंत्री आठवड्याच्या शेवटी दौरा करणार आहेत. विधिमंडळाचे कामकाज चालू असताना येथे आमच्या भावना व्यक्त होत असताना सरकारकडून आम्हाला काही नुकसान भरपाई मिळत नाही. लोकप्रतिनिधी विधिमंडळात काय करीत आहेत असा प्रश्न तेथील सामान्य लोकांच्या मनात सातत्याने येत असताना मंत्री महोदय सभागृहातून पळून जातात हे त्यांना शोभते काय ? माननीय डॉ.पतंगराव कदम हे वरिष्ठ मंत्री असल्यामुळे ते स्वत: निर्णय घेऊ शकतात. नवीन किंवा कमी अनुभव असलेल्या मंत्री महोदयांचे आम्ही समजू शकतो. परंतु मंत्री महोदय सभागृहातून

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

बाहेर जाणार असतील तर त्या भागातील जनतेचा तो अवमान आहे. माननीय पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्या कृतीचा आम्ही निषेध करुन सभात्याग करीत आहोत.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात. )

----

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :शासनाने शिक्षक भरतीसाठी सेवाप्रवेशपूर्व परीक्षा (सीईटी)आणि शिक्षक क्षमता चाचणी परीक्षा (टीईटी) लागू करणे

**मु. शी.** :शासनाने शिक्षक भरतीसाठी सेवाप्रवेशपूर्व परीक्षा (सीईटी) आणि शिक्षक क्षमता चाचणी परीक्षा (टीईटी) लागू करणे यासंबंधी सर्वश्री भगवान साळुंखे, रामनाथ मोते, नागो पुंडलिक गाणार, चंद्रकांत पाटील, डॉ. रणजित पाटील, श्री.नितीन गडकरी ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासनाने दिनांक 2 मे, 2012 च्या शासन निर्णयाने प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक भरतीवर बंदी घालणे, त्यानंतर दिनांक 19 जानेवारी, 2013 व दिनांक 13 फेब्रुवारी, 2013 च्या शासन निर्णयाने शिक्षक भरतीसाठी सेवाप्रवेशपूर्व परीक्षा (सी.ई.टी) आणि शिक्षक क्षमता चाचणी परीक्षा (टी.ई.टी.) लागू करणे, या परीक्षांचे स्वरुपाबाबत स्पष्टता नसणे, सन 2012-13 व चालू शैक्षणिक वर्ष 2013-14 मध्ये सेवानिवृत्ती वाढीव पदे व वाढीव तुकड्या इत्यादीमध्ये शिक्षकांची पदे निर्माण झालेली असणे, ती भरली नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असणे, अशा गंभीर परिस्थितीमध्ये शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया."

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, दिनांक 2 मे, 2012 रोजी शासनाने प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या भरतीवर बंदी आणली आहे. पटपडताळणीच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त होणाऱ्या शिक्षकांच्या समायोजनाचे निमित्त पुढे केले. प्रत्यक्षात शाळांची मान्यता काढून घेतली जात आहे आणि त्या शाळांमधील शिक्षकांना घरी पाठविण्याचा प्रयत्न चालू आहे. न्यायालयाने आदेश देऊन त्या शाळांना संरक्षण देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तरी देखील सरकारने याबाबत निर्णय घेतलेला नाही. भरती बंद केल्यामुळे, अनेक शिक्षक सेवानिवृत्तीमुळे, सेवानिवृत्ती घेतल्यामुळे, अपमृत्यू झाल्यामुळे व वाढीव जागा निर्माण झाल्यामुळे अनेक जागा रिक्त आहेत त्या सर्व जागा शासनाने भरलेल्या नाहीत. परिणामी शाळांच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे. त्यामुळे शिक्षकांची भरती होण्याची आवश्यकता आहे. दि.6.9.2012 रोजी भरती करण्याचा शासनाने प्रयत्न केला आहे. परंतु त्याचा लाभ शिक्षकांना मिळू शकत नाही. तसेच दि.6.5.2013 रोजी शासनाने निर्णय घेतला आहे त्यामध्ये मागासवर्गीय शिक्षकांच्या अनुशेषाचा उल्लेख केलेला आहे. शासनाने शिक्षकांसाठी सीईटी व टीईटी लागू केली असली तरी त्याबाबत चित्र स्पष्ट होत नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे...

आम्ही भरतीला परवानगी दिलेली आहे असा शासनाने देखावा केलेला आहे. परंतु प्रत्यक्षात भरती होऊ शकत नाही. तेव्हा शिक्षकांची जी रिक्तपदे झालेली आहेत ती ताबडतोबीने भरण्याच्या संदर्भात शासन निदेश देईल काय ?

प्रा. फौजिया खान : राज्यामध्ये 3 ते 5 ऑक्टोबर 2011 या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांच्या उपस्थितीच्या संदर्भात विशेष पटपडताळणी मोहीम घेण्यात आली होती. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत झाली होती. या समितीने केलेल्या शिफारशी नुसार मंत्रिमंडळाने काही निर्णय घेतले. त्याप्रमाणे ज्या शाळांमध्ये 20 ते 49.99 टक्के अनुपस्थितीचे प्रमाण असेल त्या शाळेतील शिक्षक अतिरिक्त ठरले असतील तर त्यांचे समायोजन होण्याची गरज आहे. ते समायोजन झाल्याशिवाय कोणतीही भरती होऊ नये असा शासनाने निर्णय घेतला होता. परंतु विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून दोन महत्वाचे निर्णयही शासनाने घेतलेले आहेत. दिनांक 6 सप्टेंबर रोजी जी.आर. काढण्यात आला. ज्यांनी 2 मे पूर्वी प्रक्रिया पूर्ण केलेली आहे त्यांना भरतीची मुभा देण्यात आली होती. त्यानंतर 6 मे 2013 रोजी जो शासन निर्णय काढण्यात आला त्यामध्ये गणित, विज्ञान आणि इंग्रजी या विषयाच्या शिक्षकांची भरती करण्यासाठी परवानगी देण्यात आली होती.

श्री. विक्रम काळे : शिक्षक प्रतिनिधी हे आपापल्या मतदारसंघामध्ये सातत्याने फिरत असतात. मी मराठवाड्याच्या आठ जिल्ह्यामध्ये फिरत असतो. पालक आम्हाला सारखे प्रश्न विचारीत असतात. अन्य विषयाला शिक्षक नाहीत ही बाब वेगळी. परंतु गणित, विज्ञान आणि इंग्रजी या विषयांवर विद्यार्थ्यांचे भवितव्य अवलंबून असल्यामुळे त्या विषयाच्या शिक्षकांची भरती करण्याची परवानगी द्यावयास पाहिजे. परंतु ही परवानगी देताना टीईटीची अट टाकलेली आहे. टीईटीचे स्वरुप अजून स्पष्ट झालेले नाही. टीईटी केव्हा घेणार हेही निश्चित नाही. ही टीईटी घेण्यास आमची हरकत नाही, ती व्हायची तेव्हा होईल. परंतु तोपर्यंत जुन्या पध्दतीने शिक्षकांची भरती करण्याचे आदेश हे अधिवेशन संपण्यापूर्वी निर्गमित करण्यात येतील काय ? जिल्हा परिषदेच्या शाळांमधील गणित, विज्ञान आणि इंग्रजी या विषयाच्या शिक्षकांची भरती जुन्या पध्दतीने, जिल्हा शिक्षण अधिका-यांच्या परवानगीने करण्यासंबंधीचे परिपत्रक काढण्यात येईल काय ?

..2..

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी शिक्षक नाहीत असे सांगितले. परंतु अशी परिस्थिती नाही. तेथे शिक्षक आहेत. 6 मेच्या जी.आर.मध्ये टीईटीची अट लागू केलेली आहे हे खरे आहे. टीईटीची प्रक्रिया पाईप लाईनमध्ये आहे. तोपर्यंन्त विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी ही अट शिथिल करण्यात येईल. गणित, विज्ञान आणि इंग्रजीसाठी 6 मेच्या जी.आर.मध्ये जी अट टाकलेली आहे ती काढून टाकण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : राज्यामध्ये लोअर प्रायमरीमधील, अपर प्रायमरी मधील आणि माध्यमिक मधील समायोजन करण्याचे शिक्षक किती आहेत ? त्या तुलनेत अतिरिक्त शिक्षक किती आहेत ? टीईटीचे मी स्वागत करतो.

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ 13:05

श्री.कपिल पाटील...

सभापती महोदय, जून, 2013 पूर्वी काही जागा रिक्त झालेल्या आहेत. शासनाने निर्णय काढल्यानंतर टी.ई.टी.लागू करा. परंतु तोपर्यंत जेवढया जागा रिक्त आहेत, समायोजनाचा आकडा वगळून उरलेल्या सगळया रिक्त जागा जेथे गरज आहे तेथे सगळया विषयांचे शिक्षक नेमले पाहिजे. केवळ इंग्रजी, गणित या विषयासाठी शिक्षक नेमले पाहिजेत असे नाही तर सगळया विषयांसाठी शिक्षक नेमले पाहिजे. शिक्षकाविना शाळा चालू शकत नाहीत. इयत्ता 9 आणि इयत्ता 10 वीच्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षक नाहीत. शिक्षक नसल्यामुळे या राज्यातील शाळांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. या वर्षी स्पर्धा परीक्षेमध्ये आपली मुले मागे पडलेली आहेत. शिक्षक नाहीत हे त्यामागचे कारण आहे. आपली अन्य राज्याच्या तुलनेमध्ये अतिशय वाईट परिस्थिती झालेली आहे. त्याचे मुख्य कारण शिक्षक नाहीत. मोठया घरातील मुले क्लास लावतात, त्याच्या मुलांचे भले होते. परंतु सर्वसामान्य अनुदानित शाळांमध्ये शिक्षक नसेल तर त्या मुलांचे प्रचंड नुकसान होते. गरीब विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ द्यावयाचे नसेल तर दिनांक 6 मे, 2013 रोजीचा शासन निर्णय होण्यापूर्वी ज्या शिक्षकांच्या जागा रिक्त होत्या, त्या जागा जुन्या पध्दतीने ताबडतोबीने भरण्याची परवानगी देणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. समायोजनाची प्रक्रिया ही शेवटच्या टप्प्यावर आलेली आहे. रिक्त पदांची संख्या समायोजित पदापेक्षा जास्त असेल तर ती पदे भरण्यासाठी शासन निर्णय घेईल काय अशा प्रकारचा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. या बाबतीत मी सांगू इच्छिते की, तशा प्रकारचा निर्णय शासनामार्फत घेतला जाईल. हे अधिवेशन संपण्यापूर्वी आम्ही यासंदर्भातील निर्णय घेऊ. याच विषयाच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर उद्या बैठक आहे. त्या बैठकीत या विषयावर चर्चा होणारच आहे. परंतु अधिवेशन संपण्यापूर्वी यासंदर्भात निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, 6 मे, 2013 रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे इंग्रजी, गणित आणि सायन्स या विषयाचे शिक्षण भरण्यासंदर्भातील बंदी शिथिल करण्यात आली आहे त्याबद्दल मी शासनास धन्यवाद देतो. त्याचप्रमाणे 2 मे, 2012 पूर्वी ज्या शाळांना शासनाने जागा भरण्यास परवानगी दिली होती. त्या जागांवर नियुक्त्या देण्यात आल्या. परंतु अजूनही

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ 13:05

श्री.वसंतराव खोटरे...

शिक्षणाधिकारी यांनी त्यास वैयक्तिक मान्यता दिली नाही. कारण त्यांनी भरतीवरील बंदीचे कारण सांगून मान्यता देण्याचे काम बंद केलेले आहे. अनेक प्रस्ताव शिक्षणाधिकाऱ्यांकडे पडून आहेत. यासंदर्भात कॅम्प लावण्यासंदर्भात शिक्षणाधिकाऱ्यांना आदेश देण्यात येतील काय ? शिक्षणाधिकाऱ्यांकडून प्रक्रिया होते. आता या संदर्भात सर्व प्रकारची मान्यता शासन देणार आहे, प्रत्येक विभागाकडे बरेचसे प्रस्ताव पडलेले आहेत. होते. माझ्या अमरावती विभागातील 35 प्रस्ताव पाठविलेले आहेत. काल या संदर्भात चौकशी केली असता त्यांनी मला सांगितले की, संचालकांकडे सदर प्रस्ताव पाठविले आहेत. संचालकांनी सदरचे प्रस्ताव अद्यापही शासनाकडे पाठविलेले नाहीत. काल माझी माननीय मंत्री महोदयांसोबत चर्चा झाली आहे. अमरावती विभागातील 35 प्रस्ताव संचालकांकडे पाठविलेले आहेत...

**उप सभापती** : आपण स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, ही प्रक्रिया सुटसुटीत करण्यासाठी यावर शासन काही उपायोजना तातडीने करील काय, 2 मे, 2012 रोजीच्या शासन निर्णया अगोदर जे शिक्षक नियुक्त झाले त्यांच्यासाठी कॅम्प लावण्यासंदर्भात अधिकाऱ्यांना आदेश देण्यात येतील काय ?

प्रा.फौजिया खान : 2 मे, 2012 पूर्वी ज्यांच्या प्रस्तावांना ॲप्रूव्हल दिलेले नाहीत, त्याबाबतीत शिक्षणाधिकाऱ्यांना सांगण्यात येईल. दुसरे असे की, काल सायंकाळपर्यंत शासनाकडे 14 जिल्हयांची माहिती आलेली आहे. त्याच्यावर तत्काळ निर्णय घेण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, 2 मे, 2012 निर्णय निघाला आहे आणि पटपडताळणीच्या अनुषंगाने अतिरिक्तांचे समायोजन करण्यासाठी भरतीवर बंदी आणली. ही भरती बंदी संपूर्ण राज्यासाठी होती असे आपले म्हणणे आहे ही गोष्ट विभागाने मान्य केली आहे आणि बैठकीतही या बाबतीत चर्चा झालेली आहे. परंतु शासनाचे या बाबतीतील म्हणणे पूर्णपणे चुकीचे आहे. लातूर, नागपूर आणि पुणे विभाग या जिल्हयांमध्ये 2 मे, 2012 नंतर नेमलेल्या उच्च माध्यमिकच्या अनेक शिक्षकांना मान्यता दिलेल्या आहेत ही गोष्ट खरी आहे काय?

यानंतर श्री. भोगले....

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ D/ 13:10

लक्षवेधी सूचना क्र.3.... श्री.रामनाथ मोते....

वाशिम, अकोला, वर्धा, नागपूर, लातूर, पुणे, नांदेड, गोंदिया, अमरावती, नाशिक व नंदूरबार या 11 जिल्हयांमध्ये बंदीचे आदेश असताना सुध्दा शिक्षणाधिकाऱ्यांनी माध्यमिकच्या पदांना मान्यता दिलेली आहे. 11 जिल्हयांमध्ये आणि 3 विभागांमध्ये मान्यता मिळतात. जे अधिकारी नीटपणे मान्यता देत नाहीत तेथे शिक्षक अडकून पडले आहेत. तेथे शिक्षक मिळत नाहीत. अन्य जिल्हयात शिक्षणाधिकाऱ्यांनी नियुक्त्या केल्या, कारण त्यांना लक्ष्मीदर्शन घडले. त्यामुळे त्या पदांना मान्यता मिळाली. एका बाजूला भरती बंद आहे म्हणून सांगितले जाते आणि दुसऱ्या बाजूला मान्यता दिली जाते. बंदी असताना अधिकाऱ्यांनी शासनाचे नियम डावलून मान्यता दिली हे खरे आहे काय, असल्यास त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात? केंद्र शासनाने सूचना केल्यानुसार राज्य शासनाने टीईटी आणली आहे. जरुर टीईटी घेण्यात यावी. त्याबाबत लवकर नियोजन करण्यात यावे. ही टीईटी पहिले आठवीपर्यंतच्या शिक्षकांना लागू आहे की, पहिली ते दहावीपर्यंतच्या शिक्षकांना लागू आहे?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, टीईटी पहिली ते दहावीपर्यंतच्या सर्व शिक्षकांसाठी लागू होणार आहे. शासनाच्या माहितीप्रमाणे बंदी असताना कुठेही भरती झालेली नाही. सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिलेली आहे ती सत्य समजून याची चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी जी माहिती दिली आहे ती शासनानेच पुरविली आहे. कोणत्या 11 जिल्हयात माध्यमिकच्या पदांना मान्यता दिली हे मंत्री महोदयांनी कालच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील उत्तरात नमूद केलेले आहे. या 11 जिल्हयांमध्ये बंदी असताना मान्यता देण्यात आली होती, त्यामुळे त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात?

प्रा.फौजिया खान : याची माहिती घेण्यात येईल.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, गेली 2 वर्षे पटपडताळणी केली गेली. त्यामुळे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन करण्याचा विषय अद्याप मिटलेला नाही. अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन केव्हापर्यंत पूर्ण होणार आहे? आज काही अटींसह शासन शिक्षकांची पदे भरण्यास मान्यता देते. टीईटीची पहिली परीक्षा केव्हा घेण्यात येईल?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.3...

प्रा.फौजिया खान : मी याचे उत्तर दिलेले आहे. समायोजनाची प्रक्रिया शेवटच्या टप्प्यात आहे. अधिवेशन संपण्यापूर्वी भरतीला परवानगी देण्याची कार्यवाही शासनाकडून होणार आहे.

श्री.नागो पुंडलिक गाणार : दिनांक 6 सप्टेंबर, 2012 रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री.हा.ब.जगताप, कार्यासन अधिकारी यांनी दिनांक 18 जून, 2013 रोजी 4 शिक्षण सेवकांच्या नियुक्तीस मान्यता दिलेली होती. ही कृती नियमानुसार योग्य आहे काय?

नंतर 2बी.1...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, 6 सप्टेंबर, 2012 अनुसार संपूर्ण भरतीची जाहिरात दि.2 मे च्या अगोदर झाली असेल तर त्याला शासनाने परवानगी दिलेली आहे. परंतु या शिवाय भरती करण्यात आली असेल तर त्यासंदर्भातील चौकशी निश्चितपणे करण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छिते.

-----------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचा मुद्दा

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांचा औचित्याचा मुद्दा राहिला होता त्यांनी तो मांडावा.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुमारे 12 हजार कोटी रुपये खर्चून अकाराला येत असलेल्या टर्मिनल टू या आलीशान अद्ययावत टर्मिनलवर शिवरायांचे दर्शन दुर्लभ होवून छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ हे नाव केवळ नावापुरतेच उरणार की,काय अशी शक्यता निर्माण झालेली आहे. यासंदर्भातील बातमी कालच्या महाराष्ट्र टाईम्सने दिली होती. देश विदेशातून मुंबईत येणाऱ्या अभ्यागताना शिवरायांनी बांधलेले गडकिल्ले त्यांची दूरदृष्टी व स्वराज्याची स्थापना याचे दर्शन घडविण्याची नामी संधी असणे, या आलीशान टर्मिनलमध्ये 47 लाख चौरस फूट इतकी जागा वापरण्यास मिळणार असल्याने येथे देशविदेशातील अभ्यागताना शिवरायांच्या कार्याचे दर्शन घडेल असे वैभवशाली दालन व महाराजांचा भव्य व सुंदर आश्वारुढ पुतळा निर्माण करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्यांद्वारे करीत आहे."

-------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : अपंग विद्यार्थी व व्यक्ती यांचे उत्तम पुनर्वसन करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने इ.टी.सी. सेंटरची उभारणी करणे याबाबत श्री. हेमंत टकले,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

बऱ्याच वेळेला राज्यातील अनेक भागात ज्या ज्या त्रुटी आढळतात त्या विशेष उल्लेखाच्याद्वारे मांडून त्याचे निराकरण कसे होईल याकडे लक्ष देत असतो. परंतु कोठे चांगली कामे होत असतील तर त्याचाही उल्लेख होणे मला आवश्यक वाटते.

"नवी मुंबईमध्ये अपंग विद्यार्थी आणि व्यक्ती यांचे उत्तमप्रकारे पुनर्वसन व्हावे, त्यांचे जीवनमान उंचवावे या उद्देशाने नवी मुंबई महानगरपालिकेने इ.टी.सी. सेंटर उभारणी केलेली आहे. अशी योजना राबविणारी नवी मुंबई महानगरपालिका ही देशातील पहिली महानगरपालिका ठरली आहे. सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत अपंगासाठी पहिले मॉडेल स्कूल म्हणून सरकारने मान्यता दिलेली आहे. याच पध्दतीची केंद्रे राज्यात लवकरात लवकर इतरत्रही उभारली जावीत यासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत उचित कार्यवाही व्हावी अशी शासनास मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शौचालय साफ करण्यासाठी सफाईदार नसल्यामुळे शौचालये लहान विद्यार्थ्यांनाच साफ करावी लागणे याबाबत श्री. सुभाष चव्हण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राज्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये प्रामुख्याने पहिली ते सातवी पर्यंतची मुले शिकत असतात. अशा या मुलांचे वय कमीच असते, शिवाय या मुलांची शाळेत संख्याही खूपच कमी असते. या जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील शौचालय साफ करण्यासाठी सफाईदार किंवा शिपाई यांची पदे भरण्यात आली नसल्यामुळे शाळेतील शौचालय साफ करण्यात येत नाही यामुळे शौचालय अतिशय खराब होऊन सर्वत्र दुर्गंधी पासरलेली आहे. शिक्षक शाळेतील लहान मुलांनाच शौचालय साफ करण्यास लावीत असल्याचे आढळून आले आहे. यामुळे शाळेतील लहान मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्याच प्रमाणे शाळेत मुलांना पिण्याच्या पाण्याची सोय सुध्दा नसल्यामुळे शाळेत पाणी भरण्यासाठी या लहान वयात मुलांना दूरवरुन पाणी आणावे लागत असल्याचे आढळून आले आहे. यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शौचालय साफ करण्यासाठी सफाई कामगार तसेच शिपाई ही पदे त्वरित नियुक्त करण्याची आवश्यकता आहे तसेच मुलांकडून शौचालय साफ करुन घेणाऱ्या शिक्षकांवर कारवाई होण्याची आवश्यकता या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

-------------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : पुणे शहरातील जुने वाडे धोकादायक होणे याबाबत श्री. चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"पुणे शहरात सुमारे दीड लाखाहून अधिक जुन्या वाडयांची संख्या असणे, सदर वाडयांपैकी अनेक वाडे अती जीर्ण व राहण्यासाठी धोकादायक असणे, महापालिका हद्दीतील अतिधोकादायक 55 वाडयांपैकी 23 वाडे अजूनही त्याच स्थितीत उभे असणे, कसबा पेठेत जुना वाडा पाडण्याचे काम सुरु असतांना मातीच्या ढिगाऱ्याखाली दबून एका मजुराचा दि. 13.6.2013 रोजी मृत्यू होणे,या अगोदरही जुन्या वाडयांचा भाग कोसळून 5 नागरिकांचा मृत्यू झालेला असणे, त्यामुळे या धोकादायक वाडयांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर येणे, हे वाडे तातडीने पाडून तेथील लोकांचे पुनर्वसन करण्याची नितांत गरज असणे, अन्यथा गंभीर दुर्घटना होऊन नागरिकांचा जीव जाण्याची शक्यता निर्माण होणे,

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील...

जुन्या व धोकादायक जीर्ण वाड्यांचा सुनियोजित विकास होण्यासाठी वाढीव चटई निर्देशांक देण्याची लोकप्रतिनिधींनी वारंवार केलेली मागणी अद्यापही प्रलंबित आहे. तसेच मुंबईतील जुन्या चाळी व इमारती दुरूस्ती महामंडळाच्या धर्तीवर जुने वाडे दुरूस्ती विकास महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता आहे. शासनाने या सगळ्या विषयाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे म्हणून मी हा विषय विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे.

======

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : दिनांक 7 जुलै 2013 रोजी श्री.दत्ता माघाडे,रा.टिटवी, ता.सिल्लोड जि.बुलढाणा या मजुराने रोजगार हमी योजने अंतर्गत मजुरी न मिळाल्याने केलेली आत्महत्या याबाबत श्रीमती विद्या चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

राज्यात रोजगार हमी योजने अंतर्गत मजुरांना देण्यात येणाऱ्या मजुरीची रक्कम शेतमजुरांना वेळेत देण्यात न येणे, दिनांक 7 जुलै 2013 रोजी श्री.दत्ता माघाडे रा.टिटवी, ता.सिल्लोड, जि.बुलढाणा या मजुराने मजुरी न मिळाल्याने आत्महत्या केलेली असणे, अशाच प्रकारे इतर पाच शेतमजुरांनी बुलढाणा जिल्ह्यात मजुरी न मिळाल्याने आत्महत्या केलेल्या घटना उघडकीस येणे, मजुरी करूनही या शेतमजुरांच्या नावे जॉब कार्ड नसणे, सिल्लोड तालुक्यातील वेगवेगळ्या टपाल कार्यालयात मजुरांना देण्यासाठीची अडीच कोटी रक्कम पडून असणे, परंतु, ती मजुरांना वेळेवर न मिळणे, शासनाने रोहयो अंतर्गत मजुरांना देण्यासाठी दिलेली रक्कम प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे मजुरांना विहित वेळेत न मिळाल्याने झालेली निराशा, त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील शेतमजूर आत्महत्या करणे, रोहयो अंतर्गत मजुरांना वेळेवर मजुरी मिळावी व हलगर्जी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

............



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : सातारा जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतकऱ्यांकडून बेकायदेशीर रकमा कपात केल्या जात असल्याबाबत याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयंत प्र.पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

सातारा जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतकऱ्यांकडून बेकायदेशीर रकमा कपाती केल्या जात आहेत. सर्व कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतीमाल खरेदी-विक्री करताना आडते यांनी 6 टक्क्यांपेक्षा अधिक कमिशन घेऊ नये असे पत्रक जिल्हा उप निबंधकांनी दिले आहे.

मात्र, त्याकडे दुर्लक्ष करून जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांनी सर्व आडते 6 टक्के कमिशन आणि इतर खर्च, उचल या नावाखाली शेतकऱ्यांच्या बिलातून कपाती करत आहेत. या संदर्भातील पावत्या पुरावे म्हणून शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उप निबंधक, आनंद कटके यांच्या समोर सादर करण्यात आल्या आहेत.

संबंधितांचे परवाने रद्द करून शेतकऱ्यांच्या कपात केलेल्या रकमा व्याजासह परत करण्याची होत असलेली मागणी, सबब बेकायदेशीर कपातीचे पैसे व्याजासह त्वरित शेतकऱ्यांना परत करण्यात यावे, याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे.

.....

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : मुंबई महानगरपालिकेने खड्डे बुजविण्यासाठी खरेदी केलेल्या तीन मशिन्स वापराविना बंद पडून असणे याबाबत श्री.चरण सिंग सप्रा, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.चरण सिंग सप्रा (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

मुंबई महानगरपालिकेने खड्डे बुजविण्यासाठी खरेदी केलेल्या तीन मशिन्सवर रूपये 2 कोटी 60 लाख खर्च केले असून या मशिन्सच्या देखभालीसाठी दरवर्षी पालिका शासन 1 कोटी रूपये खर्च करीत आहे. सध्या या मशिन्स वापराविना बंद पडून आहेत. या मशिन्स केवळ 90 फुटी रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी उपयुक्त असल्याने व बहुसंख्य 90 फुटी रोडचे कॉंक्रीटीकरण झाल्याने या मशिन्स निरूपयोगी ठरलेल्या आहेत. आज जनतेच्या कष्टाच्या पैशाचा अविचारीपणाने वापर होत आहे. जनतेच्या पैशाचे योग्य ते व्यवस्थापन न केल्यामुळे जनतेच्या पैशाची नासाडी होत आहे. जनतेच्या पैशाचे सुव्यवस्थितपणे नियोजन करून गरज नसताना अशा प्रकारे पैशाचा अपव्यय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे करीत आहे.

............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : महाराष्ट्रातील सीआरझेडची रेषा दर्शविणारा नवीन नकाशा येईपर्यंत जुना नकाशा वापरण्याची परवानगी मिळण्याबाबत श्री.संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

दिनांक 6 जानेवारी 2011 रोजीच्या पर्यावरण विभागाने जाहीर केलेल्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्रातील सीआरझेडची रेषा दर्शविणारा नवीन नकाशा दोन वर्षांमध्ये म्हणजे 6 जानेवारी 2013 पर्यंत बनवून तयार होणे अपेक्षित होते. या शासन निर्णयामध्ये असे नमूद केले आहे की, 6 जानेवारी 2011 पासून 2 वर्षापर्यंत जुने नकाशे ग्राह्य धरले जातील. यामुळे आपोआपच 6 जानेवारी 2013 पर्यंत हे जुने नकाशे ग्राह्य धरले गेले. परंतु, या शासन निर्णयान्वये हे नकाशे ग्राह्य धरले जात नाहीत. याबाबत शासनाच्या पर्यावरण विभागाने दिनांक 20.2.2013 रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाशी पत्रव्यवहार केलेला आहे. त्यामुळे जुने नकाशे ग्राह्य नाहीत व नवीन नकाशे तयार नाहीत अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त....

सी.आर.झेड रेषेबद्दल अनिश्चितता असल्यामुळे पुढील विकासात्मक धोरणाबद्दल टांगती तलवार उभी आहे. म्हाडा, एमएमआरडीए, सिडको, एमआयडीसी तसेच खाजगी विकासक यांच्या विकासात्मक प्रकल्पांना खीळ बसलेली आहे. तेव्हा सदर नवीन नकाशास केंद्राची मान्यता मिळेपर्यंत जुना सी.आर.झेड नकाशा वापरण्याची परवानगी मिळावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखद्वारे शासनास करीत आहे.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विद्यापीठ अनुदान आयोगाने शासन निर्णयाची अंमलबजावणी अर्हताधारक (एम फिल / पी.एच.डी) प्राध्यापकाच्या नेमणुकीच्या दिनांकापासून करण्याची आवश्यकता याबाबत श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

विद्यापीठ अनुदान आयोगाने प्राध्यापकांना पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी देण्यासाठी प्राध्यापकांनी पूर्वी केलेली अखंडित सेवा ग्राह्य धरण्याबाबत दिनांक 24 डिसेंबर, 1998 रोजी अधिसूचना काढून अंमलबजावणीसाठी सर्व राज्यांना कळविले. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने दिनांक 11 डिसेंबर, 1999 रोजी अधिसूचना काढणे. तथापि, सदर अधिसूचनेमध्ये प्राध्यापकांना वरिष्ठ व निवडश्रेणी देण्यासाठी पूर्वी केलेली अखंडित सेवा ग्राह्रय धरण्याबाबतच्या निकषाचा अंतर्भाव न केल्यामुळे राज्यभरातील सेवेत असलेल्या सन 1991 ते 2000 या कालखंडातील सर्व अध्यापकांना त्यांची अखंडित व तदर्थ सेवा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेनुसार ग्राह्रय धरुन लाभ देणे आवश्यक असताना त्यांना या लाभापासून वंचित ठेवण्यात आले आहे.

सभापती महोदय, दिनांक 27.6.2013 रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील विद्यापीठ महाविद्यालयातील बिगर नेट-सेट अध्यापकांच्या सेवा नियमित करुन त्यांना अनुषंगिक लाभ देण्यात येणे. तथापि, हा लाभ शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून देण्याऐवजी शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या अध्यापकांना त्यांच्या नेमणुकीच्या दिनांकापासून देण्याची प्राध्यापकांची मागणी असणे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेची राज्यात अंमजबजावणी न केल्यामुळे राज्यातील प्राध्यापकांचे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे त्यांच्यात असंतोष व संतापाची भावना निर्माण झालेली आहे. शासन निर्णयाची अंमलबजावणी अर्हताधारक (एम फिल / पीएच.डी.) प्राध्यापकांच्या नेमणुकीच्या दिनांकापासून करण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही विशद करावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

----------

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: महापालिका प्रशासनाने नागरी सुविधा केंद्रातील कर्मचाऱ्यांना मुदत वाढ न दिल्यामुळे नागरिकांची होत असलेली गैरसोय या बाबत श्री.प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

मुंबईतील नागरिकांना कर तसेच इतर शुल्क भरण्यात यावे यासाठी महापालिका प्रशासनाने प्रत्येक विभागात नागरी सुविधा केंद्र सुरु केले आहे. मात्र जानेवारी 2013 मध्ये पालिका प्रशासनाने या केंद्रातील कर्मचाऱ्यांना मुदतवाढ न देता ती जबाबदारी प्रत्येक विभागातील कर्मचाऱ्यांवर सोपविली आहे. सदर केंद्राचे काम सध्या तीन तासाने कमी केल्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. तेव्हा पूर्वीप्रमाणे सुविधा केंद्रात कर्मचारी नेमून सुविधा केंद्राचा कारभार चालविण्यात यावा, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनास करीत आहे.

----------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: स्वामीनाथन समितीच्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी न होणे या बाबत श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले ): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

थोर कृषी शास्त्रज्ञ श्री.स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने राष्ट्रीय शेतकरी आयोगाची स्थापना केली होती. या समितीने केंद्र व राज्य शासनाला सादर केलेल्या अहवालात काही मूलभूत व महत्वाच्या शिफारशी केल्या आहेत. त्यात प्रामुख्याने राष्ट्रीय कृषी मूल्य आयोगाने किमान हमीभाव जाहीर करताना एकूण उत्पादन खर्च ध्यानात घ्यावा व या उत्पादन खर्चापेक्षा किमान 50 टक्के जास्त भाव शेतमालाला मिळावा. शेतकऱ्यांचे उत्पन्न प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या पगाराएवढे असले पाहिजे. केंद्र शासनाने व राज्य शासनाने संयुक्तरित्या "किंमत स्थिरीकरण निधी" स्थापन केला पाहिजे व या निधीतून शेतमालाच्या किंमतीत होणाऱ्या चढ-उतारापासून शेतकऱ्यांना संरक्षण दिले पाहिजे. शेतकऱ्यांना अल्पदराने कर्जपुरवठा तसेच शेतीमधील पायाभूत सुविधांचा विकास करण्याकरिता शासनाने विशेष लक्ष दिले पाहिजे. कोरडवाहू क्षेत्रामध्ये पीक कर्ज देताना ते एका वर्षाकरिता न देता किमान चार ते पाच वर्षाकरिता दिले पाहिजे. केंद्रीय व राज्य कृषी मंत्रालयाचे नाव बदलून त्याचे नाव "कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय" करावे. कृषी विकास हा शेतीच्या उत्पादनातील वाढीवरच न काढता तो शेतकऱ्यांच्या एकूण उत्पन्नाशी निगडीत असावा.

सभापती महोदय, भारतामध्ये विविध राज्यांमध्ये भिन्न वातावरण आहे. या भिन्न वातावरणामध्ये वेगवेगळ्या समस्या निर्माण होतात. या समस्यांना योग्य प्रकारे हाताळण्यासाठी त्या परिस्थितीनुरुप उत्तर शोधण्याची गरज आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

या करिता पंचायत राजच्या माध्यमातून जास्तीत जास्त योजना राबविल्या पाहिजेत, राज्य स्तरावर "राज्य शेतकरी आयोग" ची स्थापना करावी अशा प्रकारे शेतकऱ्यांना लाभदायक ठरतील अशा शिफारशी केंद्र व राज्य शासनाकडे केल्या आहेत. स्वामीनाथन समितीने आपला अहवाल सादर करुनही अद्यापपर्यंत शासनाने या शिफारशींची अंमलबजावणी केली नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला आहे. या शिफारशींची अंमलबजावणी झाल्यास शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास निश्चितच मदत होणार असल्यामुळे स्वामीनाथन समितीने शासनाकडे केलेल्या शिफारशींची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : कोकणातील स्थानिक प्रवाशांना तिकिटे न मिळाल्याने खाजगी अथवा इतर वाहतुकीचा पर्याय स्वीकारावा लागत असणे, याबाबत श्री.किरण पावसकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

कोकण रेल्वेने उन्हाळी सुट्टी, गणोशोत्सव व इतर सुट्टयांच्या सणांच्या काळात कोकणात जाणाऱ्यांची संख्या लाखोने असून नियमित नऊ गाड्यांच्या जागांची संख्या 6132 असणे, मात्र गणपतीसाठी आगाऊ आरक्षणाच्या पहिल्याच दिवशी सुरुवातीच्या दीड मिनिटांतच आरक्षण फुल झाल्याने तसेच प्रतिक्षा यादी 800 पर्यंत गेल्याने अनेक प्रवाशांना तिकिटेच मिळाली नसणे, परिणामी दलालांचे रॅकेट सक्रीय असल्याचे रेल्वेच्याच वर्तुळात बोलले जात असूनही त्यावर कारवाई होत नसणे, प्रत्येक हंगामात दलाल लॉबी कार्यरत असून त्यांना आरपीएफच्या जवानांचीही मदत मिळत असणे, मात्र सर्वसामान्य कोकणातील स्थानिक प्रवाशांना तिकिटे न मिळाल्याने खाजगी अथवा इतर वाहतुकीचा पर्याय स्वीकारावा लागत असणे, या बाबत तातडीने कार्यवाही व्हावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :शासकीय योजनांचे अनुदान वाटपासाठी राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखेत वेगळा कक्ष उभारुन वयोवृध्द, अपंग व निराधार लाभार्थ्यांना सुविधा देण्याबाबत श्री.अमरसिंह पंडित वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी भूमिहीन शेतमजूर योजना, कुटुंब अर्थसहाय्य योजना आदि निराधार योजनांद्वारे राज्यातील निराधार, वृध्द, अपंग, लाभार्थ्यांना दरमहा शासनाकडून अनुदान देण्यात येणे, त्याचे वाटप राष्ट्रीयकृत बँकेद्वारे करण्यात येणे, राष्ट्रीयकृत बँकेत अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे लाभार्थ्यांचे बँक खाते उघडण्यापासून त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत अनेक समस्यांना तोंड द्यावे लागणे, ग्रामीण भागातील वयोवृध्द, अपंग, निराधारांना सतत या कामासाठी बँकेत हेलपाटे (ये-जा) घालावे लागणे, अनेक लाभार्थ्यांना योजनांचे अनुदान हाच एकमेव अर्थ प्राप्तीचा पर्याय असल्यामुळे लाभ मिळण्यास विलंब होत असल्याने त्यांची आर्थिक कुचंबणा होणे, शासकीय योजनांचे अनुदान वाटपासाठी राष्ट्रीयकृत बँकांनी त्यांच्या शाखेत वेगळा कक्ष उभारुन वयोवृध्द, अपंग व निराधार लाभार्थ्यांना सुविधा देण्यासाठी करावयाची कार्यवाही, राष्ट्रीयकृत बँकेत निराधार योजनांचे लाभ वाटपासाठी वेगळा कक्ष निर्माण करावा, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : शैक्षणिक प्रवेश परीक्षा व नोकरीचे अर्ज भरण्यासाठी ग्रामीण विद्यार्थ्यांपुढे सायबर कॅफेशिवाय पर्याय नसल्याने गरजू विद्यार्थी व नागरिकांची होत असलेली गैरसाय, याबाबत श्री.रमेश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

राज्यात स्कॉलरशीप, आयटीआय, डिप्लोमा या सोबतच बँका व महाविद्यालयीन प्रवेश परीक्षा व नोकरीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांपुढे सायबर कॅफेशिवाय अन्य पर्याय नसणे, मात्र अलीकडेच दहशतवादी कारवायांमुळे देशभर गुप्तचर यंत्रणेमार्फत हाय अर्लटच्या सूचना देण्यात येणे आणि सायबर कॅफे ही बेकायदेशीर असल्याचे ठरविण्यात येणे, परिणामी राज्यभरातील स्कॉलरशीप, आयटीआय, डिप्लोमा, बँका आणि महाविद्यालयीन प्रवेशासाठी अवलंबून असणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांची/नागरिकांची होत असलेली गैरसोय, या बाबत सायबर कॅफेशिवाय अन्य पर्यायाची सोय शासनाने करावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

----------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी**. : स्वातंत्र्य सैनिकांची होत असलेली उपेक्षा याबाबत श्री. मोहन जोशी, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"देशाला इंग्रजांच्या आणि निजामाच्या पारतंत्र्यातून मुक्त करताना जीवाची बाजी लावणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांची उपेक्षा मंत्रालयातील सरकारी अधिकाऱ्यांनी केली आहे. मंत्रालयातून स्वातंत्र्य सैनिकांच्या आणि न्यायमूर्ती पालकर आयोगाच्या अहवालातील महत्वपूर्ण कागदपत्रे आणि फाईल्स गहाळ झाल्या आहेत. राज्यातील 7 ते 8 हजार स्वातंत्र्य सैनिक मागील 5 वर्षापासून पेन्शनसाठी हेलपाटे घालून थकले, त्यापैकी काही मरण पावले तर काही अखेरच्या घटका मोजत आहेत. सातारा येथील स्वातंत्र्य सैनिक मारोतराव पाटील यांना वयाच्या 92 व्या वर्षी आझाद मैदानात पेन्शनसाठी उपोषण करावे लागले पण त्याची देखील दखल शासनाने घेतली नाही. उच्चाधिकार समितीने कागदपत्रे आणि पुरावे तपासून मंजूर केलेल्या प्रकरणांना अद्याप अंतिम मंजुरी मिळालेली नाही. निजामाच्या विरोधात लढलेले बीडचे सिताराम बुडके, खंडू जाधव आणि साहेबराव भुमरे अशा अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी व त्यांच्यानंतर त्यांच्या पत्नीने पेन्शन मिळावी यासाठी पाठपुरावा सुरु केलेला आहे. परंतु मंत्रालयातून फाईल्स गहाळ झाल्यामुळे हे स्वातंत्र्य सैनिक उपेक्षित राहात आहेत. तरी स्वातंत्र्य सैनिकांच्या यादीची चौकशी करण्यात यावी अशी स्वातंत्र्य सैनिकांची मागणी मान्य करावी तसेच जी फाईल सरकारी अधिकाऱ्यांनी गहाळ केलेली आहे त्याची शासनाने त्वरित दखल घेऊन कारवाई करावी अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे विनंती करतो."

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

**पृ.शी./मु.शी.** : मुंबई उपनगरातील जूहू येथील मोक्याचा भूखंड अल्पदरात मिळवून जादा चटई क्षेत्रफळ घेतल्याप्रकरणी झालेला घोटाळा याबाबत श्री. रामदास कदम, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"मुंबई उपनगरातील जूहू येथील मोक्याचा भूखंड अल्पदरात मिळवून जादा चटई क्षेत्रफळ घेतल्याप्रकरणी झालेल्या घोटाळ्याप्रकरणी विधिमंडळाकडून नेमलेल्या एक सदस्यीय चौकशी समितीने घोटाळा झाल्याचे मान्य केल्यानंतर गृहनिर्माण विभागाकडून कृती अहवाल सादर केला गेला. तरीही प्रत्यक्षात काहीही कारवाई न होता ही फाईलच बंद करण्यात आल्याचे निदर्शनास येणे तसेच या सोसायटीने जादा एफएसआय घेतल्याबाबत चटई क्षेत्रफळाच्या दरातील फरकापोटी व्याजासह अडीच कोटी रुपये अद्यापही भरलेले नसतानाही म्हाडनेही कारवाई केलेली नाही. विधिमंडळात याबाबतच्या अहवालावर शिक्कामोर्बब होऊनही कारवाई केली गेली नाही. याबाबत शासनाची भूमिका स्पष्ट करावी याकरिता सदरची बाब मी विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे निदर्शनास आणीत आहे."

---

**उप सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.30 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 1.37 ते 2.30 पर्यंत मध्यंतर )

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मध्यंतरानंतर

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

**पृ.शी./मु.शी.: सन 2013-2014 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा**

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी ) : पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. आज कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन व्दारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्यांने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा संबंधित बाबीपुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे आपणास विदित आहे. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

**विविध मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या**

**तालिका सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेला घेण्यात येतील.

1.मुख्यमंत्री - ए-1, ए-2, ए-3, ए-4, ए-5, ए-6, ए-8ए, बी-3, बी-10, एफ-2, एफ-3, एफ-4, एफ-5, जे-1, जे-2, क्यू-3, क्यू-4, झेडएफ-3ए,

2.उप मुख्यमंत्री - जी-4, जी-5, जी-6, जी-7, जी-8, ओ-7, ओ-9, ओ-10, ओ-11, ओ-12, ओ-17

3.सामाजिक न्याय, व्यसनमुक्ती कार्य, विमुक्त/भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण मंत्री - एन-3, एन-5

4.आदिवासी विकास मंत्री - टी-4, टी-5, टी-6,

5.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री - डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4

6.शालेय शिक्षण मंत्री - ई-2

7.वस्त्रोद्योग, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ मंत्री - झेडई-1, झेडई-2

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती....**

8.सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण आणि राजशिष्टाचार मंत्री -आर-1, आर-3

9.क्रीडा व युवककल्याण मंत्री - ई-3

10.महिला व बालविकास मंत्री - एक्स-1

11.पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय मंत्री - डी-4, डी-5, डी-6

12.पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य मंत्री - झेडडी-2

13.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री - वाय-2

आता माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या संदर्भात माझा पॉईण्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. मी गेली पाच-सहा अधिवेशने या पुरवणी मागण्यावरील चर्चेचा आवाका आणि आराखडा पाहिलेला आहे. आम्ही रात्र रात्र जागून विविध ठिकाणाहून माहिती घेऊन ती या ठिकाणी पोटतिडिकेने मांडतो. आमच्या विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांमध्ये पुरवणी मागण्यांवर बोलायला मिळत नाही म्हणून भांडणे होतात. मी ज्या विषयावर अभ्यास करुन बोलतो त्या विषयासंबंधी मला माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर अपेक्षित असते. विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये हाच फरक आहे. शासनामध्ये कामकाज कशा प्रकारे चालले आहे हे आम्हाला या ठिकाणी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातूनच समजते. आम्ही उपस्थित केलेल्या मुद्यांना मंत्री महोदय उत्तर न देता अमुक सदस्यांनी, तमुक सदस्यांनी चर्चेमध्ये भाग घेतला असा आमचा उल्लेख करतात. काय गौरवपूर्ण उल्लेख असतो तो ! आम्हाला वाटते की, मंत्री महोदय उत्तर देतील. परंतु कोणत्याही मुद्याचे उत्तर न देता मंत्री महोदय माझ्या मागण्या मंजूर कराव्यात अशी विनंती करतात. वेळ झालेला असतो. त्यामुळे माननीय सभापती सांगतात की, वेळ झालेला आहे. मग मंत्री महोदय फाईल बगलेत मारुन जितं मया म्हणत सभागृहाबाहेर जातात. अशा प्रकारे सभागृहामध्ये चर्चा होणार असेल तर ती न झालेली बरी. पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी नियमामध्ये 7 दिवसाची तरतूद आहे. परंतु ही तरतूद तुम्ही 2 दिवसावर आणता. या दोन दिवसातील केवळ काही तास पुरवणी मागण्यांवर चर्चा होते. तरी आम्ही कोणती तक्रार करीत नाही. सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्यांना मंत्री महोदय उत्तरच देत नाहीत.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, दुसरे असे की, पुरवणी मागण्यावरील चर्चेच्या वेळी अधिकारी-कक्षामध्ये दुय्यम दर्जाचे अधिकारी बसलेले असतात. तेथे सचिव कधी बसत नाहीत. हे दुय्यम दर्जाचे अधिकारी त्यांच्या ज्ञानाप्रमाणे मंत्री महोदयांना चिठ्ठया पाठवितात. मग मंत्री महोदय थातूरमातूर उत्तर देतात. अशा प्रकारचा या विधानपरिषदेचा गेल्या 8-10 अधिवेशनाचा लेखाजोखा मी पाहिलेला आहे. मी अधिकृतरित्या बोलत आहे. अशा प्रकारे कामकाज होणार असेल तर या मागण्यावरील चर्चा थांबवा. तुम्हाला मम म्हणायचे आहे. विधानपरिषदेने मागण्या मंजूर करणे ही घटनात्मक कार्यपध्दती आहे. हा सोपस्कार तुम्हाला पूर्ण करायचा असेल तर तो तुम्ही करुन घ्या. या मागण्यासंबंधी सरकारला कोणत्याही प्रकारचे गांभीर्य नाही, काही नाही.

मघाशी आम्ही या सदनामध्ये आग्रह धरला तो मंत्र्यांच्या विरोधात नव्हता. विधानसभेतील माननीय उपाध्यक्ष फार गंभीर झाले होते. सदस्यांचे निलंबन होते तर मग गैरहजर राहिल्यामुळे मंत्र्यांचे निलंबन का होत नाही असा त्यांचा मुद्दा होता. त्यावर आदरणीय मुख्यमंत्र्यांनी आजच सांगितले की, ते मंत्र्यांचा लेखाजोखा घेत आहेत. गैरहजर असणा-या मंत्र्यांची ते हजेरी घेणार आहेत. सभापती महोदय, मी आपणाला अशी विनंती केली की, शेवटच्या दिवशी मंत्र्यांच्या गैरहजेरीमुळे वाया गेलेला वेळ दर्शविण्यात यावा, त्याप्रमाणे तो वेळ आपण वाचण्यास सुरुवात केली. सरकारला जाग यावी हा त्यामागचा उद्देश होता. संसदीय कार्यमंत्र्यांनी या बाबतीत अभ्यास करावा आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये हा विषय आणावा. जेव्हा हे सरकार या सदनाला आणि सदस्यांना सामोरे जाते त्यावेळी त्यानी गांभीर्याने गेले पाहिजे.

मी या संदर्भात देखील कामकाज सल्लागार समितीमध्ये मुद्दा उपस्थित केला होता. मी संसदीय कार्य मंत्री महोदयांना सांगितले की, तुमचा या बाबतीत काही अभ्यास नसेल तर राजीनामा द्या. या सदनाला मंत्री महोदय किंवा एकूणच हे सरकार गांभीर्याने घेत नसेल तर या ठिकाणी चर्चा का करायचा हा प्रश्न आहे. कालच्या पुरवणी मागण्यावरील चर्चेला मंत्री महोदयांनी काय उत्तरे दिली हे मला माहीत नाही. माझे म्हणणे एवढेच आहे की, पुरवणी मागण्यावरील चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्य जे जे मुद्दे उपस्थित करतील त्या सर्व मुद्यांना मंत्री महोदयांनी टोलवाटोलवी न करता उत्तरे दिली पाहिजेत. आपल्या खात्याचे अधिकारी कसे फसवतात हे

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मंत्री महोदयांना देखील कळते. प्रशासकीय यंत्रणेला धाक निर्माण करणारी ही चर्चा असते. तेव्हा सभापती महोदय, या निमित्ताने आपण सरकारला योग्य ती समज द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ प्रोसीजरच्या माध्यमातून आपल्यासमोर उभा आहे. आता शिवसेना पक्षाचे गट नेते सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो विषय मांडला त्या अनुषंगाने मी बोलणार आहे.

सभापती महोदय, मी काल पुरवणी मागण्यावरील चर्चा संपण्याच्या वेळी बोलण्यासाठी उभा होतो. सुदैवाने आपणच पीठासीन अधिकारी म्हणून आसनस्थ होतात. कृषी आणि पणन खात्याच्या मागण्यांवर मी बोललो होतो. त्यावेळी पणन खाते कोणाकडे आहे याची मला माहिती हवी होती. सभागृहात उपस्थित असलेले प्रत्येक मंत्री सांगत होते की, पणन खाते आमच्याकडे नाही. पणन खाते नक्की कोणाकडे आहे, पणन मंत्री मागण्यावरील चर्चेच्या वेळी सभागृहात उपस्थित होते काय, पणन मंत्री सभागृहात उपस्थित नसताना त्या विभागाच्या मागण्या कशा काय मंजूर झाल्या? फुड आणि प्रोसेसच्या बाबतीत रत्नागिरी जिल्हयातील सर्व लोकांना कसा काय न्याय मिळेल, महिला बचत गटांना कसा न्याय मिळेल अशी माझी पणन विभागाच्या अनुषंगाने मागणी होती. परंतु माझ्या मागणी संदर्भात मला उत्तरच मिळाले नाही. या सभागृहात पणन मागण्या मंजूर करुन टाकल्या. आम्ही पुरवणी मागण्यांच्या संदर्भात अभ्यास करीत असतो आणि त्या अनुषंगाने मागणी करतो. आम्ही मागण्या करतो त्यावेळी माननीय मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसतात. मग आम्ही या सभागृहात कशासाठी बोलावयाचे ? माननीय मंत्री उपस्थित नसताना त्यांच्या विभागाच्या मागण्या सभागृहात मंजूर करणार असाल तर मागण्यांवर चर्चा कशासाठी करावयाची असा माझा प्रश्न आहे. सभापती महोदय, आम्हाला संरक्षण देण्याची जबाबदारी आपली आहे.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : आपणास काल बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिली होती. मंत्री महोदयांनी कालच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तरे दिली आहेत.

श्री.रामदास कदम : पणन विभागाचे मंत्री महोदय कोण आहेत ही गोष्ट अजून गुलदस्त्यात आहे. पणन खात्याचे मंत्री कोण आहेत, ते काल मागण्यांवरील चर्चेच्या वेळी सभागृहात उपस्थित होते काय, आम्ही पणन खात्याच्या बाबतीत जे प्रश्न विचारले त्याबाबतीत न्याय दिला गेला काय, या प्रश्नाची उत्तरे मला हवी आहेत. पुरवणी मागण्यांना या सभागृहाची मान्यता घेतल्याशिवाय शासनाला एकही पैसा खर्च करता येत नाही असे घटनेमध्ये नमूद केलेले आहे. पुरवणी मागण्यांना या सभागृहाची मान्यता न घेता पैसे खर्च करण्याचे अधिकार या शासनाला कोणी दिले? शासन

2...

श्री.रामदास कदम..

चर्चेविना मागण्या मंजूर करुन घेऊ शकत नाही. घटनेचा गळा घोटण्याचे काम या सदनात होत असेल तर ते योग्य नाही. काल सभागृहात पणन विभागाच्या पुरवणी मागण्या चर्चेसाठी असताना संबंधित मंत्री उपस्थित राहिले नाहीत. तर आम्ही तरी सभागृहात कशासाठी बसावयाचे, कशासाठी मागण्या करावयाच्या? पुरवणी मागण्यांना उत्तर देण्याची सामुदायिक जबाबदार नसते, विभागाच्या मंत्र्यांनीच उत्तरे दिली पाहिजेत याची मला माहिती आहे. मी या सभागृहात काही नवीन सदस्य नाही. गेल्या 25 वर्षापासून मी विधिमंडळ सदस्य म्हणून काम करीत आहे. पुरवणी मागण्यांवरील उत्तर विभागाच्या मंत्र्यांनाच द्यावे लागते, राज्यमंत्र्यांना उत्तर देता येत नाही. ही गोष्ट मला कोणाकडून शिकण्याची गरज नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जी मागणी केली आहे, त्या मागणीचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. पुरवणी मागण्याच्या अनुषंगाने आम्ही विविध मागण्या करीत असतो. मी देखील या सभागृहात गेल्या 13 वर्षापासून कार्यरत आहे. आजपर्यंत पुरवणी मागण्याच्या अनुषंगाने मी लक्ष घालतो आहे, तुम्ही केलेल्या मागणीच्या बाबतीत प्रश्न सोडविण्यात आला आहे अशा प्रकारचे एकाही मंत्र्यांने मला उत्तर पाठविलेले नाही. तुम्हाला अशा प्रकारची उत्तरे आली असतील याची मला माहिती नाही. सभागृहाचा वेळ घालविण्यापेक्षा पुरवणी मागण्यांवर चर्चाच करु नये. आपण चर्चेविना सर्व विभागाच्या मागण्या मंजूर करुन टाकू. पुरवणी मागण्यांवरील चर्चा करताना आम्ही काही महत्वाचे प्रश्न उपस्थित करतो. आम्ही पुरवणी मागण्यांवर आमचे विचार मांडत असताना, आमचे विचार कधी संपतील असे संपूर्ण मंत्रिमंडळाला वाटते. आम्ही बोलत असताना माननीय मंत्री महोदयांच्या चेहऱ्याकडे पाहिले तर आमची टिंगल होते आहे असे आम्हाला वाटते ही गोष्ट मी या ठिकाणी खेदाने नमूद करीत आहे. या सभागृहात अधिकारी उपस्थित आहेत. आम्ही जे बोलतो त्याची नोंद ते घेतात. ती नोंद आपल्याला देतात की नाही या विषयी देखील आम्हाला शंका येवू लागली आहे. अधिकारी आपल्याला नोंद देत असतील तर त्याचा माननीय मंत्री महोदय अभ्यास करतात की नाही...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ 14:40

श्री.जयंत प्र.पाटील.....

माझ्या मते माननीय विरोधी पक्षनेत्यांचे मत जाणून घ्यावे. अन्यथा पुरवणी मागण्या चर्चेशिवाय मंजूर करु. शासनाकडून आम्हाला ठाम आश्वासन दिले पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ही चर्चा झाल्यानंतर जे कोणी मंत्री आहेत त्यांचा सभागृहाच्या वतीने आपण आढावा घेणे महत्वाचे आहे. आजच्या पुरवणी मागण्यांमध्ये पर्यावरण व सांस्कृतिक कार्य विभागाच्या मागण्या चर्चेसाठी दर्शविण्यात आल्या आहेत. मला या विभागाच्या मागण्यांवर बोलायचे आहे. परंतु पुस्तिकेमध्ये मागण्या कुठे आहेत हे दिसून येत नाही.

श्री.संजय सावकारे : मंत्री महोदय बैठकीमध्ये व्यस्त आहेत, ते लवकरच सभागृहात येत आहेत. मला मुद्यांची नोंद करण्यास सांगून गेले आहेत.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, विधानसभेच्या कामकाजामध्ये मंत्री महोदय व्यस्त आहेत. माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्यांची नोंद घेण्यात येईल आणि त्या अनुषंगाने उत्तर दिले जाईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याची दखल घेऊन काहीही उपयोग होत नाही, कारण सरकार काही करायला तयार नाही. काल ज्या विभागाच्या पुरवणी मागण्या विधानसभेत चर्चेला होत्या त्या विभागाच्या पुरवणी मागण्या आज विधानपरिषदेत चर्चेला दाखविण्यात आलेल्या आहेत आणि काल ज्या विभागाच्या पुरवणी मागण्या विधानपरिषदेत चर्चेला होत्या त्या विभागाच्या पुरवणी मागण्या आज विधानसभेत चर्चेला दाखविण्यात आलेल्या आहेत. जेणेकरुन मंत्री महोदयांना सभागृहात उपस्थित राहता यावे हा त्या मागील हेतू आहे. पर्यावरण मंत्री श्री.संजय देवतळे यांच्या विभागाच्या मागण्या आज विधानसभेत चर्चेला नाही हे निश्चित आहे. पुरवणी मागण्यांबाबत या सभागृहाला महत्व दिले जात नाही हे वास्तव आहे. पुरवणी मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. माननीय मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री काल सभागृहात उपस्थित नव्हते, कारण त्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा नव्हती, हे मी समजू शकतो. आजच्या पुरवणी मागण्यांमध्ये दोन्ही विभाग दर्शविलेले आहेत. मग माननीय मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांच्यापैकी कोणीही सभागृहात उपस्थित नाही.

सभापती महोदय, विधानसभेत मुंबई महापालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागातील फायली गहाळ झाल्याबाबतच्या मुद्यावर चर्चा होणार असल्यामुळे मुख्यमंत्री विधानसभेत उपस्थित राहिले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

असतील हे मी समजू शकतो. परंतु माननीय उप मुख्यमंत्री हे या सभागृहाचे नेते आहेत, त्यांनी पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी उपस्थित राहणे आवश्यक आहे. हा जो लाईटनेस आहे हा योग्य नाही. ही जी सरकार पक्षाची मानसिकता आहे त्याबाबत आम्हाला चिंता वाटते. विरोधी बाकावरील माननीय सदस्यांचा अवमान करता कामा नये.

पुरवणी मागण्यांची सॅंक्टिटी आपण घालवून बसलो आहोत. वरचे जे करतात त्याच्या पाच पावले पुढे खालचे करतात. याची वेगळी दखल सरकारने घेतली पाहिजे. त्याप्रमाणे आपण स्वत: ज्या खात्याकडून पुरवणी मागण्यांवरील चर्चेत मांडलेल्या मुद्याबाबत उत्तर दिले गेले नाही त्याची दखल घेतली पाहिजे. पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या माध्यमातून कोणत्या खात्याकडून कोणत्या मुद्याला उत्तर दिले गेले नाही याबाबत आम्ही आपल्याला पत्र देऊ. आपण संबंधित मंत्र्यांना जाब विचारणार आहात की नाही? नियम 93 अन्वये मांडलेल्या सूचनांना, लक्षवेधी सूचनांना वेळेवर उत्तर दिले जात नाही, त्याबद्दल जाब विचारत नाही. वारंवार सचिवांना बोलावून सांगितले तरी ते उत्तर देत नाहीत. प्रश्नांची उत्तरे वेळेवर येत नाहीत. विधिमंडळाच्या कामकाजाचे गांभीर्य कसे राहणार आहे?

दहा वर्षापूर्वी असे होत होते का? आज मंत्री हे सर्व लाईटली घेत आहेत. काल पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी पणन मंत्री कोण आहेत हे समजण्यासाठी एकमेकाकडे पाहिले जात होते. मंत्रीमंडळामध्ये बदल झाल्यामुळे लगेच ध्यानात येत नाही हे मी समजू शकतो. किमान आज सभागृहात रोस्टरनुसार मला बसायचे आहे, हे तरी संबंधित मंत्र्यांना माहित असले पाहिजे. रोस्टरनुसार बसायचे आहे म्हणून जाऊन बसायचे या अर्थाने कामकाज चालणार असेल तर आमची तीव्र नाराजी आहे.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : निश्चित दखल घेऊ.

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्षनेता) : नोंद घेऊन आपण या संदर्भात कारवाई करणार आहात असे समजून आम्ही चर्चा सुरु करीत आहोत. सरकारवर आमचा भरवसा राहिलेला नाही.

नंतर 2जे.1...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

सभापती महोदय, मार्चमधील अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये माननीय अर्थमंत्र्यांनी "शिलकीचा अर्थसंकल्प" हे वाक्य उच्चारताच ज्यांना कळते त्यांनी दे दणादण म्हणून बाके वाजववयास सुरुवात केली होती. आमच्या दादाने इतक्या महागाईच्या काळात शिलकी अंदाजपत्रक सादर केला म्हणून दे दणादण बाके वाजववयास सुरुवात केली गेली होती. त्याचवेळी सदर शिलकी अंदाजपत्रक हे खरे नसून केवळ कागदोपत्री आकडेमोड आहे हे सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांच्या भाषेतील "ढ" विद्यार्थ्याने दाखवून दिले. त्यांनी जर आजच्या पुरवणी मागण्या चाळल्या असतील, पुरवणी मागण्या वाचावयास वेळ मिळाला असेल, त्यातील काही कळले असेल तर ते कसे थोतांड होते हे समजून येईल. शिलकी अर्थसंकल्प म्हणून आपण बाके वाजवली त्याबद्दल मनातल्या मनात आज तरी नक्की लाज वाटू शकते इतकी ही आकडेवारी बोलकी आहे.

सभापती महोदय, 8060 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या व त्यापैकी योजनांतर्गत मागण्या 3207 कोटींच्या आहेत. खरे म्हणजे योजनेअंतर्गत पुरवणी मागण्यात येण्याचे काहीच कारण नाही. अर्थसंकल्पीय अधिवेशनात वित्त मंत्र्यांनी 184 कोटी रुपयांचे शिलकी अंदाजपत्रक सादर केले आणि 3207 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या योजनेंअतर्गत लेखा शीर्षात टाकल्यानंतर आपला अर्थसंकल्प शिलकीचा नसून तुटीचा असल्याची बाब यावरुन सिध्द होते. मी हे म्हटल्यानंतर "योजना आयोगाने आम्हाला 49 हजार कोटी पर्यंतचे अधिकार वाढवून दिलेले असल्यामुळे आम्ही हे केले आहे" असे समोरुन उत्तर येईल याची मला कल्पना आहे. परंतु तरी देखील 3207 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या बघितल्या तर 1200 कोटी रुपयांचे मार्चमधील बजेट तुटीचे होते हे सिध्द होते. आपण या आकडेवारीला रंगसफेदी करुन बजेट शिलकी असल्याचे दाखवले. त्यामुळे ही महाराष्ट्रातील जनतेच्या डोळयातील धूळफेक आपण अजून किती वर्षे करणार आहात ? प्रामाणिपणे आत्मपरीक्षण करणार आहात काय ? आपल्या राज्याला आर्थिक शिस्त लावण्याचा आपण प्रामाणिकपणे प्रयत्न करणार आहात काय ? पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने राज्य शासनाने पुन्हा एकदा आत्मपरीक्षण करावे असे मला वाटते.

श्री. विनोद तावडे ....

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 4, पृष्ठ क्रमांक 6 वर मी आता माझे विचार व्यक्त करणार आहे. निवडणूक आयोगाच्या मुद्रण खर्चासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. सांगली, मिरज, कुपवड महानगरपालिकेत काही दिवसापूर्वी निवडणुका झाल्या होत्या. प्रभाग क्रमांक 10 मधील मतदारांना आर्थिक प्रलोभन दाखविण्याचा प्रयत्न झाल्याच्या बातम्या आम्ही चॅनलवर पाहिल्या. प्रलोभनामध्ये वस्तू वाटप इत्यादी गोष्टीचा तर उल्लेख आहेच परंतु थेट प्रभाग क्रमांक 10 मधील उमेदवारासाठी रोख पैसे वाटप करण्यात येत होते. पैसे वाटप करीत असतांना अपर पोलीस अधीक्षक श्री. दिगंबर प्रधान व राज्य निवडणूक आयुक्तांच्या पथकाने यासंदर्भात 5 लोकांना अटक केली होती. या पथकाला नारंगी रंगाची पिशवी आढळून आली व त्या पिशवीमध्ये 1 लक्ष 6 हजार 200 रुपये होते तसेच उमेदवाराचे बिल्ले, टीव्हीचे निवडणूक चिन्ह, बॅलेटचे छापील रंगीत नमुने आढळून आले होते. त्या ठिकाणी जो कोणी उमेदवार उभा होता त्या उमेदवाराचे सर्व वर्णन त्या नारंगी पिशवीमध्ये पथकाला आढळून आले होते व त्यासंदर्भातील एफआयआर मिरज पोलीस स्टेशनमध्ये नोंदविण्यात आला होता. एवढी अनियमितता होऊनही या प्रकरणात कोणतीही कारवाई झाली नाही. खरे म्हणजे मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मधील 16(2) अनुसार राज्य निवडणूक आयोगाला निवडणूक निकालापासून 30 दिवसामध्ये कोर्टामध्ये आचार संहिता भंगाची याचिका दाखल करणे गरजेचे आहे. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाकडे अनेक तक्रारी दाखल झालेल्या आहेत तसेच यासंदर्भात मी स्वत: एक पत्र दिलेले आहे. परंतु अद्यापपर्यंत राज्य निवडणूक आयोगाकडून माननीय न्यायालयात याचिका दाखल करण्यात आलेली नाही. निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्याने रंगेहात पकडले असतांना सुध्दा आपण म्हणणार असाल की, "उमेदवाराने कोर्टात जावे, आम्ही काही कोर्टात जाणार नाही" परंतु असे म्हटले तर निवडणुकीची विश्वासार्हता किती राहील याचा विचारच केलेला बरा. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात शासनाने अधिक लक्ष घालावे यासाठी मी हा विषय उपस्थित केलेला आहे.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 5, पृष्ठ क्रमांक 6 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, शासकीय पदावर कंत्राटी पध्दतीने

यानंतरkk-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

400 अधिव्याख्याते अतिशय तुटपुंज्या वेतनावर घेतले होते. ज्यावेळेस एमपीएससीमध्ये घोटाळा झाल्यामुळे एमपीएससीचे काम बंद पडले होते. एज्युकेशन आणि पॉलिटेक्नीक या विभागाने कंत्राटी पध्दतीने नेमणुका केल्या होत्या. मेडिकल एज्युकेशनने कॅबिनेटच्या बैठकीमध्ये विशिष्ट प्रस्ताव पारीत करुन त्या कर्मचाऱ्यांना नियमित केले होते. परंतु हायर एज्युकेशनने तसे केले नाही. आता एमपीएससीने यासंदर्भात जाहिराती काढल्या आहेत यामध्ये नवीन नेमणुका झाल्या तर या 400 कर्मचाऱ्यांना घरी बसावे लागणार आहे. आपल्या काळात एमपीएससीमध्ये जो घोटाळा झाला होता व त्यासाठी आपल्या मदतीसाठी कमी पगारात काम करण्यासाठी जे कर्मचारी धावले होते ते सुध्दा परीक्षा पास करुनच आले होते. त्यांची यासंदर्भात एक वेगळी परीक्षा झाली होती. ज्यांनी आपल्या खात्यात 12/14 वर्षे काम केलेले आहे त्यांना आता तुम्ही परीक्षेला बसा म्हटले तर त्याचे एक तर वय बसत नाही, त्यांनी ऑलरेडी एक परीक्षा पास केलेलीच आहे. आताच्या मुलांचा इंटेलिजन्स आणि 10 वर्षापूर्वीच्या उमेदवारांचा इंटेलिजन्स यामध्ये फरक पडतो. पूर्वीच्या कर्मचाऱ्यांना आताच्या मुलांबरोबर बसवले तर ते न्यायसंगत होणार नाही. त्यामुळे 400 अधिव्याख्यात्यांचा विषय सोडवावा अशी विनंती आहे. यासंदर्भातील निवड प्रक्रिया झाली होती,निवड चाचणी आणि बिंदू नामावलीच्या काटेकोर पालन करुन ही पदे भरली गेली होती. त्यामुळे 400 अधिव्याख्यात्यांच्या संदर्भात त्वरित निर्णय होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 7, पृष्ठ क्रमांक 7 च्या संदर्भात मी विचार व्यक्त करणार आहे. आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्था. आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष चौकशी आयोगाकरिता झालेला खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या आयोगाला ज्या ज्यावेळी मुदतवाढ दिली होती त्या पूर्वीचा कालावधी संपण्याच्या अगोदर आपण मुदतवाढ दिलेली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन दिनांक 20 एप्रिल पर्यंत सुरु होते त्यामुळे अधिवेशन सुरु असतांना या आयोगाच्या मुदतवाढीला परवानगी देता आली असती. परंतु विधिमंडळाला गृहीत धरण्याची प्रक्रिया सुरु झाली. आदर्श आयोगाची नेमणूक विधी मंडळाच्या चर्चेतून झाली होती. अधिवेशन सुरु असतांना आपल्याला आदर्शला मुदतवाढ द्यावयाची असेल तर, अधिवेशनामध्ये चर्चा होईल, टीका

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

होईल म्हणून टाळायचे आणि परस्पर मुदत द्यायची. आपण आदर्शचा अहवाल या सभागृहात कधी मांडणार आहात ? हा अहवाल तर प्रत्यक्षात येत नाही परंतु या अहवालाची चौकशी करणाऱ्या काही अधिकाऱ्यांना कोणत्यातरी मंत्र्याने, मुख्यमंत्र्याने फ्लॅट दिलेले आहेत याची चर्चा बाहेर होते आहे व ही चर्चा बाहेर होत असतांना आमचे कॉंग्रेसचे काही मित्र सांगतात की, दिल्ली मध्ये ज्यावेळेस एखाद्या मुख्यमंत्र्यांच्या नावाची चर्चा होते तेव्हाच हे होते.

हा अहवाल फुटल्याची बातमी चॅनलवरुन आपण पाहिलेली आहे. हे काय गौडबंगाल आहे ? आदर्शच्या भ्रष्टाचारामुळे जर मुख्यमंत्र्याला जावे लागले असेल व त्याचा कॉग्नीजन्स दिल्लीतील राष्ट्रीय नेतृत्वाने घेतला असेल तर आदर्शच्या संदर्भातील अहवाल आपण कधी मांडणार आहात, या अधिवेशनात हा अहवाल मांडला जाणार आहे काय ? कशा पध्दतीने मांडला जाणार आहे याची स्पष्टता माननीय मुख्यमंत्र्यांनी करावी अशी अपेक्षा करतो. आदर्शचा सहा महिन्याचा कालावधी 20 ऑक्टोबर, 2013 रोजी संपेल. ऑक्टोबर महिन्यामध्ये आतापर्यंत हिवाळी अधिवेशन झालेले नाही. त्यामुळे या अधिवेशनात सदर अहवाल मांडणे गरजेचे आहे. सदर बाब लक्षात घेता आदर्शचा अहवाल हे अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहात सादर करुन त्यावर चर्चा घडवून आणावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या पुरवणी मागणी क्रमांक ए-4, बाब क्रमांक 8,पृष्ठ क्रमांक 7 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. काल मी हा विषय उपस्थित केली असती तर त्यावेळेस मला कोणत्या बाबीनुसार उल्लेख करीत आहे असे विचारले असते. त्यामुळे मी हा विषय आज उपस्थित करीत आहे. महाराष्ट्र सदनाचे बांधकाम करण्यासाठी जवळपास 100 कोटी रुपये खर्च येणार तो देण्यासाठी विभागाकडे पैसे नाहीत हे मी समजू शकतो. त्यामुळे हे काम बीओटीवर देण्यात आले. बीओटीवर काम देत असतांना त्या कंपनीला त्या बदल्यात काय द्यावे ? महाराष्ट्र सदन, हाय मांऊट तसेच अंधेरीतील प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे काम देऊन त्या बदल्यामध्ये चमणकर समुहाला 4 लाख 50 हजार चौरस फूटाचा चटई निर्देशांक विकण्यास परवानगी दिली गेली होती.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

त्यासाठी महाराष्ट्र सदन प्रकल्प हा झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प दाखविल्ण्यात आला. त्यामुळे 2 लाख 30 हजार चौ.फूटांचा चटईक्षेत्र निर्देशांक महाराष्ट्र सदन, सरकारी विश्रामगृह व प्रादेशिक परिवहन कार्यालय या तीन प्रकल्पासाठीचे कंत्राटदार चमणकर समुहाला देण्यात आले. याच बरोबर दिल्लीतील महाराष्ट्र सदन व इतर इमारतींच्या बांधकामासाठी 2 लाख 20 हजार चौ.फुटाचा एफ.एस.आय. मुंबईत वापरण्याची मुभा देखील देण्यात आली. आपल्या 100 कोटी रुपयांच्या कामासाठी 110 कोटी रुपयांचे काम दिले हे समजण्यासारखे आहे.

सभापती महोदय, चमणकर समुह लोखंडवाला, अंधेरी येथील रस्त्यावर व्यावसायिक व निवासी असा संयुक्त प्रकल्प राबवित आहे. त्याठिकाणी व्यावसायिक गाळ्यासाठी 40 हजार प्रती चौ.फूट इतका रेट आहे. तर निवासी सदनिकेचा दर 15 हजार चौ.फूट इतका आहे. यातील 15 टक्के भाग हा वाणिज्यिक पकडला तरी 67 हजार 574 फूट इतकी जागा उपलब्ध होते आणि तेथील व्यावसायिक रेट 40 हजार आहे म्हणजे त्यांना 270 कोटी रुपये मिळणार आहेत. 3 लाख 82 हजार 500 चौ.फूट इतकी निवासी जागा आहे आणि त्याचा दर 15 हजार चौ.फूट आहे. म्हणजे 573 कोटी रुपयांचा नफा होणार आहे. या विकासकाने शासकीय इमारतीच्या बांधक्‍ामासाठी 100 कोटी रुपये व झोपडपट्टीच्या पुनर्वसनाच्या सदनिका बांधण्याकरिता 200 कोटी रुपये असे एकूण 300 कोटी रुपये खर्च केले असतील तर त्या बदल्यात त्याला 540 कोटी रुपयांचा नफा होणार आहे. आपण अशाप्रकारे लूट करणार असाल तर राज्य तोट्यात जाणारच. राज्याचा तुटीचा अर्थसंकल्प येणारच. तेव्हा या सर्व प्रकरणाची चौकशी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी करावी अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

बाब क्रमांक 10, पृष्ठ क्रमांक 8 - राज्यातील विविध प्रशासकीय व विकास प्रबोधिनीकरिता निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. राज्यातील मागास भागातील जास्तीत जास्त विद्यार्थी अधिकारी व्हावेत याकरिता सदर पूरक मागणी मागितलेली आहे. या मागणीचे स्वागत केले पाहिजे हा खर्च नियोजित असल्यामुळे तो अर्थसंकल्पामध्ये दाखविणे आवश्यक होते. पण त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद न करता जाणीवपूर्वक पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केली. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विद्यार्थ्यांकरिता अशाच प्रकारचे केंद्र उभारावे व हे केंद्र मुंबईत न



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

उभारता तीन जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी सोईच्या ठिकाणी उभारावे अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 14, पृष्ठ क्रमांक 9 - स्व.वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्ष महोत्सव साजरा करण्यासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. हा खर्च योजनांतर्गत आहे. असे असताना त्यासाठीची तरतूद अर्थसंकल्पात न करण्याचे कारण मला समजलेले नाही. स्व.वसंतराव नाईक यांची जन्मशताब्दी अचानक आली नाही. आपणास त्यांची जन्मशताब्दी साजरी करायची आहे. त्यांच्या आदर्शावर आपण कारभार करीत आहोत. असे असताना स्व.वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्ष महोत्सव साजरी करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये का तरतूद करण्यात आली नाही ? हरितक्रांतिचे प्रणेते असणाऱ्या वसंतराव नाईक जन्ममहोत्सव वर्ष साजरा करण्यासाठी शासनाला नियमित अर्थसंकल्पामध्ये निधी उपलब्ध होत नाही हा स्व. वसंतराव नाईक यांचा अवमान आहे असे मी समजतो. आपणा सर्वांच्या त्यांच्याबद्दल मनापासून आदर आहे. आपण अनेकवेळा त्यांच्या कार्याबद्दल बोलतो. स्व.वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्ष महोत्सव साजरा करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये निधी देता येत नसेल तर ती अतिशय दुर्दैवी बाब आहे.

बाब क्रमांक 18, पृष्ठ क्रमांक 11 - अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी तरतूद केलेली आहे. आता निवडणुका जवळ आल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रातील स्मारकासाठी निधी मिळू लागला आहे. सन 2004 मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रात स्मारक उभारण्यात येईल अशी घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर एक निवडणूक झाली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी तरतूद करुन ठेवायची. प्रत्यक्षात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक होईल की नाही हे माहीत नाही. आम्ही तरतूद केली. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याची आमची इच्छा होती असे सांगायला सरकार मोकळे. सन 2004 पासून जवळपास 10 वेळा विधिमंडळात अर्थसंकल्प मांडण्यात आला. परंतु त्या अर्थसंकल्पामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही.

यानंतर श्री.बरवड...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

माननीय मंत्री श्री. मधुकरराव पिचड यांना सांगू इच्छितो की, आपल्या पक्षाचे सर्व नेते वारंवार यावर बोलत होते आणि आपण पक्षाचे अध्यक्ष म्हणून सर्व पाहात होता. एकाही अर्थसंकल्पात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक पूर्ण करण्यासाठी भरीव तरतूद केली नव्हती. आता आपण 3 कोटी 90 लाख रुपयांची तरतूद केली आहे. ही तरतूद आम्ही केली आहे असे दाखववायाचे आणि परत पुढची पाच वर्षे काढण्याची संधी घ्यावयाची यामध्ये कोठे तरी लोकांची फसवणूक आहे. मराठा आरक्षणाचा विषय सुध्दा तसाच आहे. आपण डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये निर्णय घेऊन समिती नेमली. त्या समितीने सहा महिन्यात काही केले नाही. पुण्याला समितीची बैठक आयोजित केली होती आणि पुण्याला जाणार म्हटल्यानंतर असे कळले की त्या समितीची मुदतच संपली. मग घाईघाईने पुण्याची बैठक पुढे ढकलली आणि नागपूरला घेतली. आपण जर गंभीर नसाल तर उगाच थोतांड मांडण्याची गरज नाही. निश्चितपणे त्याची ही दोन उदाहरणे आहेत.

सभापती महोदय, यानंतर मी नगरविकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 51 वरील बाब क्रमांक 71 बाबत बोलणार आहे. यामध्ये महानगरपालिका क्षेत्रातील मूलभूत सोयी-सुविधांच्या विकासाकरिता तरतूद करणे यासाठी पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडीकडे वसई हायवे खारबांवकडून कशेळी, दापोडाकडे जाणाऱ्या वाहनांकडून महानगरपालिकेकडून घेण्यात येत असलेले मार्गस्थ शुल्क (एस्कॉट) सदर रस्ता महानगरपालिकेच्या हद्दीत येत नसल्यामुळे बेकायदेशीरपणे वसूल करण्यात येत आहे. तो रस्ता महानगरपालिकेमध्ये येत नाही. जो मार्ग महानगरपालिकेच्या हद्दीत येतच नाही त्या मार्गावर केवळ महानगरपालिकेचा जकात नाका आहे याचा गैरफायदा घेऊन जबरदस्तीने वर दिलेल्या मार्गावरुन येणाऱ्या वाहनांवर मार्गस्थ कर लावून वसुली करणे हे कोणत्याही कायद्यात बसत नाही व हे चांगल्या महानगरपालिकेचे लक्षण नाही. त्यामुळे भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीत येत नसलेला मार्ग, वसई हायवे खारबांवकडून कशेळी, दापोडाकडे जाणाऱ्या मार्गावरुन आगमन व निर्गमन होणाऱ्या वाहनाकडून मार्गस्थ शुल्काची बेकायदेशीर वसुली होत असल्यामुळे ती त्वरित बंद करावी अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

सभापती महोदय, यानंतर मी नगरविकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 52 वरील बाब क्रमांक 72 बाबत बोलणार आहे. यामध्ये नगरपरिषदांना त्यांच्या क्षेत्रातील वैशिष्ट्यपूर्ण विकास कामांसाठी सहाय्य पुरविण्याकरिता तरतूद करणे यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. या मागणीच्या निमित्ताने मी डहाणू नगरपरिषदेच्या भ्रष्टाचाराकडे लक्ष वेधू वेधण्यासाठी मी हा विषय उपस्थित करीत आहे. डहाणू नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी घरभाडे भत्ता घेतला आणि निवासस्थानासाठी घेतलेल्या बंगल्याचे भाडे नगरपरिषदेकडून भरले. भाड्याच्या घराची दुरुस्ती नगरपरिषदेच्या पैशातून केली. नगरपरिषदेचे कर्मचारी घरकामासाठी वापरले. डहाणू नगरपरिषदेच्या सर्व निविदा मॅनेज करुन 10 टक्के अधिक दराने त्याच त्याच कंत्राटदारांना काम देण्यात आले. मी हे यासाठी मांडत आहे की, असा अधिकारी त्या ठिकाणी बसल्यानंतर बाकीचे काय होत असेल ? हा काही फार मोठा भ्रष्टाचार आहे असे नाही. पण ही प्रवृत्ती बरोबर नाही. आदिवासी वस्ती सुधारणा निधीचा वापर खाजगी जागेवर करावयाचा, नगरपरिषद हद्दीबाहेर करावयाचा, नियमबाह्य पध्दतीने करावयाचा, निविदा 10 टक्के अधिक दराने मॅनेज करावयाची, अनुसूचित जमाती क्षेत्रासाठीचे 10 टक्के अधिक नियमबाह्य पध्दतीने खर्च करावयाचे, दलित वस्ती सुधारणा निधीचा देखील गैरवापर खाजगी जागा विकसित करण्यासाठी करावयाचा, हे सर्व त्यांनी केलेले आहे. अंदाजपत्रकांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तांत्रिक मंजुरी न घेता जीवन प्राधिकरणाकडून मंजुरी घेण्यात आल्या. विद्युत विभागाच्या अंदाजपत्रकांना देखील जीवन प्राधिकरणाने परवानगी दिली. विद्युत विभाग आणि जीवन प्राधिकरणाचा काय संबंध आहे हे कळत नाही. अंदाजपत्रकामध्ये शासनाच्या गौण खनिजाचा (रॉयल्टी) अंतर्भाव करुन प्रत्यक्षात ही रक्कम शासनाच्या तिजोरीत न भरता हडप केली. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी नगराविकास खात्याने करावी अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, नगरविकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 52 वरील बाब क्रमांक 72 मध्ये नगरपरिषंदाना त्यांच्या क्षेत्रातील वैशिष्ट्यपूर्ण विकास कामासाठी सहाय्य पुरवण्याकरिता तरतूद करण्यात आली आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या एकूण 444 सफाई कामगारांसाठी सोलापूर

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. विनोद तावडे .....

महानगरपालिकेच्या बुधवार पेठ, म्युनिसिपल कॉलनी व सदर बझार म्युनिसिपल कॉलनी येथे असलेल्या निवासस्थानाची दुरावस्था झालेली असून ती सध्या पडावयास आलेली आहे. सध्या राज्य व केंद्र शासनाच्या धोरणानुसार अनुसूचित जाती जमातीच्या व्यक्तींना जागा खरेदी करणे व बांधण्यासाठी अनुदान देण्यात येते. घरबांधणी योजना हाती घेतल्यास त्यांना या सवलतीचा फायदा मिळणार आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 चे कलम 63, अनुक्रमांक 23 अन्वये महानगरपालिका कामगारांची व बदली सफाई कामगार व सर्व प्रकारच्या कामगारांसाठी घरबांधणी योजना राबविणे व परिपूर्ती योजना राबविणे यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या 444 सफाई कामगारांसाठी घरे बांधण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/ पूर्वी श्री.बरवड 15:05

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, यानंतर मी नगरविकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 51 वरील बाब क्र.71 वर माझे विचार मांडतो. मुंबईमध्ये एमएमआरडीए मार्फत मोनो रेलचे काम सुरु आहे. हे काम एल.ॲण्ड टी.कंपनीने स्क्रोनी कन्स्ट्रक्शन व जे.कुमार यांना सबलेट केलेले आहे. या मोनो रेलचे काम सुरु असताना अनेक दुर्घटना घडल्यामुळे त्यात माणसे मरण पावत आहेत. अशा दुर्घटना घडल्यानंतर माननीय मंत्री श्री.नसिम खान यांनीही अपघाताच्या ठिकाणी भेटी दिलेल्या आहेत. दुर्घटना घडल्यानंतर ती क्रेन चालविणाऱ्याला जबाबदार धरले जाते. त्या दुर्घटनेला मॅनेजर, मालक, कंत्राटदार यांना जबाबदार धरले जात नाही. एल.ॲण्ड टी.कंपनीला जबाबदार धरले जात नाही मात्र क्रेन चालविणाऱ्याला दोषी धरले जाते. अशा दुर्घटनांमध्ये आतापर्यंत 4 बळी गेलेले आहेत. अशा दुर्घटना झाल्यानंतर त्या स्क्रोनी कन्स्ट्रक्शन व जे.कुमार या कंत्राटदारांना पकडले जात नाही. परंतु छोट्या लोकांना पकडले जाते. आतापर्यंत 4 बळी जाऊनही एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांशी संगनमत झालेले आहे, त्यांच्याशी सूत जुळलेले आहे, त्यातून आर्थिक व्यवहार होतात. एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी या दुर्घटनांसाठी कोणतीच कारवाई केली नसल्यामुळे दुर्घटना होण्याच्या घटना थांबलेल्या नाहीत. परवा सुध्दा वडाळा येथे एक गर्डर पडला होता. सुदैवाने त्यात जीवितहानी झाली नाही. प्रत्येक अधिवेशनामध्ये अशा दुर्घटना होत आहेत. दिनांक 18 जुलै, 2013 रोजी एक अपघात झालेला आहे. मानवाच्या जीविताची किंमत शासनाच्या लेखी कंपन्यांवर कारवाई करण्यापेक्षा कमी आहे. या कंपन्यावर कारवाई करण्याबाबत शासन खरेच जागरुक आहे का, मजुरांचा जीव म्हणजे काहीच नाही अशी शासनाची भूमिका आहे का ? त्यामुळे शासनाने एमएमआरडीएच्या अधिका-यांवर व संबंधित कंत्राटदारांवर कठोर कारवाई करावी अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर मी विधी व न्याय विभागाच्या पृष्ठ क्र.117 वरील बाब क्र.124 वर मी बोलतो. या बाबी अंतर्गत उच्च न्यायालय, मुंबई येथील इमारतीच्या जागेत न्यायालय कक्ष निर्माण करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. माझगांव येथे सन 1997 साली न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले. गेली 16 वर्षे तेथे कोर्टाचे कामकाज चालू आहे. या न्यायालयाच्या

2.....

श्री.विनोद तावडे....

इमारतीमध्ये 5 पोलीस व 8 अन्य न्यायालये सुरु आहेत. परंतु दिनांक 18 जुलै, 2013 रोजी सायंकाळी 4 वाजता अचानकपणे या इमारतीला धोकादायक म्हणून घोषित करण्यात आले. 16 वर्षामध्ये या इमारतीला धोकादायक म्हणून घोषित करण्यात आले आहे. याबाबत मा.उच्च न्यायालयाने सदरहू इमारत धोकादायक असल्याचा निर्वाळा देत या ठिकाणी कार्यरत असलेली सर्व 13 न्यायालये अन्य ठिकाणी स्थलांतरित करण्याचे निर्देश देऊन माझगांव येथील न्यायालयाची इमारत सील केली. इमारत सील केल्यामुळे अनेकांचे ब्रिफ आत राहिले आहेत, वस्तू राहिल्या आहेत. अचानकपणे त्या दिवशी इमारतीला सील लावल्यामुळे वकील मंडळी हवालदिल झालेली आहेत. ब्रिफ आत असल्यामुळे ते वाचण्यासाठी उपलब्ध होऊ न शकल्यामुळे अनेक प्रकरणांमध्ये आता केवळ तारखा दिल्या जातात. अवघ्या सोळा वर्षाच्या अल्पमुदतीत माझगांव येथील न्यायायालयाची इमारत धोकादायक कशी झाली असा मला शासनाला प्रश्न विचारावयाचा आहे. सद्य:स्थितीत 5 पोलीस न्यायालये शिवडी येथे स्थलांतरित करण्यात आली आहेत. उर्वरित 8 न्यायालये इतरत्र स्थलांतरित करण्याची कार्यवाही सुरु आहे, झालेली नाहीत. ज्या ठिकाणी ही न्यायालये स्थलांतरित केली आहेत त्या ठिकाणी पुरेशा सुविधा नाहीत. तेथे जेवढे कर्मचारी आहेत त्यात आणखी कर्मचारी ठोसले तर काय होणार ? आपण नेहमी असे म्हणतो की, न्यायालयात लवकर न्याय मिळत नाही. कोर्टांची संख्या कमी आहे, जी न्यायालये आहेत त्यांची अशी अवस्था आहे. 13 न्यायालयाचं काम पूर्ववत सुरु होण्याच्या दृष्टीने शासनाने योग्य ती कार्यवाही करावी अशी मी मागणी करतो. माझगांव येथील न्यायालयाची इमारत धोकादायक घोषित केलेली आहे. त्या इमारतीच्या बांधकामामध्ये भ्रष्टाचार झाला होता काय याची शासनाने चौकशी करावी अशी मी मागणी करतो.

यानंतर मी आदिवासी विकास विभागाच्या पृष्ठ क्र.185 वरील बाब क्र.190 वर बोलतो. या मागणीद्वारे या विभागातील कर्मचाऱ्यांना देशांतर्गत प्रवास खर्चासाठी तरतूद करण्यात आली आहे. जिल्हा ठाणे येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू या कार्यालयात सहाय्यक प्रकल्प अधिकारी म्हणून काम पाहणारे श्री.हळपे यांच्याकडे प्रकल्प कार्यालयाची जबाबदारी देण्यात आली.

3.....

श्री.विनोद तावडे....

प्रभारी प्रकल्प अधिकारी म्हणून काम करीत असताना श्री.हळपे यांनी सुमारे 17 कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला. गैरव्यवहाराची बातमी प्रसिध्द झाल्यानंतर प्रकल्प अधिकारी एकात्मिक विकास प्रकल्प डहाणू कार्यालयाची चौकशी करण्यात आली. चौकशी अहवालात 17 कोटी रुपयांची अफरातफर झाल्याचे नमूद करण्यात येऊन सदर अहवाल शासनाला सादर करण्यात आला आहे. या चौकशी समितीने तपशीलवार 50 पानांचा अहवाल तयार करुन त्यात झालेल्या अनियमितता अतिशय गंभीर असून अधिक खोलवर विस्तृतपणे उच्च दर्जाच्या आणि अधिक अधिकार असलेल्या अधिकाऱ्यांकडून चौकशी होणे अपेक्षित आहे, असे शासनाला स्पष्टपणे कळविले आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ D/ 15:10

श्री. विनोद तावडे...

एकूण गैरव्यवहाराच्या प्रकरणात हळपे यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. तो गुन्हा आर्थिक गुन्हा शाखेकडे वर्ग झाला. परंतु सहायक प्रकल्प अधिकारी आर.एन.हळपे यांना पोलिसांनी अटक केली नाही. आदिवासी विकास विभागाने कोणताही फॉलो अप केला नाही. या दरम्यान आदिवासी विकास विभागाच्या वरिष्ठ अधिका-यांशी सलोखा करुन आर.एन.हळपे पुन्हा आदिवासी विकास विभागात कार्यरत झाले.या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन हळपे यांच्यासह त्यांना संरक्षण देणा-या मंत्रालयातील अधिका-यांवर तातडीने कारवाई करावी अशी आमची आदिवासी विकास मंत्री महोदयांकडे मागणी आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बाब क्रमांक 156, पृष्ठ क्रमांक 142. गडचिरोली जिल्हयात ओ.बी.सी.ची लोकसंख्या जिल्ह्यातील आदिवासी जातीच्या बरोबरीने आहे. दिनांक 23 मार्च 1994च्या शासन निर्णयानुसार गडचिरोली जिल्ह्याकरिता ओ.बी.सी.च्या वर्ग 3 व 4 च्या नोकर भरतीकरिता 19 टक्के आरक्षण होते व नंतर 1 सप्टेंबर 1997 रोजी 8 टक्के व त्यानंतर 25 सप्टेंबर 2002ला 5 टक्के असे एकूण 13 टक्के आरक्षण कमी केले. जिल्हयात अनुसूचित जमातीची लोकसंख्या 38 टक्के असून त्यांना 24 टक्के आरक्षण आहे. अनुसूचित जातीची लोकसंख्या 12 टक्के आहे व त्यांना 12 टक्के आरक्षण आहे. विमुक्त जाती व जमातीची लोकसंख्या 3 टक्के आहे आणि त्यांना 8 टक्के आरक्षण आहे. आता हे आक्षण 6 टक्क्यावर आणलेले आहे. यामुळे जिल्हयातील ओ.बी.सी.वर फार मोठा अन्याय झालेला आहे. तरी गडचिरोली जिल्ह्यातील इतर मगासवर्ग समाजावर होणारा अन्याय दूर करावा अशी मी मागणी करीत आहे. त्यांना न्याय मिळेल अशी मी अशा व्यक्त करतो.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बाब क्रमांक 155, पृष्ठ क्रमांक 142. विनयभंगाच्या गुन्ह्याखाली 4 दिवस अटकेत असलेले रमेश कदम हे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे अध्यक्ष आहेत. त्यांना मदत करणा-या मंत्र्यांना घरी बसविण्यात आले. आता रमेश कदम यानाही घरी बसवा. याबाबतीत मंत्री महोदयांनी ढोबळमानाने निर्णय न करता ठोस निर्णय करावा. जे मंत्री महोदय घरी गेले त्यांनी जाताना बंगल्यातील ए.सी., टयूब लाईट नेल्या. काय लूट चालली आहे ! लाज वाटते. एखादा मंत्री त्या पदावरुन गेल्यानंतर त्यांनी बंगल्यातील

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

एसी, पंखे सगळे काही घेऊन जायचे ? कार्यकर्त्यांनी चुकून नेले.. साफसफाई करताना अधिका-यांनी काढले. त्यांच्या आशीर्वादाने असणारे रमेश कदम तेथे आले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने जिल्हाधिकारी यांचेमार्फत ड्रॉ पध्दतीने कर्ज मंजुरीचे नियम केलेले असताना अध्यक्ष रमेश कदम व प्रभारी व्यवस्थापकीय संचालक श्री संतोष इंगळे यांनी जवळपास 500 लाभार्थ्यांना थेट कर्ज मंजूर करुन नियमाची पायमल्ली केली आहे. त्यांच्या विषयी तक्रार करायला गेलो तर पक्षाचे सर्वोच्च नेते सांगतात की, तो त्यांचा माणूस आहे, तुम्ही त्यांना भेटा, त्यांनी सांगितले तर होऊन जाईल. अशी भाषा हल्ली सुरु आहे.

सभापती महोदय, मागील वर्षी महामंडळाच्या सर्व कार्यालयासाठी बायोमॅट्रीक मशिन खरेदी केलेली असताना पुन्हा या वर्षी बायोमॅट्रीक मशिन खरेदी केवळ कमिशन मिळविण्यासाठी केली आहे. जी व्यक्ती चार दिवस जेलमध्ये जाऊन आलेली आहे अशा व्यक्तीला आपण महामंडळाचा अध्यक्ष केल्यानंतर राजकीय व्यवस्थेवरील लोकांचा विश्वास वाढेल की कमी होईल ? या व्यक्तीने केलेला गुन्हा हा विनयभंगाचा आहे.

सभापती महोदय, महामंडळाकडे गेल्या दोन वर्षापूर्वी खरेदी केलेले संगणक, झेरॉक्स मशिन सुस्थितीत असताना पुन्हा लाखो रुपयांचे संगणक व झेरॉक्स मशिन, महागडी चारचाकी वाहने खरेदी करण्यात आली. या खरेदी व्यवहाराची चौकशी केली पाहिजे. शासनाच्या कुठल्याही मान्यतेशिवाय, जाहिरात न देता जी अनधिकृत नोकर भरती केलेली आहे ती तत्काळ रद्द करुन शासनाच्या नियमाप्रमाो नोकर भरती करुन या समाजाला न्याय द्यावा अशी मी मागणी करतो.

सामाजिक न्याय विभाग, बाब क्रमांक 158, पृष्ठ क्रमांक 144. राज्य शासनाचे उपक्रम असलेल्या महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ हे म्हाडाच्या वांद्रे येथील कार्यालयात कार्यान्वित असून या महामंडळाचा कारभार ओबीसी महामंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मदतीने चालविला जातो. तसेच महामंडळाची जिल्हास्तरावर देखील कार्यालये नाहीत. यावरुन हे शासन अपंग व्यक्तीच्या प्रती किती संवेदनशील आहे हे दिसून येते. महाराष्ट्र अपंग वित्त व विकास महामंडळ आपण अपंगासाठी सुरु केले. या महामंडळाला स्वत:चा वेगळा कर्मचारी वर्ग नाही. ओबीसी महामंडळातील कर्मचारी म्हणतात की हे आमचे काम नाही. या कर्मचारी वर्गाकडे कामाचा अधिकचा भार असल्यामुळे ते अपंगांची कामे तितक्या आस्थेने करीत नाहीत हे वास्तव आहे. राज्य

..3..



MSS/ ST/ D/ 15:10

श्री. विनोद तावडे....

शासनाने 30 ऑक्टोबर 2010 अणि 15 ऑगस्ट 2011 रोजी शासन निर्णय काढून त्याद्वारे अपंगासाठीच्या विविध कल्याणकारी योजनांसाठी 3 टक्के निधी राखून ठेवण्याचे नमूद केले आहे. परंतु उक्त 2 शासन निर्णयान्वये राज्य शासनाने यंदाच्या अर्थसंकल्पात अथवा महानगरपालिका/नगरपालिकांनी आपापल्या अंदजपत्रकात अशा प्रकारची कोणतीही तरतूद केलेली नाही. अपंगासाठी केंद्र शासनाची एडीआयपी योजना एनजीओमार्फत राबविली जाते. या योजनेचे लेखापरीक्षण होत नसल्यामुळे त्यात पुरविण्यात येणा-या वस्तू दुय्यम व निकृष्ट दर्जाचा आहेत.

...नंतर श्री. गिते....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, अपंगांसाठी केंद्र शासनाची एडीआयपी योजना एनजीओमार्फत राबविली जाते. या योजनेचे लेखापरीक्षण होत नसल्याने त्यात पुरविण्यात येणाऱ्या वस्तू या दुय्यम व निकृष्ट दर्जाच्या आहेत. अपंग लाभार्थ्यांसाठी एडीआयपी योजनचा लाभ घेण्यासाठी मासिक उत्पन्न मर्यादा ठरवून दिलेली आहे, त्यात मोठ्या प्रमाणात वाढ करणे गरजेचे आहे. सभापती महोदय, अपंगाचा विकास, कल्याण होईल या हेतूने केंद्र शासनाने तसेच उत्तरप्रदेश, तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि गोवा या राज्यांनी अपंगासाठी स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना केली आहे.

सभापती महोदय, सध्या राज्यात अपंगांची टक्केवारी 2 टक्के इतकी आहे तसेच ज्येष्ठ नागरिकांची टक्केवारी 11 टक्के इतकी आहे, हे दोन्ही विषय एकत्रित करुन त्यांच्याकरिता उक्त राज्यांच्या धर्तीवर एक स्वतंत्र मंत्रालय स्थापन केल्यास राज्यातील अपंग व्यक्ती तसेच ज्येष्ठ नागरिकांचे खऱ्या अर्थाने कल्याण होईल. अशा प्रकारचे स्वतंत्र मंत्रालय स्थापन करुन त्यांच्यासाठी कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन देण्याचा शासनाने प्रयत्न करावा अशी या निमित्ताने माझी मागणी आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची बाब क्रमांक 157, पृष्ठ क्रमांक 143-माननीय उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्रमांक 182/2010 यामध्ये दिलेल्या निर्णयाव्दारे हस्तांतरित करण्यात आलेल्या बालगृहांसाठी तरतूर करण्यात आलेली आहे. या बाबतीत मी माझे विचार व्यक्त करणार आहे.

सभापती महोदय, या बाबींतर्गत बालगृहाकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. बालगृहांसाठी ही तरतूद होत असताना बालगृहांच्या वाटपाबाबत अनेक तक्रारी माझ्याकडे प्राप्त झाल्या आहेत. या प्रकरण फसवणूक झालेल्या काही संस्था चालकांनी तर थेट ॲफीडेव्हिट करुन माझ्याकडे तक्रार केली आहे. मी ते ॲफीडेविट आपल्या मार्फत माननीय मंत्री महोदयांकडे पाठवितो.

सभापती महोदय, 2007 नंतरच्या महिला व बालविकास विभागाच्या कारभारात तसेच वर्ष 2008 मध्ये या विभागाने केलेल्या बालगृहांच्या वाटपात तत्कालीन मंत्र्यांपासून विभागीय अधिकारी, कर्मचारी व कारकून यांनी लाच घेतली ही बाब श्री.बाबुराव रामभाऊ गिरी, अध्यक्ष,जय माता दि संस्था, टाकळी खंडेश्वरी, ता.कर्जत, जिल्हा अहमदनगर यांनी दिनांक 4 जून,2013 रोजीच्या प्रतिज्ञापत्राव्दारेनमूद केली.

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, सन 2008 मध्ये सुमारे 574 संस्थांच्या बालगृह मान्यतेचे प्रस्ताव मंजूर करताना तत्कालीन महिला व बालविकास मंत्री यांच्यासह विभागातील सर्व सचिव, अधिकारी, शिपाई यांनी कशाप्रकारे व किती लाच घेतली आणि या सर्व लोकांचे लाच संकलन करण्याचे काम महिला व बालविकास विभागातील तत्कालीन अधिकाऱ्यांनी कशाप्रकारे केले याबाबतची सविस्तर माहिती सदर प्रतिज्ञापत्रात नमूद केलेली आहे.

महोदय, या 574 संस्थांच्या बालगृहांच्या मान्यते प्रकरणीचा निकाल 2010 मध्ये माननीय उच्च न्यायालयात लागल्यानंतर पुणे येथील महिला व बालविकास आयुक्तालयाचे आयुक्त श्री.बाजीराव जाधव यांनी मुलाखती घेवून प्रत्येक प्रकरणामागे 3 लाख रुपयांची लाच घेऊन कशाप्रकारे मान्यता दिली याबाबतचे स्पष्टीकरण देखील सदर प्रतिज्ञापत्रात आहे.

त्याचप्रमाणे या प्रतिज्ञापत्रात महिला व बालविकास विभागाच्या अहमदनगर जिल्हयाच्या कार्यालयाने सन 2007 मध्ये हरी ओम बालगृह संस्थेस बालगृहाची मान्यता देताना कशाप्रकारे दमदाटी करुन लाच घेण्याचा व अखेर लाच न दिल्याने सदर संस्थेस मंजूर केलेल्या बालगृहाची परवानगी कशी रद्द केली याबाबतची सविस्तर माहिती सदर प्रतिज्ञापत्रात नमूद केलेली आहे.

महोदय, गरीब, भटक्या, विमुक्त जातीतील मुलांसाठी चालविण्यात येणाऱ्या सदर हरी ओम बालगृह संस्थेने मंजूर अनुदानासाठी दीड लाखाचे कमीशन न दिल्या प्रकारणी जिल्हा महिला बालविकास अधिकारी श्री.पगारे तसेच परिविक्षा अधिकारी श्रीमती पठाण यांनी श्री.गिरी यांचा कशाप्रकारे छळ करुन त्यांची जबरदस्तीने विकण्यास काढल्याची बाबही त्याममध्ये नमूद करण्यात आली आहे.

सभापती महोदय, या गंभीर प्रकरणाची तातडीने दखल घेऊन महिला व बालविकास विभागातील कारभाराची विशेष करुन बालगृहांच्या वाटपातील प्रक्रियेची केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी करुन यात गुंतलेले सर्व दोषी व्यक्ती विशेष करुन संबंधित मंत्री, आयुक्त व इतर सहकारी यांचेवर कठोर कारवाई करुन अहमदनगर जिल्हयातील हरी ओम बालगृह संस्थेची मान्यता मनमानीपणे रद्द करणाऱ्या महिला व बालविकास विभागातील आजी-माजी कर्मचारी व अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी मी करीत आहे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाची बाब क्रमांक 179, पृष्ठ क्रमांक 169- यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करण्यासाठीचा खर्च भागविण्याकरिता अतिरिक्त तरतूद करणे या संदर्भात मी बोलणार आहे.

महोदय, महाराष्ट्र राज्यात गतवर्षामध्ये नॅशनल क्राईम रेकॉर्डस् ब्युरो यांचेकडून प्राप्त झ ाले आहे. त्या माहितीनुसार एकूण 45,247 अपघाताची नोंद झाली. त्यामध्ये 13,936 नागरिकांचा मृत्यू झाल्याची नोंद दिसून येते. यामधील 13,333 लोकांना मृत्यू व 43,847 लोक जखमी हे फक्त राज्य महामार्गावर झाल्याचे दिसून येतात.

तथापि सदरच्या अपघातामध्ये फक्त NH17 ज्यास आपण मुंबई-गोवा महामार्ग संबोधतो यावर गत सहा महिन्यात सुमारे 200 जणांचा मृत्यू व 380 लोक जखमी झाले आहेत. तसेच गत 5 वर्षात एकूण सदरचे महामार्गावर मृत झालेल्या सन 2008 ते मे, 2013 पर्यंत सिंधुदुर्गामध्ये 221, रायगडमध्ये 751 व रत्नागिरी जिल्हयामध्ये 450 असे एकूण 1422 व्यक्तींचे मृत्यू फक्त या महामार्गावर झाले आहेत.

परंतु या 1422 व्यक्तींपैकी फक्त जगबुडीच्या दुर्घटनेत मयत झालेल्या प्रवाशांव्यतिरिक्त अद्यापपर्यंत एकाही मृत अथवा जखमी झालेल्या व्यक्तींना अनुदान दिलेले नाही. या अपघातांमध्ये मृत व जखमी झालेल्या व्यक्तींना क्षतीपूर्ती योजनेमधून सुध्दा अनुदान दिलेले नाही. दिनांक 13 जुलै, 2013 रोजी याच महामार्गवरील महाड येथे झालेल्या टकरीत 4 जण ठार झाल्याची घटना घडली. या बाबतीत शासन गंभीर विचार करणार आहे काय ?

महोदय, सदरच्या महामार्गवर रत्नागिरी, मुंबई, गोवा येथे फक्त ट्रॉमा केअर सेंटर आहेत. अन्य कोणत्याही ठिकाणी ट्रॉमा सेंटर अत्यंत दूरवरील अंतरावर आहेत. अधिवेशन काळात अपघात झाला की, ट्रॉमा सेंटर्सची घोषणा होते. अधिवेशन संपले की, ट्रॉमा सेटरच्या घोषणेचा शासनाला विसर पडतो.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

त्यामुळे या ठिकाणी ट्रॉमा केअर युनिट नसल्यामुळे अपघातग्रस्तांना तातडीने वैद्यकीय मदत मिळत नाही. त्यामुळे अपघातातील रुग्णांच्या जीविताचा प्रश्न निर्माण होतो. इंदापूर, माणगाव, खेड, चिपळूण आणि पाली येथे ट्रॉमा केअर युनिट निर्माण केले तर अपघातामध्ये त्या त्यावेळी उपयोग होईल. त्या अर्थाने मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांना एवढेच सांगू इच्छितो की, सुरुवातीला आग्रहाने सांगण्यात आले होते की, 184 कोटी रुपयांचा शिल्लकी अर्थसंकल्प सादर केला आहे. 8060 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्यांमध्ये योजनांतर्गत 3207 कोटींची तरतूद केली आहे. याचा अर्थ माननीय वित्तमंत्री श्री.अजित पवार यांनी सादर केलेला अर्थसंकल्प किती तुटीचा होता हे त्यांच्या चाणाक्ष नजरेला आलेले असावे. परंतु माननीय मुख्यमंत्री हतबल आहेत. त्याबद्दल आतापर्यंत काही बोलले नाहीत, आज तरी त्यांनी काही भाष्य करावे अशी अपेक्षा करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2013-14 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभाग, बाब क्र.60, पृष्ठ क्र.44. माननीय शालेय शिक्षणमंत्री अतिशय देखणे आहेत. शिक्षकाच्या विषयी माझ्या मनामध्ये चांगुलपणाची भावना आहे. असंख्य शिक्षकांना बीड जिल्हयामध्ये नगरपालिका, जिल्हा परिषद, विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणूक प्रचारामध्ये गुंतविले जाते. संस्था चालकांची पोस्टर्स चिकटविण्याची जबाबदारी शिक्षकांना स्वीकारावी लागते. बीड जिल्हयात आदर्श शिक्षण संस्था आणि नोबल शिक्षण संस्था या दोन शिक्षण संस्था आहेत. या शिक्षण संस्थांमधील सर्व शिक्षकांचे आर्थिक शोषण करण्याची, निवडणुकीच्या दरम्यान मानसिक शोषण करण्याचा वेगळा प्रकार बीड जिल्हयामध्ये सुरु झालेला आहे.

सभापती महोदय, सभागृहात माझ्या शेजारी माननीय सदस्य श्री.एम.एम.शेख बसतात. ते सुध्दा संस्थाचालक आहेत. त्यांच्या संस्थेत 500 शिक्षक काम करतात. परंतु त्यांनी कोणत्याही शिक्षकाचे शोषण केलेले नाही. माननीय सदस्य श्री.विक्रम काळे हे सुध्दा शिक्षकांचे संस्था चालक आहेत. त्यांनी कधी कोणाचे शोषण केलेले नाही. परंतु बीड जिल्हयामध्ये अनिष्ट प्रथा सुरु झाली आहे. देखण्या शिक्षणमंत्र्यांना माझी विनंती आहे की, माझ्यासारख्या गांधीवादी कार्यकर्त्याची चिंता त्यांनी दूर करण्याचा प्रयत्न केला तर निश्चितपणे शिक्षकांची प्रतिष्ठा अबाधित राहू शकते.

सभापती महोदय, बाब क्र.227, पृष्ठ क्र.216. बीड शहर बिंदुसरा नदीमुळे पूर्व आणि पश्चिम असे दोन भागामध्ये विभागले गेले आहे. आदरणीय मुख्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. बीड नगरपालिकेचा कारभार म्हणजे आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय असा चाललेला आहे. अतिशय अनागोंदी कारभार सुरु आहे.

नंतर 2आर.1...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

मला पर्यावरण संबंधी चिंता वाटते. बिंदुसरा नदीच्या पात्रात एक कि.मी.चा रस्ता विशिष्ट लोकांच्या प्लॉटींगला दळणवळणाची सोय व्हावी म्हणून केलेला आहे. हा गंभीर गुन्हा आहे. त्यांनी नदीचे पात्र अडविले आहे. त्यांनी नदीवर अतिक्रमण केले आहे. हे सर्व निसर्गाच्या विरोधात आहे. हे अनैसर्गिक कृत्य नगरपालिकेकडून घडले असेल तर तेथील सीओंना जबाबदार धरून त्यांच्या विरूद्ध कारवाई केली पाहिजे. यासंबंधी आम्ही पर्यावरण विभागाकडे अनेक तक्रारी केल्या आहेत. पर्यावरण विभाग वामकुक्षीमध्ये आहे की काय हेच मला कळत नाही. हे खाते कोणाकडे असू द्यावे. शेवटी, लोकांना न्याय हा मिळालाच पाहिजे.

यानंतर मी पाणी पुरवठा विभागाच्या पान क्रमांक 211 वरील बाब क्रमांक 221 वर बोलणार आहे. बीड जिल्हा परिषदेमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी पुरवठा योजना अर्धवट स्थितीमध्ये आहेत. यात गुत्तेदार आणि अधिकाऱ्यांचे संगनमत आहे. मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार आहे. भ्रष्टाचार केल्यामुळे काही सरपंच जेलची हवा खाऊन आलेले आहेत. अशा स्थितीमध्ये शासनाने अधिकारी आणि पदाधिकारी यांच्या मार्फत पाणी पुरवठा योजनांचा बट्ट्याबोळ लावला आहे. त्यामुळे त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. ती राज्य शासनाने करावी अशा प्रकारची आग्रहाची विनंती मी करणार आहे. ज्या पाणी पुरवठा योजना होतात त्याला कायम स्वरूपी स्रोत असणे आवश्यक आहे. या योजना पुढील 12-13 वर्ष म्हणजे एक तप राहणार आहेत. मधल्या काळामध्ये या योजनेला निधी मिळणार नाही. अशा स्थितीमध्ये योजनांचे परिपोषण उत्तम प्रकारे होण्याच्या दृष्टीने शासनाने लक्ष देऊन त्या कार्यान्वित करण्याचा प्रयत्न करावा एवढी आग्रहाची विनंती करतो आणि थांबतो.

......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, बीड नगरपालिकेसंबंधीचा उल्लेख सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी केला आहे. मी सर्वांच्या माहितीसाठी सांगतो की, बीड नगरपालिकेत 99 टक्के एकाच पक्षाची सत्ता आहे. येथे एकच सदस्य चुकून 200 मतांनी निवडून आलेला आहे.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी पान क्रमांक 6 वरील बाब क्रमांक 4 वर बोलणार आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने मतदार यादीच्या पुनर्रचनेचे काम करण्यासाठी सभागृहा समोर पुरवणी मागणी करण्यात आली आहे.

या राज्यात मतदार यादीचे जेव्हा जेव्हा काम सुरू होते तेव्हा तेव्हा आमचे शिक्षक मतदार यादीचे काम करीत असतात. हे काम करीत असताना त्यांना जे मानधन दिले जाते ते चार ते पाच वर्षे मिळत नाही. आता सभागृहात माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. त्यांना माझी विनंती आहे की, हे अधिवेशन संपण्याच्या आधी त्वरित आदेश काढून निवडणुकीसाठी महत्त्वाचे काम करणारे जे आमचे शिक्षक बांधव आहेत त्यांना त्यांचे मानधन त्वरित अदा केले गेले पाहिजे. त्यासंबंधीच्या तातडीच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या पाहिजेत अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, 1 जुलै रोजी हरित क्रांतीचे प्रणेते स्व.वसंतराव नाईक यांचा जन्मशताब्दी सोहळा अतिशय उत्साहामध्ये पार पडला. या कार्यक्रमाला देशाचे माननीय राष्ट्रपती महोदय देखील उपस्थित होते. यासाठी सरकारने 100 कोटी रूपयांची तरतूद देखील केली आहे. एवढेच नव्हे तर आमच्या मराठवाड्यामध्ये माझ्या मतदार संघामध्ये परभणी येथे कृषी विद्यापीठ आहे त्याला श्री.वसंतराव नाईक यांचे नाव देण्याचा निर्णय सुद्धा या जन्मशताब्दी सोहळ्याच्या निमित्ताने राज्य सरकारने घेतलेला आहे. त्या बद्दल मी माननीय मुख्यमंत्री महोदय, माननीय उप मुख्यमंत्री महोदय व मंत्रिमंडळाचे आभार मानतो. आपण येथे जी काही तरतूद केली आहे त्यानुसार ग्रामीण भागातील नव्या तरूण पिढीला स्व.वसंतराव नाईक कोण होते हे देखील कळले पाहिजे. यादृष्टीने त्यांच्या जीवनावर चित्रफित तयार करावी. ती केली नसल्यास तयार करावी. त्यामुळे या विषयाकडे देखील आपण लक्ष घातले पाहिजे. श्री.यशवंतराव चव्हाण व श्री.वसंतराव नाईक ही दोन मोठी व्यक्तिमत्त्वे होती. या दोघांनी या राज्याला खूप काही दिले आहे. त्यामुळे त्यांच्यावर चांगला चित्रपट तयार करून तो ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दाखविण्याचे काम सुद्धा आपण केले पाहिजे अशी मागणी मी या माध्यमातून करीत आहे.

..4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ ST/ प्रथम श्री.सतिश 15:30

श्री.विक्रम काळे....

यानंतर मी बाब पान क्रमांक 11 वरील बाब क्रमांक 18 वर बोलणार आहे. अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभे करण्यासाठी निधीची मागणी ठेवण्यात आली आहे. हे स्मारक झाले पाहिजे यासाठी या सभागृहामध्ये सातत्याने आवाज उठविला. त्याला आता कुठे तरी चालना मिळत आहे. हे स्मारक आमच्या पिढीच्या काळातच निश्चितपणे उभे राहणार आहे हे ही निश्चित झाले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी मागच्या अधिवेशनात सभागृहाला अवगत केले होते की,केंद्रीय पर्यावरण मंत्री येणार आहेत. त्यांना घेऊन आम्ही जागा दाखविणार आहोत. मला वाटते की, ही सर्व प्रक्रिया पार पाडलेली दिसते. तेव्हा स्मारका संबंधातील जागा निश्चिती झाली काय, झ ाली असल्यास त्यासंबंधी देखील सभागृहाला व राज्यातील जनतेला अवगत केले पाहिजे. जागा निश्चित झाली असेल तर प्रत्यक्षपणाने कामासंबंधातील पुढील कार्यवाही काय होणार आहे याची ठोस माहिती देखील सभागृहाला दिली पाहिजे.

यानंतर मी पान क्रमांक 120 वरील बाब क्रमांक 132 वर बोलणार आहे. धर्मादाय आयुक्त यांच्या पद निर्मितीसाठी मागणी करण्यात आली आहे. या पुरवणी मागणीच्या माध्यमातून मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करणार आहे. आज या राज्यामध्ये 90 टक्के विद्यार्थ्यांना खाजगी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षण देण्याचे काम होत आहे हे देखील मी येथे अधोरेखित करीत आहे. या राज्यातील शिक्षण संस्था चालकांनी पुढाकार घेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम केले आहे. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांचा जन्म मुंबईत झाला असेल. येथे बसलेले सन्माननीय सदस्य हे ग्रामीण भागात शिकलेले आहेत. आम्ही जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिकलो आहोत. पुढे जाऊन आम्ही खाजगी शाळेमध्ये शिकलो आहोत. अशा प्रकारे एक मोठे काम खाजगी शिक्षण संस्थांनी केलेले आहे.

आज एखाद्या संस्थेमध्ये वाद होतो. तो वाद चॅरिटी कमिशनरकडे प्रलंबित असतो. हा वाद दहा वर्षे मिटत नाही. त्यावर धर्मादाय आयुक्तांकडून निकाल दिला जात नाही. त्यामुळेच माझी मंत्री महोदयांकडे मागणी आहे की, कायद्यामध्ये कुठे तरी बदल करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. सहकार विभागामध्ये अशी तरतूद आहे की, एखाद्या संस्थेमध्ये निवडणूक झाली आणि बहुमताने बॉडी निवडून आली की त्या बॉडीला अधिकार प्रदान होतात. तशीच पद्धत शिक्षण संस्थेमध्ये ठेवावी. शिक्षण संस्थेमध्ये एखादी बॉडी बहुमताने निवडून आली तर त्यांना देखील अधिकार मिळाला पाहिजे. त्यादृष्टीने तातडीने पावले उचलून बदल केला पाहिजे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

आता मी शेवटच्या बाबीकडे येणार आहे. शिक्षण विभागाकडून मागणी करण्यात आली आहे. दोन्ही शिक्षण मंत्री चांगले काम करीत असल्यामुळे आम्हाला त्याचा मनापासून आंनद आहे. पण तरी देखील बरेचसे प्रश्न प्रलंबित आहेत. त्यामुळे आमच्या मनामध्ये खंत आहे. आपण शिक्षण विभागातर्फे मागणी केलेली आहे त्याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. कायम विना अनुदानावर आलेल्या शाळा 56 आहेत, 214 प्राथमिक शाळा आहेत. दरवर्षी प्राथमिक, माध्यमिकच्या तुकड्या अनुदानावर येतात. तेथील कर्मचाऱ्यांना कुठल्याही प्रकारचे वेतन देण्याची तरतूद केलेली नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. कायम विना अनुदान शाळा अनुदानास पात्र होऊन जवळपास वर्ष झालेले आहे. याच सभागृहामध्ये माननीय मंत्री महोदयांनी जाहीर केलेले आहे की, त्यांच्यासाठी आम्ही तरतूद केलेली आहे. जो पर्यंत आर्थिक तरतूद होत नाही तो पर्यंत वेतन सुरू होत नाही.

यानंतर पान क्र.TT-1 श्री.अजित यांच्याकडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

तेव्हा या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी ठोस निर्णय घ्यावा अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, मूल्यांकनाचा एक टप्पा झाला परंतु त्याचा दुसरा टप्पा केव्हा होणार आहे याबाबत अनेकांच्या मनात शंका आहेत. तेव्हा माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मूल्यांकनाचा दुसरा टप्पा केव्हा सुरु होणार आहे हे सांगावे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, प्राध्यापकांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्यासाठी 709 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे त्याबद्दल मी सरकारचे जाहीर अभिनंदन करतो.परंतु प्राध्यापकांचा सन 1991 ते 2000 चा प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी निर्णय घेण्याची गरज आहे. त्या संदर्भात पुनर्विचार करावा अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, शासकीय कला महाविद्यालयासाठी मागणी केलेली आहे. राज्यामध्ये फक्त 15 कला महाविद्यालये आहेत. या कला विद्यालयाच्या माध्यमातून चांगल्या दर्जाचे कलाकार घडविले जात आहेत. या कला महाविद्यालयांना 90 टक्के अनुदान दिले जाते. कला विद्यालयांना 100 टक्के अनुदान द्यावे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, अल्पसंख्याक विकास विभागाचे मंत्री अतिशय कर्तबगार आहेत. अल्पसंख्याक शाळांना भौतिक सुविधांसाठी दोन लाख रुपये देण्यात येतात. आपण ही चांगली योजना आखली आहे. परंतु जिल्हाधिकाऱ्यांमार्फत जे प्रस्ताव पाठविले जातात त्यामध्ये पारदर्शकता असणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी पैशाची देवाण घेवाण होते. जे पैसे देतात त्यांचे प्रस्ताव पुढे पाठविले जातात. जे पैसे देत नाहीत त्यांचे प्रस्ताव पाठविले जात नाहीत. तेव्हा या प्रकरणी चौकशी केली पाहिजे. ते अनुदान सर्वांना कसे मिळेल हे पाहिले पाहिजे. तसेच या अनुदानात वाढ केली पाहिजे. आपण मला बोलण्यासाठी अधिक वेळ दिला त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

--------

..2.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

बाब क्रमांक -1 पृष्ठ क्रमांक 5 - विधी व न्याय विभाग - माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे विधी व न्याय विभाग आहे. या राज्यात झालेले कायदे उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात रद्द होतात ही आपणा सर्वांना लाजविणारी बाब आहे.

सभापती महोदय, या विधिमंडळाने डान्सबार बंदीचा कायदा केला होता. या कायद्याच्या विरोधात श्री.शेट्टी हे सर्वोच्च न्यायालयात गेले होते. सर्वोच्च न्यायालयाने आपण केलेला कायदा रद्द केला. श्री.शेट्टी यांनी सांगितले की या कायद्याचा मसुदा आम्ही बनविला होता. आपण विधिमंडळात कायदे बनवितो त्याचा मसुदा बाहेरील व्यक्ती बनवित असेल तर ते योग्य नाही आणि श्री.शेट्टी यांची असे बोलण्याची हिम्मत कशी होते ?

सभापती महोदय, आम्ही राज्य शासनाच्या विरोधात अनेकवेळा उच्च न्यायालयात गेलो परंतु आम्हाला अपयश आले. राज्य शासनाने रायगड जिल्हा परिषदेसाठी सिम्पल मेजॉरीटीने अविश्वास ठराव आणण्याचा प्रस्ताव आणला होता. आम्ही त्या विरोधात उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात गेलो. परंतु आम्हाला तेथे यश आले नाही. राज्य शासन जे ठरविते तेच फायनल असते अशी परिस्थिती राज्यामध्ये होती. परंतु आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. तेव्हा माननीय मुख्यमंत्री महोदयांनी विधी व न्याय विभागाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, सहकारी संस्था विधेयक हे संयुक्त समितीकडे पाठविलेले आहे. मी त्या समितीवर सदस्य आहे. मी समितीच्या बैठकांना फक्त दोन वेळा अनुपस्थित होतो. या कायद्याच्या संदर्भात विधी व न्याय विभागाने सदस्यांना माहिती द्यायला पाहिजे. परंतु आम्हाला माहिती दिली जात नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बरवड.....

श्री. जयंत प्र. पाटील .....

त्या ठिकाणी आपल्या सारखी ॲडव्होकट माणसेच पाहिजेत. परंतु आम्ही त्या ठिकाणी अनुभवातून बोलत होतो. विधी खात्याकडे गांभीर्याने बघण्याची वेळ राज्य शासनावर आलेली आहे.

सभापती महोदय, याच बाबीवर बोलताना मी दुसरा मुद्दा मांडू इच्छितो. ज्या मतदार याद्या होत आहेत त्या पारदर्शक होत नाहीत. गेल्या महिन्यामध्ये ग्रामपंचायतींच्या निवडणुका झाल्या. रोहा तालुक्यामध्ये भातसई ग्रामपंचायतीची निवडणूक झाली. श्री. नामदेव खांडेकर यांना दोन बायका होत्या. श्री. नामदेव खांडेकर यांच्या पहिल्या बायकोचे नाव सौ. गुलाब नामदेव खांडेकर असे आहे. ती सोडून गेली. त्याच्या दुसऱ्या बायकोने सौ. गुलाब नामदेव खांडेकर हिच्या नावावरच फॉर्म भरला. त्या फॉर्मवर फोटो नाही. तिचे माहेरचे नाव वेगळेच आहे. ती निवडून आली. आम्ही ओरिजनल बाईला निवडणुकीला घेऊन गेलो. जी मूळ सौ. गुलाब नामदेव खांडेकर आहे तिचा फोटो मतदार यादीमध्ये होता. त्या ठिकाणी एकमताने मतदान झाले. आम्हाला माहीत होते की ती महिला दुसरीच आहे. त्या ठिकाणी आमचे 4 सदस्य आणि पाच त्यांचे सदस्य निवडून आले. आम्ही सौ. गुलाब नामदेव खांडेकर यांना त्या ठिकाणी घेऊन गेलो. तेथील निवडणूक अधिकारी असे म्हणाले की, हा फोटो खरा नाही. तिचाच फोटो खरा होता. ते म्हणाले हा फोटो सर्टिफाय करुन पाहिजे. त्या ठिकाणी जी मामलेदार बाई आहे तिच्याकडून सर्टिफाय करुन घेऊन या असे त्यांनी सांगितले. आम्ही सर्वजण गाडी घेऊन मामलेदार बाईकडे गेलो. मामलेदार बाई म्हणाल्या की माझा कॉम्प्युटर बंद पडलेला आहे. या राज्यामध्ये काय चालले आहे ? बायका दोन करा, तीन करा त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. पण कमीतकमी त्यांचे असत्य फोटो तरी देऊ नका. यामध्ये कोठे तरी पारदर्शकता आली पाहिजे.

सभापती महोदय, या ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये माझ्या अलिबाग तालुक्यातील 14 ग्रामपंचायती होत्या. त्यापैकी 10 ग्रामपचायती आमच्या पक्षाने जिंकल्या. तेथील निवडणूक अधिकारी निवडणुकीचा निकाल काय द्यावयाचा हे तहसीलदारांना विचारतात. मी सर्व डॉक्युमेंट आणलेले आहे. सर्व निकालांमध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, तहसीलदारांच्या आदेशाप्रमाणे मी हा निकाल देत आहे. निवडणूक अधिकारी स्वतंत्र असतो. त्याला कोणालाही भेटता येत नाही. निवडणूक

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

श्री. जयंत प्र. पाटील .....

आयुक्त सुध्दा त्यांना निर्णय देऊ शकत नाही किंवा सांगू शकत नाही. पाचही ग्रामपंचायतींमध्ये त्यांनी तहसीलदारांच्या आदेशाप्रमाणे निकाल दिले. या राज्यामध्ये स्वच्छता राहावी म्हणून ज्याच्याकडे शौचालय आहे तोच उमेदवार उभा राहू शकतो असा आपण कायदा केलेला आहे. शौचालय नसेल आणि शौचालय नाही असे जर सर्टिफिकेट तर ग्रामसभेमध्ये आणले तर त्याचा फॉर्म उडतो. यावेळी आम्ही 10 उमेदवारांचे असे अर्ज दिले. या ठिकाणी पारदर्शकता नाही. त्यांनी त्या ठिकाणी फॉर्म ठेवले. शासनाने त्र्याहत्तरावी घटना दुरुस्ती केली आणि त्यामध्ये निवडणुका वेळेवर झाल्या पाहिजेत हे बघितले. पण यामध्ये कोठे तरी पारदर्शकता आली पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, यांनतर मी आदिवासी विकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 185 वरील बाब क्रमांक 190 बाबत बोलणार आहे. मी आदिवासी विकास मंत्री श्री. मधुकरराव पिचड यांचे स्वागत करतो. त्यांनी आदिवासी विकास मंत्री म्हणून कार्यभार सांभाळावा अशी त्यांची इच्छा होती व आमचीही इच्छा होती. माननीय मंत्री महोदयांनी सर्व आदिवासी आश्रमशाळांची चौकशी केली पाहिजे. मी विदर्भात वाशिम जिल्ह्यातील एका गावामध्ये गेलो. श्री. देशमुख नावाचे माझे कार्यकर्ते होते. त्या कार्यकर्त्याची एक आश्रमशाळा होती. मी गेल्यानंतर त्यांनी हार वगैरे घातला. ते म्हणाले आम्हाला मान्यता मिळालेली नाही. मी सांगितले की तुम्हाला ताबडतोब मान्यता मिळवून देतो. मी माननीय मंत्री महोदयांकडे आलो. मी कधीही शाळेसाठी वगैरे शिफारस देत नाही. पण मी त्यांना शिफारस दिली. दोन तीन महिन्यांनी त्यांना परवानगी देण्यात आली. मी फिरत असताना परत सहा महिन्याने त्या गावाला गेलो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील......

माझ्यामुळे तुमच्या आश्रमशाळेला परवानगी मिळाली असे मी त्यांना म्हटले. त्यावर ते मला असे म्हणाले की, साहेब, परवानगी मिळविण्यासाठी मला 20 लाख रुपये खर्च आला आहे. तुमच्या पत्राचा उपयोग झाला नाही. ते ऐकून मी मान खाली घालून आलो. माननीय आदिवासी विकास मंत्री श्री.मधुकरराव पिचड यांना मी सांगू इच्छितो की, आपण अनेकदा या राज्याचे मंत्री झालेला आहात. आता उर्वरित काळामध्ये किंवा पुढील एक वर्ष ज्या आश्रमशाळांना मान्यता देण्यात आलेली आहे त्या सर्वांच्या चौकशा सुरु कराव्यात, एवढीच माझी आपल्याला विनंती आहे.

सभापती महोदय, यानंतर मी नगरविकास विभागाच्या पृष्ठ क्र.50 वरील बाब क्रमांक 67 वर माझे विचार मांडतो. खोपोली येथील मंगल कार्यालयाचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. ते काम करणाऱ्या ठेकेदाराने ते काम अर्धवट ठेवलेले आहे. त्या ठिकाणी नव्याने मंगल कार्यालयाचे बांधकाम करण्याबाबत मी सभागृहामध्ये अनेकदा बोललो आहे. परंतु त्याच ठिकाणी नवीन काम सुरु करण्यात आलेले आहे. ते काम तातडीने थांबविले पाहिजे. त्या कामाचे 45 लाख रुपयांचे बिल दिले जाणार आहे. शासनाने ही कार्यवाही ताबडतोब थांबवावी.

सभापती महोदय, लहानपणी माझ्या वडिलांबरोबर पुण्याहून कोल्हापूरला जात असताना कात्रजचा घाट लागत असे. त्या घाटाची माहिती आम्हाला वडील सांगत असत. माझे काकाही आम्हाला विचारत असत की, कात्रजच्या घाटात कोणी लढाई केली होती ? आमचे उत्तर चुकल्यावर ते मला म्हणत असत की तुम्ही चांगला अभ्यास करीत नाही. पण आज कात्रजचा घाटच नष्ट करण्यात आलेला आहे. पुण्यावर आदिलशाहीने गाढवाचा नांगर फिरविला होता. त्यानंतर शिवाजी महाराजांनी लहानपणी सोन्याचा नांगर फिरवून पुणे शहर उभे केले आहे. तो इतिहासच नष्ट केला गेला आहे. 'कात्रजचा घाट तुला दाखवितो' अशी जगप्रसिध्द म्हण या घाटामुळे तयार झालेली आहे. महाराजांच्या बुध्दिमत्तेला वेगळे कौशल्य होते. महाराजांनी शाहिस्तेखानाबरोबर लढाई केली ती जगाच्या इतिहासामध्ये लिहिली गेली आहे. कात्रजचा घाट ही हेरिटेज वास्तू आहे. तो घाटच नष्ट केला आहे. ही बाब पुरातत्व विभागाच्या अंतर्गत येते. परंतु नगरविकास विभागाकडून बुलडोझर लावून काम करण्यासाठी वेगवेगळ्या परवानग्या दिल्या जात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

आहेत. पुणे महानगरपालिका याबाबत कारवाई का करीत नाही ? कात्रजच्या घाटामध्ये बंगले बांधण्यासाठी शिवापूरपर्यंत पुणे महानगरपालिकेची हद्दवाढ केलेली आहे. आता कात्रजचा बोगदा संपल्यानंतर पुणे महानगरपालिकेची हद्द संपते. महानगरपालिकेने कात्रजचा घाट आपल्या क्षेत्रात घेतला आहे. तेथे महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे एफएसआय मिळतो. महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे तेथे डेव्हलपमेण्ट करता येते. हे सर्व थांबले पाहिजे अशी मागणी करुन मी येथेच थांबतो.

----

3....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2013-14 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, दुग्धव्यवसाय विभागाच्या पृष्ठ क्र.39, बाब क्र.57 वर मी माझे विचार प्रथम मांडतो. मी मंत्री महोदयांना आवर्जून आठवून करुन देतो की, दिनांक 18 मार्च, 2013 रोजी या सदनामध्ये या विषयाची बाब क्र.21 सभागृहासमोर मान्यतेसाठी सादर झाली होती. त्यावेळी देखील मी या मुद्यावर बोलून मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणले होते. एकात्मिक दुग्ध विकास प्रकल्प हा राष्ट्रीय विकास प्रकल्पातून निर्माण झालेला आहे. या प्रकल्पातून एका दुग्ध विकास प्रकल्पाला 20 ते 25 लाख रुपये दिले जातात.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्यामधून गायी आणून त्या सांभाळायच्या असा हा प्रकल्प आहे. मराठवाडयामध्ये सन 2009-10 आणि 2010-11 या दोन वर्षामध्ये यासाठी ज्या संस्थांची निवड झाली ती राजकीय शिफारशी मधून झाली. त्यावेळी ज्या कार्यकर्त्यांना संस्था दिल्या गेल्या त्यातील फक्त एक किंवा दोन संस्थाच अस्तित्वात आहेत. बाकीच्या संस्थांना फक्त अनुदान दिले गेले. काहीच उभे राहीले नाही. हे या सभागृहामध्ये सांगण्याची माझी चौथी वेळ आहे. मंत्री महोदय, आपण खाते चालविता की आपल्या खात्यातील संबंधित अधिकारी खाते चालवितात ? ते अधिकारी आता खाऊन पिऊन मोकळे झालेले आहेत. मंत्री महोदय, आपण मराठवाडयातील आहात. असे प्रकार या सदनामध्ये वारंवार सांगण्याची आमच्यावर पाळी येणार असेल तर आपले खाते काय काम करते असा प्रश्न निर्माण होतो. मी अशा 10 संस्थांची नावे शासनाकडे दिली होती. परंतु कोणावरही कोणत्याही प्रकारची कारवाई झाली नाही. 20-25 लाख रुपये हडप केलेले आहेत, लाटलेले आहेत. या बाबतीत कोणावर गुन्हे दाखल केलेले नाहीत, कोणावर कारवाई केलेली नाही. जे अधिकारी यामध्ये गुंतलेले असतील ते निवृत्त देखील झालेले असतील. वारंवार मला या सभागृहामध्ये हेच सांगावे लागत असेल तर लोक मला कोडगा म्हणतील. म्हणून मंत्री महोदय या प्रकरणी कारवाई करणार आहेत की नाही असा माझा प्रश्न आहे. ही कारवाई गुन्हेगारी स्वरुपाची झाली पाहिजे. जे अधिकारी यामध्ये गुंतलेले असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. मराठवाड्याला दुग्धविकासामध्ये प्रगल्भ करण्याच्या नादामध्ये अधिकारी खाऊन पिऊन मोकळे झाले. त्या ठिकाणी आता गायी नाहीत आणि दूध देखील नाही. महाराष्ट्रामध्ये जेवढया दुग्धविकास संस्था आहेत त्यामध्ये मराठवाड्यातील दुग्ध विकास संस्थांची परिस्थिती अत्यंत वाईट आहे हे आपणा सर्वांना माहीत आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे मंत्री महोदयांनी गांभीर्याने लक्ष द्यावी अशी मी त्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न या सभागृहामध्ये उपस्थित झाला त्यावेळी मी असे म्हटले की सर्व शिक्षक कंगाल झाले आहेत काय ? जो उठतो तो आपला पगार वाढ मागतो, अमुक मागतो तमुक मागतो, असे चालू आहे. .. मला अशी माहिती प्राप्त झालेली आहे की, अधिकारी आणि शिक्षक यांनी संगमताने खोटया बढत्या दाखवून 5 कोटी रुपये अतिरिक्त पगार घेतला. त्याचे काय झाले माहीत नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचा मी नेहमी आदर करतो. ते नेहमी सत्य परिस्थितीवर बोलतात. आता ते जे काही सांगत आहेत ते चुकीचे आहे असे मी म्हणत नाही.प्राध्यापकांनी चुकीचे वेतन घेऊन शासनाला करोडो रुपयास फसविले अशा प्रकारच्या बातम्या वर्तमानपत्रातूनही दोन तीन वेळा आलेल्या आहेत. यामुळे आमच्या शिक्षकांची बदनामी होते. असा कोणताही प्रकार झालेला नाही. शिक्षक स्वत:हून चेक लिहीत नाही, स्वत:हून आपले वेतन काढत नाही. हे अधिका-यांचे काम असते. तपासणी करण्याचे काम अधिका-यांचे असते. वेतन निश्चिती करताना देखील चार अधिका-यांच्या हाताखालून फाईल गेल्यानंतर वेतन निश्चिती होते. हे सर्व करीत असताना अधिकारी झोपले होते काय ? आम्ही फक्त आमच्या मागण्या सादर करीत असतो. द्यायचे काम सरकारचे आहे. शिक्षकांना आपोआप कोणतीही गोष्ट मिळत नाही, ती त्यांना मागावी लागते आणि ती नियमामध्ये बसत असेल तरच त्यांना मिळते. त्यामुळे हा उल्लेख टाळावा अशी माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : खाई त्याला खवखवे अशी मराठीमध्ये म्हण आहे. मी काहीच बोललो नव्हतो. मी असे म्हटले की अशा प्रकारची माहिती मला प्राप्त झाली. पण आता सन्माननीय सदस्यांनी कबुली जबाब दिला. आम्ही चोरले, आम्ही खाल्ले, पण अधिका-यांनी आम्हाला का खाऊ दिले ? चोरी कशी उघड होते हे ऐकून मंत्री महोदय हसत होते. सन्माननीय सदस्यांनी स्वत:च सांगितले. त्यांना त्यांच्या मंत्र्यांवर विश्वास राहिलेला नाही. देखणे मंत्री असताना सन्माननीय सदस्य त्यांच्यावर आणि त्यांच्या अधिका-यांवर असे आरोप करतात. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी माझ्या मुद्याचे समर्थन केले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. त्यांना हे आरोप मान्य नसतील तर त्यांनी वर्तमानपत्राच्या विरोधात हिंमत असेल तर न्यायालयात जावे किंवा शिक्षकांनी चोरीमध्ये सहभागी होऊन ते पैसे खाल्ले हे कबूल करावे. या ठिकाणी त्यांनी ते कबूल केले त्याबद्दल धन्यवाद. मी जे पुढचे सांगणार आहे ते वेगळे आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

हा विषय त्र्यंबकेश्वर ग्रामपंचायतीत झालेल्या घोटाळयाच्या अनुषंगाने निर्माण झालेला आहे. विभागीय उपायुक्त श्री.चंद्रकांत गुंडेवार यांनी या घोटाळयाची चौकशी केली. त्या चौकशीच्या वेळी शिक्षण खात्याचे संबंधित अधिकारी त्यांच्या बरोबर उपस्थित होते. त्यांच्या लक्षात आल्यानंतर तीन वर्षे शिक्षकाच्या वेतन देयक फरकाची संपूर्ण कागदपत्रे जप्त करण्यात आली. तत्कालीन गटविकास अधिकारी, महिला गटशिक्षण अधिकारी, महिला अधीक्षक हे या घोटाळयाच्या बाबतीत संशयित असल्या कारणाने त्यांच्या बाबतीत काय कारवाई केली जाणार आहे असा प्रश्न निर्माण झालेला आहे. ज्या शिक्षकांनी अशाप्रकारे पगार लाटले, त्यांनी त्या पगाराच्या फरकाची रक्कम वाटून खाल्ली असेल. त्यांनी त्या पैशांचे वाटप कशा पध्दतीने केले याची मला निश्चित माहिती नाही. त्या जबाबदार शिक्षकांविरुध्द कोणत्या प्रकारची कारवाई केली जाणार आहे या बाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी. शिक्षकांना प्रामाणिक समजतो. समाजात सर्वच लोक बदमाश नसतात.

सभापती महोदय, मी माननीय श्री.हर्षवर्धन पाटील उपस्थित आहेत म्हणून एक गोष्टीचा उल्लेख या ठिकाणी मुद्दाम करतो. तुम्ही आयबीएन या दूरचित्रवाहिनीवर आमदारांच्या बाबतीत मुलाखतीसाठी गेला होतात. तुम्ही संसदीय कार्य मंत्री आहात म्हणून बोलतो आहे. ते तेथे विसरल्या सारखे काहीही बोलत होते. दोन आमदारांनी काही तरी केले म्हणून महाराष्ट्रातील सगळे आमदार बदनाम, सगळे आमदार गुंड, सगळे आमदार मवाली असे मुलाखत घेणारी व्यक्ती बोलत होती. आपण त्यांना त्यावेळी एवढेच सांगितले की, अशा प्रकारचे शब्द वापरु नका. महात्मा गांधी यांच्या सारखी भूमिका आपण तेथे घेतली. आमदारांच्या बाबतीत मुलाखत घेणारी व्यक्ती अशा प्रकारचा शब्दप्रयोग करीत होती, त्याच वेळी तुम्ही तिघा आमदारांनी तेथून निघून जावयास पाहिजे होते. परंतु मत मांडण्याची मोठी हौस असते. आपण सर्वजण तेथे बसून राहिलात. सर्व शिक्षक दोषी नसतात. लाखो शिक्षक आहेत, त्यातील 5-50 शिक्षक बदमाश असतील. त्यामुळे शिक्षकाला बट्टा लागत नाही. जे कोणी असे वागत असेल तर तशा शिक्षकांचा आपण पंचनामा केला पाहिजे. आलेले गळू कापल्या शिवाय ते बरे होत नाही, तशी भूमिका आपण घेतली पाहिजे. शिक्षकांबद्दल बोलल्या बरोबर कोणी उठून उभे राहण्याची गरज नाही. मराठवाडयामध्ये शाळांची तपासणी झाली.

श्री.विक्रम काळे : आपल्या मराठवाडयात असे म्हणा.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : मी आपला मराठवाडा म्हणतो. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांचे वेगळे आहे. ते दादा लिमिटेड कंपनीचे आहेत. सभापती महोदय, या पटपडताळीत सिध्द झ ाले आहे. ज्या शिक्षण संस्था चालकांनी 10-10, 15-15 वर्षे पटपडताळीच्या नावाखाली अनुदाने घेतली. त्या संस्थांमध्ये शिक्षक कामावर आहेत. त्या शिक्षकांना संस्था चालकांनी पूर्ण पगार दिला नसेल. पण ते शासनाच्या अनुदानातील शिक्षक आहेत. ते शिक्षक बेरोजगार झाले, त्या शिक्षकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सभागृहातील एकाही शिक्षक लोकप्रतिनिधींनी मांडला नाही. तो प्रश्न का मांडला नाही ? त्या शिक्षकांनी काय लबाडी केली, त्यांची काय चूक होती? संस्था चालकांनी शासनाला फसविले आहे, त्यांनी बनवाबनवी केली आणि करोडो रुपये गिळंकृत केले. त्या शिक्षकांचा पगार शासनाच्या अनुदानातून देण्यात येत होता. त्या शिक्षकांना पेन्शन शासन देणार आहे. बेरोजगार झालेले हजारो शिक्षक आहेत, ते निर्वासित झाले आहेत.त्यांचा पुनर्वसनाचा प्रश्न एकाही शिक्षक आमदारांनी सभागृहात उपस्थित केला नाही.

श्री.विक्रम काळे : मी त्या शिक्षकांचा प्रश्न सभागृहात मांडला आहे.

श्री.दिवाकर रावते : त्या शिक्षकांचा प्रश्न सभागृहात मांडलाच पाहिजे. प्रथम त्या शिक्षकांचे पुनर्वसन करा त्यानंतरच नवीन शिक्षकांची भरती करावी. ते शिक्षक असले तरी त्यांनी शासनाची फसवणूक केली आहे, शासना समवेत बनवाबनवी केली आहे, त्यांना माफ करता येणार नाही. शिक्षकांना समाज घडवावयाचा असतो म्हणून सर्वात जास्त शिक्षा त्यांना दिली पाहिजे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री नुकतेच सभागृहाबाहेर गेले. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी विधी व न्याय विभाग सक्षम नाही असे मत व्यक्त केले. सभागृहाच्या गॅलरीत विधी व न्याय विभागाचे अधिकारी उपस्थित असतील तर त्या गोष्टीचा मला निश्चितपणे आनंद होईल. विधी व न्याय विभागाचा दिनांक 3 जुलै, 2013 रोजीचा आदेश माझ्याकडे आहे. त्या आदेशाला सरकारचे सर्व मंत्री जी.आर.असे म्हणतात. विधी व न्याय विभागाचा दिनांक 3 जुलै, 2013 रोजीच्या आदेशात असे नमूद आहे की, मंत्रालय येथील सॉलिसीटर व सहसचिव या पदावर कार्यरत असलेले श्री.के.रा.शिंदे हे निवृत्त झाले होते.

यानंतर श्री.भोगले...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ KTG/ D/ D/ 16:00

श्री.दिवाकर रावते....

निवृत्त झालेले श्री.शिंदे यांना पुनर्नियुक्ती देण्यात आली. तत्संबंधीच्या आदेशात कारणे नमूद केली आहेत. नियमानुसार सॉलिसीटर आणि सह सचिव हे पद सहाय्यक सॉलिसीटर आणि उप सचिव या निम्न संवर्गातील एकाकी पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीने किंवा सरळ सेवा किंवा अनुषंगिक अधिकाऱ्याच्या बदलीने भरण्याची तरतूद आहे. त्या ठिकाणी सहाय्यक सॉलिसीटर आणि उप सचिव हे पद रिक्त असल्यामुळे कोणाला पदोन्नती देण्यात येत नसली तरी श्री.शिंदे यांना पुनर्नियुक्ती देण्याचा निर्णय घेतला. त्या संदर्भातील आदेशात हे म्हटले आहे. हा शासनाचा अधिकृत सहीने निघालेला आदेश आहे. या आदेशात म्हटले आहे की, अपंगांचे आरक्षण सुनिश्चित करण्यासाठी विभागामार्फत पाठविण्यात आलेल्या प्रस्तावावर सामाजिक न्याय विभागाकडून अंतिम निर्णय झालेला नसल्यामुळे या पदाचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास अद्याप पाठविणे शक्य झाले नाही. या विभागाने अपंगाचे पद भरण्याबाबत सामाजिक न्याय विभागाला सांगितले की, पात्र उमेदवार उपलब्ध करुन द्यावा.

सभापती महोदय, माझा थेट आरोप आहे. विधी व न्याय विभागाने अशा प्रकारचे कोणतेही पत्र आजच्या तारखेपर्यंत सामाजिक न्याय विभागाला पाठविलेले नाही. पाठविले असेल तर मला त्या पत्राची तारीख मंत्री महोदयांनी सांगावी. माहितीच्या अधिकारात त्या पत्राची प्रत मी उपलब्ध करुन घेईन. मला या सदनात संबंधित मंत्र्यांकडून उत्तर हवे आहे. सामाजिक न्याय विभागाला कोणतेही पत्र पाठविले नसताना शासन आदेशामध्ये कोणाला तरी पदोन्नती द्यायची म्हणून असत्य घटना लिहिली जात असेल तर संबंधित आदेश काढणारे व्ही.टी.अल्हाट हे हक्कभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील, त्यांच्यावर नोकरी गमावण्याची पाळी येईल. हे शपथेवर असत्य असलेले सत्य म्हटले आहे. माझा स्पष्ट आरोप आहे की, असे कोणतेही पत्र विधी खात्याने पाठविलेले नाही. परंतु श्री.शिंदे यांना नेमण्याकरिता आदेशात तसे नमूद केले आहे.

सभापती महोदय, मी विधिमंडळाच्या लायब्ररीमध्ये गेलो होतो. निवृत्त झालेल्या कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याला सेवेत मुदतवाढ देऊ नये या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने एक निर्णय दिला आहे हे मला पक्के माहित आहे. तो आदेश मिळविण्यासाठी मी ग्रंथपाल श्री.वाघमारे यांना भेटलो. त्यांना तो निर्णय सापडला नाही. परंतु न्यायालयाचा असा निर्णय आलेला आहे. आज सामान्य प्रशासन विभागाच्या पुरवणी मागण्या चर्चेला आहेत.

..2..

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, मुख्य सचिव श्री.जयंतकुमार बांठिया यांना सहा महिने मुदतवाढ देण्यात आली. मला हा निर्णय खटकला. त्यांच्या ज्ञानाबद्दल, कर्तृत्वाबद्दल किंवा आयएएस सेवेतील कामगिरीबद्दल काही म्हणायचे नाही. ते सचोटीचे अधिकारी आहेत. मुख्य सचिव म्हणून त्यांनी चांगल्याप्रकारे काम केले आहे. त्यांना मुदतवाढ देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले की, महाराष्ट्रात दुष्काळाची परिस्थिती असल्यामुळे त्यांना सहा महिने मुदतवाढ देणे भाग पडत आहे. या सभागृहात दुष्काळासंबंधी पुनर्वसन मंत्री, कृषी मंत्री, जलसंधारण मंत्री बोलले. त्या त्या खात्यातील सचिव काम करीत नाहीत? श्री.जयंतकुमार बांठिया निवृत्त झाले असते तर जे कोणी मुख्य सचिव पदावर नियुक्त झाले असते ते कर्तबगार नसते का? विभागातील सह सचिव, सचिव आहेत त्यांना सोबत घेऊन दुष्काळाबाबत नियोजन झाले नसते का? मला हा प्रश्न पडला नाही. कायद्याप्रमाणे श्री.बांठिया यांना मुदतवाढ देता येत नाही म्हणून केंद्राकडून त्यांच्या मुदतवाढीला मान्यता मिळविण्यात आली.

नंतर 2एक्स.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

परंतु त्याच वेळेला माननीय मुख्यमंत्र्यांनी सर्वोच्च न्यायालयात स्वत: शपथपत्र दाखल करुन त्यासंदर्भात शासनाचे आदेश काढले आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व विभागामध्ये अशा प्रकारे मुदतवाढ देता येणार नाही यासाठी हा आदेश काढला गेला होता. सामान्य प्रशासन विभागाचा दि. 14 जानेवारी, 2010 चे हे आदेश पत्र असून त्यामध्ये असे म्हटले आहे की, "दि. 15 फेब्रुवारी, 1995 च्या संदर्भात शासकीय अधिकारी/कर्मचारी व विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती यांना करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबत कार्यपध्दती व निकष ठरविण्यात आलेले आहेत. त्याच प्रमाणे 1 नोव्हेंबर, 1995 च्या शासकीय निर्णयान्वये नियत वयोमानानुसार निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर सेवेत मुदतवाढ व पुनर्रनियुक्तीच्या संदर्भात कार्य पध्दतीमध्ये निकष ठरवून देण्यात आलेले आहेत." त्यामध्ये पुढे असेही म्हटले आहे की,

"It is submitted that concerned appointing authorities will be advised to follow this policy strictly and necessary instructions will be given to all departments to inform the appointing authorities under their control.

It is further stated and submitted that all existing post retirement appointments of State Government employees and their extensions will be reviewed. Those appointments which are not in accordance with the provisions of the Government Resolution dated 9/11/1995 or its subsequent amendments will be terminated or phased out. This exercise of reviewing all cases of reappointments and/or extension of State Government officers and employees will be completed by 31/3/2010."

याचा अर्थ या प्रमाणे सेवा दिली असेल तर त्यांना घरी पाठविले जाईल, परत कोणाला सेवा दिली जाणार नाही असे उच्च न्यायालयात माननीय मुख्यमंत्र्यांनी शपथ पत्र दिलेले आहे.

सभापती महोदय, अशा प्रकारे सेवा दिल्या असतील तर त्या समाप्त करण्यात येतील असे म्हटलेले असतांना शिंदे महोदय असे कोण लागून गेलेले आहेत ? शिंदेच्या योग्यतेचा माणूस या महाराष्ट्रात नाही काय ? खरे म्हणजे महाराष्ट्रात जे थोर विधी तज्ज्ञ आहे त्यांचा हा अवमान आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

त्या ठिकाणी दुसरे कोणी येऊ शकत नाहीत काय ? यासंदर्भात मी मागोवा घेण्याचा प्रयत्न केला होता. डान्सबार बिलाच्या संदर्भात कायदे खात्याने काम बरोबर न केल्यामुळे राज्य शासनाची नाचक्की झाली असे मी जेव्हा सभागृहात बोललो त्यानंतर महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी ठामपणे सांगितले की, "होय, डान्सबार बंदीच्या संदर्भात विधी खात्याला अपयश आले आहे". सन्माननीय महाराष्ट्रातील काँग्रेसचे अध्यक्ष व या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी सांगितले की, "आपण एकाच सरकारमध्ये काम करीत आहोत". मी विधी खात्यावर या सभागृहात नेहमीच विचार मांडत असतो. विधी खात्याचे विधेयक केव्हा येईल त्याची वाट बघतो आहे. श्री. सिताराम शिंदे हे कायद्यात बसत नसतांना, त्यांच्या जागेवर दुसरा कोणीही उपलब्ध नाही तसेच अपंगाच्या बाबतीत असत्य घटना आपल्या आदेशात लिहिली तसेच हे काम नियोजन पध्दतीने केले आहे.

सभापती महोदय, बाळासाहेब देशमुख हे सन 2009 मध्ये विधी खात्यात अवर सचिव म्हणून योग्यतेप्रमाणे आले. सेवानियमानुसार सेवेत लागल्यानंतर पाच वर्षे त्या पदावर काम केल्यानंतर पुढची पदोन्नती मिळत असते. परंतु त्यांना 3 वर्षात उप सचिव म्हणून पदोन्नती देण्यात आली. आपल्याकडे पहिली पास झाला, दुसरी पास झाला, तिसरी पास झाला, चौथी पास झाला की, पाचवीमध्ये प्रवेश दिला जातो. परंतु ज्यावेळेस मुलगा तिसरीतून डायरेक्ट पाचवीत जातो तेव्हा काही तरी गडबड असते असा त्याचा अर्थ होतो. विधी खात्यामध्ये बऱ्याच दिवसापासून नवीन भरती केली गेलेली नाही. पदाच्या भरतीच्या संदर्भात तयार झालेली नस्ती पुढे सरकतच नाही. विधी खात्यात 5 वर्षापासून सर्व बढत्या स्थगित झालेल्या आहेत. कोणालाही बढत्या दिल्या जात नाहीत.

सभापती महोदय, विधी खात्याचे अधिकारी श्री. माळवे साहेब हे ठाण्याला राहतात. त्यांना हार्ट ॲटॅक आला त्यामुळे त्यांनी ठाण्यातील हॉस्पिटलमध्ये औषोधोपचार करुन ते बरे झाले. श्री. माळवे हे जेव्हा कार्यालयात रुजू झाले तेव्हा विधी खात्याचे प्रधान सचिव श्री. अचलिया यांनी त्यांना सांगितले की, तुम्ही सेन्ट जॉर्जमध्ये ॲडमिट न झाल्यामुळे तुम्हाला बिल मिळणार नाही.

यानंतर AAA-1



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री. दिवाकर रावते ...

सभापती महोदय, आपले जर अशा प्रकारचे अधिकारी असतील आणि त्यांच्या पध्दतीने हे सरकार चालत असेल तर मोठा प्रश्न निर्माण होईल.

सभापती महोदय, मी आता जो प्रश्न मांडणार आहे तो प्रश्न सामान्य प्रशासन विभागाचा आहे की, गृह खात्याचा आहे याची मला माहिती नाही. श्री. शिंदे हे सरकारचे फार लाडके आहेत. त्यांना त्यांच्या गाडीवर कायद्याने लाल दिवा किंवा पिवळा दिवा लावण्याचा अधिकार नाही. परंतु हे महाशय स्वत:च्या गाडीवर लाल दिवा लावून फिरतात. विधी खात्याच्या सॉलिसिटरला कोण अडवणार ? आपण त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय ? आमच्या गाडीला मराठी नंबर प्लेट लावली असेल तर 3-3 हवालदार आडवे येतात. मराठी नंबर प्लेटला का अडवले जाते हे मला काही समजत नाही. या प्रशासनामध्ये एकंदर किती लाल दिवे आहेत ? खरे म्हणजे हे सामान्य प्रशासन विभागाचे काम आहे. लाल दिवा हा शासनाने मान्य केलेल्या प्रमुख व्यक्तीच्या गाडीवरच लागू शकतो. लाल दिवे बाजारात विकत कसे काय मिळतात ? बाजारात जे लाल दिवे विकले जातात त्यावर तुम्ही बंदी का आणत नाही ? दोन तासात लाल दिवा विकत आणून मी माझ्या गाडीवर लावू शकतो अशी परिस्थिती आहे. या सरकारमध्ये, प्रशासकीय यंत्रणेमध्ये कायद्यामध्ये नेमके काय चालले आहे ? लोकसभेवर आंतकवाद्यांनी हल्ला केला होता त्यावेळी आतंकवादी लाल दिवा लावूनच आले होते. त्यामुळे लाल दिव्याचे काय महत्व असते हे तुम्हा आम्हाला माहिती आहे. आमच्या गाडया खालून वरुन तपासल्या जातात त्याबद्दल मला काही बोलावयाचे नाही. परंतु बेकायदेशीरपणे लाल दिवे लावणारे हे कोण आहेत ? शिंदे यानी त्यांच्या गाडीवर लाल दिवा लावला म्हणून त्यांना बडतर्फ करावयास पाहिजे होते परंतु त्यांना बडतर्फ न करता पदोन्नती दिली गेली आहे. ही जी परिस्थिती आहे त्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितले आहे की, जे काही विधेयके येतात ती न्यायालयातून तुम्ही डायरेक्ट पास करुन आणा. ही जी भावना जनमाणसात तयार झालेली आहे ती सरकारसाठी चांगली नाही. ही कोणत्याही मंत्र्यांसाठी गौरवाची नाही. न्यायालयच हे सरकार चालवित आहे ही जी भावना जनमाणसात गेलेली आहे ती योग्य नाही. आम्हाला सुध्दा ते योग्य वाटत नाही. तुमचे आमचे वाद असतील तर त्यासाठी आम्ही आंदोलने करु, उत्तर देण्यामध्ये तुम्ही अपयशी झालात तर तुम्ही घरी जाल,

..4..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते …

तुमच्या जागेवर आम्ही बसू. खरे म्हणजे हा राजकारणातील विषय आहे. परंतु या प्रशासकीय यंत्रणेने सर्वांना खिळखिळे केलेले आहे. मंत्री कुचकामी आहेत व न्यायालयच सर्व काही निर्णय देते अशी जी परिस्थिती निर्माण केलेली आहे ती अत्यंत शोचनीय आाहे.

यानंतर श्री. अजित ….

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, ॲड. उज्ज्वल निकम यांच्या संदर्भात एक बाब विचारावयाची आहे की, राज्य शासनाने ॲड.उज्ज्वल निकम यांच्याकडे आतापर्यंत किती खटले सोपविले, त्यासाठी किती फी दिली ? माफीचा साक्षीदार निर्माण करुन हमखास केस जिंकण्याचा त्यांचा वकूब आहे. मला त्यांच्या बुध्दीमत्तेला आव्हान द्यायचे नाही. जरा काही झाले तर उज्ज्वल निकम यांच्याकडे केस सोपवा असे सांगितले जाते. लखनभैय्या प्रकरणामध्ये त्यांनी अकलेचे तारे तोडले. आतंकवाद्यांना फासावर चढवायला नेहमी कोट घालून सज्ज असलेले व सरकारी पैशातून गडगंज फी घेऊन स्वत:ला महाराष्ट्र भूषण समजणारे असे ते वकील आहेत. दाऊदच्या माणसाची बाजू घेऊन ते बोलत होते. ज्या पोलिसांनी मदत केली, त्यांनी साक्षीपुरावे गोळा केले म्हणून तुम्ही केस उभी करु शकलात. पोलिसांचा अवमान झाला त्यावेळी मला चीड आली. त्यांच्या पांडित्याबद्दल मला काही बोलायचे नाही. विधी खात्यामध्ये जे काही चालले आहे ते गंभीर आहे हे मी या ठिकाणी नमूद करतो.

सभापती महोदय, जात पडताळणी प्रमाणपत्राच्या संदर्भात चर्चा झाली पाहिजे अशी आम्ही मागणी केल्यानंतर त्या विषयावर अडीच तासाची चर्चा झाली होती. त्याबद्दल आपणास धन्यवाद देतो. त्या चर्चेच्यावेळी मी एक विषय मांडला होता की, एका विद्यार्थ्यास जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यासाठी पुणे येथील महिला अधिकारी श्रीमती मनिषा फुले यांनी 20 हजार रुपये मागितले होते. मी ते प्रकरण नावानिशी मांडले होते. मी हे प्रकरण मांडून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली होती. पण ती कारवाई झाली की नाही मला माहीत नाही. परंतु मला त्या महिलेने बाहेर सांगितले की, माझ्याकडून चूक झाली. मी त्या विद्यार्थ्याचे पैसे परत करते. त्या महिलेने पैसे परत केले आणि त्या विद्यार्थ्याला प्रमाणपत्र देखील दिले. अशाप्रकारे छळ करणारे अधिकारी बसले असतील मग ते पुरुष असो की महिला असो अशा बरबटलेल्या अधिकाऱ्यांना ताबडतोब दूर केले पाहिजे. आजही अधिकारी असे म्हणतात की, "आपण सभागृहामध्ये काहीही बोला, कितीही बोंब मारा, आमचे काही होत नाही." या सभागृहाला कोणी मोजत नाही. या सभागृहाबद्दल अधिकाऱ्यांमध्ये किंमत उरलेली नाही.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, या सदनामध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांनी किती अधिकारी व कर्मचाऱ्यांना निलंबित केले त्या संदर्भातील माहिती मी माहितीच्या अधिकाराखाली मागितली. त्या संदर्भात माझ्याकडे दोन प्रकरणांतील माहिती प्राप्त झाली आहे. विधानसभेने "निरंक"अशी माहिती दिलेली आहे. ज्यांच्याकडून योग्य माहिती येणे आवश्यक आहे त्यांनी "निरंक" अशी माहिती दिलेली आहे. माझ्याकडे विविध विभागांकडून कोणाकोणाला निलंबित केले त्याची माहिती आलेली आहे. निलंबित केलेल्या अधिकाऱ्यांचे पुढे काय झाले ? आपणास अधिका-यांना निलंबित करण्याची हौस नसते. परंतु एखाद्या अधिकाऱ्याने चांगले काम केले नसेल तर त्या विरुध्द आपण सदनात आवाज उठवितो. तो आवाज सर्वसामान्य जनतेचा असतो. अधिकाऱ्यांकडून चूक झाली असेल तर त्यांना निलंबित करतो. परंतु नंतर पुढे काही होत नाही. दोन महिन्यानी तो पुन्हा सेवेत रुजू होतो. तेव्हा लोकांमध्ये असा समज होतो की, सरकारमध्ये सर्व काही आलबेल आहे. जास्तीत जास्त बोंबाबोंब झाली की निलंबन होईल आणि तो दोन महिन्यांनी पुन्हा सेवेत रुजू होईल.

सभापती महोदय, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या संदर्भातील मुद्दा माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडला असल्यामुळे मी तो मुद्दा पुन्हा मांडत नाही.

सभापती महोदय, तंत्र शिक्षण विभागाबाबत बोलायचे झाल्यास त्याठिकाणी एकाही सामानाची खरेदी न करता कागदोपत्री आठ ते नऊ कोटी रुपयांची खरेदी दाखविली आहे. त्या संदर्भात येथे चर्चा झाली होती. तसेच खालच्या सभागृहात देखील चर्चा झाली होती. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते की, त्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल. हा कोण अधिकारी आहे ज्याला हलविण्याची शासनाला हिम्मत होत नाही ?

सभापती महोदय, मी सभागृहात एक विशेष उल्लेख मांडला होता त्या संदर्भात सन्माननीय मंत्री श्री.राजेश टोपे यांनी मला पत्र लिहिले आहे. विशेष उल्लेखाचे उत्तर एक महिन्यात द्यावे लागते. माननीय मंत्री महोदयांनी लिहिलेले पत्र मी वाचतो. "श्री.एस.एस.हस्ते, सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यवाह, अमरावती यांच्या विरुध्द कर्मचा-याच्या बढती व भरती याबाबत झालेल्या तक्रारीच्या संदर्भात विशेष उल्लेख मांडला होता. त्या संदर्भात श्री.हस्ते, सह संचालक यांच्याविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची प्रक्रिया सुरु झाली आहे."

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्या बाबतीत काय झाले हे मी आता जाणून घेऊ इच्छितो. गेल्या अधिवेशनात मी प्रश्न उपस्थित केला होता. कारवाई केली नसेल तर माननीय मंत्री श्री. दत्तात्रय सावंत, आपण आपल्या नावाला जागावे. कालच गुरुपौर्णिमा झाली आणि आपले नाव दत्तात्रय असल्यामुळे आपण आपल्या नावाला जागून या माणसाच्या बाबतीत काय आहे ते बघावे आणि तसे असेल तर त्याला आजच घरी पाठविण्याची व्यवस्था करावी. या अधिकाऱ्यांना जर डोक्यावर बसविले तर तुमचे मंत्रीपद जाईलच पण सरकारचा असा घाणेरडा शेवट ते अधिकारी करतील. कर्तबगार माणसाला नाकर्ते करण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये आहे. या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने मी चार-पाच महत्वाच्या गोष्टी मांडलेल्या आहेत त्याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांवर काही सूचना करण्यासाठी आपण मला संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, सुरुवातीलाच माननीय विरोधी पक्ष नते श्री. विनोद तावडे आणि काही सन्माननीय सदस्यांनी या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये काही मुद्दे उपस्थित केले. वास्तविक पाहता हा आर्थिक व्यवहाराचा लेखाजोखा आपल्यासमोर आलेला असतो. त्यामध्ये कामांसाठी किती रक्कम मंजूर केली आहे आणि किती अधिकची रक्कम लागणार आहे या बाबींचा प्रामुख्याने उल्लेख असतो. पण त्या निमित्ताने या शासनामार्फत चालविल्या जाणाऱ्या सर्व कामांमध्ये निधीची पूर्तता केल्यानंतर कामकाजामध्ये सुधारणा होईल, ज्या त्रुटी असतील त्या दूर होतील आणि जे सदस्य त्रुटी निदर्शनास आणून देतील त्याची दखल घेऊन आपण मागितलेला पैसा योग्य त्या कारणासाठी योग्य त्या वेळेत खर्च होतो की नाही यासंबंधीची एक साधकबाधक चर्चा या निमित्ताने सभागृहामध्ये होत असते. म्हणून मला ही चर्चा महत्वाची वाटते. या चर्चेच्या निमित्ताने जे काही निष्कर्ष निघतात त्या निष्कर्षाचा आणि या पुरवणी मागणीमध्ये मांडलेल्या विषयांचा आपण संबंध जोडून ते व्यवस्थितपणे मार्गी लागेल अशीच आमची सुध्दा शासनाकडून अपेक्षा असते.

सभापती महोदय, मी विधी व न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 120 वरील बाब क्रमांक 132 च्या संदर्भात बोलणार आहे. धर्मादाय आयुक्तांच्या विभागीय कर्मचारीवर्गासाठी 773 नव्याने निर्माण केलेल्या पदांच्या संदर्भात पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. ही मागणी अतिशय आवश्यक आहे. रावते साहेब मला थोडे अडवतील पण एनजीओ म्हटले की लवकर कळते म्हणून मी एनजीओ असा उल्लेख करतो. राज्यामधील ज्या एनजीओ आहेत त्यातील बहुतांश संस्था चांगल्या असून या संस्था समाजोपयोगी कामे करीत असतात. मग ते शिक्षणाचे काम असेल, आरोग्याचे काम असेल, अशा विषयांसंबंधी ज्या ठिकाणी शासन पोहचू शकत नाही, पुरे पडू शकत नाही त्या ठिकाणी या सर्व बाबतीत आपण पूरक व्यवस्था करावी अशी त्यांची या मागची भूमिका असते आणि त्याचे नियंत्रण करणारे राज्याचे प्रमुख ठिकाण म्हणजे धर्मादाय आयुक्त आहेत.

सभापती महोदय, एकूण परिस्थिती बघितली तर या धर्मादाय आयुक्तांच्या कारभारामध्ये आणि त्यांना दिलेल्या अधिकारांमुळे ते गतिमान आहेत किंवा नाही, काही खात्यांच्या बाबतीत हल्ली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. हेमंत टकले ......

असे झाले आहे की, तुम्ही सहजपणे सामान्य नागरिक म्हणून त्या ठिकाणी गेलात तर तुम्हाला तेथे काहीच मिळणार नाही. एक यंत्रणा तयार होते, त्यांच्याकडे जाणारे मध्यस्थ तयार होतात आणि खालच्या पातळीपासून वरच्या पातळीपर्यंत एखादी क्षुल्लक गोष्ट जरी राहिली आणि कोणाला त्रास द्यावयाचा असेल तर अडवणुकीचे धोरण घेतले जाते.

सभापती महोदय, आपण नव्याने पदे निर्माण करीत आहात ही गोष्ट अतिशय चांगली आहे परंतु एकूणच धर्मादाय आयुक्तांचा कारभार, त्यांच्या विभागीय कर्मचाऱ्यांच्या बसण्याची सोय, त्या ठिकाणी असलेली साधनसामुग्री हे पाहता जिल्हा पातळीवर काही ठिकाणी तर अशी अवस्था आहे की, तेथील क्लार्कला बसण्यासाठी खुर्ची आहे पण तुम्ही कामासाठी त्याच्यासमोर गेलात तर तुम्हाला बसण्यासाठी खुर्ची नसते. त्यांच्याकडे तेवढ्या खुर्च्याच नाहीत. त्यांच्याकडे पुरेशी स्टेशनरी नाही. कित्येक वेळेला संस्थांना असे सांगितले जाते की, आम्हाला अमुक कागदांचे काही रोल्स पाठवा, आमच्याकडे बॉलपेन्स नाहीत ते तुम्ही पाठवा. अशा प्रकारच्या मागण्या त्यांच्याकडून होतात. माझी अशी माहिती आहे की, पूर्वी सर्व संस्थांकडून निधी घेतला जात असे. तो जमा झालेला निधी फार मोठ्या प्रमाणावर अजूनही शिल्लक आहे. त्यामुळे नव्या पदांच्या निर्मितीबरोबरच तेथील प्रशासकीय यंत्रणा अधिक चांगली करण्यासाठी जर धर्मादाय आयुक्तांकडे निधी उपलब्ध असेल तर त्याचाही योग्य वापर आपण या निमित्ताने करुन घेतला पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पृष्ठ क्र.160 वरील बाब क्र.134 वर मी बोलतो. या मागणीद्वारे मध्यवर्ती मनोरुग्णालयासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. आपल्या राज्यातील एकूण मनोरुग्णालयांची अवस्था पाहिली तर आश्चर्याचा धक्का बसेल. या रुग्णालयांची श्रेणी बदलण्याची चर्चा करतो. सध्या सामाजिक व्यवस्थेमध्ये मनोरुग्णांचे प्रमाण वाढत चालले आहे. त्यामुळे असलेली मनोरुग्णालयांची स्थिती चांगली केली पाहिजे. ज्या ठिकाणी शक्य असेल तेथे किंवा विदर्भात किंवा मराठवाड्यात मध्यवर्ती ठिकाणी नवीन मनोरुग्णालय बांधावे अशी माझी शासनाला विनंती आहे.

राज्यातील सर्व विभागांमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे विभागीय संदर्भ सेवा केंद्रे सुरु केलेली आहेत. परंतु माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री किंवा माननीय राज्यमंत्री दौऱ्यावर जात असतील त्यावेळी त्यांना कोणते ना कोणते शिष्टमंडळ विभागीय केंद्राच्या नाकर्तेपणाबद्दल सांगत असतील. तेथे पुरेसा कर्मचारी, मशिनरी आणि डॉक्टर्सही नाहीत. ती केवळ संदर्भ केंद्रे आहेत. प्रत्येक जिल्ह्यात हुतात्मा स्मारके उभी राहिली आहेत त्या प्रमाणे या संदर्भीय सेवा केंद्रांची अवस्था होऊ नये अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

राज्याच्या अपंगांच्या पुनर्वसनाचा विषय शासनाने त्यात घेतलेला आहे. त्यासाठी तरतूद वाढविली पाहिजे अशी माझी विनंती आहे. साथीच्या रोगावर नियंत्रण ठेवण्याचा महत्वपूर्ण कार्यक्रम आहे. हा विषय मी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे मांडणार आहे. परंतु केंद्र सरकारच्या संस्थेने दोन वर्षापूर्वी भरारी पथकासारखे इंटेलिजन्स युनिट स्थापन केलेले आहे. त्याचा कारभार राज्यात सुरु आहे. नेहमी येणाऱ्या साथीच्या रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी निधी देणे शक्य असेल तर शासनाने विचार करावा.

यानंतर मी पृष्ठ क्र.203 वरील बाब क्र.217 वर बोलतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर साधनसामुग्री प्रकाशन समितीसाठी ही तरतूद केलेली आहे. हे काम खूप दिवसापासून सुरु आहे. हा विषय उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत येतो. यासाठी 43 लाख रुपयांची मागणी केलेली आहे. हे प्रकाशन जनतेसमोर लवकरात लवकर जाणे गरजेचे आहे. याकडे शासनाने अधिक लक्ष दिले पाहिजे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.हेमंत टकले....

अल्पसंख्याकांच्या शाळांना सुविधा देण्याबाबतची एक मागणी करण्यात आलेली आहे. एकूण अल्पसंख्याक लोकसंख्येचा विचार करता ही मागणी अपुरी पडणार आहे. त्यामुळे या मागणीमध्ये वाढ करण्याचा जरुर विचार करावा.

शालेय शिक्षण विभागाच्या अंतर्गत पृष्ठ क्र.260 वर बाब क्र.279 नमूद केलेली आहे. स्पर्धा परीक्षांसाठी मुलींसाठी मोफत मार्गदर्शन करण्यासाठी ही मागणी केलेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने आयआयटी, जेईई, आंतरराष्ट्रीय ऑलिंपियाड अशा प्रकारच्या शिक्षणाच्या प्रगतीच्या वाटा आहेत. त्या खुल्या करुन देण्यासाठी शासनाने लायक विद्यार्थीनींसाठी अधिक तरतूद करावी.

यानंतर बाब क्र.45, बाब क्र.62 वर मी बोलतो. अवर्षणग्रस्त खेड्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ करण्याचा शालेय शिक्षण विभागाने चांगला निर्णय घेतला आहे. शासनाने विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेऊन ही तरतूद केलेली असावी. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

यानंतर सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्र.14 वर मी बोलतो. स्व.वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्षासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 16:30

श्री. हेमंत टकले...

मला वाटते या 100 कोटी रुपयाचा उपयोग करुन स्व. वसंतराव नाईक यांनी त्यांच्या उमेदीच्या कारकिर्दीमध्ये जे काही काम केलेले आहे, त्याची रचनात्मक मांडणी सबंध राज्यात कशी होईल हे पहावे. आपल्याला हे पैसे एका वर्षात फक्त खर्च करुन टाकायचे आहेत असे न समजता, हे शंभर कोटी रुपये स्व. वसंतराव नाईक यांच्या नावाने आपली इन्व्हेस्टमेण्ट असून तिच्यातून होणारा प्रसार अधिक मोठा कसा होईल या दृष्टीने आपण काम करायला पाहिजे अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, एक अत्यंत समाधानाची बाब म्हणजे आपल्या पुरवणी मागण्यामध्ये ज्याचा सर्वात शेवटी नंबर लागतो त्या मराठी भाषा भवनासाठी आपण 11 कोटी रुपयाची तरतूद केल्या बद्दल मी शासनाचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. त्याच प्रमाणे गोरेगावची चित्रनगरी, कोल्हापूरची चित्रनगरी मार्गी लागण्यासाठीची तरतूद देखील खूप समाधान देणारी वाटते. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेला देऊ केलेला निधी नाटय विभागासाठी महाराष्ट्रामध्ये नवीन दालन उघडेल असा मला विश्वास वाटतो. स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या चित्रपट निर्मितीसाठी अधिकचा निधी उपलब्ध करुन दिला त्याबद्दलही आपल्याला धन्यवाद देतो. साहित्य कला क्षेत्रातील मान्यवरांची नवीन यादी आपणाकडे आलेली आहे. त्यासाठी 57 लाख रुपयाची तरतूद केलेली आहे. ही यादी परिपूर्ण नाही. या यादीमध्ये अजून अनेकांचा समावेश होण्याची शक्यता आहे. ही तरतूद वाढवून दिली जाईल आणि साहित्य, कला आणि संस्कृतीमध्ये काम केलेल्या वृद्धांना एक चांगला दिलासा आपणाकडून दिला जाईल अशी अपेक्षा मी बाळगतो आणि मी केलेल्या सर्व सूचनांचा माननीय मंत्री महोदयांनी विचार करावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय सन 2013-2014च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पूरक मागण्यांना मान्यता मागताना सरकारची अशी अपेक्षा असते की या सर्व गोष्टींसाठी सदनाने सरकारवर भरवसा ठेवावा, ज्या गोष्टींसाठी सरकारने तरतूद केलेली आहे ती कमी पडते, किंबहुना जास्त तरतूद हवी म्हणून त्याचे समर्थन करुन पूरक मागण्यांना मान्यता घेण्यासाठी शासन सदनासमोर येते. त्यामुळे स्वाभाविकच आमची अशी अपेक्षा असते की, सरकारने दिलेले जे लॉजिक आहे, जी कारणे आहेत ती सरकारने स्पष्ट करावीत यासाठी आम्ही या ठिकाणी प्रश्न उपस्थित करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 4, पृष्ठ क्रमांक 6- Additional provision for expenditure of revision and printing Electoral Roll यासाठी जवळ जवळ 41 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. हे इलेक्टोरल रोल रिप्रिंट आणि नव्याने करण्यात येणार आहेत. मुंबई शहरामध्ये एकेका लोकसभा क्षेत्रामध्ये 43 हजार नावे डबल प्रिंट झालेली आहेत. वांद्रे (पश्चिम) सारख्या एका विधानसभा क्षेत्रात 28 हजार नावे कट किंवा रिप्रिंट होतात. आपल्या विधानसभा क्षेत्रामध्येही तीच स्थिती असेल. 41 कोटी रुपये खर्च करुन फॉल्ट नसलेली, प्रिंटींग केलेली नवीन इलेक्टोरोल होणार आहे काय ? किंबहुना त्याचा स्टेटस रिपोर्ट सरकारला द्यावा अशी माझी मागणी आहे.

नगरविकास विभाग, बाब क्रमांक 67, पान क्रमांक 50 - Dalitvasti Scheme in Municipal Council यासाठी 176 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. जेव्हा आपण ॲडिशनल प्रोव्हिजन करतो त्यावेळी यासाठी मूळ तरतूद किती होती ? दलितवस्त्यांसाठी द्याव्या लागणा-या योजनांची आठवण आपणास बजेटनंतर का झाली ? ही आठवण बजेटच्या वेळी का झाली नाही ? बजेट तयार करताना महाराष्ट्रातील दलितवस्त्यांचा आपणास विसर का पडला ? या प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांनी द्यावीत.

बाब क्रमांक 68. Provision for fees for Special Cousel for pleading on behalf of Government- यासाठी 1 कोटी 81 लाख रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. आदर्शची केस वरच्या कोर्टामध्ये उभी करण्यासाठी 1 कोटी 81 लाख रुपयाची तरतूद केलेली आहे. या आदर्श केसमध्ये सरकार केन्द्र सरकार विरुध्द लढत आहे.

...नंतर श्री. गिते...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार.....

डिफेन्स आणि सी.बी.आय.चा जो दावा आहे. महाराष्ट्र सरकारला तो दावा खोडून काढण्यासाठी 1 कोटी 81 लाख रुपये हवे आहेत. केंद्र सरकारचा दावा खोडून काढण्यासाठी अजून किती निधी लागणार आहे यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

सभापती महोदय, नगरविकास विभागाची बाब क्रमांक 69, पृ.क्र.51 च्या अनुषंगाने मी बोलतो आहे. स्टॅम्प डयूटीवर 1 टक्का सरचार्ज वाढवून एलबीटी घालविण्याचा प्रस्ताव असून त्यासाठी प्रोव्हीजन करण्यात आली आहे. महाराष्ट्रात 1 टक्का स्टॅम्प डयूटी वाढवून राज्य सरकारच्या तिजोरीत किती निधी आला आणि त्याचे वितरण महाराष्ट्र शासन राज्यातील महानगरपालिका आणि नगरपालिकांना किती दिवसात करणार आहात याचे उत्तर संबंधित मंत्री महोदयांकडून येणे अपेक्षित आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 51, बाब क्रमांक 71 च्या अनुषंगाने मी माझे विचार व्यक्त करीत आहे. महानगरपालिका क्षेत्रामध्ये मूलभूत सोयी-सुविधांच्या विकासाकरिता 232 कोटी रुपयांची पुरवणी मागणी सभागृहासमोर मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे. मुंबई शहरापूरते बोलावयाचे झाले तर पी.डब्ल्यू.डी., एमएसआरडीसी, एमएसआरटीसी, एमएमआरडीए ही राज्य सरकारची चार प्राधिकरणे मूलभूत सोयी-सुविधा देण्याचे काम करतात. या चारही प्राधिकरणांनी गेल्या चार वर्षात मुंबई शहरात खड्डे भरण्याच्या कामासाठी 350 कोटी रुपये खर्च केले आहेत. मूलभूत सोयी सुविधांसाठी 232 कोटी रुपयांची प्रोव्हीजन पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून करण्यात आली आहे. गेल्या चार वर्षात या चार प्राधिकरणांनी खड्डे बुजविण्यासाठी 350 कोटी रुपये खर्च केले आहेत. खड्डे बुजविण्याच्या कामासाठी राज्य शासन काही सर्वंकष पॉलिसी जाहीर करणार आहे काय, मुंबई शहरामध्ये डिफर पेमेंटवर रस्ते करणार आहात काय, राज्य सरकार मोठया ठेकेदारांचा समावेश करण्यासाठी मोठया योजना तयार करणार आहे काय ? मुंबई शहरातील नागरिकांना आजही हायवेवरुन जाताना खड्डयांचा सामाना करावा लागतो आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे येणे अपेक्षित आहे. मुंबई शहरामध्ये रेडी मिक्स कॉक्रीटचे प्लॅन्ट मोठया प्रमाणात सुरु आहेत. मी या बाबतीत दोनच उदाहरणे देणार आहे. पर्यावरण विभागाचा क्लिअरन्स नाही, एमपीसीबीचे नॉर्मस् फॉलो केले नाहीत. लाफार्ज अँड नवनीत कंपनीचा एक प्लॅन्ट एलबीएस भांडूप (पश्चिम) येथे चालू आहे. यांनी पर्यावरण विभागाच्या ॲक्टचे व्हायलेशन केले आहे. त्यांनी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

एमपीसीबीच्या नॉर्म्सचे व्हायलेशन केले आहे. दुसरा प्लॅन्ट एससीसी आणि अट्रॉ ट्रेकचा असून देवनार पोलीस स्टेशनच्या समोर कार्यरत आहे. दोन्ही नॉर्म्स् न फॉलो करणाऱ्या या कंपन्यांवर राज्य शासन कारवाई करील काय ?

सभापती महोदय, वित्त विभागाची बाब क्रमांक 73, पृ.क्र.56 च्या संदर्भात सांगू इच्छितो की, ही बाब अतिशय महत्वाची आहे. कन्सल्टंट बजेट बनविण्यासाठी कन्सल्टंट हवेत म्हणून पुरवणी मागणीच्या माध्यमातून प्रोव्हीजन मागितलेली आहे. माझ्याकडे माहिती आहे आणि पेपर्स सुध्दा उपलब्ध आहेत. आपल्याकडे जास्त पैसे येतील कसे आणि जास्त पैसे वाचतील कसे असे बजेट कन्सल्टंट आपण अपेक्षित करीत असतो. कन्सल्टंटसाठी प्रोव्हीजन मागितली आहे. महाराष्ट्राच्या आमदानीत घट कशी होते आहे या बाबतची शासनाने माहिती घेतली पाहिजे. कन्सल्टंटचे ॲडव्हाईस नीटपणे चाललेले नाही असे माझे स्पष्ट मत आहे.

सभापती महोदय, मोलायसेस एक्सपोर्ट या राज्यात मोठ्या प्रमाणात चालू आहे. डोमेस्टीक मार्केटमध्ये मोलायसेस नाही. केमिकल इंडस्ट्रीला मोलायसेस नाही. 7 हजार कोटी रुपये एक्साईज मधून मिळतात. परंतु आपल्या कन्सल्टंट मोलायसेस एक्सपोर्ट करण्याचे ॲडव्हाईस देतात. मोलायसेस एक्सपोर्टमुळे जवळ जवळ 2 हजार कोटी रुपयांचा घाटा राज्य सरकारला होतो आहे. शासनाचे बजेट कन्सल्टंट काय करता असा आमचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 143, बाब क्रमांक 171-महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा,स्वच्छता व पुर्नविकास) न्यायाधिकरणाच्या कार्यालयाकरिता पुरवणी मागणी सभागृहासमोर मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे. माझ्या हातात पेपर्स आहेत. मी कांदिवली येथील विषय मांडणार आहे. त्या विषयाबाबतची माहिती सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना असेल. माझ्याकडे 3 के ची ऑर्डर आहे. एका विकासकाला एमएमआरडीएची जमीन 100 एकरची म्हणजे 1 लाख स्केअर फुटाची खुली जागा दिली. राज्य सरकारने ही जागा एसआरएसाठी दिली. त्या जमिनीची किंमत जवळ जवळ 50 कोटी रुपये एवढी आहे. त्यास ॲप्रूव्हल दिले, त्या विकासकाला एफएसआय आणि कन्सेशन दिले गेले. त्यातून तो विकासक 15600 कोटी रुपयांचा प्रॉफीट खेचू शकतो.

3...



ABG/ KTG/ D/ 16:35

**उप सभापती** : आपला या बाबतीत खूप खोलवर अभ्यास आहे. मी आपला अभ्यास ॲप्रीसिएट करतो.

ॲड.आशिष शेलार : मी या बाबतीत माननीय मुख्यमंत्री महोदयांना दिनांक 7 मार्च, 2013 रोजी पत्र दिलेले आहे. सभापती महोदय, आपण माझे म्हणणे ऐकून घेत आहात त्याबद्दल मी आपला आभारी आहे. आमची इच्छा आहे की, या संदर्भात आपण सरकारला आदेश द्यावेत.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार.....

3 के कलम अंतर्गत कांदिवलीतील हनुमान नगर येथील प्रकल्पामध्ये बिल्डरला जर 15 हजार कोटी रुपयांचा फायदा होत असेल तर राज्य सरकारला त्यातून काय मिळणार आहे हे सभागृहात स्पष्ट झाले पाहिजे. मी माननीय मुख्यमंत्र्यांना या संदर्भात पत्र दिले आहे, परंतु मला अजून लेखी उत्तर आलेले नाही.

सभापती महोदय, याच धर्तीवर माननीय मंत्री श्री.नसीम खान यांच्या मतदारसंघात देखील 1875 एकर जागेचा मुद्दा आहे. एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडियाच्या 1875 एकर जागेवर 7075 झोपड्या उभारल्या गेल्या आहेत. मुंबई शहरात एअरपोर्टच्या 276 एकर जागेवर अतिक्रमणे झालेली आहेत. मुंबईच्या एअरपोर्टकरिता एमएआयएल कंपनी स्थापन झाली आहे. या कंपनीने एचडीआयएल कंपनीला पुनर्वसनाकरिता घरे बांधण्याचे कॉन्ट्रॅक्ट दिले आहे. एचडीआयएल कंपनीने 7000 घरे बांधली आणि 18 हजार घरे बांधण्याचे काम सुरु आहे. असे असताना एमएआयएलने कॉन्ट्रॅक्ट रद्द केला आहे. त्यामुळे एअरपोर्ट ॲथॉरिटीच्या भूखंडावरील झोपडीधारकांनी आता जायचे कुठे? त्यांचे पुनर्वसन कोण करणार आहे? एचडीआयएल कंपनीने 4000 कोटी रुपयांचा दावा राज्य शासनाविरुध्द दाखल केला आहे. झोपड्यांचे पुनर्वसन होणार नाही, झोपडीधारकांना पर्यायी घरे मिळणार नाही, उलट 4000 कोटी रुपये मिळावे म्हणून बिल्डर कंपनीने दावा दाखल केला आहे. राज्य सरकारने याबाबत स्पष्टीकरण द्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्र.174, सार्वजनिक आरोग्य विभाग. एनआरएचएमच्या वेबसाईटवर राज्य सरकारची स्थिती काय आहे? पब्लिक हेल्थबाबत काय स्थिती आहे? महाराष्ट्रात 1.70 लाख लोकसंख्येमागे एक कम्युनिटी हेल्थ सेंटर आहे. जवळजवळ 727 चौ.कि.मी.क्षेत्र एका कम्युनिटी हेल्थ सेंटरच्या क्षेत्रात येते आणि 120 गावांचा त्यामध्ये समावेश होतो. महाराष्ट्रात एकूण 363 कम्युनिटी हेल्थ सेंटर्स असून त्यापैकी 20 कम्युनिटी हेल्थ सेंटर्स इंडियन पब्लिक हेल्थ स्टॅण्डर्ड प्रमाणे आहेत. मंत्री महोदयांनी याबाबत स्पष्टीकरण द्यावे अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

---

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2013-14 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.142, बाब क्र.155. दलित वस्त्यांची सुधारणा करण्यासाठी पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. आपणा सर्वांना कल्पना आहे की, गावोगावी फिरताना सर्वत्र कार्यकर्त्यांची तक्रार असते की, प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये दलित वस्ती विकासाची जी कामे केली जातात त्याकरिता 15 टक्के रक्कम राखीव ठेवलेली असते.

नंतर 3एच.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापती स्थानी तालिका सभापती श्री.किरण पावसकर)**

ॲड.जयदेव गायकवाड....

परंतु, प्रत्यक्षात ही 15 टक्के रक्कम खर्च होत नाही असे विदारक सत्य सातत्याने लक्षात येत आहे. मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, राज्यातील संपूर्ण ग्रामपंचायतीचा आढावा घ्यावा आणि 15 टक्के रक्कम दलित वस्तीच्या विकासासाठी खर्च होते की नाही हे पहावे. सदर रक्कम खर्च होत नसेल तर त्या ग्रामपंचयातीवर आपण कोणती कारवाई करणार आहात ? अशा प्रकारची कारवाई झाली नाही तर मग रक्कम खर्च होणारच नाही.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सहकार कायद्यातील दुरूस्तीबाबत

**मु.शी.**: सहकार कायद्यातील दुरूस्तीबाबत माननीय सहकार मंत्र्यांचे निवेदन

श्री.हर्षवर्धन पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील....

सभापती महोदय, या राज्यामध्ये वारंवार संभ्रमाची परिस्थिती निर्माण होत होती. दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीचे प्रतिवृत्त आजच आम्ही खालच्या सभागृहाच्या पटलावर ठेवत आहोत. त्यानंतर यावर चर्चा होईल. ज्या चार महत्त्वाच्या बाबी आहेत त्या मी या निवेदनाच्या माध्यमातून स्पष्ट करीत आहे. दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीचा मसुदा मान्य झालेला आहे. गिलोटीन झाल्यानंतर हे बिल पुर:स्थापन करण्यासाठी मी कामकाज पत्रिकेमध्ये दाखविलेले आहे. या बिलावर खालच्या सभागृहात चर्चा झाल्यानंतर हे बिल या सभागृहात याच अधिवेशनाच्या कालखंडामध्ये चर्चेसाठी घेण्यात येईल. या निवेदनाच्या प्रती सर्व सन्माननीय सदस्यांच्या टपाल खणामध्ये टाकण्यात येतील.

.......

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: सन 2013-2014 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा**

(चर्चा पुढे सुरू.....

ॲड्.जयदत्त गायकवाड : सभापती महोदय, मी दलितवस्ती सुधारणा संबंधात चर्चा करीत होतो. दलितवस्ती विकासासाठी 15 टक्के रक्कम असते. ती रक्कम खर्च केली जात नाही याकडे मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधत होतो. याकडे माननीय मंत्री महोदयांनी लक्ष देण्याची गरज आहे.

आता मी पान क्र.187 वरील बाब क्रमांक 193 वर बोलणार आहे. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भारतीय व राज्य प्रशासकीय सेवेची संधी प्राप्त करून देण्यासाठी पुरवणी मागणी करण्यात आली आहे.

या पुरवणी मागणी द्वारे आदिवासी विद्यार्थ्यांना, तरुणांना केंद्रीय व महाराष्ट्र पातळीवरील प्रशासकीय सेवेसाठी तयार करण्याबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत. शासकीय आमश्रशाळेमध्ये अनुसूचित जाती व जमातीचे विद्यार्थी शिकत असतात. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना कपडे, जेवण ह्या ज्या सुविधा मिळतात त्या सुविधा अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मिळत नाही अशा प्रकारचा माझा अनुभव आहे व कार्यकर्त्यांच्या तक्रारी देखील आहेत. आदिवासी ज्या भागात राहतात त्या आदिवासी भागामध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना सवलती मिळणार आहेत की, नाही हा प्रश्न अनेक वर्षापासून माझ्या समोर येत आहे. तो मी आपल्या माध्यमातून सभागृहा पुढे मांडू इच्छितो.

यानंतर 3 J-1 श्री.अजित यांच्याकडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड...

एक विदारक सत्य आहे की, आदिवासींची घरे डोंगरभागामध्ये असतात. तेथे आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणात असते. त्या ठिकाणी अनुसूचित जाती जमातीच्या लोकांची एक--दोन घरे असतात त्यामुळे अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना सवलती मिळत नाहीत. तेव्हा मी ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे. तेव्हा आदिवासी भागातील अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना मदत मिळण्याबाबत माननीय सामाजिक न्याय मंत्री आणि माननीय आदिवासी विकास विभाग मंत्री यांनी दखल घ्यावी अशी माझी विनंती आहे.

बाब क्रमांक 183, पृष्ठ क्रमांक 176 - वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग- कंत्राटी खर्च भागविण्यासाठी पुरवणी मागणी मागितलेली आहे. मी या चर्चेच्या निमित्ताने एका बाबीकडे लक्ष वेधू इच्छितो की, पुणे येथील ससून रुग्णालयात चतुर्थश्रेणीची 300 पदे रिक्त आहेत. ही 300 पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याचा शासनाचा मानस दिसतो. शासन कंत्राटी पध्दतीने पदे भरुन चतुर्थश्रेणी वर्गातील कर्मचाऱ्यांना नोकरीपासून वंचित ठेवणार आहे काय याबाबत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा अशी मागणी करुन माझे भाषण पूर्ण करतो.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

पृष्ठ क्रमांक 51,बाब क्रमांक 71 - नगर विकास विभाग - मुंबई शहर आणि उपनगरातील मैदाने व उद्याने दत्तक योजनेंतर्गत दत्तक घेण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतलेला आहे. त्यामुळे सर्वसामान्य, वयोवृध्द व मुले मैदाने व उद्यानांपासून वंचित राहत आहेत. तेव्हा दत्तक दिलेली मैदाने व उद्याने महानगरपालिकेने त्वरित परत घेण्याचा निर्णय घ्यावा अशी माझी मागणी आहे.

पृष्ठ क्रमांक 215, बाब क्रमांक 222- पर्यावरण विभाग - मुंबईत शिवडी, वांद्रे,वरळी, माहीम, सायन, रेवा किल्ला,धारावी काळा किल्ला आदी किल्ले असून या किल्ल्यांकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्यामुळे त्या ठिकाणी अतिक्रमणे झालेली आहेत. तेथील अतिक्रमणे हटवून किल्ल्यांचे जतन करावे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यात समुद्रात सिंधुदुर्ग किल्ला आहे. या किल्ल्यास माहे एप्रिल 2013 मध्ये 243 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल या किल्ल्याची विशेष देखभाल व तेथे रोषणाई करण्याचा निर्णय शासनाने घेतला. पण त्या संदर्भात आजतागायत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. तेव्हा सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या देखभालीसाठी आणि तेथे रोषणाई करण्यासाठी निधीची तरतूद करावी.

पृष्ठ क्रमांक 219, बाब क्रमांक 229 अल्पसंख्याक विकास विभाग - मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ व वक्फ बोर्डाचा कारभार गतिशील करण्यासाठी 106 पदे तातडीने भरण्याचा निर्णय दोन वर्षापूर्वी घेण्यात आला होता. परंतु आजतागायत ही पदे भरलेली नाहीत. तेव्हा या पदांसाठी निधीची तरतूद करुन ही पदे लवकर भरावीत अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने एक क्रांतिकारी निर्णय घेतलेला आहे पण तो निर्णय भयानक आहे. शासनाने एक परिपत्रक काढलेले आहे की, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, विशेष मागासवर्ग प्रवर्ग, इतर मागासवर्गतील कर्मचाऱ्यांनी अद्याप जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले नसेल अशा कर्मचाऱ्यांनी दिनांक 31 जुलै पर्यंत तसा अर्ज करावा. जे कर्मचारी 31 जुलै पर्यंत अर्ज करणार नाहीत अशा सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना सेवेतून मुक्त केले जाणार आहे. निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे निवृत्त वेतन रद्द होणार आहे. 15-15



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण.....

वर्षापूर्वी निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सुध्दा ही अट लागू आहे. मुख्य सचिवांच्या समितीने हा निर्णय घेतलेला आहे. खरे म्हणजे हा निर्णय सरकारने घेतला पाहिजे. मुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री आणि सामान्य प्रशासन विभाग यांनी त्या संदर्भात विचार विनियम करुन ते परिपत्रक त्वरित मागे घ्यावे अशी विनंती आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण.....

महोदय, सामाजिक न्याय विभागाची बाब क्रमांक-160, पृष्ठ क्रमांक-144 वर मी बोलतो. महोदय, राज्यात वसतिगृहे बांधण्याचा निर्णय होऊन सुध्दा वसतिगृहे बांधण्याचे काम प्रलंबित आहे. या निमित्ताने मी मागणी करतो की, या वसतिगृहांच्या बांधकामासाठी त्वरित निधीची तरतूद करुन शासनाने या समाजाच्या वसतिगृहांचा प्रश्न तातडीने सोडवावा.

महोदय, वस्त्रोद्योग विभागाची बाब क्रमांक-231, पृष्ठ क्रमांक-220 वर मी बोलतो. केंद्र सरकारने राज्यात 15 टेक्सटाईल पार्क उभारण्यास मंजुरी दिली आहे. परंतु अजूनपर्यंत ते उभारण्यात आलेले नाहीत. या कामासाठी त्वरित निधीची तरतूद करुन लवकरात लवकर टेक्सटाईल पार्क उभारण्यात यावे, अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

महोदय, सांस्कृतिक कार्य विभागाची बाब क्रमांक 226, पृष्ठ क्रमांक 216 वर मी बोलत आहे. साहित्य, कला व आर्थिक सहाय्य या बाबतची ही मागणी आहे. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रकाशित न झालेले ग्रंथ, टिप्पणे, नोंदी, लेखी सल्ले, चळवळीशी संबंधित असलेले दस्तऐवज, संदर्भ विषयक लेखन आणि छायाचित्रे या सर्व चरित्र साधनाचे प्रकाशन करण्याची गरज आहे. हे प्रकाशन त्वरित करण्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी मागणी करतो.

महोदय, नाट्य, तमाशा, संगीत महोत्सवाशी संबंधित असलेल्या बाब क्रमांक 223, पृष्ठ क्रमांक-215 वर मी बोलतो. कोकणात दशावतारी कलाकार होते. परंतु ते आता वयोवृध्द झाले आहेत. त्यांचे मानधन वाढविण्याची मी मागणी केली आहे. त्यांचे मानधन 3 हजार रुपयांपर्यंत करावे आणि त्यासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी या पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो व येथेच थांबतो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, सन 2013-14 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाची बाब क्रमांक 174 वर मी प्रथम बोलणार आहे. या ठिकाणी माननीय सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री बसलेल्या आहेत. मी त्यांना नेहमीप्रमाणे खेड तालुक्यातील कळभणी रुग्णालयाबाबतचा प्रश्न विचारतो. कळभणी रुग्णालयाच्या बाबतीत माननीय राज्यमंत्र्यांनी गेल्या तीन अधिवेशनात उत्तर दिले होते. या निमित्ताने मी त्यांना विचारतो की, कळभणी रुग्णालयाचे आय.सी.यु. युनिट सुरु झाले आहे काय, या बाबतची माहिती त्यांनी उत्तराच्या भाषणात द्यावी. या रुग्णालयाच्या संदर्भातील प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी असे सांगितले होते की, कळभणी रुग्णालयासाठी आवश्यक ते डॉक्टर मिळत नाहीत. मी त्यांना विचारतो की, निदान आता तरी तुम्हाला डॉक्टर मिळाले आहेत काय ? सभापती महोदय, शासनकर्त्यांना डॉक्टर मिळत नसतील तर संबंधित मंत्री महोदयांनी राजीनामा देऊन बाजूला झाले पाहिजे. सरकार चालविण्याचा तुम्हाला नैतिक अधिकार नाही. आपण एकप्रकारे जनतेच्या जीवाशी खेळत आहात. या सभागृहात माननीय राज्यमंत्र्यांनी पाच वेळा आश्वासन दिले होते. खेड तालुक्यातील कळभणी या डोंगरी भागातील रुग्णालयाला न्याय मिळवून देण्यासाठी मी सभागृहात सतत भांडत आहे. मध्यंतरी त्या ठिकाणी वरिष्ठ डॉक्टरांची टीम पाठविली होती. त्यांनी तेथील पाहणी केली. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, कळभणी येथील आय.सी.यु. युनिट का सुरु होत नाही आणि त्या ठिकाणी आवश्यक ते डॉक्टर्स का मिळत नाहीत ? मी तर म्हणेन की, माननीय राज्यमंत्र्यांनी त्या ठिकाणी भेट द्यावी. शिवाय सोबत आपली यंत्रणा घेऊन जावी. पुढील अधिवेशनात मला पुन्हा हा विषय उपस्थित करावा लागणार नाही या दृष्टिकोनातून आपण योग्य ती कार्यवाही करावी, अशी मी या पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने विनंती करतो.

महोदय, सामाजिक न्याय विभागाची बाब क्र.155 वर मी बोलतो. या ठिकाणी माननीय आदिवासी विकास मंत्री आणि सामाजिक न्याय मंत्री नाहीत. ही पुरवणी मागण्यांवरील चर्चा असल्यामुळे त्यांनी उपस्थित राहावयास पाहिजे होते. मध्यंतरी मी सामाजिक न्याय मंत्र्यांविरुध्द हक्कभंगाचा प्रस्ताव दिला होता. त्या बाबत त्यांनी मला उत्तर पाठविले होते. ते उत्तर त्यांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी ते या ठिकाणी उपस्थित असावयास हवे होते. त्यांनी मला "डॉ.नरेंद्र

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

दाभोळकर यांच्या अंनिस संस्थेस परदेशातून पैसे मिळण्यासंदर्भात श्री.रामदास कदम यांनी दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना" या विषयावरील विशेषाधिकार भंगाच्या सूचनेवर उत्तर पाठविले होते. महोदय, अंधश्रध्दा निर्मूलन हे विधेयक सरकारने नव्हे तर डॉ.नरेंद्र दाभोळकर यांनीच आणले आहे. कारण ते स्वत:च सांगत आहेत की, हे विधेयक मी स्वत: आणले आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

हे कमी करुन टाका, ते कमी करुन टाका, यातून हे वगळा पण मी आणलेले बिल पास करा असे ते म्हणतात. मी संबंधित मंत्री महोदयांना विचारले होते की, ते परदेशातून पैसा आणून या देशामध्ये, या महाराष्ट्रामध्ये अस्थिरता निर्माण करतात का ? त्यावेळी त्यांनी मला 'नाही' असे उत्तर दिले होते. म्हणून मी संबंधित मंत्री महोदयांविरुध्द विशेष हक्क भंगाची सूचना दिली होती. विशेष हक्क भंगाची सूचना दिल्यानंतर त्यांना वस्तुस्थिती कळली.

सभापती महोदय, त्या विशेषाधिकार भंगाच्या संदर्भात त्यांनी मला जे उत्तर दिले आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, "अंधश्रध्दा विधेयकासंदर्भात श्री. रामदास कदम, विधान परिषद सदस्य यांनी विधान परिषदेत सन 2011 च्या पावसाळी अधिवेशनात उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यांवर विशेषाधिकार भंगाच्या सूचनेसंदर्भातील प्रकरणाची वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे.

डॉ. नरेंद्र दाभोळकर यांची 'अंनिस' नावाची संस्था असून त्या समितीच्या माध्यमातून सभागृहात अंधश्रध्दा निर्मूलन विधेयक आणण्याचा प्रयत्न झाला होता. डॉ. दाभोळकर यांनी या संदर्भात एक पुस्तक लिहिलेले असून त्यात त्यांनी त्यांच्या संस्थेला विदेशातून फंड किंवा अनुदान मिळत नसल्याचे नमूद केले आहे. याबाबत मा.श्री. रामदास कदम यांनी या संदर्भात माहितीच्या अधिकारातून माहिती घेतली असता डॉ. दाभोळकर यांच्या संस्थेकडे रु. 1,50,00,000/- इतक्या रकमेचा निधी जमा असून अद्यापही मोठ्या प्रमाणात परदेशातून पैसे मिळतात हे उघड झाले आहे. अशा प्रकारे परदेशातून पैसा घेऊन अंधश्रध्दा निर्मूलन हा कायदा या राज्यात करुन हिंदूच्या भावना भडकविण्याचा प्रयत्न केला जात आहे त्यामुळे सदर संस्था बंद करण्याबाबत श्री. रामदास कदम, विधान परिषद सदस्य यांनी उपरोक्त औचित्याच्या मुद्यांन्वये शासनास विनंती केली होती."

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. रामदास कदम : मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर मी वाचत आहे. ही माहिती माझी नाही. मंत्री महोदयांच्या उत्तरावर सन्माननीय सदस्यांची काय हरकत आहे हे मला माहीत नाही.

श्रीमती विद्या चव्हाण : असे पैसे मिळाले तर काय झाले ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : मंत्री महोदयांनी मला जे उत्तर दिले आहे ते मी वाचत आहे. त्या बाबतीत काय झाले हे आपण मंत्र्यांना विचारावे. सभापती महोदय, मला आपले संरक्षण पाहिजे. त्यांनी आपल्या पुस्तकामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, आम्हाला परदेशातून पैसे मिळत नाहीत. मी माहितीच्या अधिकारान्वये माहिती मागितली. त्यामध्ये हे उघड झाले आहे असे माननीय मंत्री म्हणतात.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "सदर प्रकरणी त्वरित आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे व पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडून माहिती मागवण्यात आली असता, आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी त्यांचे पत्रासोबत तत्कालीन पोलीस अधीक्षक, सातारा यांचा अहवाल पाठविला होता. सदर अहवाल पोलीस अधीक्षक सातारा यांनी त्या वेळेस त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या पुराव्याच्या आधारे पाठविला होता. सदर अहवालान्वये असे कळविले की, डॉ. नरेंद्र दाभोळकर यांची अंधश्रध्दा निर्मूलन ही संस्था सातारा जिल्ह्यात कार्यरत असून ती सन 1992 मध्ये धर्मादाय आयुक्त, सातारा कार्यालयात क्र.ई.-461 सातारा या क्रमांकाने नोंदणी करण्यात आली आहे. सदर समितीचा कागदोपत्री नोंद असलेला पत्ता 155, सदाशिव पेठ, पंचमुखी मंदिरासमोर, सातारा असा असून सध्याचा पत्ता परिवर्तन, सहयोग हॉस्पिटल, सदर बाजार, सातारा असा आहे. सदर संस्थेची सातारा जिल्ह्यात इतर ठिकाणी शाखा कार्यरत नसल्याची माहिती देण्यात आली आहे. सदर समितीस परदेशातून निधी मिळत असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नसल्यामुळे सदर समितीविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

ही वस्तुस्थिती मा. श्री. रामदास कदम, वि.प.स. यांना कळविण्यात आली. सदर माहिती चुकीची असल्याने त्यांनी महाराष्ट्र विधान परिषद नियम 240 अन्वये विशेष हक्क भंगाची सूचना विधान परिषदेत मांडली. अशा प्रकारच्या संस्थेची तपासणी व नियंत्रण धर्मादाय आयुक्ताचे अधिपत्याखाली असल्याने, त्यांचेकडून अधिकची माहिती पोलीस विभागाने प्राप्त केली असता, दाभोळकरांच्या संस्थेविषयी धर्मादाय आयुक्तांकडे सादर केलेल्या वार्षिक हिशेब पत्रकात (2007 ते 2010 पर्यंत) विदेशातून मिळणाऱ्या निधीची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आढळली.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अंनिस या संघटनेने फॉरेन कॉन्ट्रीब्युशन (रेग्युलेशन) ॲक्ट, 2010 नुसार दि. 19.10.2001 रोजी 083970034 अन्वये नोंदणी केलेली आहे तसेच सन 2006-07 मध्ये रु. 14,61,343/- व सन 2007-08 मध्ये रु. 2,35,635/- इतकी रक्कम घेतल्याचे कळविले.

या अधिकच्या माहितीच्या अनुषंगाने प्रकरण गृह विभाग व विधी व न्याय विभागाकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव पाठविण्यात आलेले आहे." हे उत्तर मला मंत्री महोदयांनी पाठविले आहे.

**( सभापती स्थानी माननीय उप सभापती )**

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, ज्या संस्थेची धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी झालेली आहे. त्याचे हिशोब देण्याची जबाबदारी त्या संस्थेवर आहे. त्या संस्थेने धर्मादाय आयुक्तांकडे हिशोब दिलेला आहे. कोणत्याही संस्थेला परदेशातून मदत मिळण्यापूर्वी केंद्र सरकारकडून विशिष्ट परवानगी घ्यावी लागते. ती परवानगी मिळाल्याशिवाय कोणतीही संस्था विदेशातून मदत घेऊ शकत नाही. त्या संस्थेने स्वत:हून त्यांच्याकडे आलेल्या सोर्सची माहिती धर्मादाय आयुक्तांकडे जाहीर केलेली आहे. त्याचा रितसर परवाना त्यांच्याकडे आहे. या संस्थेबाबत माहिती समोर आलेली आहे. त्यामध्ये लपवालपवीचा भाग नाही. त्यांनी जे जे आतापर्यंत केलेले आहे त्याचे सविस्तर विवरण धर्मादाय आयुक्तांना सादर करण्यात आलेले आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मागील वर्षाचा त्यांनी सी.ए.कडून ऑडिट रिपोर्ट घेतला आहे त्यामध्ये खाडाखोड केलेली आहे. अंधश्रध्दा निर्मूलन विधेयक शासन सभागृहासमोर चर्चेसाठी ठेवणार आहे. मी त्या विधेयकाची वाट बघत आहे. हे प्रकरण वाटते तेवढे सोपे नाही. त्यावेळी गृह विभागाला मी सर्व फाईल्स देणार आहे. श्री.निळू फुले हे या अंनिसचे सभासद होते. त्यांचे निधन होऊन काही वर्षे झालेली आहेत.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## सभागृहाच्या कामकाजाबाबत

**उप सभापती** : आताच माझ्याकडे एक महत्वाची माहिती आलेली आहे. दोन्ही रेल्वे मार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद पडलेली आहे. पुरवणी मागण्यांवरील चर्चा शक्यतो लवकर संपवावी अशी मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो. आपला कर्मचारी वर्ग लांबच्या ठिकाणाहून कामावर येतो. त्यांना आजचे कामकाज संपल्यानंतर उद्या सकाळी पुन्हा लवकर कार्यालयात यावयाचे आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आता ही चर्चा थांबवून उद्या सकाळी 10 वाजता सभागृहाची विशेष बैठक घेतली तरी चालू शकेल.

**उप सभापती** : याबाबत मी माननीय सभापतींशी बोललो आहे. त्यांनी मला सकाळी 10 ते 12 वाजेपर्यंत विशेष बैठक घेण्याची सूचना केली आहे. परंतु उद्या सकाळी रेल्वे वाहतूक उशिराने सुरु असल्यास काही सन्माननीय सदस्य आणि कर्मचारी वर्गाला येथे येण्यास उशीर होईल. त्यामुळे आपल्या शेडयुलप्रमाणे सभागृहाची बैठक सकाळी 11 वाजताच सुरु होईल.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

**पृ.शी./मु.शी.**: सन 2013-14 च्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

( चर्चा पुढे सुरु )

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, याबाबत विधी व न्याय विभागाने काय अहवाल दिला आहे त्याची शासनाने माहिती द्यावी. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले हे अभ्यासू सदस्य आहेत. त्यांना मी माझ्याजवळ असलेली सर्व माहिती देईन. त्यावेळी श्री.निळू फुले हे या समितीवर होते. त्यांचे सहा वर्षांपूर्वी निधन झालेले आहे. त्यांच्या मृत्यूचा दाखला कधी घेण्यात आला त्याची तारीख माझ्याजवळ आहे. त्यांची खोटी सही मला दाखविलेली आहे. आता वेळ कमी असल्यामुळे मला अधिक सविस्तर बोलण्यासाठी भाग पाडू नये.

आदिवासी विभागासंबंधी मी माहितीचा अधिकार या कायद्याद्वारे सर्व माहिती मागविली आहे. या विभागामार्फत आश्रमशाळांमधील मुलींसाठी गणवेशाची खरेदी करण्यात आली आहे. 525 मुलींसाठी टॉप व पायजम्याची खरेदी केलेली आहे. या गणवेशाची बाजारात 400 ते 500 रुपये किंमत असताना कोणत्या दरामध्ये खरेदी करण्यात आली, कोणत्या संस्थेला कशा पध्दतीने हे काम देण्यात आले त्याची चौकशी करण्यात यावी.

यानंतर मी बाब क्र.190 वर बोलतो. कुपोषणाच्या संदर्भात माननीय न्यायालयाने असे सांगितले आहे की, शासनाने स्वत:च निर्णय घ्यावेत. आमच्या आदेशाची वाट कशासाठी बघता ? न्यायालयाकडून शासनाला खडसावले जाते. न्यायालयाने शासनाला असे विचारले आहे की, बालरोग तज्ज्ञ, भूल तज्ज्ञ, अस्थिरोग तज्ज्ञ या डॉक्टरांच्या रिक्त असलेल्या जागा किती दिवसात भरल्या जाणार आहेत ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

न्यायालयाने आदेश दिल्यानंतर हे सर्व भूलतज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञ आपण भरले का ? आता किती जागा रिक्त आहेत याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी.

सभापती महोदय, खावटी कर्ज ठेकेदारासाठी दिले गेले. ते आदिवासीसाठी दिले गेले नाही. आदिवासींना पावसाळयामध्ये कोणतेही काम मिळत नाही, त्यांना मजुरी मिळत नाही म्हणून पावसाळयामध्ये त्यांना हे खावटी कर्ज दिले जाते. हे खावटी कर्ज पावसाळा संपल्यानंतर दिले गेले. राज्याचे सचिव श्री. जॉनी जोसेफ यांनी न्यायालयामध्ये ॲफिडेव्हीट केले होते की अन्न आणि नागरी पुरवठा विभागाच्या दराप्रमाणे तांदूळ आणि गव्हाची खरेदी केली जाईल. परंतु जी काही खरेदी झाली ती त्या दरापेक्षा दहापटीने जास्त झालेली आहे. या सरकारने न्यायालयाचा अवमान करुन ठेकेदाराची भर केलेली आहे. हे खावटी कर्ज आदिवासींकडून वसूल केले जाते. जास्त भावाने धान्य खरेदी करुन जास्त भावाने आदिवासींना द्यायचे आणि त्यांच्या डोक्यावर कर्ज ठेवायचे, अशा प्रकारचे पाप या सरकारने केलेले आहे. तेव्हा या प्रकरणी चौकशी करुन आदिवासींना या खावटी कर्जातून ताबडतोबीने मुक्त करावे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, नाचणीची बिस्किटे आणि चिक्कीची खरेदी करण्यात आली. आयुक्तांनी सांगितले होते की, 11 कोटी रुपयाची प्रोटीन पावडर आणि 17 कोटीची बिस्किटे खरेदी करु नका. हा आयुक्तांचा अहवाल माझ्याकडे आहे. आयुक्तांचा अहवाल बासनात गुंडाळून ही खरेदी करण्यात आली. ही खरेदी केवळ ठेकेदारांच्या फायद्यासाठी करण्यात आलेली आहे. या खरेदीची चौकशी मंत्री महोदयांनी करावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, मी माननीय गृहनिर्माण राज्यमंत्र्यांचे या निमित्ताने लक्ष वेधू इच्छितो. मागच्या वेळी राज्यमंत्री महोदय श्री. सचिन अहिर यांनी सांगितले होते की, 1995च्या आधीच्या ज्या झोपड्यांची विक्री झालेली आहे आणि ज्यांनी ती खरेदी केलेली आहे त्या झोपडीधारकांना फ्लॅट देण्यात येईल, त्यासाठी न्यायालयाची परवानगी घेण्यात येईल. हे किती कालावधीमध्ये करणार असा प्रश्न मी विचारला होता. त्यावेळी आपण "लवकरात लवकर" असे उत्तर दिलेले होते. माझी आपणाला हात जोडून विनंती आहे की, आपण "लवकरात लवकर" असे उत्तर न देता न्यायालयाकडून आपण तातडीने परवानगी आणावी. एसआरएच्या अनेक योजना थांबलेल्या आहेत.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

मागील एक वर्षापासून हा विषय मी या सभागृहामध्ये सातत्याने मांडत आहे. हाच विषय आमचे नेते सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच माननीय विरोधी पक्षनेत्यांनी देखील मांडला होता. तेव्हा आता सर्वोच्च न्यायालयामध्ये आपण जे ॲफिडेव्हिट दिले होते ते विथ्ड्रा करुन एसआरए योजनेतील झोपडपट्टीवासीयांना न्याय द्यावा. तसेच 1995च्या आधीच्या झोपड्यांचे ज्यांचे फोटोपास आहेत, परंतु त्या झोपड्या ज्यांना विकल्या त्यांना अधिकृत म्हणून पात्र करण्यात यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, एसआरएच्या सर्व योजना थांबविण्यात आल्या आहेत. किती एसआरएच्या योजना म्हाडा राबविणार आहे यासंबंधीची यादी जाहीर करण्यात येईल असे माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री महोदयांनी सांगितले होते. परंतु तीन महिन्यामध्ये याबाबतीत त्यांनी काहीही केले नाही.मी मागील वेळी अशीही विचारणा केली होती की, काय द्या आणि चला, म्हणजे कायद्याने चला, असे काही आहे काय ? त्यावेळी राज्यमंत्री महोदयांनी "तसे काही नाही"असे सांगितले. मग असेही नाही आणि यादी देखील जाहीर केली जात नाही. कोणत्या जागा म्हाडा डेव्हलप करणार यासंबंधीचा निर्णय झालेला असेल तर त्याची यादी जाहीर करण्यास कोणती अडचण आहे ? विकासक म्हाडामध्ये यावेत, त्यांनी आपणास भेटावे मग काय द्या आणि पुढे चला, असे आहे काय ?

सभापती महोदय, राजेंद्र नगर मधील रहिवाशी 16 वर्षापासून संक्रमण शिबिरामध्ये आहेत. त्या जागेचा विकास करण्यासाठी शासनाने 10 वर्षामध्ये तीन वेळा स्थगिती दिली. ती जागा म्हाडा स्वत: विकसित करीत नाही आणि विकासकालाही विकसित करु देत नाही. या प्रकरणी "लवकरात लवकर" असा शब्दप्रयोग न करता किती दिवसात निर्णय घेणार हे माननीय मंत्री महोदयांनी मला सांगावे. सभापती महोदय, मला अनेक विषय मांडावयाचे आहेत. परंतु आपण सभापतीस्थानी आलात त्यामुळे वेळे अभावी मी माझे भाषण येथेच थांबवितो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

---

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी जेव्हा अनिसच्या संदर्भातील विषय मांडला त्यावेळी सन्माननीय सदस्य आदरणीय श्री. हेमंत टकले यांनी चांगली पध्दत सांगितली. परंतु काळ सोकावतो म्हणून मला सांगावेसे वाटले ते मी सांगत आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ प्रथम श्री.शिगम 17:20

श्री.दिवाकर रावते...

सदर देवस्थान हे राष्ट्रवादी पक्षाच्या वाटणीला आलेले आहे. सभापती महोदय, माझ्याकडे अधिकृत माहिती अशी आहे की, निदेशानुसार कळविण्यात येते की, सन 1985-86 ते 2008-09 या 26 वर्षाच्या कालावधीत पंढरपूर येथील विठ्ठल रुखुमाई मंदिर समितीने प्रशासकीय अहवाल विधिमंडळात सादरच केलेले नाहीत. ज्या पदाधिकाऱ्यांची आपण नेमणूक केली आहे, त्या समितीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासकीय अहवाल सभागृहासमोर गेल्या 26 वर्षापासून ठेवलेला नाही. तेथील मंदिर समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मंदिरात जमा झालेला निधी, त्या ठिकाणी केलेला विकास इत्यादी संबंधीचा अहवाल सभागृहात सादर करणे बंधनकारक असताना तो अहवाल विधिमंडळास सादर केलेला नाही. हा अहवाल उप निबंधकाकडे मिळेल काय यासंबंधी विचारणा केली. तेथेही तो अहवाल उपलब्ध होऊ शकला नाही.

मी विधी व न्याय विभागास माहितीच्या अधिकाराखाली अहवालासंबंधीची माहिती मागितली. विधी व न्याय विभागाने माहितीच्या अधिकाराखाली जे उत्तर दिले आहे ते फार महत्वाचे आहे. दुर्दैवाने विधी व न्याय खाते कॉंग्रेस पक्षाकडे आहे. विधी व न्याय विभागाने असे उत्तर दिले आहे की, गेल्या 26 वर्षात अशा प्रकारचा कोणताही अहवाल प्राप्त झालेला नाही. आमच्याकडे या बाबतीत गेल्या 26 वर्षाची कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध नाही. या बाबतीत दुसऱ्या विभागाकडे चौकशी करण्यात यावी. विधी व न्याय विभागाचे अधिकारी बसलेले आहेत, ते विधिमंडळास अवमानीत करीत असतील, विधिमंडळाला तो मोजतच नसतील तर ते बरोबर नाही. लाखो भाविकांचा हा प्रश्न आहे. महाराष्ट्रातील घराघरातील दैवत असलेल्या विठ्ठल रुखुमाईच्या मंदीराचा प्रश्न आहे. अशा प्रकारे अनागोंदी करणारी मंडळ असतील तर आजच्या आज श्री.अण्णा डांगे यांच्या नेतृत्वाखालील मंडळ ताबडतोब माननीय मंत्री महोदयांनी बरखास्त करावे. त्या संदर्भात लोकसत्ता वृत्तपत्राने छापले आहे की, कोण कसे पैसे घेतात, नंबराच्या पावत्या कशा पध्दतीने फाडतात. या ठिकाणी जे प्रकार चालले आहेत ते सर्व छापून आले आहे. हा विषय काढण्यासंदर्भात स्फूर्ती दिल्याबद्दल मी सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना धन्यवाद देतो.

---------------

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एम.एम.शेख (नामनियुक्त ) : सभापती महोदय, अल्पसंख्याक विकास विभागातील बाब क्रमांक 231, पृष्ठ क्रमांक 220- मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळासाठी 50 कोटी रुपयांची पुरवणी मागणी सभागृहासमोर सादर करण्यात आली आहे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ हे अल्पसंख्याक समाजातील जे बेरोजगार आहेत, त्यांना रोजगार देण्याससाठी स्थापन झालेले आहे. परंतु 2009 मध्ये अल्पसंख्यांक विभागातंर्गत असलेले मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाने बेरोजगारांसाठी 71 कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केलेले आहेत. त्या महामंडळास निधी मंजुरीचे पत्र मिळाले. प्रत्यक्षात एक रुपयाचा निधी शासनाकडून उपलब्ध करुन दिला गेलेला नाही. या ठिकाणी फक्त 50 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. माननीय श्री.नसीम खान साहेब हे अल्पसंख्याक विकास मंत्री असून ते कार्यक्षम म्हणून ओळखले जातात. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळासाठी 100 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन द्यावा अशा प्रकारची विनंती या पुरवणी मागणीच्या माध्यमातून करीत आहे.

सभापती महोदय, 2013-2014 या वर्षाच्या अर्थसंकल्पात मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाला 250 कोटी रुपयांचा निधी मंजूर केलेला आहे. परंतु या महामंडळास एक रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. अर्थसंकल्पातील 250 कोटी रुपयांचा निधी मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळास लवकरात लवकर देण्यात यावा.

सभापती महोदय, अल्पसंख्याक विभागाची बाब क्रमांक 228, पृ.क्र.219- ग्रामीण भागासाठी 8 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद अत्यल्प आहे. राज्यात अल्पसंख्यांक समाज मोठया प्रमाणात आहे अशा 5000 ग्रामपंचायती आहेत. त्यासाठी 8 कोटी रुपयांचा निधी अत्यल्प आहे. या ग्रामपंचायतींना विकास कामे करण्यासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी.

सभापती महोदय, अल्पसंख्यांक विकास मंत्रालय 2008 पासून कार्यरत आहे. अल्पसंख्यांक समाजावर अन्याय होतात, अत्याचार होतात, बऱ्याच वेळा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यासाठी गेल्या नंतर अल्पसंख्यांक समाजाच्या लोकांच्या तक्रारी नोंदवून घेतल्या जात नाहीत. म्हणून अल्पसंख्यांक समाजासाठी कायदेशीर तरतुदी करण्यात याव्यात अशी मी या निमित्ताने मागणी करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

------

3...



ABG/ D/ ST/ प्रथम श्री.शिगम 17:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( अनेक सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी परवानगी मागतात.)

**उप सभापती** : सर्वच सन्माननीय सदस्य पुरवणी मागण्यांवर बोलणार असतील तर कर्मचाऱ्यांना घरी जाऊ देवू आणि आपणच रात्रभर सभागृहात चर्चा करु, त्यास माझी काही हरकत नाही.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 17:25

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सामाजिक न्याय मंत्री सभागृहात उपस्थित झालेले आहेत. कोकणातील कॉलेजचे सामाजिक न्याय विभागाकडून 1.90 कोटी रुपये येणे बाकी आहे. कॉलेज चालवायचे कसे? तातडीने त्या कॉलेजला थकबाकीची रक्कम देण्यात यावी.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 17:25

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2013-14 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

बाब क्र.72, पृष्ठ क्र.52 वर नगरपरिषदांना त्यांच्या क्षेत्रातील वैशिष्ट्यपूर्ण विकास कामांसाठी सहाय्य करण्याकरिता तरतूद करण्यासाठी पुरवणी मागणी सादर केली आहे. शासन निर्णय क्र.जीइएस 2008, दिनांक 6.1.2008 नुसार 295 लाख इतका निधी मंजूर झाला होता. खामगाव नगरपरिषदेच्या विविध विकास कामांसाठी 147.50 लाख इतका निधी प्राप्त झाला आहे. तत्कालीन जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दिनांक 22.1.2009 रोजी कामांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. या आदेशामधील अनुक्रमांक 2 चे काम खामगाव नगरपरिषदेच्या हद्दीतील आहे. मस्तान चौकातील टिळक पुलाच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यानंतर कामाची निविदा दिनांक 3.2.2009 च्या दै.मातुभूमी, पुण्यनगरी व लोकमत या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती. निविदा प्रक्रिया पूर्ण न करताच नगरपरिषदेने दिनांक 27.2.2009 रोजी खास सभा बोलावून प्रस्ताव क्रमांक 3/1, अ.क्र.6 नुसार संबंधित ठेकेदाराची निविदा मंजूर करण्यात आली. ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करुनही आजपर्यंत या पुलाचे काम पूर्ण झालेले नसताना सदरहू कामावर 18, 54, 211 रुपये खर्च झालेला आहे. शासन लोकोपयोगी कामासाठी उपलब्ध निधी शासनाच्या निर्णयानुसार अभ्यासपूर्ण नियोजन करुन खर्च होणे अपेक्षित आहे. याबाबत संपूर्ण जबाबदारी नगरपरिषदनेची असते. असे असताना मस्तान चौकातील पुलाचे बांधकाम न करता पुलाचे बांधकाम केल्याबाबत खोटे दस्तऐवज तयार करुन 18,52,211 रुपयांचे देयक संबंधित ठेकेदाराला अदा करण्यात आल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे.

सभापती महोदय, माझ्याकडे जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासकीय मान्यता दिलेल्या पत्राची प्रत उपलब्ध आहे. त्याचबरोबर जिल्हाधिकाऱ्यांनी काही अटी घातल्या होत्या, त्या अटींबाबतचे पत्र उपलब्ध आहे. नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव आहे, ज्या ठरावामध्ये या पुलाच्या बांधकामाला त्यांनी मान्यता दिली होती. त्याचबरोबर मस्तान चौक भागातील काही मुस्लीम नागरिकांनी पत्र देऊन पुलासंबंधीची माहिती विचारली होती. त्याबाबत असे उत्तर देण्यात आले की, वैशिष्ट्यपूर्ण विकास योजनेंतर्गत 25 लाख रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले होते. पहिल्या टप्प्यातील काम करण्यासाठी 18,52,400 रुपये खर्चाच्या कामाला प्रशासकीय मान्यता आहे. "दै.मातृभूमी, पुण्यनगरी व लोकमत वृत्तपत्रात निविदा निघाली असून एस.एफ.कासीम यांची

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...............

निविदा मंजूर करण्यात आली असल्याचे व काम झालेले नाही" असे उत्तर दिले आहे. पुढे असे म्हटले आहे की, "खामगाव नगरपरिषदेने खास सभा बोलावून प्रस्ताव क्र.3/1, अ.क्र.6 नुसार मस्तान चौकातील टिळक पूलासाठी certificate of original work done दिलेले आहे". इतके सर्व होऊनही पूल बांधलेला नाही. परंतु 18 लाख रुपये घेतले गेले आहेत याची शासन चौकशी करणार आहे काय?

सभापती महोदय, बाब क्रमांक 72, पृष्ठ क्रमांक 22. वैशिष्ट्यपूर्ण विकास कामासाठी सहाय्य पुरविण्यास तरतूद करण्याकरिता पूरक मागणी सादर केली आहे. हा विषय मी सभागृहात चार वेळा उपस्थित केलेला होता. मी या सभागृहाचा जबाबदार सदस्य आहे. माझ्या गावातील शहीद भगतसिंग चौकाच्या सौंदर्यीकरणाचे काम न होताच पैसे घेण्यात आले.

नंतर 3क्यू.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पांडुरंग फुंडकर ....

हे पैसे अशा रीतीने काढल्यानंतर त्यासंदर्भात आपण जिल्हाधिकाऱ्याकडे चौकशीचे काम दिले परंतु जिल्हाधिकाऱ्याने या चौकशीचे काम एसडीओ यांना दिले. एसडीओ यांनी चौकशीचा रिपोर्ट नील दिलेला आहे. अधिकारी मॅनेज केल्यामुळेच नील रिपोर्ट दिला गेला आहे. अधिकाऱ्यांवर वरुन दबाव आणला जातो. प्रत्यक्ष जागेवर काय हे दाखवून देण्यास मी तयार आहे. भगतसिंग चौकाचे काहीही सौदंर्यकरण न होता 4 लक्ष रुपये काढले गेले त्याची चौकशी योग्य रीतीने करावी अशी माझी कळकळीची विनंती आहे. वैशिष्ट्य पूर्ण कामासाठी आपण 10-10 कोटी रुपये देतात त्याबद्दल आम्हाला काही म्हणावयाचे नाही. परंतु काम न करता बोगस बिल तयार करुन पैसे काढले जात असेल तर ते योग्य नाही. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे अशी मागणी करतो.

सभापती महोदय, खामगाव नगरपरिषदेमध्ये बाब क्रमांक 229, पृष्ठ क्रमांक 219 अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्राला पायाभूत नागरीसुविधांसाठी अनुदान भागविण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. बुलढाणा जिल्हयातील खामगाव नगरपरिषदेच्या हद्दीत मस्तान चौक हा भाग संपूर्णपणे अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्र आहे. या भागात 100 टक्के मुस्लीम बांधव राहतात. या भागाचा बऱ्याच वर्षापासून विकास झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे. या भागातील शाळा क्रमांक 2 मध्ये 2000 विद्यार्थी शिक्षण घेतात. या शाळेच्या समोरचा रस्ता खराब झाला आहे. या रस्त्यावर पावसाळयात पाणी साचले जाते. मागच्या वर्षी या रस्त्यावर एक मुलगी घसरुन तिचा मृत्यू झालेला आहे. असे असतांनाही या रस्त्याकडे शासनाने दुर्लक्ष केलेले आहे. या भागाच्या विकासाकडे लक्ष दिले जात नाही आणि दुसऱ्या बाजूला आमचे शासन "विकास की गंगा" असे स्वत:ला म्हणून घेतात. या रस्त्यावर एका मुलीचा मृत्यू झालेला आहे हे गांभीर्य लक्षात घ्यावे व या रस्त्यासाठी शासनाने पैसे द्यावेत अशी विनंती करतो.

सभापती महोदय, याच दोन क्रमांकाच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी खेळाचे मैदान आहे. परंतु हे मैदान पावसाळयामध्ये पाण्याने तुडुंब भरलेले असते. शाळेच्या मैदानाचे सपाटीकरण करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे या शाळेच्या मैदानाचे सपाटीकरण करण्यात यावे एवढी मागणी करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर): सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 6, यामध्ये शासनाच्या राजशिष्टाचार शाखेच्या अस्थापनेवरील विविध प्रशासकीय खर्चासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. यामध्ये झेंडयाचा उल्लेख आहे. मी माननीय मंत्री महोदयांना आपल्या मार्फत विचारु इच्छितो की, आपण प्लॅस्टिकच्या झेंडयांवर बंदी घातलेली आहे. आता 20 दिवसांनी 15 ऑगस्ट येणार आहे. त्यामुळे प्लॅस्टिकच्या झेंडयावरील बंदी कायम आहे काय ? शहरात आजही प्लॅस्टिकचे झेंडे बघावयास मिळतात. त्यामुळे प्लॅस्टिकच्या झेंडयावर आपण काय कारवाई करणार आहात याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात द्यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, चित्रपटगृहामध्ये राष्ट्रगीत वेगवेगळया फॉर्ममध्ये वाजवले जाते. पूर्वी केवळ झेंडा दाखवला जात असे परंतु आता काही कलाकार दाखवतात तसेच आणखीन काही दाखवले जाते. राष्ट्रगीत दाखवितांना प्रत्येक चित्रपट गृहात वेगवेगळया पध्दतीने दाखवले जाते. त्यामुळे राष्ट्रगीत दाखविण्याच्या संदर्भात काही संहिता आहे काय? याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 67,71 पृष्ठ क्रमांक 50,51 महानगरपालिकेतील मूलभूत सोयीसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या सभागृहात नर्सिंगहोमला लायसन्स देण्याविषयीचा प्रश्न उपस्थित झाला होता त्यावेळेस तत्कालीन राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव यांनी सांगितले होते की, आता 20 बेड पर्यंतच्या नर्सिंग होमला कोणत्याही प्रकारचे लायसन्स लागणार नाही. तसेच 3 वर्षाचे लायसन्स रिन्यू करुन घेऊ, महानगरपालिकेकडून शपथपत्र घेऊन तात्पुरते लायसन्स देऊ. परंतु यासंदर्भातील कोणताही प्रश्न अद्यापपर्यंत सुटलेला नाही. आजही नर्सिंगहोम धारकांना पिडले जात आहे. या विषयाच्या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्र्यांची 3 वेळा भेट मागितली होती परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी 3 वेळा भेट टाळली असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

हा हेत्वारोप नाही. शासन आणि मुंबई महानगरपालिकेसह इतर महानगरपालिका तोडगा काढण्यासाठी तयार नाहीत असे दिसते. आपल्याकडे फायरब्रिगेडसाठी अपुरा कर्मचारीवर्ग आहे. फायरची एनओसी मिळण्यासंबंधीचा प्रॉब्लेम आहे. आजही नर्सिंग होममध्ये जे रूग्ण उपचार घेत आहेत त्यांना इन्श्युरन्स क्लेम करायचा असेल तर त्यांना मेडिक्लेम मिळत नाही हा सर्वात मोठा प्रश्न आहे. त्यामुळे आपल्या उत्तरामध्ये या गोष्टीचा खुलासा करावा अशी मी विनंती करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर मी शालेय शिक्षण विभागाच्या पान क्रमांक 44 वरील बाब क्रमांक 61 वरील अशासकीय माध्यमिक शाळांना सहायक अनुदान देण्याच्या पुरवणी मागणीवर बोलणार आहे. आज एस.एस.सी.बोर्डाच्या शाळा कमी होत चालल्या आहेत. अनेक एस.एस.सी.बोर्डाच्या शाळा ICSE, CBSE शी संलग्न होत आहेत. ज्या प्रमाणे मराठी माध्यमांच्या शाळा बंद होत चालल्या आहेत त्या प्रमाणे एस.एस.सी.बोर्डाशी संलग्न असलेल्या शाळा देखील बंद होतील की काय अशी भीती वाटते आहे. यासाठी आपण काही मापदंड ठेवणार आहात काय ? एनओसी दिल्यानंतर आपले काम संपणार आहे.

एस.एस.सी.बोर्ड देखील जगले पाहिजे. हे बोर्ड स्वायत्त असले तरी ते राज्य शासनाचे स्वत:चे बोर्ड आहे. ICSE आणि CBSE च्या शाळांना आपण प्राधान्य देण्याबद्दल माझे काहीच म्हणणे नाही.

आपण सर्व ICSE आणि CBSE शाळांमधून 25 टक्के गरीब मुलांना शाळा प्रवेशासाठी आरक्षण ठेवणार आहात. त्याचे काय झाले ? नेमक्या किती गरीब मुलांना 25 टक्क्याच्या कोट्यामध्ये प्रवेश देण्यात आला याचा उल्लेख आपल्या कुठल्याही निवेदनामध्ये आलेला नाही.

यानंतर मी पान क्रमांक 186 वरील बाब क्रमांक 192 वर बोलणार आहे. आदिवासी विभागाने गेल्या दोन वर्षामध्ये तीन लाख रूपयांच्या मच्छरदाण्या खरेदी केल्या. आदिवासींचे हिवतापा पासून रक्षण व्हावे म्हणून मच्छरदाण्या देण्याची केंद्र शासनाची योजना आहे. केंद्र शासनाच्या निधीतून मच्छरदाण्या खरेदी केल्या जातात. घोंगड्यांचा घोटाळा हा तर आहेच. त्यापेक्षाही मच्छरदाण्यांचा घोटाळा फार मोठा आहे. सन 2008 आणि 2011 मध्ये मच्छरदाण्या मिळाल्या होत्या. सन 2012-13 मध्ये कोणालाही मच्छरदाण्या मिळालेल्या नसतानाही त्या मिळाल्या आहेत असे सांगितले जात आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, आज देखील जव्हार, मोखाडा, वाडा येथील आश्रमशाळेतील 17500 विद्यार्थ्यांना गहू,तांदूळ इ.प्रकारचे रेशन देतो. पण त्याचा आज खडखडाट झालेला आहे.

मी शेवटचा मुद्दा मांडून माझे भाषण पूर्ण करणार आहे. मी पान क्रमांक 167 वरील बाब क्रमांक 175 वर बोलणार आहे. ही सार्वजनिक आरोग्य विभागाची बाब आहे. आजही मालवण येथे 20 बालके कुपोषित आहेत. त्यापैकी एका मुलाचा मृत्यू झाला आहे. कुपोषित बालकांमध्ये मालवण येथील कुपोषित बालकांची गणना केली आहे काय याचे उत्तर द्यावे.

महाराष्ट्र शासनाने गेल्या वर्षीच्या तुलनेत तीन पटीने जास्त मोठी ऑर्डर अॅन्टी रेबीस व्हॅक्सीनची दिलेली आहे. त्याचे टेंडर 25 तारखेला ओपन होणार आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, महाराष्ट्रात कुत्रा चावण्याचे प्रमाण तिप्पटीने वाढले आहे काय ? याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

..................

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 5 वर बोलणार आहे. लोकसेवा आयोगासाठी 8 कोटी 87 लाख रूपयांची तरतूद पुरवणी मागणी मध्ये करण्यात आली आहे. त्या निमित्ताने मला प्रश्न विचारावयाचा आहे की, दिनांक 18 मे रोजी एमपीएससीची परीक्षा झाली होती त्याच्या निकालाचे काय झाले आहे ? या सर्व गोंधळाला व्हास्ट इंडिया ही कंपनी जबाबदार असताना त्याच कंपनीकडून वेबसाईटचे व्यवस्थापन केले जात आहे. तेव्हा या कंपनी विरूद्ध आपण कोणती कारवाई केली आहे.

यानंतर मी बाब क्रमांक 9 वर बोलणार आहे. पुतळ्यासाठी आपण 9 कोटीची तरतूद केली आहे. पण हे पुतळे कोणाचे आहेत हे स्पष्ट नाही.

विधी व न्याय विभागासाठी देखील भरपूर तरतूद केली आहे. परंतु, दलित आणि महिला यांच्या बऱ्याचशा केसेस प्रलंबित आहेत. त्याची आकडेवारी मी पटलावर ठेवते.

शिक्षण विभागातर्फे अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची फी भरण्याची तरतूद केली आहे. परंतु, शिक्षण आणि विधी न्याय विभागामध्ये समन्वयाचा अभाव दिसतो आहे. आज महाराष्ट्रातील शिक्षण मंडळे बरखास्त करण्यात आली आहेत. शिक्षणाचा मूलभूत अधिकाराचा कायदा आल्यामुळे महाराष्ट्रामध्ये पुणे, ठाणे, डोंबिवली सह जवळ जवळ 30 महानगरपालिकेच्या अखत्यारितील शिक्षण मंडळ बरखास्त करण्यात आली आहेत.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ 17:40

डॉ.नीलम गोऱ्हे....

परंतु नंतर माननीय उच्च न्यालयाने ती ऑर्डर रद्द करुन ती शिक्षण मंडळे आहे तशीच ठेवा असा निर्णय दिला. तेव्हा या शिक्षण मंडळाच्या कारभारात सुधारणा करावी. तसेच आरटीईच्या नावाने विधी व न्याय विभागाकडून अयोग्य मार्गदर्शन केले जात आहे त्याबाबत पुनर्विचार करावा अशी विनंती करते.

सभापती महोदय, महिला व बाल विकास विभागाच्या बाबतीत सांगू इच्छिते की, राज्य महिला आयोगासाठी तरतूद केलेली नाही. बलात्कार आणि ॲसिड पीडित महिलांच्या पुनर्वसनासाठी राज्य शासनाकडे निधी नाही म्हणून उच्च न्यायलयाने ताशेरे ओढलेले आहेत. वित्त व नियोजन विभागाने त्यासाठी तरतूद करणे आवश्यक होते.

सभापती महोदय, या ठिकाणी वित्त राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक उपस्थित आहेत. मला त्यांच्या निदर्शनास एक बाब आणून द्यायची आहे की, नियोजन विभागाच्या बाब क्रमांक 65 नुसार 62 कोटी 32 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. आपण म्हटलेले आहे की, न वापरलेला गेलेला निधी 62 कोटी 38 लाख रुपये आहे. काही विशिष्ट कारणांकरिता तो निधी खर्च झाला नाही म्हणून 62 कोटी 38 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. निधी खर्च न होण्याची कारणे काय आहेत ? मुळात 62 कोटी 32 लाख रुपयांची तरतूद असताना 62 कोटी 38 लाख रुपये खर्च झाले नाहीत हे कशाच्या आधारे आपण म्हणत आहात ?

सभापती महोदय, परिवहन विभागाने "मोटार वाहन निरीक्षक" असे एक पद निर्माण केले होते. नंतर त्याचे नामाकरण "कर वसुली अधिकारी" असे करण्यात आले. परंतु त्या पदाला अधिकार दिलेले नाहीत.

सभापती महोदय, नगर विकास विभागाबाबत सांगू इच्छिते की, मूलभूत सोयीसुविधांसाठी 272 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या तरतुदींचा अग्रक्रम काय आहे ? या अग्रक्रमामध्ये मुंबई शहरामध्ये रेसकोर्सवर सर्वसामान्यांना जाता येईल असा थीम पार्क तयार करण्याचा समावेश आहे काय हे स्पष्ट केल्यास महाराष्ट्रातील जनतेला दिलासा मिळू शकेल.

सभापती महोदय, पुणे शहरातील वाहतुकी संदर्भात 1 लाख 59 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. वाहतुकीचा प्रश्न अतिशय गंभीर असताना केलेली तरतूद खूप अपुरी आहे. त्यामध्ये वाढ करावी अशी माझी मागणी आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय, सरकार जकात पुन्हा सुरु केल्याचे सांगत आहे. त्यासाठी सरकारने एक टक्का तरतूद केलेली आहे. जकात आणि एलबीटीमुळे व्यापाऱ्यांना त्रास आणि नुकसान सहन करावे लागत आहे. नगर विकास विभागाचे धोरण अस्तित्वात आहे की नाही अशी शंका येते.

सभापती महोदय, आपण यात्रा कर रद्द केलेला आहे. पण किती ठिकाणी यात्राकराची गरज आहे हे पाहून त्याप्रमाणे अनुदान देण्याचा विचार करावा कशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करते.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी सन 2013-2014 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

बाब क्रमांक 228, 229, 230, 231 पृष्ठ क्रमांक 219-220 -अल्पसंख्याक विकास विभाग- मौलाना आझाद अल्पसंख्याक महामंडळासाठी 50 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. अलीगढ मुस्लीम युनिव्हर्सिटीचे सेंटर महाराष्ट्रात अपेक्षित होते परंतु त्यासाठी एक रुपयाची देखील तरतूद केलेली नाही याचे मला दु:ख होते. चार सेंटर्ससाठी केंद्र सरकारकडून निधी प्राप्त होणार आहे. अलीगढ मुस्लीम युनिव्हर्सिटी ही मुस्लीम युनिव्हर्सिटी नाही. ती सेक्युलर युनिव्हर्सिटी आहे. त्याठिकाणी अन्य धर्मियातील विद्यार्थ्यांना सुध्दा ॲडमिशन मिळते. त्या संस्थेला अल्पसंख्याकाचा दर्जा मिळालेला नाही. स्वातंत्र्य चळवळीमध्ये या युनिव्हर्सिटीचे योगदान आहे. भारताच्या बौध्दीक संपदेमध्ये या युनिव्हर्सिटीचे योगदान आहे. आपण अशा युनिव्हर्सिटीला जागा देऊ शकत नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री प्रा.फौजिया खान युनिव्हर्सिटीसाठी जागा पाहण्यासाठी मालेगाव येथे गेल्या होत्या. पण त्यांना गाडीतून खाली देखील उतरु दिले नाही. हे राज्य कोणाचे आहे ? या युनिव्हर्सिटीसाठी केंद्र शासनाकडून निधी मिळणार आहे. अलीगढ मुस्लीम युनिव्हर्सिटी महाराष्ट्रात येऊ पाहत आहे आणि त्यासाठी राज्यमंत्री जागा पाहू शकत नसतील तर ती अतिशय दु:खाची बाब आहे.

सभापती महोदय, अलीगढ युनिव्हर्सिटीसाठी खुल्ताबाद येथे जागा पाहिलेली आहे. पण त्यासाठी तरतूद करणार नसाल तर आम्ही कोणावर विश्वास ठेवायचा, आपण दुसऱ्यांना दोष कसा द्यायचा ? अलीगढ मुस्लीम युनिव्हर्सिटीचे सेंटर बिहार, केरळ, कलकत्ता या राज्यांमध्ये सुरु झाले आहे. महाराष्ट्रात देखील तसे सेंटर ताबडतोब सुरु झाले पाहिजे त्यासाठी राज्य शासनाने जागा उपलब्ध करुन द्यावी अशी मी मागणी करतो.

उच्च शिक्षण बाब क्रमाक 210, 211 आणि शालेय शिक्षण विभाग बाब क्रमांक 65 - शालेय शिक्षण विभागाने दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या परीक्षा फीची प्रतिपूर्ती करण्यासाठी तरतूद केलेली आहे. पण उच्च शिक्षण विभागाने अशी कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही ही अतिशय क्लेशदायक आणि दु:खाची बाब आहे. घेतलेली फी परत करण्यामध्ये फार शौर्य नाही आणि औदार्य नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

माणूस आता कुठे दुष्काळातून बाहेर पडत आहे. पाऊस चांगला झाला असला तरी राज्यात ओला दुष्काळ निर्माण होण्याची भीती आहे. सध्या पाऊस चांगला झाला तरी लोकांची परिस्थिती सुधारण्यास ऑक्टोबर महिना उजाडेल. त्यामुळे या विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची अडचण निर्माण झाली आहे. शालेय शिक्षण विभागाने इयत्ता 11 वी, 12 वी तील विद्यार्थ्यांचे आणि उच्च शिक्षण विभागाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे सर्व शैक्षणिक शुल्क माफ केले पाहिजे. या निमित्ताने मी मागणी करतो की, या विद्यार्थ्यांची टयुशन फी आणि प्रवेश शुल्क त्या त्या विभागांनी माफ केले पाहिजे. शासन या कडे दुर्लक्ष करीत असेल तर ती बाब कदापि योग्य नाही. म्हणून या दृष्टिकोनातून शासनाने योग्य ती कार्यवाही करावी, अशी विनंती करतो.

महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाबीच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, आपत्कालीन परिस्थितीमध्ये कर्मचाऱ्यांना त्यांच्या घरी सोडविण्याची व्यवस्था राज्य शासनाच्या माध्यमातून करावी, अशी मागणी करुन मी वेळे अभावी येथेच थांबतो.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2013-14 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, सामाजिक न्याय विभागाची बाब क्रमांक-156, पृष्ठ क्रमांक-142 वर मी प्रथम बोलू इच्छितो. शासनाने सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची निर्मिती केली. पददलित समाजातील तरुणांना औद्योगिक क्षेत्रात व्यवसायाची संधी तसेच त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्याची संधी उपलब्ध करुन दिली. या महामंडळाची स्थापना केल्यानंतर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ अशी निरनिराळी महामंडळे स्थापन करण्यात आली. दलित समाजातील तरुणांना आपल्या पायावर उभे करण्यासाठी या महामंडळांची स्थापना करण्यात आली. पददलित समाजातील तरुणांना 1 लाखापासून 25 कोटी रुपयांपर्यंतचा कर्ज पुरवठा करुन त्यांना स्वत:च्या पायावर उभे करणे हे महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे उद्दिष्ट होते. परंतु गेल्या चार वर्षांतील पहिल्या दोन वर्षांत 1 लाख रुपयांपर्यंतचे आणि त्या नंतरच्या दोन वर्षात 2.5 लाख रुपयांपर्यंतच कर्ज पुरवठा करण्यात आला. त्यापुढे कर्ज पुरवठा करण्यात आला नाही.

महोदय, या सभागृहात घोषणा करण्यात आली होती की, महामंडळांचे कर्ज माफ करण्यात येईल. शासनाने केवळ 50 टक्के कर्ज माफ केले आहे. परंतु एनएफडीसीचे कर्ज माफ केले नाही किंवा त्यांना शासनाच्या माध्यमातून पत पुरवठा केला नाही. आज अशी स्थिती आहे की, पददलित समाजातील तरुणांना या महामंडळांच्या माध्यमातून कर्ज मिळत नाही. त्यांना केवळ 1-2 लाख रुपये कर्ज मिळते. सकाळी मिळालेले कर्ज संध्याकाळपर्यंत खर्च होते. या समाजातील तरुणांना स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून कसल्याही प्रकारची तरतूद केली जात नाही. मी मध्यंतरी माननीय मंत्र्यांना विनंती केली होती की, मागासवर्गीय आमदारांना सोबत घेऊन या विषयी माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घ्यावी. या निमित्ताने मी मागणी करतो की, किमान एनएफडीसीच्या कर्जाची परतफेड करावी. जेणेकरुन मागासवर्गीय तरुणांना कर्ज मिळू शकेल.

..3..

श्री.राम पंडागळे....

महोदय, मी आपल्या माध्यमातून सांगू इच्छितो की, राज्य सरकारचे धोरण चांगले आहे. परंतु ते योग्य प्रकारे राबविले नाही तर दलित समाजाला त्या धोरणाचा काहीच फायदा होणार नाही.

महोदय, पददलित समाजाचा प्रश्न आला की, त्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले जाते. पददलितांचा प्रश्न उपस्थित केल्यानंतर त्यावर आम्ही बोलू नये किंवा सरकारने ते ऐकून नये अशा प्रकारचा प्रयत्न सुरु आहे. कोणी जर अशा प्रकारे वागत असेल तर पददलित समाज त्यांना माफ करणार नाही. शेवटी एवढीच मागणी करतो की, माननीय मंत्र्यांनी पददलित समाजातील तरुणांना 25 कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज वाटप करण्यासाठी आवश्यक तेवढ्या रकमेची तरतूद करुन पददलित समाजातील गरजू तरुणांना कर्ज पुरवठा करावा.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण पूर्ण करतो.

-------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ( वित्त व नियोजन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, अर्थ व नियोजन विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे व सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी भाग घेऊन काही चांगल्या सूचना केलेल्या आहेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, 184 कोटी रुपये शिलकीचा अर्थसंकल्प मांडला आणि आता 8 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या कशासाठी आणल्या ? या वर्षाची वार्षिक योजना 46,938 कोटी रुपयांची मान्य केलेली आहे. परंतु ज्यावेळी आपण आयोगाकडे गेलो त्यावेळी आपल्या योजनेचे आकारमान 49 हजार कोटीचे मान्य करण्यात आले आणि त्यामध्ये वाढ करण्यात आली. ती वाढ झाल्यामुळे आपल्याला जुलैच्या पुरवणी मागण्यांमध्ये 8 हजार कोटी पर्यंतच्या पुरवणी मागण्या करणे अनिवार्य झाले. पण यामध्ये 3892.12 कोटी रुपये एवढा निव्वळ भार पडणार आहे. त्यामुळे या वर्षामध्ये आपण साधनसंपत्ती, महसूल उत्पन्न वाढ आणि खर्चामध्ये काटकसर करुन हा अनिवार्य असलेला जो खर्च आहे त्या अनुषंगाने कार्यवाही करुन बचत करण्याच्या संदर्भात निश्चितपणे कार्यवाही केली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आमदार निधीच्या पूरक मागण्यांच्या संदर्भात उल्लेख केला. मागच्या वर्षी काही भागातील आमदारांची कामे सुरु असताना जो काही निधी आमदारांसाठी उपलब्ध करुन दिला होता तो बीडीएसवर दिल्यानंतर काही कारणास्तव काही विभागातील आमदारांचा निधी व्यपगत झाला. त्यामुळे या पुरवणी मागण्यांमध्ये ही रक्कम घ्यावी लागली. त्या भागातील जिल्हाधिकारी आणि त्या भागातील आमदारांची विनंती असल्यामुळे 2012-2013 मध्ये जो निधी अखर्चित राहिला होता त्याला या पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून मंजुरी द्यावी अशी सभागृहाला विनंती आहे. वित्त विभागाच्या बाब क्रमांक 73 ते 77 या अंतर्गत एकूण 326 कोटी 10 लाख 40 हजार रुपयांच्या पुरवणी मागण्यांना तसेच नियोजन विभागाच्या बाब क्रमांक 161 ते 169 अंतर्गत 254 कोटी 31 लाख 31 हजार रुपयांच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

---

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

श्री. मोहम्मद आरीफ (नसीम) खान : (वस्त्रोद्योग, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्री) : सभापती महोदय, माझ्या विभागाच्या बाब क्रमांक 228 ते 231 या बाबी अंतर्गत पुरवणी मागण्यांवरील चर्चा सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी सुरु केली तसेच आमच्या विभागाशी संबंधित विषयावर सन्माननीय सदस्य सर्वश्री विक्रम काळे, हेमंत टकले, सुभाष चव्हाण, एम.एम.शेख, पांडुरंग फुंडकर, कपिल पाटील व इतर सन्माननीय सदस्यांनी काही सूचना केलेल्या आहेत. आपण केलेल्या सर्व सूचनांचे मी स्वागत करतो. आपण आमच्या विभागावर जे आपले मत व्यक्त केलेले आहे त्याबद्दल मी सर्वांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांना माहीत आहे की, या राज्यात अल्पसंख्याक विभागाची स्थापना 2008-2009 या वर्षामध्ये झालेली आहे. विभागाची स्थापना झाल्यानंतर अल्पसंख्याक समाजाच्या उत्थानासाठी शैक्षणिक क्षेत्रामध्ये अनेक प्रकारच्या योजना आणण्यामध्ये आम्ही यशस्वी झालेलो आहोत. सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ स्थापन करुन याची सुरुवात केलेली आहे. अशा अनेक प्रकारच्या योजना विभागाच्या वतीने सुरु केलेल्या आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

श्री.नसिम खान...

आज या ठिकाणी 4-5 मुद्दे मांडण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी शाळेसमोर रस्ता बांधण्याचा विषय उपस्थित केला होता. संबंधित विभागामार्फत प्रस्ताव मागविण्याबाबत सूचना करण्यात येईल. प्रस्ताव आल्यानंतर ग्रामीण योजनेच्या निकषात तो रस्ता बसत असेल तर त्यासाठी निधी उपलब्ध करता येईल.

सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण, श्री.हेमंत टकले आणि श्री.एम.एम.शेख यांनी मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाबाबत मुद्दा मांडला होता. या महामंडळाला शासनामार्फत 250 कोटी रुपये भागभांडवल देण्यात आलेले आहे. या शासनाने ऐतिहासिक निर्णय घेऊन भागभांडवलाची रक्कम 500 कोटी रुपये केलेली आहे. या वाढीव भागभांडवलाची रक्कम मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंजूर केलेली आहे. त्यातून लाभार्थ्यांना पैसे देण्याची सुरुवात झालेली आहे. सन 2013-14 मध्ये 25 कोटी रुपयांची तरतूद केली होती. या पुरवणी मागण्यांमध्ये 50 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. म्हणजे या वर्षी या महामंडळाला एकूण 75 कोटी रुपये देण्यात येतील. जेणे करुन त्यांच्याकडे असलेली थकबाकी किंवा मंजूर प्रकरणांचे कर्ज वितरित करणे सोपे होईल.

सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी अलिगढ विद्यापीठाचा मुद्दा उपस्थित केला आहे. केंद्र शासनाने देशातील 6-7 राज्यांमध्ये अलिगढ विद्यापीठाची स्थापना करण्यास मंजुरी दिलेली आहे. त्यात महाराष्ट्र राज्याचा समावेश आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित हा विषय आहे. परंतु अल्पसंख्याकांशी संबंधित ही बाब असल्यामुळे अल्पसंख्याक विभागामार्फत त्याचा पाठपुरावा केला जात आहे. या केंद्रासाठी राज्यातील 2-3 जागा सुचविलेल्या आहेत. औरंगाबाद येथील खुल्ताबाद येथील जागेला त्या विद्यापीठाने सहमती दिलेली आहे. महसूल विभागामध्ये हा प्रस्ताव विचाराधीन आहे. या प्रस्तावावर लवकरात लवकर विचार होईल. याबाबत निर्णय झाल्यावर अलिगढ विद्यापीठाच्या धर्तीवर राज्यात विद्यापीठ सुरु होईल. या राज्यातील केवळ अल्पसंख्याक समाजातीलच नाही तर सर्व समाजातील विद्यार्थ्यांना त्या विद्यापीठातून शिक्षण घेण्यासाठी मदत होईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ ST/ D/ D/

श्री.नसिम खान....

सभापती महोदय, अल्पसंख्याक समाजाच्या शाळांसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध होण्यासाठी 2 लाख रुपये देण्याची योजना सुरु केलेली आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांची स्पेसिफिक तक्रार असेल तर ती माझ्याकडे त्यांनी द्यावी. त्याबाबत जिल्हाधिकारी स्तरावरुन चौकशी करण्यात येईल. लोकांना त्रास होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. सध्या जो कोटा आहे तो वाढवून जास्तीत जास्त लोकांना पायाभूत सुविधा देता येतील. त्यासाठी तरतूद वाढविण्याचा प्रस्ताव विभागामार्फत केलेला आहे.

सन्माननीय सदस्य श्री.एम.एम.शेख यांनी एक मुलभूत मुद्दा उपस्थित केलेला आहे. अल्पसंख्याक समाजाच्या गेल्या 3-4 वर्षांपासून तक्रारी वाढलेल्या आहेत. त्यांच्यावर कोठे तरी अन्याय होत असेल तर त्याबाबत त्यांना न्याय मिळत नाही. त्यांना न्याय मिळण्यासाठी या विभागामार्फत अल्पसंख्याक आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. त्या आयोगाकडे कोणीही तक्रार करु शकते. तरीही अल्पसंख्याक समाजावर जर कोठे अत्याचार होत असेल तर आणि त्याबाबत दक्षता घेण्यासाठी, नियंत्रण ठेवण्यासाठी व बारकाईने नजर ठेवण्यासाठी एक ॲट्रॉसिटी ऑन मायनॉरिटी सेल या विभागामध्ये सुरु करण्याचा पुढील काळात निर्णय घेण्यात येईल. या सेलमार्फत पाहणी करण्यात येईल. या सेलकडे आलेल्या तक्रारींची दखल घेऊन संबंधित विभागाला सूचना केली जाईल.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. नसीम खान : सभापती महोदय, अल्पसंख्याक विकास विभागाच्या बाब क्रमांक 228 ते 231 पृष्ठ क्रमांक 218 ते 220 वरील एकूण 75 कोटी रुपयाच्या पुरवणी मागण्यांना मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ( सामान्य प्रशासन, शालेय शिक्षण, महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 1 ते 19, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 174 तें 180, महिला व बालविकास विभागाच्या बाब क्रमांक 218, 219 आणि 220, शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 60,61, 62 व 65 आणि सांस्कृतिक कार्य विभागाच्या बाब क्रमांक 222, 223, 224, 225 आणि 226 या पूरक मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करते.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या पूरक मागण्यावरील चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी शिक्षक निवडणुकीच्या कॅम्पेनसाठी काम करतात असा मुद्दा उपस्थित केला. असे करता येत नाही. जेथे कोठे असा प्रकार होत असेल तर त्या बाबतीत चौकशी करुन कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी ज्या संस्थेचा उल्लेख केला त्याची माहिती घेण्यात येईल. कोणतीही संस्था आपल्या शिक्षकांना निवडणुकीचे काम देऊ शकत नाही. असा प्रकार निदर्शनास आला तर त्याबाबतीत ताबडतोबीने कारवाई होऊ शकते.

डॉ. दीपक सावंत : शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी शिक्षक काम करु शकणार नाही काय ?

प्रा. फौजिया खान : मी शिक्षक मतदारसंघाच्या बाबतीत बोलत नाही. ज्या नियमित निवडणुका होतात त्याबाबतीत मी सांगितले. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी मूल्यांकन प्राप्त झालेल्या ज्या अनुदानित शाळा आहेत त्यांना दुसरा टप्पा देण्यासंबंधी उल्लेख केला. त्या बाबतीत देखील निर्णय घेण्यात येईल. निधी देण्यामध्ये कोणतीही अडचण नाही.

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाप्रमाणे आपले बोर्ड करावे असा मुद्दा मांडला. ही गोष्ट खरी आहे की, सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाचा दर्जा उच्च असल्यामुळे त्या शाळांमध्ये आपल्या मुलाने शिकावे असे पालकांना वाटते. म्हणून आपल्या राज्य मंडळाने अभ्यासक्रमामध्ये सुधारणा करुन सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाप्रमाणे अभ्यासक्रम करण्याचा प्रयत्न केलेला असून याची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्यास सुरुवात केलेली आहे. परंतु आपण मूल्यांकनाचे जसे निकष केलेले आहेत त्याप्रमाणे

..3..



MSS/ KTG/ D/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 18:00

प्रा. फौजिया खान...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

राज्य शासनाने ठरवून दिलेले निकष पूर्ण केले नसतील तर एनओसी दिली जाणार नाही. दर्जा टिकविण्याच्या दृष्टीने ही बाब अतिशय महत्वाची आहे.

सभापती महोदय, दुर्बल घटकासाठी 25 टक्के आरक्षण ठेवलेले आहे. दिनांक 15 मार्च 2013ला अधिसूचना काढण्यात आली. 2013-2014 या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया अद्याप सुरु आहे. त्यांना 31 जुलै पर्यंतची वेळ दिलेली आहे. दुर्बल घटकांसाठी आरक्षण ठेवण्याची प्रक्रिया आपण अधिक चांगल्या प्रकारे करीत आहोत.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी शिक्षकांनी 5 कोटी रुपये घेतल्यासंबंधीचा मुद्दा मांडला. या प्रकरणी विभागीय आयुक्तांनी सर्व डॉक्युमेण्ट जप्त केलेली आहेत. या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

सभापती महोदय, मी एका बाबीचा या ठिकाणी उल्लेख करु इच्छिते की, असे प्रकार होऊ शकतात ही गोष्ट मी नाकारु शकत नाही. असे प्रकार कोठेही होऊच शकत नाही असे मी म्हणू शकत नाही. जेथे मनुष्य आहे तेथे असे प्रकार होण्याची शक्यता असतेच. त्यामुळे एक पर्सन इंडिपेंडट प्रणाली निर्माण करणे हाच यावर उपाय होऊ शकतो. आपण शालार्थ पध्दत निर्माण करीत आहोत. शालार्थ पध्दतीतून शिक्षकांचे तसेच इतर संबंधित कर्मचाऱ्यांचे पगार देण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. ही प्रणाली अतिशय चांगली आणि पारदर्शक राहणार आहे. ही प्रणाली विकसित होत आहे आणि थोडयाच कालावधीत त्या प्रणालीची अंमलबजावणी सुरु होणार आहे. मला विश्वास आहे की, दोन-दोन ठिकाणी एकच शिक्षक काम करीत आहे आणि तो शिक्षक दोन्ही आस्थापनेतून पगार घेत आहे अशा काही वेगवेगळया गैरप्रकारांना आळा बसू शकेल. असे प्रकार भविष्यात होऊ नयेत म्हणून शासनाने पर्सन इंडिपेंडंट प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

सभापती महोदय, पटपडताळणीत जे शिक्षक अतिरिक्त आढळून आले, त्यांच्या समायोजनाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. त्यांनी मुद्दा मांडताना असाही उल्लेख केला की, अतिरिक्त शिक्षकांवर कारवाई कशासाठी केली जात आहे. या बाबतीत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने सुचविले होते आणि त्या सूचनेच्या अनुषंगाने मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला आहे. जे अतिरिक्त शिक्षक ठरतील, त्या शिक्षकांचे समायोजन करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची अनुपस्थिती 50 टक्क्यांपेक्षा कमी असेल तर मात्र त्यांच्यावर वेगळया प्रकारची कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

श्री.दिवाकर रावते : त्या शिक्षकांना संस्था चालकांनी नियुक्त्या दिल्या आहेत आणि त्यांनी विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम केलेले आहे. विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याची तसेच विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वाढ करण्याची जबाबदारी संस्था चालकांची आहे. विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वाढ करण्याची जबाबदारी शिक्षकांची नाही. या बाबतीत शिक्षण संस्था चालकांवर कारवाई झाली पाहिजे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : शिक्षण संस्था चालकांवर गुन्हे दाखल करण्यासंबंधीचा देखील शासनाने निर्णय घेतलेला आहे. विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वाढ करण्याची शिक्षकांची सुध्दा जबाबदारी आहे. कारण ते विद्यार्थ्यांना शिकवितात. शाळेत एकही विद्यार्थी नाही आणि त्या संस्थेस अनुदान मिळत आहे. त्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती ठेवण्याची जबाबदारी काही प्रमाणात शिक्षकांची आहे असे मी नम्रपणे नमूद करु इच्छिते. या बाबतीत शासनाने क्वाशस डिसीजन घेतलेला आहे. त्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करीत आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी शिक्षण मंडळाच्या बाबतीत विचारणा केली. शिक्षण मंडळाच्या बाबतीत माननीय न्यायालयाने आदेश दिलेले आहेत की, जो पर्यंत सभागृहामध्ये यासंबंधीची अमेंडमेंट मान्य करीत नाही, तोपर्यंत स्थगिती दिलेली आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सभागृहासमोर सदर अमेंडमेंट सादर केली आहे. त्या अमेंडमेंटचे काय करावयाचे हे विधिमंडळ सभागृहांनाच ठरवावयाचे आहे.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने माननीय श्री.विनोद तावडे आणि सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी भाग घेतला. बालगृहाच्या बाबतीत या ठिकाणी उल्लेख करण्यात आला आहे. बालगृहाच्या बाबतीत मला सांगावयाचे आहे की, ज्या बालगृहात अनियमितता झालेल्या आहेत, त्या बालगृहांची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे. मान्यता रद्द करण्याच्या विरोधात 105 बालगृहांचे संस्थाचालक न्यायालयात गेले आहेत. बालगृहात मूलभूत सुविधा नसल्याच्या कारणास्तव त्यांची मान्यता रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

सभापती महोदय, श्री.गिरी यांच्या बाबतीतही उल्लेख केला गेला. श्री.गिरी यांनी मागणी सादर केली होती (अडथळा)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी माननीय मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण पूर्णपणे ऐकून घ्यावे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, विभागाचे मंत्री या ठिकाणी पूर्णपणे उत्तरे देत नाहीत अशा प्रकारची सन्माननीय सदस्यांकडून तक्रार करण्यात आली होती. त्यामुळे मी माझ्या विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने सविस्तरपणे उत्तर देत आहे. कृपया सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तराचे भाषण पूर्णपणे ऐकून घ्यावे.



प्रा.फौजिया खान....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर करावयात अशा प्रकारची माझी विनंती आहे. त्याचप्रमाणे सांस्कृतिक कार्य विभागाच्या मागण्यांच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले आणि श्री.सुभाष चव्हाण यांनी अतिशय उपयुक्त सूचना केलेल्या आहेत. त्यांच्या सूचनांचा निश्चितपणे विचार करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना सांगू इच्छिते की, मुंबई चित्रनगरीच्या बाबतीत अतिशय चांगला मास्टर प्लॅन तयार करण्यात आलेला आहे.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ D/ KTG/ KTG/ 18:10

प्रा.फौजिया खान.....

तो मास्टर प्लॅन आंतरराष्ट्रीय दर्जाचा राहणार आहे. चित्रनगरीमध्ये फिल्मबाबत सर्व सुविधा असणार आहेत. ॲम्युझमेंट पार्क, युनिव्हर्सल स्टूडिओपेक्षा उत्कृष्ट सुविधा असणारा 3500 कोटी रुपयांचा मास्टर प्लॅन बीओटी तत्वावर अंमलात आणण्याचे ठरविले आहे. त्याचबरोबर कोल्हापूर चित्रनगरीचा सुध्दा मास्टर प्लॅन तयार केला आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्यांवर बोलताना माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे, माननीय सदस्य श्री.हेमंत टकले, ॲड.आशिष शेलार, श्री.रामदास कदम यांनी भाग घेतला आहे. अपघातप्रवण परिसरात ट्रॉमा केअर युनिट असावे अशी मागणी करण्यात आली आहे. राज्याच्या आरोग्य संस्थांचा बृहत आराखडा तयार केला असून प्रत्येक ठिकाणी मोठी गॅप असू नये, ज्या ठिकाणी गॅप असेल ती कमी करण्यासाठी संचालक, आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे. नंतरच्या काळात लोकांच्या ज्या मागण्या आलेल्या आहेत त्या समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. ट्रॉमा केअर युनिट कणकवली येथे 100 बेडचे रुग्णालय सुरु केले असून सिंधुदुर्ग जिल्हयातील सावंतवाडी येथेही एक युनिट सुरु केले आहे. हे सगळे ट्रॉमा केअर सेंटरच पहिल्या टप्प्यामध्ये घेतले आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. कणकवली येथील ट्रॉमा केअर युनिट पूर्ण करण्यासाठी तेथे न्यूरो फिजिशियन, न्यूरो सर्जन, रेडिऑलॉजिस्ट असणे आवश्यक आहे. ही पदे भरली आहेत का? तुमच्याकडे साधे डॉक्टर नाहीत. सुसज्ज ऑपरेशन थिएटर नाही आणि सांगता की ट्रॉमा केअर युनिट सुरु केले आहे.

प्रा.फौजिया खान : बृहत आराखड्यामध्ये ही बाब घेऊन त्यासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. तेथे कोण येऊ इच्छितात त्यानुसार मॅनपॉवरच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे. माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी कम्युनिटी हेल्थ सेंटरचा मुद्दा मांडला आहे. मी सांगू इच्छिते की, आयपीएचएस अंतर्गत 73 रुग्णालये निवडली आहेत.

माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी डॉक्टरांच्या कमतरतेबाबत जो मुद्दा उपस्थित केला तो शासन अमान्य करणार नाही. हे खरे आहे की, ग्रामीण भागामध्ये जाऊन काम करण्यास, खास करुन कोकण भागामध्ये जाण्यासाठी डॉक्टर मंडळी उत्सुक नाहीत. त्यामुळे डॉक्टरांना अधिक इन्सेटिव्ह देण्याचा प्रयत्न करण्यात आला. कॉन्ट्रॅक्ट बेसवर नेमलेल्या डॉक्टरांना 1 लाख रुपये

..2...

प्रा.फौजिया खान.....

पर्यंत महिना पगार देण्याचा प्रयत्न केला, तरीही डॉक्टर मंडळी कोकणात काम करण्यास यायला तयार नाही. म्हणून माझी सूचना आहे, मागील वेळी सुध्दा मी सांगितले होते की, कोकणामध्ये मेडिकल कॉलेज सुरु झाले पाहिजे. जोपर्यंत मेडिकल कॉलेज सुरु होत नाही तोपर्यंत हा प्रश्न मिटणार नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मेडिकल कॉलेज सुरु करण्यासाठी 300 बेडचे रुग्णालय सुरु करावे लागते. ते कोकणामध्ये तरी शक्य नाही. मंत्री महोदया सांगतात की डॉक्टर उपलब्ध होत नाहीत. कोकणामध्ये कोणी काम करण्यास जाऊ इच्छित नाही. मेडिकल कॉलेज स्थापन झाले तर डॉक्टर उपलब्ध होतील असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु मेडिकल कॉलेज सुरु करण्यास 300 बेडच्या रुग्णालयाची आवश्यकता असते. ते होणे शक्य नसल्यामुळे मेडिकल कॉलेज कसे सुरु होणार?

प्रा.फौजिया खान : मनुष्यबळाची अडचण मी मान्य करते. बाहेरचे लोक कोकणात जायला तयार नसतील तर कोण काय करणार? आपण पगार देऊ शकतो, इन्सेटिव्हज देऊ शकतो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, हा कोकणाचा अवमान आहे. कोकणाला कमी लेखले जात आहे. मंत्री महोदयांचे म्हणणे रेकॉर्डवरुन काढून टाकावे.

**तालिका सभापती** : आक्षेपार्ह वक्तव्य रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल.

नंतर 3झेड...1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, कोकणामध्ये डॉक्टर यावेत यासाठी शासन काहीही करण्यास तयार आहे. शासन डॉक्टरांना इन्सेन्टीव्ह देण्यास तयार आहे. परंतु कोकणामध्ये डॉक्टर जाण्यास तयार नाहीत. मी उत्तर देत असतांना सन्माननीय सदस्य ज्या पध्दतीने बोलत आहे ते योग्य नाही. कोकणामध्ये जाण्याचा डॉक्टरांनी ऑप्शन घेतला तर त्यांना 6 इन्क्रीमेंट देण्यात येतात परंतु तरीही कोकणात डॉक्टर जाण्यासाठी इच्छुक नाहीत. सन्माननीय सदस्यांनी कोकणामध्ये डॉक्टर आणून दिले तर शासन त्यांना सेवेमध्ये नक्की घेण्यात येईल. (अडथळा)

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी )** : सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्यानुसार कामकाजातून तो शब्द काढून टाकण्यात आला आहे. त्यामुळे आता माननीय मंत्री महोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्या.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, कोकणाची जी काही वस्तुस्थिती आहे ती मी या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. उत्तर देण्यामध्ये आपल्याकडून अडथळा येत असल्यामुळे (अडथळा) आरोग्य विभागाच्या तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री ):सभापती महोदय, परिवहन व गृहनिर्माण विभागाच्या मागण्यावर सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले तसेच सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्यासंदर्भात निश्चितपणे नोंद घेतली जाईल तसेच त्यासंदर्भात त्यांना कळविले जाईल. सन्माननीय सदस्य प्रा. नवले साहेबांनी सांगितल्या प्रमाणे बीड शहरातील नदीमध्ये अनाधिकृत बांधकाम केले असल्याची तक्रार केलेली आहे त्यामुळे त्यासंदर्भात चौकशी करुन योग्य ती कारवाई केली जाईल.

सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी 1995 चा ट्रान्सफरचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. आपल्या सर्वांना माहिती आहे की, ट्रान्सफर व्हावी अशी शासनाची मानसिकता आहे. परंतु यासंदर्भात सुप्रीम कोर्टाचे निर्बध असल्यामुळे ट्रान्सफर आपल्याला करता आले नाही. यासाठी आपण एसएलपी फाईल करण्याची भूमिका घेतली असून यासंदर्भात 33(1) आणि 33(2) कारवाई सुध्दा झालेली आहे. विधी व न्याय विभागाकडे न जाता आपण आपल्या डीसीआर मध्ये बदल करण्याचा प्रयत्न केला तर आपल्याला एसएलपी फाईल करण्याचीही गरज लागणार नाही तसेच सुप्रीम कोर्टाचीही परवानगी घेण्याची आवश्यकता लागणार नाही. हे अधिवेशन संपल्याच्या दीड महिन्याच्या आत यासंदर्भातील संपूर्ण कार्यवाही पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

सभापती महोदय, यासंदर्भात आपण म्हाडाला स्पष्ट सूचना दिल्या आहेत की, तुम्हाला जिकडे योजना शक्य होईल, त्यासंदर्भातील नावे दाखवा, योजना कशी करणार आहे ते सुध्दा दाखवा व त्यासंदर्भातील संपूर्ण यादी दिली पाहिजे असे सांगितले आहे. या अधिवेशनानंतर प्राधिकरणाच्या पहिल्या बैठकीत हा विषय उपस्थित केला जाईल व यासंदर्भातील यादी सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करुन दिली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाचे 237 कोटी रुपयांच्या व परिवहन विभागाच्या 178 कोटी रुपयांच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

--------

...3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उदय सामंत (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नगरविकास, विधी व न्याय तसेच मराठी भाषा या तीन विभागाच्या पुरवणी मागण्यासाठी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोदजी तावडे, प्रा. सुरेश नवले, सन्माननीय सदस्य सर्वश्री विक्रम नवले, जयंत प्र.पाटील, दिवाकर रावते, हेमंत टकले, ॲड श्री. आशिष शेलार, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयदेव गायकवाड, सुभाष चव्हाण, रामदास कदम, पांडुरंग फुंडकर,डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील व सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी या चर्चेमध्ये सहभाग घेऊन शासनाला अनेक चांगल्या सूचना केलेल्या आहेत.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत....

सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी काही मुद्दे येथे मांडले आहेत. त्यासंबंधी मी अगदी थोडक्यात खुलासा करणार आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या सफाई कामगारांच्या घरांचा प्रश्न त्यांनी येथे मांडला आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाने 1 कोटी 68 लाख रूपये दिलेले आहेत. यात 90 टक्के हिस्सा महाराष्ट्र शासन देणार आहे. सदर घरे बांधण्यासंबंधीचे टेंडर काढून हे काम आपण लवकरात लवकर सुरू करण्यात येईल.

डहाणू नगरपालिकेच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मुद्दा उपस्थित करून चौकशी केली पाहिजे अशी मागणी केली आहे. यासंबंधी आम्ही जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल मागविला आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे ग्राह्य मानून जिल्हाधिकाऱ्यांकडून चौकशी करून पुढील कार्यवाही केली जाईल.

भिवंडी येथील जकात नाके हे नियमानुसारच सुरू आहेत. मोनोरेलचे काम सुरू असताना अपघात झाल्याची बाब देखील त्यांनी उपस्थित केली आहे. संबंधित कंत्राटदाराने बाधित कुटुंबाला नुकसान भरपाई दिलेली आहे.

सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी देखील येथे काही मुद्दे उपस्थित केले आहेत. खड्ड्यांसंबंधी महापालिकेला सूचना द्याव्यात असे देखील त्यांनी सांगितले आहे. यासंबंधी महानगरपालिकेला लवकरात लवकर सूचना देण्यात येतील.

सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी तीन महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यांनी येथे भ्रष्टाचार झाला आहे असा मुद्दा उपस्थित केला आहे. याबाबत चौकशी केली जाईल. त्यात जर तथ्य आढळले तर संबंधितांविरूद्ध नक्की कारवाई करण्यात येईल.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी नर्सिंग होम संबंधीचा मुद्दा उपस्थित केला आहे. यासंबंधी मी माझ्या स्तरावर डॉ.दीपक सावंत यांच्या समवेत बैठक आयोजित करून कार्यवाही करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी येथे 232 कोटी रूपयांचा उल्लेख केला आहे. मी एवढेच सांगतो की, नगरपालिकांवर अन्याय होणार नाही याची दक्षता महाराष्ट्र शासनातर्फे नक्की घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत .....

एलबीटीच्या संबंधी देखील उल्लेख करण्यात आला आहे. एक टक्क्याचा मुद्रांक शुल्क महाराष्ट्र शासनाने देण्याची तरतूद केलेली आहे. यात्रा अनुदानासाठी आम्ही 6 कोटी 50 लक्ष इतकी वाढीव रकमेची मागणी येथे करण्यात आली आहे. नगरविकास विभागाच्या 883 कोटी 61 लाख 59 हजार रूपयांच्या पुरवणी मागण्या मान्य कराव्यात अशी सभागृहाला विनंती करीत आहे.

विधी व न्याय विभागा संबंधी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी माझगाव कोर्टासंबंधातील एक मुद्दा मांडला आहे. माझगाव येथील बांधकाम 1997 मध्ये झाले ही वस्तुस्थिती आहे. या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट केल्यानंतर ही इमारत पडणार आहे असे लक्षात आले. त्यावेळीच तेथील सर्व न्यायालयांचे स्थलांतर करण्यात आले आहे. यासाठी एक कोटी तीस लाख रूपयांचे एस्टीमेट तयार केले आहे. एस्टीमेट संबंधात योग्य ती कार्यवाही झाल्यानंतर इमारतीच्या दुरूस्तीचे काम लवकरात लवकर सुरू केले जाईल.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी श्री.शिंदे यांच्या संबंधातील मुद्दा मांडला आहे. श्री.शिंदे साहेबांना मुदत वाढ देण्यात आली आहे असे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले आहे. ही वस्तुस्थिती खरी आहे. त्यांना मुदतवाढ नियमाप्रमाणे देण्यात आलेली आहे. दिनांक 9.11.1995 च्या नियमाप्रमाणे ही मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यांना शासनाचे वाहन दिले जाते असे त्यांचे दुसरे म्हणणे होते. त्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, त्यांना कोणतेही शासकीय वाहन पुरविण्यात आलेले नाही.

धर्मादाय आयुक्त कार्यालयात कशा प्रकारची यंत्रणा असली पाहिजे यासंबंधात सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले साहेबांनी मुद्दा मांडलेला आहे. त्या सर्व गोष्टी आम्ही विचारात घेऊ. मी आपल्या अनुमतीने विधी व न्याय विभागाच्या 85 व 89.....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अपंगां संबंधी म्हटले आहे की, अपंगांबद्दलचा अहवाल पाठविण्यात आलेला आहे. मी असा आरोप केला आहे की, अहवाल पाठविलेलाच नाही. आपण जर अहवाल पाठविला असेल तर त्याची मला तारीख सांगावी.

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, या संबंधात सविस्तर माहिती घेतली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले आहे की, आम्ही करणार नाही...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती तपासून पाहिली जाईल.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने बाब क्रमांक 85 व 89 येथे नमूद केलेल्या योजनांतर्गत 2 कोटी 24 लाख इतक्या तसेच 124 ते 132 विधी व न्याय विभागाच्या योजनांतर्गत 6 कोटी 86 लाख 97 हजार व पूरक नियोजन 1 कोटी 1 लाख 18 हजार रूपयांच्या पुरवणी मागण्या मान्य कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

तिसरा एक अतिशय महत्त्वाचा विषय आहे. महाराष्ट्र शासनाने सांस्कृतिक धोरण जाहीर केले. त्यावेळी मुंबईमध्ये मराठी भाषा भवन आवश्यक आहे अशा प्रकारची भूमिका घेतली.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत...

मराठी भाषा विभागाची मागणी क्रमांक झेडएफ-3ए बाब क्रमांक 232 सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च या लेखाशीर्षाखाली मुंबई येथे भाषा भवन बांधण्यासाठी 11 कोटी 19 लक्ष रुपयांची मागणी मान्य करावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय मंत्री ) : सभापती महोदय, पशुसंवर्धन, दुग्य व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय या विभागांच्या मागण्यांवर चर्चा करताना सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मराठवाड्यामध्ये एकात्मिक दूध विकास योजनेंतर्गत एकूण 16 संस्थांना मदत केलेली आहे असा मुद्दा मांडला. आपण प्रत्येक जिल्ह्यामध्ये दोन प्रकल्प घेतलेले आहेत. त्यातील 12 प्रकल्प सुरु आहेत तर 4 प्रकल्पांबाबत चौकशी करुन त्याची यादी सन्माननीय सदस्यांना पाठविण्यात येईल. तसेच ज्या संस्थांनी निधीचा उपयोग केला नसेल त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या मागण्या क्रमांक डी-4, डी-5 व डी-6 अंतर्गत 31 कोटी 66 लाख 16 हजार रुपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.पद्माकर वळवी (क्रीडा व युवक कल्याण मंत्री ) सभापती महोदय, क्रीडा व युवक कल्याण विभागाची मागणी क्रमांक ई-3 बाब क्रमांक 63 व 64 खालील एकूण रुपये 18 कोटी 10 लक्ष रुपयांची पूरक मागणी सभागृहाने मंजूर करावी अशी मी विनंती करतो.

--------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय, व्यसनमुक्ती कार्य, विमुक्त/भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण मंत्री ) : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या 316 कोटी 46 लाख 13 हजार रुपयांच्या मागण्यांना सभागृहाने मंजुरी द्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, या विभागावर बोलताना अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगल्या व मौल्यवान सूचना केलेल्या आहेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दोन-तीन मुद्दे उपस्थित केले गडचिरोली जिल्ह्यामध्ये नोकर भरतीमध्ये ओबीसीची टक्केवारी खूप कमी झाली आहे असा मुद्दा त्यांनी मांडला. त्यांनी मांडलेली वस्तुस्थिती खरी आहे. परंतु हा विषय सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारित येत असल्यामुळे त्या विभागाला तसे कळविण्यात येईल.

सभापती महोदय, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या अध्यक्षांबद्दल अनेक लेखी स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत असा मुद्दा मांडण्यात आला. त्या संदर्भात महात्मा जोतिबा फुले विकास महामंडळाच्या एम.डी.मार्फत माहिती घेण्यात येईल. जर काही अनियमितता झाली असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी जात पडताळणी प्रमाणपत्रा संदर्भात दिनांक 31 जुलै पर्यत अर्ज करावा असा मुख्य सचिवांनी काढलेला जी.आर.रद्द करावा असे सांगितले. आपणास तो जी.आर.रद्द करता येणार नाही. कारण काही कर्मचाऱ्यांनी मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या नोकऱ्या अनेक वर्षापासून लाटलेल्या आहेत. सन 2001 मध्ये दोन्ही सभागृहाने त्या संदर्भातील कायदा मंजूर केलेला आहे. अर्ज सादर करण्याची मुदत जुलै महिन्यापर्यंत आहे परंतु त्यामध्ये आणखी वाढ करता येईल काय किंवा पेन्शनमध्ये काही सवलत देता येईल काय या संदर्भात माननीय मुख्यमंत्री आणि संबंधित विभाग विचार करणार आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी निश्चिंत असावे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी राज्यातील वसतिगृहांच्या संदर्भात मुद्दा मांडला होता. राज्यामध्ये एकूण 371 शासकीय वसतिगृहे आहेत. त्यापैकी 239 वसतिगृहे बांधून पूर्ण झालेली आहेत. काही वसतिगृहांसाठी जमिनी उपलब्ध आहेत आणि काही वसतिगृहांचे बांधकाम अर्धवट अवस्थेत आहेत ते पूर्ण करण्यात येईल.

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी दाभोळ येथील प्रश्न विचारला होता. मी त्या बाबत सांगू इच्छितो की, एस.पी.यांनी जी माहिती दिली त्या आधारे उत्तर दिलेले आहे. तेव्हा त्या प्रकरणी योग्य ती चौकशी होईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी अधिकाऱ्याची चौकशी केली नाही, त्यांना शिक्षा झाली नाही असे सांगितले.

यानंतर श्री.बोर्डे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे....

परंतु काही पुरावे सापडले नाहीत. त्यामुळे त्यांची पुण्याहून सांगलीला बदली करण्यात आली आहे. तसेच त्यांनी विचारले की, जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे किती अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. या निमित्ताने सांगतो की, वर्ग-1 च्या दोन अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्यात आलेले आहे.

महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी विचारले की, 176 कोटी रुपये आणि 300 कोटी रुपये पुरवणी मागण्यांमध्ये का दाखविले. मी त्यांना सांगू इच्छितो की, ही ठोक रक्कम होती. ती कोठे ना कोठे गुतवावयास हवी होती. त्यामुळे नागरी आणि ग्रामीण दलित वस्त्यांतील कामांसाठी त्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे. ही रक्कम नागरी व ग्रामीण भगातील वस्त्यांतील शेवटच्या माणसांवर खर्च होणार आहे, म्हणून त्यासाठी तरतूद करण्यात आली आहे.

महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड यांनी सांगितले की, आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना जादा सोयी सवलती मिळतात. परंतु मी त्यांना सांगतो की, तसे काही नाही. राज्य सरकारने वसतिगृहांना 100 कोटी रुपये अतिरिक्त देण्याचा प्रयत्न केला आहे.

सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी मागासवर्गीयांची भूमिका जोरात मांडली आहे. त्यांची मागासवर्गीयांबद्दल नेहमीच तळमळ असते. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या इतिहासामध्ये भाग भांडवलाची टक्केवारी 50, 30, 20 अशा प्रकारे कमी कमी होत होती. परंतु आम्ही त्या महामंडळाला 2011-12 मध्ये 150 कोटी रुपये आणि 2012-13 मध्ये 150 कोटी रुपये जादा भाग भांडवल उपलब्ध करुन करुन देऊन त्या महामंडळाला समृध्द करण्याचा प्रयत्न केला आहे. या महामंडळाची लाभार्थ्याला 5 लाख रुपये थेट कर्ज देण्याची योजना आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांना सांगू इच्छितो की, औद्योगिक सहकारी संस्था उभारावयाची असल्यास लाभार्थ्याला 7 कोटी रुपये देण्यात येतात. परंतु या ठिकाणी जास्तीत जास्त लोकांना संधी मिळावी म्हणून कर्ज वाटपावर मर्यादा आहे. ओ.बी.सी., व्ही.जे.एन.टी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांना पैसे मिळाले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. मागच्या वर्षीचे 800 कोटी रुपये आणि या वर्षीचे पैसे देण्यासाठी 1400 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. वित्त विभागाने 80 टक्के म्हणजे 1123

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोटी रुपये उपलब्ध करुन दिल्यामुळे संस्था आणि विद्यार्थ्यांना पैसे मिळतील. केवळ 12 जिल्हे असे आहेत की, त्यांना पैसे देताना आधार कार्डाचा आधार घ्यावा लागेल. त्यासाठी थोडा वेळ लागेल. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना याबाबतच्या सूचना दिल्या आहेत.

महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर पिचड (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या बाब क्रमांक 190 ते 201 यासाठी 153 कोटी 85 लाख 90 हजार रुपयांची मागणी करण्यात आली असून, त्या मागण्या सभागृहाच्या मंजुरीसाठी ठेवण्यात आल्या आहेत.

महोदय, या मागण्यांवर चर्चा करीत असताना सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी श्री.हळबे, तत्कालीन ए.पी.ओ. यांच्याकडून करण्यात आलेल्या भ्रष्टाचाराबाबतचा मुद्दा मांडला. या प्रकरणी जो अपहार झाला होता त्या बाबत श्री.हळबे यांना निलंबित करण्यात आले होते. परंतु दि.11 जून, 2012 रोजी त्यांना पुन्हा सेवेत घेण्यात आले. त्यांनी केलेला अपहार मला अक्षम्य वाटत असल्यामुळे त्यांची फेरचौकशी करण्यात येईल्. फेरचौकशीमध्ये ते दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितले की, शालेय विद्यार्थ्यांना वेळेत गणवेश मिळाले पाहिजे, खावटी कर्ज वेळेत मिळाले पाहिजे तसेच जादा दराने तांदूळ खरेदी करु नये. मी प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी आजच उत्तर दिले होते की, या संदर्भात चौकशी करण्यात येईल. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी बिस्कीटे व प्रोटीन पॉवडरची खरेदी केली जाते. या संदर्भातील प्रश्न उपस्थित झाल्यानंतर मी सांगितले होते की, अशा प्रकारे खरेदी करण्याची पध्दत गैर आहे. जी तज्ज्ञ मंडळी आहेत त्यांनी ठरविले पाहिजे की, मुलांना पोषक असे कोणते पदार्थ आहेत. ते पदार्थ योग्य असतील तरच खरेदी करावी. त्यामुळे या वस्तूंच्या खरेदीची पध्दत बदलली जाईल.

महोदय, खावटी कर्जाबाबत या ठिकाणी सांगण्यात आले. राज्य सरकारने निर्णय घेतला आहे की, खावटी कर्ज आता धान्य रुपाने नव्हे तर रोख स्वरुपात देण्यात यावे. रोख स्वरुपात खावटी कर्ज देण्याची पध्दत आता सुरु करण्यात आली आहे.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आश्रमशाळा हस्तांतरणाबाबतचा तसेच त्यामध्ये गैरप्रकार झाल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, आता मी हस्तांतरणाचे संपूर्ण धोरणच बदलले आहे. हस्तांतरण प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणणारे धोरण तयार केलेले आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकरराव पिचड ...

सभापती महोदय, मच्छरदाण्यांची जी खरेदी झालेली आहे तसेच जव्हार मोखाडा येथे धान्य देण्याच्या संदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आला. एकूण आदिवासी विकास खाते हे विकासाचे खाते असावे यादृष्टीने त्याकडे लक्ष दिले जाईल आणि त्यासाठी ज्या ज्या सुधारणा कराव्या लागतील त्या बाबतीत वेळप्रसंगी कठोर निर्णय घेऊ परंतु विकासाचे काम झाले पाहिजे या साठी या सर्व मागण्या मंजूर कराव्या अशी मी सभागृहाला विनंती करतो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी.पी.सावंत ( उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या संदर्भातील पुरवणी मागण्यांच्या चर्चेमध्ये सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री विक्रम काळे, दिवाकर रावते, हेमंत टकले, कपिल पाटील यांनी आपला सहभाग नोंदविला.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी पॉलिटेक्निकमध्ये कंत्राटी पध्दतीवर जे अधिव्याख्याते आहेत त्या संदर्भातील विषय मांडला. ही गोष्ट खरी आहे की, 2002 ते 2004 च्या आसपास जवळजवळ 800 ते 850 कंत्राटी अधिव्याख्याते आपण पॉलिटेक्निकमध्ये भरले. या पोस्ट एमपीएससीच्या अखत्यारीतील होत्या. कालांतराने 2006 साली कर्नाटक शासन विरुध्द उमादेवी या प्रकरणामध्ये सुप्रीम कोर्टाचा निर्णय आला आणि त्यामध्ये या सर्वांच्या बॅक डोअर एंट्री बंद झाल्या. त्यामुळे या सर्वांना आपण डायरेक्ट अपॉईन्टमेंट देऊ शकत नव्हतो. तरी सुध्दा 2010 साली एमपीएससीने जेव्हा जाहिरात दिली तेव्हा यातील अनेक लोक गुणवत्तेच्या आधारावर घेतले गेले. आज सुध्दा 641 पदांची जाहिरात काढलेली आहे. यातील आणखी काही लोक त्यामध्ये गुणवत्तेच्या आधारावर जातील. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी सांगितल्याप्रमाणे यातील 81 लोक एजबार होत आहेत म्हणजे त्यांचे वय जास्त होत आहे. आजही अनेक क्षेत्रामध्ये आपल्याकडे जागा रिक्त राहणार आहेत. या सर्वांना आपण जॉबलेस होऊ देणार नाही असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी या ठिकाणी प्राध्यापकांचा प्रश्न उपस्थित केला. कलाम महाविद्यालयाला 90 टक्के देतो त्यामध्ये 10 टक्के वाढ करुन 100 टक्के करावे असे त्यांनी सांगितले. शासनाचे हे 1988 चे धोरण आहे आणि त्यामध्ये फेरविचार करण्याचे सध्या तरी विचाराधीन नाही. सन्माननीय सदस्यांनी 1991 ते 2000 च्या संदर्भात प्राध्यापकांचा प्रश्न उपस्थित केला. त्याचा उल्लेख मघाशी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून केला. 1991 ते 2000 यामधील जे लोक नंतर क्वालिफाय झालेले आहेत त्यांची नियुक्तीच्या दिनांकापासून सेवा ग्राह्य धरावी अशा प्रकारचा प्रस्ताव विभागातर्फे सुध्दा तयार करण्यात आलेला आहे आणि तो प्रस्ताव विचाराधीन आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी. पी. सावंत .....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी श्री. हस्ते, सह संचालक यांच्या संदर्भात विचारणा केली होती. श्री. हस्ते, सह संचालक, अमरावती विभाग यांच्या अनियमिततेच्या बऱ्याच गंभीर तक्रारी आल्या होत्या. त्यास अनुसरुन शासनाने त्यांच्या विरुध्द दोन विभागीय चौकशा लावल्या होत्या. त्यांच्यावर आता दोषारोपण झालेले आहे. लवकरात लवकर आपण या दोन्ही चौकशी समितीचा निर्णय आपण देऊ.

श्री. दिवाकर रावते : दोन वर्षे हे चालू आहे.

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, आताच त्यांच्या विरोधात दोषारोपण झालेले आहे.

श्री. दिवाकर रावते : दोन महिन्यात, तीन महिन्यात करु असे सांगावे.

श्री. डी.पी.सावंत : लवकरात लवकर करण्यात येईल असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या 796 कोटी 23 लाख 68 हजार रुपयांच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ( पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री ) : सभापती महोदय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या पूरक मागण्यांवरील चर्चेत सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी बीडच्या संदर्भात काही प्रश्न उपस्थित केले होते. अनेक पाणीपुरवठा योजना अपूर्ण आहेत असे त्यांनी सांगितले. मी माहिती देऊ इच्छितो की, आपण 2012-2013 आणि 2013-2014 च्या बृहत आराखड्याला एकत्रित मंजुरी दिली होती. त्यामध्ये 771 योजनांना मान्यता दिली होती. त्यापैकी 330 योजना पूर्ण झालेल्या आहेत. 441 योजना प्रगतिपथावर असून त्या अंतिम टप्प्यात आहेत. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न तक्रारीच्या अनुषंगाने ऑडीटमध्ये काही सापडल्याबाबत उपस्थित केला. यामध्ये 15 ग्रामपंचायती अशा आहेत की ज्यामध्ये जवळपास 2 कोटी 24 लाख रुपयांचा अपहार झाल्याचे ऑडीटमध्ये निदर्शनास आले आहे. त्यामध्ये 2 ग्रामपंचायतींकडून परत काम पूर्ण करुन घेतलेले आहे. 6 ग्रामपंचायतींवर पोलीस केस केलेली आहे आणि आणखी 5 ग्रामपंचायतींवर करणार आहोत. दोन ग्रामपंचायतीमध्ये पाणी पुरवठा समितीने काम पूर्ण करण्याची इच्छा दर्शविलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे.......

त्यामुळे ते काम शासन करणार आहे. स्त्रोत बळकटीकरणाबाबत त्यांनी मुद्दा मांडलेला आहे. शिवकालीन योजनेच्या माध्यमातून स्त्रोत बळकट करण्यासाठी किंवा सक्षम करण्यासाठी त्या ग्रामपंचातीला कोणतीही योजना घेता येईल.

सभापती महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची बाब क्र.221 वरील मागणी सभागृहाने एकमताने मंजूर करावी अशी मी विनंती करतो.

**तालिका सभापती ( श्री.मोहन जोशी)** : सन 2013-14 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपलेली आहे.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

**पाणी समस्या व व्यवस्थापन या विषयावरील परिसंवादबाबत घोषणा**

**तालिका सभापती** : बुधवार, दिनांक 24 जुलै, 2013 रोजी दुपारी 4 ते सायंकाळी 6.30 या कालावधीत मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे "पाणी समस्या व व्यवस्थापन" या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. सदरहू परिसंवादामध्ये डॉ.राजेंद्र सिंह, जागतिक दर्जाचे जलतज्ज्ञ व मॅगसेसे पुरस्कार विजेचे आणि शिरपूर पॅटर्नचे प्रणेते श्री.सुरेश खानापूरकर, वरिष्ठ भू-वैज्ञानिक यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. कृपया सर्व माननीय सदस्यांनी या परिसंवादास उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या, बुधवार, दिनांक 24 जुलै, 2013 रोजी सकाळी 11 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 41 मिनिटांनी,
बुधवार, दिनांक 24 जुलै, 2013 रोजीच्या सकाळी 11 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही